# पाश्चिमात्य राजकीय विचारवंत


लेखक

**डॉ. संभाजी संतोष पाटील**

सहयोगी प्राध्यापक

श्री.शि.वि.प्र.संस्थेचे भाऊसाहेब ना.स. पाटील साहित्य

व मु.फि.मु.अ. वाणिज्य महाविद्यालय, देवपूर, धुळे



**SIDDHI PUBLISHING HOUSE**

**NANDED – 431605.**

**ISBN No.: 978-81-960521-2-6**

**लेखक**
**डॉ. संभाजी संतोष पाटील**
**मो. नंबर : ९४२३७३०५११**

*

**प्रकाशक**
सिद्धी पब्लिकेशन,
मारोती मंदिराजवळ,
भावसार चौक, तरोडा खु. नांदेड़
मो. 9623979067
ईमेल – shrishprakashan2009@gmail.com
Website : www.wiidrj.com
*
**अक्षर जुळवणी**
डॉ. राजेश गंगाधरराव उंबरकर
*
**मुद्रक**
अनुपम प्रिंटर्स
श्रीनगर, नांदेड़. मो. 9175324437
© सर्व अधिकार संपादकाकडे
*
**प्रथम आवृत्ती**
**24 मे 2022**
**किंमत : 400 /- रु**

# :: समर्पित ::

**खान्देशचे महान जेष्ठ नेते,**

**उत्कृष्ट संसदपटू, माजी मंत्री**

**आदरणीय दाजीसाहेब**

## श्री. रोहिदासजी चुडामण पाटील

# :: मनोगत ::

पाश्चिमात्य राजकीय विचारवंत हे पुस्तक आपल्या हाती देतांना अतिशय आनंद होत आहे. या पुस्तकातुन प्लेटो, ॲरिस्टॉटल, मॅकिव्हली, हॉब्ज, जॉन लॉक, रुसो, हेगेल, जॉन स्टुअर्ट मील, कार्ल मार्क्स, मॅक्सवेबर या प्राचीन व विसाव्या शतकातील मांडलेल्य विविध विचारांची ओळख होणार आहे. बदलत्या परिस्थितीनुसार विविध पाश्चात्य विचारवंतांनी जे विचार मांडलेले आहेत त्यांची ओळख व्हावी, शासकीय धोरण ठरवितांना पाश्चात्य विचारवंतांचे विचार मार्गदर्शक ठरावेत या उद्देशाने विषयांची मांडणी करण्यात आली आहे. प्लेटोपासुन मॅक्सवेबरपर्यंत सर्व विचारवंतांचा एकच समान हेतू दिसतो. तो म्हणजे मानवी जीवन अधिक उन्नत, उत्तम करणे त्यासाठी राज्यव्यवस्था व समाजव्यवस्था यांचे स्वरुप व भूमिका कशा प्रकारची असावी हे त्यांनी सांगितले आहे. सारख्याच प्रश्नांची त्यांनी दिलेली भिन्न - भिन्न उत्तरे म्हणजेच विविध राजकीय सिध्दांत होत. विद्यार्थी हे शिक्षकांचे दैवत. विद्यार्थ्यांच्या कुवतीचा विचार करुन पुस्तकाची मांडणी साधी, सरळ सोप्या भाषेत केलेली आहे. विद्यार्थी वर्ग माझ्या पुस्तकाचे स्वागत करतील असा विश्वास वाटतो. हे पुस्तक कोणतीही राजकीय व्यवस्था, प्राध्यापक, विद्यार्थी मित्र, संशोधक यांना निश्चितपणे उपयोगी पडणार आहे. या पुस्तकाच्या लेखन कार्यास मला अनेक मित्र व हितचिंतकांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. त्याबद्दल सर्वांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करणे हे माझे कर्तव्य समझतो.

माझ्या लेखन कार्यास पितृतुल्य अप्पासाहेब प्राचार्य डॉ. पी.डी. देवरे यांची प्रेरणा लाभलेली आहे. श्री.शि.वि.प्र. संस्थेचे चेअरमन आमदार बाबासाहेब श्री. कुणालजी पाटील, उपाध्यक्ष डॉ. संजय पाटील, उपाध्यक्ष श्री. प्रफुल्लकुमार सिसोदे, प्रशासकिय अधिकारी श्री. प्रमोद पाटील, प्राचार्य डॉ. मनोहर पाटील, प्राचार्य डॉ. संजय सोनवणे, प्राचार्य डॉ. एम.व्ही. पाटील, प्राचार्य डॉ. एम.एच. शिंदे, प्राचार्य डॉ. आर.आर. अहिरे, प्राचार्य डॉ. अशोक खैरनार, प्राचार्य डॉ. आर.बी. पाटील, प्रा. शशीकांत बोरसे, डॉ. रवि वाघ, डॉ. मोहन पावरा, डॉ. जितेंद्र तलवारे, प्रा.ए.आर. पाटील, प्रा.के.व्ही. महाले यांच्या

मार्गदर्शन व प्रोत्साहनामुळे हा ग्रंथ पुर्ण करु शकलो तसेच डॉ. विजय तुंटे, डॉ. महेंद्र पाटील, डॉ. मनिषा कचवे, डॉ. आनंद पवार, ग्रंथपाल बबन गावीत आणि महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य मिळाले त्यांच्या ऋणात राहु इच्छितो.

महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. प्रमोद पवार यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाल्याने मी हे पुस्तक आपल्या हाती देत आहे. कौटुंबिक परिवारातुन आई सौ. जयवंताबाई संतोष शिंदे, वडील अण्णासाो. श्री. संतोष नथु शिंदे, पत्नी सौ. संगिता पाटील, कन्या कु. दिव्या व मुलगा नीलवर्ण यांच्या सहकार्यामुळे प्रस्तुत ग्रंथ लिखाणाचे काम पुर्णत्वास आले.

**डॉ. संभाजी संतोष पाटील**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| १. | प्लेटो | ०७ |
| २. | ॲरिस्टॉटल | ३४ |
| ३. | मॅकिव्हली | ५४ |
| ४. | थॉमस हॉब्ज | ६५ |
| ५. | जॉन लॉक | ७५ |
| ६. | जीन जॅक्स रुसो | ८४ |
| ७. | हेगेल | ९९ |
| ८. | जॉन स्टुअर्ट मिल | १०९ |
| ९. | कार्ल मार्क्स | १२२ |
| १०. | मॅक्स वेबर | १४२ |
| | संदर्भ ग्रंथसुची | १५९ |

### प्रकरण १ ले

# प्लेटो - Plato

## (इ.स. ४२८ ते इ.स. ३४७)

---

प्राचीन ग्रीक विचारवंत प्लेटो हा अतिशय बुध्दीमान विचारवंत होता. ग्रीकची राजकीय तत्वज्ञानाची सुरुवात प्लेटोच्या आधी झालेली होती. पण प्लेटोच्या पुर्वीचे राजकीय तत्वज्ञान लिखीत स्वरुपाचे नव्हते. प्लेटोच्या पूर्वी सॉक्रेटिस या विचारवंताने मौखिक स्वरुपात राजकीय तत्वज्ञानाची मांडणी केली होती. सॉक्रेटीसची पध्दती प्रश्नरुप म्हणजे संवादात्मक स्वरुपाची होती. नंतर सॉक्रेटीसचे विचार ग्रंथरुपाने प्लेटोने लिहीले म्हणून प्लेटो हा राजकीय तत्वज्ञान मांडणारा पहिला राजकीय विचारवंत ठरतो. सॉक्रेटिस आणि प्लेटो यांचा बराच संबंध आल्याने प्लेटोच्या विचारांवर सॉक्रेटिसच्या विचारांचा बराच प्रभाव पडलेला आढळून येतो. प्लेटोच्या विचारांचे प्रमुख स्फुर्तीस्थान म्हणजे सॉक्रेटिस असेही म्हणता येईल.

**जीवन परिचय :**

प्लेटोचा जन्म ग्रीसमधील अथेन्स या नगरराज्यात इ.स.पूर्व ४२७ मध्ये झाला. प्लेटोच्या जन्माच्या वेळेस अथेन्सची लोकशाही ढासळायला सुरुवात झाली होती. लोकशाहीच्या भरभराटीचा काळ ओसरला होता. सॉक्रेटिसच्या मृत्युच्या वेळी प्लेटोचे वय २८ वर्षाचे होते. सॉक्रेटिस हा प्लेटोचा गुरु होता. सॉक्रेटिसला विषप्राशन करुन मृत्युदंडाची शिक्षा झाली होती. त्यांच्या मृत्युचा प्लेटोच्या मनावर फार परिणाम झाला होता. प्लेटोचा विचार शासनात सक्रीय सहभाग घेण्याचा होता. सॉक्रेटिसच्या मृत्युनंतर त्याने आपला विचार बदलला अशा प्रकारे प्लेटो तत्वज्ञानाकडे आकर्षित झाला. प्लेटो अथेन्स सोडून प्रवासासाठी निघाला. जवळ जवळ त्याने १२ वर्ष इजिप्त, इराण, बाबीलोनीया, सिसिली, आफ्रिका इत्यादी भागात प्रवास केला. अथेन्सला पुन्हा येऊन त्याने ॲकडमी नावाची शिक्षणसंस्था स्थापन केली. त्याने शिक्षणाचे कार्य शेवटपर्यंत केले. अथेन्सच्या सामाजिक जीवनाविषयी नव्याने विचार करण्याची आवश्यकता त्याला वाटली. प्लेटोने आपल्या आयुष्यातील शेवटचा

पन्नास वर्षाचा काळ स्वतःच स्थापन केलेल्या विद्याश्रमात (Academy) अध्ययन, अध्यापन आणि ग्रंथलेखन करण्यात घालविला. त्याचे रिपब्लिक (Republic) स्टेटस्मन (Statesman) आणि लॉज (Laws) हे तीन ग्रंथ प्रसिध्द आहेत. प्लेटोने आपल्या ग्रंथात राजकारण, समाजशास्त्र, नीतितत्वे, धर्मकल्पना, अर्थशास्त्र, मानसशास्त्र इत्यादी अनेक विषयांचा परामर्श घेतला आहे. राज्यशास्त्राने नीतितत्वाच्या अधीन असले पाहिजे यावर प्लेटोचा मुख्य भर होता. म्हणूनच राज्याची सुत्रे समाजातील नीतिमान आणि तत्वज्ञ यांच्या हाती असली पाहिजेत असे तो प्रतिपादन करतो.

**प्लेटोची तत्वज्ञ शासकाची कल्पना :**

Until Philosoper's are king's or the king's and the princesss of the world have spirit and the power of philosophy cities will never have rest from their eviles." जोपर्यंत तत्वज्ञ शासक राजे बनणार नाहीत किंवा राजे आणि राजपूत्र यांना तत्वज्ञ बनण्याची आवड निर्माण होणार नाही तोपर्यंत नगर राज्ये दोषमुक्त होणार नाहीत.

प्लेटोने आपल्या आदर्श राज्याची कल्पना मांडली. ती सॉक्रेटीसच्या मृत्युने त्यांच्यावर झालेल्या परिणामामुळेच. त्याचे आदर्श राज्य हे अव्यवहारी आहे पण अवास्तव मात्र नाही. त्याने नगर राज्यातील शासन पध्दतीचे चांगले भाग एकत्र केलेत व त्यानुसार तत्वज्ञ शासनाचे तीन टप्पे सांगितले - १) इंद्रियजनस्थ ज्ञान, २) बुध्दीजनस्य ज्ञान, ३) आत्मजनस्य. गुहेत असलेल्या व्यक्तिस इंद्रियजन्य ज्ञान असते. बुध्दीजनस्थ ज्ञान असलेला मनुष्य गुहेच्या तोंडाशी असतो आणि केवळ अंर्तज्ञान प्राप्त असलेला मनुष्य हा गुहेच्या बाहेर असतो. म्हणजेच प्रकाशात असतो व असा मनुष्य हा आपल्या भोवतालचे विश्व योग्य रितीने जाणू शकतो. कारण त्याला आत्मिक ज्ञान प्राप्त झालेले असते. तो स्वार्थापलिकडे गेलेला असतो. प्लेटो आपल्या राज्यात कायद्याला महत्व देत नाही. कारण तो म्हणतो, "तत्वज्ञ शासक राज्य चालविणार असतील तर कायद्याची काय आवश्यकता?" तसेच तो म्हणतो, "जर राज्यातील लोक चारित्र्यहिन असतील तर कायदे आवश्यक ठरतात, व जर राज्यातील लोक चारित्र्यवान असतील तर कायदे निरुपयोगी सिध्द होतात."

म्हणून तो कायद्यावर आधारलेल्या न्यायाला महत्व देत नाही. तत्वज्ञ शासक आत्मज्ञान असल्याने त्याला चांगले वाईट उचीत-अनुचीत कळू शकते, ते स्वार्थापासून अलग असतात. समाजात सर्वांना न्याय मिळावा म्हणून प्लेटोने तत्वज्ञ शासकाची कल्पना मांडलेली आहे.

**Discuss Critically Plato's ideal of philosopher King -** प्लेटोने आपल्या राज्याच्या कल्पनेत तत्वज्ञ शासक असावा असे सांगितले. न्यायाधिष्ठीत राज्याची कल्पना मांडत असतांना प्लेटोने न्यायाचे वैयक्तिक आणि सामाजिक स्वरुप स्पष्ट केले. व्यक्तिच्या गुणांमध्ये बुध्दी हा सर्वश्रेष्ठ गुण आहे. बुध्दीचे व्यक्तीवर जसे नियंत्रण असते तसे बुध्दीमान लोकांचे समाजावर नियंत्रण असावे. त्यातून तत्वज्ञ शासकाची कल्पना उदयाला आली. "Republic" या आपल्या ग्रंथात प्लेटोने तत्वज्ञ लोकांना श्रेष्ठस्थानी बसवून आपला गुरु सॉक्रेटिस प्रती आदर आणि श्रध्दा व्यक्त केली.

"Republic" हा ग्रंथच मुळी संवादात्मक स्वरुपाचा आहे. या ग्रंथात प्रश्नाची उत्तरे सॉक्रेटिस देत आहे असे दर्शवून प्लेटोने आपल्या गुरुवरील प्रेम व्यक्त केले आहे. तत्वज्ञ राजाची कल्पना परिस्थिती सापेक्ष आहे. प्लेटोच्या काळी अथेन्समध्ये प्रत्यक्ष लोकशाही होती. सामान्य लोकांच्या हातात सत्ता होती. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याचा अतिरेक झाला होता. अशा स्थितीत अथेन्सची अवनिती थांबविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे तत्वज्ञ राजाच्या हाती राज्यकारभाराची सुत्रे सोपविणे होय. प्लेटोने आपल्या Republic ग्रंथात असे स्पष्ट केले आहे की, तत्वज्ञ राजा होत नाही तोपर्यंत नगरराज्ये दोषमुक्त होणार नाहीत. यावरुन असे स्पष्ट होते की, तत्वज्ञ राजा ही कल्पना तर्कशुध्द आहे. आदर्श राज्य हे न्यायाशी संबंधित आहे. न्यायाधिष्ठित राज्य स्थापन होण्यासाठी बुध्दीवान लोकांनीच राज्यकारभार करावा असा प्लेटोचा आग्रह होता. बार्कर हा लेखक या संबंधात म्हणतो, "आदर्श राज्याच्या रचनेच्या पध्दतीतील एक तर्कशुध्द परिपाक म्हणजे तत्वज्ञ राजा होय."

व्यक्ति आणि राज्य यात सामर्थ्य आहे. कारण राज्य हे व्यक्तीचे व्यापक रुप होय. जाड भिंगातून जशी बारीक अक्षरे स्पष्ट दिसतात तसेच राज्यसंस्थेमध्ये व्यक्तीचे व्यक्तिमत्व अधिक खुलून दिसते. जे गुण मानवामध्ये आहेत तेच गुण राज्यातही आहेत. बुध्दी, साहस आणि वासना (क्षुधा) हे तीन

मनुष्याचे गुण तसेच राज्याचेही होतात. व्यक्ति आणि राज्य यांचा अलग विचार असंभव आहे. या गुणांना अनुसरुनच समाजात तीन वर्ग असावेत. बुध्दीचे प्रतिनिधीत्व करणारा तत्वज्ञ वर्ग साहस किंवा धैर्याचे प्रतिनिधित्व करणारा सैनिक वर्ग व वासनेचे प्रतिनिधित्व करणारा कामगार, शेतकरी वर्ग ज्या लोकांमध्ये बुध्दी हा गुण इतर दोन लोकांच्या गुणांपेक्षा जास्त असेल ते लोक तत्वज्ञ वर्गात समाविष्ट होतील. साहस या गुणाचे प्राबल्य असणारे लोक सैनिक वर्गात येतील व वासना हा गुण इतर दोन गुणांपेक्षा अधिक प्रमाणात असेल तर लोक उत्पादक/शेतकरी वर्गात मोडले जातील. समाजाच्या या तीनही वर्गांपैकी पहिल्या वर्गाने म्हणजे तत्वज्ञ वर्गाने राज्यकारभार पहावा असे प्लेटोने सांगितले. बुध्दीचे नियंत्रण नसेल तर व्यक्तिचा गोंधळ होतो. त्याचप्रमाणे समाजावर बुध्दीप्रधान वर्गाचे नियंत्रण नसेल तर समाज गोंधळलेल्या अवस्थेत सापडेल. त्या समाजाची उन्नती होणार नाही. संपत्तीचा मोह असणाऱ्या व्यापारी वर्गाकडे जर सत्ता गेली तर संपूर्ण समाजाचा सर्वनाश होतो असे प्लेटोचे स्पष्ट मत होते. "तत्वज्ञ राजा" असा शब्द प्रयोग प्लेटोने जाणीवपूर्वक केलेला आहे. राजा तत्वज्ञ असावा अशी अपेक्षा कशासाठी? असा प्रश्न पडतो.

### ❖ प्लेटोला अभिप्रेत असलेला तत्वज्ञ शासक -

प्लेटोला अभिप्रेत असलेला तत्वज्ञ फार वेगळा आहे. जगापासून अलिप्त राहून चिंतनात मग्न असलेला तत्वज्ञ प्लेटोला अभिप्रेत नाही तर बुध्दीवैभवाच्या आधाराने सत्यं-शिवं-सुंदरम याचे आकलन होते तो तत्वज्ञ. ज्ञानाची सतत तळमळ असणारा तसेच सतत जो जिज्ञासू असतो तो तत्वज्ञ, कलाकार जो असतो तो खरा तत्वज्ञ. असा तत्वज्ञ शास्त्रज्ञही असतो आणि कुशल राज्यकर्ताही असतो. समाजात राहून समाजाची चिंता करणारा आणि समाजाला चिंतामुक्त करण्याच्या दृष्टीकोनातून केवळ विचार करणारा नव्हे तर उत्तम प्रकारे प्रशासन करणारा असा तत्वज्ञ प्लेटोला अभिप्रेत होता.

त्याने कल्पिलेल्या तत्वज्ञाचे जीवन समाजात असते. तत्वज्ञ समाजापासून दूर अशा एकाकी आणि चिंतनशिल स्थितीत नसतो. तो तत्वज्ञ असला तरी त्याला व्यवहार पाहावा लागतो.

### ❖ तत्वज्ञ राजाच्या पात्रतेच्या अटी / निकष -

कोणतीही व्यक्ती तत्वज्ञ राजा होवू शकत नाही. प्लेटोच्या काळात कोणतीही व्यक्ति प्रशासन होवू शकत होती व त्यामुळे समाजात गोंधळ माजला होता. राजा हा गुणवान असावा असे प्लेटोला वाटत होते आणि म्हणूनच त्याने तत्वज्ञ राजाची संकल्पना पुरस्कारली व त्याच्या पात्रतेच्या अटी/निकष स्पष्ट केलेत.

१. राजाजवळ विशेष स्वरुपाची बुध्दीमत्ता असली पाहिजे. ज्ञान हा सर्वश्रेष्ठ गुण आहे या तत्वाला अनुसरुन प्लेटोने हा गुण सांगितला. राजाला उत्तम स्मरणशक्ती असली पाहिजे. पण केवळ स्मरणशक्ती म्हणजे ज्ञान नव्हे, तर राजाला कोणत्याही प्रश्नाचे त्वरीत आकलन झाले पाहिजे व त्यावर योग्य असा उपाय सुचविला पाहिजे. समाजातील सर्व लोकांमध्ये हे गुण नसतात त्यामुळे राजाची निवड काळजीपुर्वक केली पाहिजे.

२. राजा बुध्दीमान असला तरी त्याच्यावर उत्तम संस्कार असले पाहिजेत व त्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे. तत्वज्ञ राजा हा जन्मभर विद्यार्थी असतो. त्यामुळे त्याने सतत शिकले पाहिजे. वयाच्या २० व्या वर्षी त्याची बुध्दी चाचणी घेऊन बुध्दीमान व्यक्ति निवडल्या पाहिजेत. या काळात राज्यकारभाराचे व्यवहारीक शिक्षण घेतले पाहिजे. ५० व्या वर्षी शिक्षण पूर्ण झाले असे समजू नये तर सत्ता हाती आल्यावर शासकाने शिक्षण चालूच ठेवावे.

३. शिक्षणाने व्यक्तिवर उत्तम संस्कार होतात असा प्लेटोचा विश्वास होता. प्लेटोला व्यक्तितील स्वार्थ नष्ट करावयाचा आहे. हे माझे आणि हे तुझे हा स्वार्थी विचार घालवून तत्वज्ञ राजाला समाजहितासाठी वाहून घ्यायचे आहे आणि म्हणूनच प्लेटोने सामुदायीक जीवनाची कल्पना सुचविली आहे. त्यालाच प्लेटोचा साम्यवाद म्हणतात. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी निर्माण होण्यासाठी तत्वज्ञ राजांनी एकत्र जीवन जगले पाहिजे. त्याच्या पोषणाची जबाबदारी शेतकरी आणि कारागिर या वर्गाकडे सोपविली

पाहिजे. तत्वज्ञ राजाने आपल्या गरजा कमीतकमी केल्या पाहिजेत तो चैनी/विलासी असू नये तर तो नेहमी चिंतनशिल प्रवृत्तीचा असावा.

### ❖ तत्वज्ञ शासकासाठी सांगितलेली आचारसंहीता -

व्यक्तिवर जसे बुध्दीचे नियंत्रण असते तसेच समाजावर बुध्दीमान व्यक्तिचे नियंत्रण असावे असे प्लेटोचे मत आहे व त्यातूनच त्याने तत्वज्ञ शासकाचे चित्र रेखाटले आहे. तत्वज्ञ हा सर्वज्ञ असतो, त्यामुळे त्याच्या हाती अमर्याद सत्ता असते. त्याच्यावर कुणाचेही नियंत्रण नाही. त्याच्यावर फक्त एकच नियंत्रण आहे व ते म्हणजे विवेकाचे नियंत्रण होय. हे नियत्रण नैतिक आणि व्यक्तिगत स्वरुपाचे आहे. अमर्याद सत्ता प्राप्त असलेल्या तत्वज्ञ शासकाकडून समाजात प्रमाद घडणार नाही काय? या प्रश्नाचा प्लेटोने विचार केला व तत्वज्ञ शासकाकडून सत्तेचा दुरुपयोग होवू नये म्हणून त्याच्यासाठी त्याने आचारसंहीता सांगितली.

१. तत्वज्ञ राजाने न्यायाधिष्ठित राज्य स्थापन करण्याच्या दृष्टीने प्रत्येक व्यक्तिच्या अंगचे गुण लक्षात घेवून त्यानुसार त्याला काम द्यावे. साहसी मनुष्य असेल तर त्याला सैनिक बनवावे, वासना असलेल्या व्यक्तिला कारागीर व शेतकरी बनवावे, राजाकाकडे शिक्षण व्यवस्था असावी कारण शिक्षणातून संस्कार होतात आणि शिक्षणामुळेच गुणवत्ता वाढीला लागते.
२. राज्याच्या लोकसंख्येवर तत्वज्ञ राजाचे बारीक लक्ष असावे. लोकसंख्या बेताचीच असावी. लोकसंख्या फार वाढली तर भूमी अपूर्ण पडते, दारिद्रय येते व समाजाची एकात्मता नष्ट होते. लोकसंख्या कमी असेल तर पुरेसे सैनिक, शेतकरी, कारागीर उपलब्ध होणार नाहीत.
३. राज्य हे आर्थिक दृष्टीने अतिवैभव संपन्न नसावे व दरिद्रीही नसावे. कारण अतिवैभव माणसाची नितिमत्ता बिघडवीते व दारिद्रय माणसाची कार्यक्षमता कमी करते.

प्लेटोने राजा स्वार्थरहित असावा असे सांगितले. त्याची राहणी साधी असावी, तो चिंतनशिल असावा. पण त्याचबरोबर समाजामध्ये सतत रममाण

होणारा असावा. प्लेटोने तत्वज्ञ शासकाच्या वैयक्तिक जीवनाचाच विचार केला नाही तर त्याच्या सामाजिक जीवनाचाही विचार केलेला आहे.

### ❖ तत्वज्ञ शासकाच्या कल्पनेचे परिक्षण -

प्लेटोने Republic या ग्रंथात तत्वज्ञ राज्यकर्त्याचे गुण, कार्य आणि वैशिष्ट्ये वर्णन केलेली आहेत. परंतु प्लेटोने तत्वज्ञ राज्यकर्त्याची कल्पना विशद करतांना काही महत्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष केले आहे.

१. तत्वज्ञ राज्यकर्त्यांच्या हाती राज्याची सुत्रे देतांना प्लेटोने तत्कालीन ग्रीक लोकांच्या राज्यविषयक कल्पनांकडे दुर्लक्ष केले. ग्रीक लोकांच्या मते कायद्याचे सार्वभौमत्व मान्य असलेल्या नागरिकांचा समाज म्हणजे राज्य ही प्राचीन ग्रीकांची राजा संबंधीची कल्पना होती. परंतु प्लेटोने अमर्याद सत्ता असलेल्या आणि कायद्याच्या बंधनातून मुक्त असलेल्या तत्वज्ञ राज्यकर्त्यांची केलेली कल्पना ही एकतंत्री शासनाकडे झुकणारी आहे. बुध्दीचे श्रेष्ठत्व मान्य करतांना प्लेटोने बहुसंख्य अशा लोकांना त्याच्या राज्यात यंत्राचा दर्जा प्राप्त करुन दिला आहे. प्लेटोच्या मते ज्ञान हा केवळ समाजातील काही थोड्या लोकांचा विशेष अधिकार आहे. जनतेच्या सामुहिक ज्ञानापेक्षा तत्वज्ञ राज्यकर्त्याचे ज्ञान हे श्रेष्ठ आहे असे प्लेटो मानतो. प्लेटोच्या या मताने किंवा विचाराने प्रत्यक्ष लोकशाही किंवा प्रातिनिधीक लोकशाही अशक्य असते. असे जे प्लेटोने दर्शविले ते अवास्तव वाटते.

२. प्लेटोने तत्वज्ञ राज्यकर्त्यांसाठी सांगितलेल्या शिक्षण पध्दती, अर्थशास्त्र, कायदेशास्त्र, लष्करी डावपेच इ. आवश्यक असलेल्या विषयांचे शिक्षण देण्याची व्यवस्था केलेली नाही. त्याच्या शिक्षण पध्दतीत संगीत, गणित, तर्कशास्त्र यासारख्या अमुर्त शास्त्राच्या अध्ययनावर भर दिला आहे.

आदर्श प्रशासकांना या विषयांचे ज्ञान असून भागणार नाही, तर निरनिराळ्या व्यक्तिंसाठी, काळासाठी आणि देशासाठी कोणत्या गोष्टी योग्य आहेत आणि कोणत्या अयोग्य आहेत हे ठरविण्याची पात्रता शासकाची

असावयास पाहीजे. केवळ गणित-शास्त्रात किंवा समाजशास्त्रात निष्णात असून भागणार नाही तर इतर विषयांचेही समाजज्ञान शासकाला असले पाहीजे.

३. तत्वज्ञ राज्यकर्त्यांची कल्पना लोकांमध्ये प्रिय होणे केवळ अशक्य वाटते. राजकारणामध्ये तत्वज्ञ शासक कितपत टिकेल याची शंका वाटते. तत्वज्ञ राज्यकर्त्याचा मानसिक पिंड मुख्यतः तत्वज्ञानाचा असल्याने तो आपला अधिकाधिक वेळ चिंतनात घालविल व त्यामुळे वस्तुस्थितीकडे त्याच्याकडून दुर्लक्ष होण्याची जास्त संभावना आहे.

४. प्लेटोने आपल्या तत्वज्ञ शासकाच्या कल्पनेत कायदा या संस्थेचे अवमुल्यन केले आहे. जे की बुध्दीला पटत नाही. वस्तुतः कोणत्याही एका व्यक्तिच्या विकासापेक्षा कायदा हा अधिक संयमी आणि अनुभवावर आधारलेला असतो. त्यामुळे कायद्याचे अस्तित्व नागरिकांना हितकारक ठरते. प्लेटोने मात्र भावनेच्या भरात आपल्या राज्यातून कायद्याचे उच्चाटन केले आहे.

५. तत्वज्ञ राज्यकर्ता भवितव्यतेच्या विचारात अथवा भूतकालीन विचारात अधिक गं ुग राहण्याची शक्यता असल्याने वर्तमान काळातील घडामोडींकडे लक्ष देण्यास तो असमर्थ ठरेन.

अशाप्रकारे प्लेटोच्या तत्वज्ञ शासकाच्या कल्पनेवर अनेक प्रकारचे आक्षेप घेण्यात आले आहेत. ते सर्व आक्षेप योग्य आहेत. असे जरी म्हटले तरी आत्मदर्शक भूमिकेतून विचार केल्यास प्लेटोची तत्वज्ञ राज्यकर्त्याची कल्पना उच्चकोटीची आहे यात शंका नाही. परंतु या कल्पनेस प्रत्यक्ष व्यवहारात मुर्त स्वरुप प्राप्त करुन देणे हे देखील तेवढेच अवघड काम आहे हे नाकारुन चालणार नाही.

**प्लेटोचा न्यायविषयक सिध्दांत -**

प्लेटोने न्यायाधिष्ठीत न्यायाची कल्पना केलेली आहे. या ग्रंथात त्याने आपली न्यायविषयक कल्पना मांडत असतांना तत्कालीन न्यायविषयक सिध्दांताची खंडण केले आणि त्यानंतरच आपला न्यायविषयक सिध्दांत मांडला आहे. प्लेटोने आपला Republic हा ग्रंथ लिहीत असतांना संवादात्मक पध्दती (Titois) स्विकारली आहे. "Best Titois on

Justics" असे या ग्रंथाचे वर्णन केले जाते. न्यायाची स्थापना करणे हा प्लेटोचा उपदेश असल्याने त्याने न्यायाच्या प्रस्थापनेसाठी आदर्श राज्याची कल्पना केली आहे. प्लेटोचे न्यायविषयक विचार हे अत्यंत मौलिक स्वरुपाचे आहेत. प्लेटोच्या काळी जे न्यायासंबंधीचे परंपरागत सिध्दांत प्रचलित होते ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१. न्यायासंबंधी परंपरागत सिध्दांत: Traditional Theory of Justics किंवा सिफॉलसचा सिध्दांत -**

"सत्य बोलणे आणि आपल्या ऋणातून मुक्त होणे म्हणजेच न्याय" अशी न्यायाची व्याख्या सिफॉलसने केली. परंतू त्याचे विवेचन करण्यापूर्वीच त्याचा मृत्यु झाला. त्यामुळे त्याचे स्पष्टीकरण त्याचा पुत्र फॉली मार्क्स याने केले. फॉली मार्क्स म्हणतो, "सत्य बोलणे म्हणजे उचित वर्तणूक करणे/ज्याची वस्तू त्याला देणे." म्हणजेच मित्राशी मित्रत्व आणि शत्रूशी शत्रूत्व वर्तणूक होय. प्लेटोने त्या सिध्दांताचे खंडण केले आहे. प्लेटो म्हणतो मित्राशी मित्रत्व आणि शत्रूशी शत्रुत्व वर्तणूक ठेवणे म्हणजे न्याय असे मानले तर मित्र कोण - आणि शत्रू कोण हे जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे. कित्येकदा बाह्य वर्तणूक मित्रत्वाची असू शकते व अंतर्मन मात्र शत्रूत्वाचे असण्याची शक्यता असते. अशावेळी मित्र म्हणून वर्तणूक दिली तर ती वर्तणूक न्याय्य ठरणार नाही. कारण मित्र कोण आणि शत्रू कोण हे जाणून घेणे ही एक कला आहे. कलेचा तर सदुपयोगही होतो व दुरुपयोगही होवू शकतो. शल्यचिकित्सक याला वाटले तर तो व्यक्तीला जिवदान देतो, किंवा मृत्युमुखी पडतो. ही गोष्ट न्यायाला धरुन होणार नाही. थोडक्यात न्याय बाह्यवर्तणुकीशी संबंधीत गोष्ट नव्हे तर तो आत्म्याचा गुण आहे.

**२. क्रांतीकारी दृष्टीकोन किंवा थ्रेसीमेक्र्सचा सिध्दांत - Raotical Theory of Justics**

"बलवान मनुष्याचे हित म्हणजेच न्याय" ही व्याख्या थ्रेसीमेकर्सने केली. बळी तो कान पिळी हा नियम क्रांतीकारी सोफिस्टांना मान्य आहे. थ्रेसीमेकर्स म्हणतो, "समाजात जे बलवान असतात त्यांचेच समाजावर शासन असते, नियंत्रण असते. त्यांचे म्हणणे सर्वांना मान्य करावेच लागते. शासनाच्या आज्ञांचे पालन करणारी व्यक्तिच न्याय असते." असे थ्रेसीमेकर्सचे

मत आहे. पण त्याने दुसऱ्या ठिकाणी असे म्हटले आहे की, "कार्याचे औचित्य तर कार्यापासून मिळणाऱ्या आनंदावर आहे" थ्रेसीमेकर्स अशाप्रकारे रोज परस्पर विरोधी विधाने करित आहे. शासकाच्या आज्ञांचे पालन केले तर ती व्यक्ती प्रशासकाप्रत न्याय करेल पण स्वत:च्या बाबतीत मात्र न्याय करणार नाही. स्वत:च्या बाबतीत न्याय करायचे म्हटले तर शासकाच्या बाबतीत न्याय करु शकत नाही. प्लेटो म्हणतो, शासन करणे हा एक भाग आहे, शरीरातील कोणाच्या न कोणाच्या दोषांच्या कारणांचा परिणाम स्वरुपातून कलेचा जन्म होत असतो. गुरु हा शिष्यांच्या मेंदूतील दोषांना दूर करतो. म्हणून शिक्षण ही एक कला आहे. डॉक्टर रोग्याचा रोग नाहीसा करतो. रोग्याला रोगमुक्त करणे ही सुध्दा एक कलाच आहे. डॉक्टरांनी आपले कार्य केले किंवा शासनाने निस्वार्थ बुध्दीने प्रेरित होवून शासीकांचे हीत सांभाळले तर न्यायाची प्रस्थापणा होते. थ्रेसिमेकर्सचा सिध्दांत धर्माहून अधर्म श्रेष्ठ मानतो. अन्याय न्यायापेक्षा चांगला असे म्हणणे होय, आणि म्हणून प्लेटोने हा ही सिध्दांत त्याज्य ठरविला आहे.

### ३. कार्यकारणासंबंधीचा / व्यावहारिक / ग्लाऊकनचा सिध्दांत - Pragmeatist Theory of Justics-

ग्लाऊकनच्या मते न्याय हा नैसर्गिक नसून कृत्रिम आहे आणि तो परंपरा तसेच प्रथांवर अधिष्ठीत असतो. जेव्हा मनुष्य केवळ निसर्गावर अवलंबून होता तेव्हा त्याच्यावर अन्यायच होत गेला. निसर्ग अवस्थेमध्ये जीवन जगणे मनुष्याला अशक्यप्राय झाले तेव्हा दुर्बल व्यक्तिंनी परस्परांमध्ये एक करार केला या करारामध्ये कायद्याचे स्वरुप निश्चित करण्यात आले आणि या कायद्याच्या आचरणाने आदर्श नियम मानण्यात आले. मनुष्य केवळ भितीमुळेच नितिनियमांचे पालन करु लागला. न्यायदेखील अशाच प्रकारे सुरु झाला. म्हणूनच न्याय हा भितीचा परिणाम आहे. ग्लाऊकन पुढे असे म्हणतो की, न्याय करारातून उत्पन्न झाला आणि त्याने आपली उपयोगिता सिध्द केली. भितीतून शासक निर्माण झालेत आणि भित्रे लोक त्या शासकांच्या आज्ञांचे पालन करु लागलेत. प्लेटोने याही सिध्दांताला त्याज्य ठरविले. न्याय केवळ उपयोगितेवर आधारित नसतो.

अशाप्रकारे त्याच्याकाळी अस्तित्वात असलेले न्यायविषयक सिध्दांताचे प्रथम खंडन केले आणि मगच आपला न्यायविषयक सिध्दांत प्रस्थापित केला. प्लेटोच्या मते "न्याय हा आत्म्याचा गुण आहे. ती एक आंतरीक अवस्था आहे. न्याय म्हणजे आत्म्याच्या विकासाची अंतिम पायरी आहे. न्याय मनुष्य स्वभावाची एक गरज आहे. न्यायाचे वास्तव्य व्यक्तिच्या अंत:करणात असते आणि व्यक्तिचे विकसित स्वरुप म्हणजे राज्य आणि म्हणून न्याय हा व्यक्ति आणि राज्य या दोघांत असतो." परंतु राज्यात न्यायाचे अस्तित्व जास्त जाणवू शकते. ज्याप्रमाणे लहान लहान अक्षरे जाड भिंगातून पाहिली असता ठळक आणि मोठी दिसतात त्याचप्रमाणे व्यक्ति-व्यक्तितील न्याय राज्याच्या माध्यमातून जास्त स्पष्ट दिसतो. म्हणूनच प्लेटो असे म्हणतो की, "न्याय म्हणजे राज्यरुपी शरीराचा आत्मा आहे व आदर्श राज्यापासून तो अलग होवू शकत नाही. राज्यातील शासक, सैन्य आणि उत्पादक हे तीन्ही वर्ग जर एक दुसऱ्याच्या कार्यात हस्तक्षेप करु लागलेत तर न्यायाची स्थापना होणार नाही."

**प्रो. सबाईन -** यांच्या मते "न्यायाचे बंधन समाजाला एकतेच्या सुत्रात बांधते. आपआपल्या योजनेनुसार कर्तव्ये पार पाडणाऱ्यांच्या समन्वयाचे नाव म्हणजे न्याय." न्याय हा एक व्यक्तिगत आणि सामाजिक गुण आहे. यामुळे राज्यातील घटकांचे अधिकतम कल्याण होते.

**बार्करच्या मते :** "समाजामध्ये विभिन्न प्रकारच्या व्यक्ति असतात. उदा. राज्यकर्ते सैनीक आणि उत्पादक या व्यक्ति एक दुसऱ्यांच्या आवश्यकता पूर्ण करण्यासाठी समाजात संघटित होतात. स्वधर्माचे पालन करुन समाजाला एकतेच्या सुत्रात बांधतात." प्लेटोने सामाजीक जीवनाच्या या मुलभूत सिध्दांतालाच न्याय मानले आहे.

**प्लेटोच्या न्यायविषयक सिध्दांताचे परिक्षण -**

१. बार्करच्या मते - प्लेटोचा न्याय वास्तविक न्याय नाही तर मनुष्याला आपल्या कर्तव्यापर्यंत सिमित करणारी भावना आहे. प्लेटोचा न्याय म्हणजे केवळ नैतिक भावना आहे.

२. प्लेटोच्या मते मनुष्यात वासना, साहस व बुध्दी यापैकी एक प्रवृत्ती प्रधान असते. पण मनुष्यातील एकच प्रवृत्ती कायम स्वरुपी प्रधान

असते असे म्हणता येत नाही. कारण निरनिराळ्या परिस्थितीत मनुष्यातील निरनिराळ्या प्रवृत्ती प्रबळ होवू शकतात.

३. प्लेटोचा न्याय निष्क्रिय स्वरुपाचा आहे. न्यायाच्या बळावर व्यक्ति अधिकारासाठी संघर्ष करते. पण प्लेटोने न्यायाला इतके आत्मसंयमीत बनविले आहे की, सामाजीक उन्नतीच्या दृष्टीने तो सक्रिय भूमिका वठवू शकत नाही.
४. प्लेटोने आपल्या न्यायसिध्दांतात कर्तव्याला प्रमुख स्थान दिले. परंतु अधिकारांना मात्र स्थान दिलेले नाही. न्यायाच्या प्राप्तीसाठी तो व्यक्तिला राज्यात विलीन करुन टाकतो. त्यामुळे व्यक्तिच्या विकासाच्या दृष्टीने ही गोष्ट हानीकारक आहे.
५. प्लेटोचा न्याय स्वामीभक्ताकडे झुकला आहे.
६. प्लेटोने आपल्या न्यायसिध्दांतात तत्वज्ञानी शासकाला इतकी सत्ता प्रदान केली आहे की, तो निरंकुश बनू शकतो.
७. शासक आणि सैनिक यांच्यासाठी त्याने संपत्तीचा व स्त्रीयांचा साम्यवाद सांगितला आहे. वासनापूर्तीसाठी स्त्रीयांशी त्यांनी अल्पकाळ सहवास करावा असे तो म्हणतो. म्हणजेच त्याने केवळ मनुष्याच्या वासना या तत्वाकडे लक्ष दिले आहे आणि आंतरिक भावनेकडे दुर्लक्ष केलेले आहे. म्हणून प्लेटोची न्यायविषयक कल्पना उच्चकोटीतली असली तरी समतोल स्वरुपाची वाटत नाही.

**प्लेटोची शिक्षण विषयक योजना**

प्लेटोच्या Republic या ग्रंथात त्याने आपली शिक्षण विषयक कल्पना मांडली आहे. प्लेटोने शिक्षणाला अनन्य साधारण महत्व दिले आहे. न्यायाचे राज्य प्रस्थापित करण्याच्या दृष्टीकोनातून त्याने आपली शिक्षण विषयक योजना प्रतिपादन केली आहे. व्यक्तिला जोपर्यंत आपल्या कर्तव्याची जाणीव होत नाही तोपर्यंत न्याय प्रस्थापित होवू शकत नाही ही जाणीव शिक्षणामुळे निर्माण होत असल्यामुळे प्लेटोने शिक्षणाला श्रेष्ठ स्थान दिले आहे. प्लेटोच्या मते शिक्षणाचा उद्देश आपल्या अंतर्गत असलेल्या प्रवृत्ती ओळखून त्यानुसार व्यक्तिस कार्य करावयास लावणे होय.  तसेच त्या कार्यात नैपुण्य प्राप्त करुन देणे याशिवाय जर काही व्यक्ती मानसिक दृष्ट्या अपरिपक्व

असतील तर त्याची कारणे शोधून त्या व्यक्तिला मानसिकदृष्ट्या सुदृढ करणे हा देखील शिक्षणाचा एक उद्देश आहे. प्लेटोच्या मते शिक्षण हे मानसिक रोगांकरीता मानसिक उपचार करण्याचा प्रयत्न होय. जास्तीत जास्त चांगले किंवा सद्‌गुणी जीवन जगणे हे मानवी जीवाचे उद्दिष्ट आहे आणि हे उद्दिष्ट योग्य प्रकारच्या शिक्षणाद्वारे साध्य होवू शकते. प्लेटोच्या मते शिक्षणामुळेच चांगले जीवन जगण्यासाठी आवश्यक अशी परिस्थिती व्यक्तिलाही निर्माण करता येवू शकते. प्लेटोचे असे ठाम मत होते की, शिक्षणामुळेच शरिराचा विकास होतो. मनुष्य स्वभावात शिक्षणामुळे सुधारणा घडवून आणता येवू शकते. नैतिक शिक्षणामुळे मनुष्य परोपकारी बनतो. प्लेटोने शिक्षणावर इतका भर दिला आहे की, रुसोला त्यामुळे असे म्हणावेसे वाटते की, "Republic" हा ग्रंथ राज्यशास्त्रावरील ग्रंथ नसून तो शिक्षण शास्त्रावरील ग्रंथ आहे. बार्कर या लेखकाने प्लेटोच्या शिक्षणाचे उद्दिष्ट स्पष्ट करतांना असे म्हटले आहे की, प्लेटो शिक्षणाद्वारे निरनिराळ्या वर्गात कर्तव्याची भावना निर्माण करु इच्छितो. व्यक्तिला समाजहित भावना व सत्य शोधण्याची प्रवृत्ती हाच शिक्षणाचा उद्देश होय.

**प्लेटोची शिक्षणविषयक योजना -** प्लेटोच्या शिक्षणविषयक योजनेचे उद्दिष्ट पाहिल्यावर त्याच्या शिक्षण योजनेवर विचार करणे आवश्यक आहे. प्लेटोने शिक्षणाचे दोन भाग केले आहेत. १) प्राथमिक शिक्षण, २) उच्च शिक्षण.

**१) प्राथमिक शिक्षण -**

लहानपणापासून तरुण अवस्थेपर्यंत दोन्ही वर्ग सारखेच आहेत. परंतु उच्च शिक्षण मात्र युवा अवस्थेपासून प्रौढ अवस्थेपर्यंत फक्त शासक वर्गासाठी आहे. प्राथमिक शिक्षणाची विभागणी प्लेटोने तीन विभागात केली आहे.

(अ) १ ते ६ वर्षापर्यंत, (ब) ६ ते १८ वय वर्षापर्यंत, (क) १८ ते २० वय वर्षे

१ ते ६ वय वर्षापर्यंत मुलांना नैतिक आणि धार्मिक शिक्षण साध्या कथांच्या द्वारे देता येईल. मुलांना धार्मिक व नैतीक गोष्टी सांगून मुलांमध्ये चांगल्या सवयी निर्माण करणे आणि मुलांवर चांगले संस्कार करणे, ६ ते १८ वर्षापर्यंत दिल्या जाणाऱ्या शिक्षणात शारिरिक व बौध्दीक असे दोन्ही प्रकारचे

शिक्षण देण्यात येईल. त्याचबरोबर संगीत या विषयावर देखील प्लेटोने भर दिला.

प्लेटोच्या मते सर्वश्रेष्ठ शिक्षण म्हणजे आत्म्याच्या विकासासाठी संगीत व शरिराच्या विकासासाठी व्यायाम होय. संगीत हे आत्म्याचे अन्न आहे तर व्यायाम हे शरीराला स्वस्थ ठेवते, व त्यामुळे स्वस्थ नागरिक निर्माण होतात. तिसऱ्या टप्प्यात म्हणजे १८ ते २० वर्षापर्यंतच्या मुलामुलींसाठी प्लेटोने सैनिकी शिक्षणाचा पुरस्कार केला आहे. त्याच्या मते सैनिकी शिक्षणामुळे नागरिक शिस्तबध्द होवून आज्ञापालन व संयम या गुणांची त्यांच्यात वाढ होते.

**२) उच्च शिक्षण -**

प्लेटोने उच्चशिक्षण केवळ वरिष्ठ वर्गासाठी सांगितले आहे. २० वर्षापर्यंत शिक्षण पूर्ण झाल्यावर एक सार्वजनिक परीक्षा घेण्यात येईल व जे विद्यार्थी यशस्वी होतील अशा विद्यार्थ्यांनाच उच्च शिक्षण देण्यात येईल व जे विद्यार्थी अयशस्वी होतील त्यांना उत्पादक वर्गात समाविष्ट केले जाईल. प्लेटोने उच्च शिक्षणासाठीही दोन टप्पे सांगितले आहेत. एक २० ते ३० वय वर्षापर्यंचा शिक्षणाचा काळ, या काळात गणित व विज्ञान याबाबत शिक्षण दिले जाईल. प्लेटोच्या मते गणित, तर्कशास्त्र, ज्योतिषशास्त्र या विषयाचे ज्ञान देखील फार आवश्यक आहे. या काळात विद्यार्थ्यास सैनिकी शिक्षण देखील दिले जाईल. २० ते ३० वय वर्षातील शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुन्हा एक परीक्षा घेण्यात येईल व जे अयशस्वी होतील ते सैनिक वर्गात मोडले जातील. विद्यार्थ्यांना पुन्हा ३० ते ३५ वयापर्यंत तर्कशास्त्राचे शिक्षण देण्यात येईल. कारण तर्कशास्त्रामुळे शुध्द ज्ञानाची प्राप्ती होवू शकते व याच शिक्षणामुळे तत्वज्ञ शासन निर्माण करता येतील असा प्लेटोचा विश्वास होता. ३० ते ३५ वर्षापर्यंत अभ्यास पूर्ण केल्यानंतर ज्यांना सत्याचे ज्ञान झाले आहे ते राज्यकारभार करतील. प्लेटो असे म्हणतो की, शिक्षण हे कधीच न संपणारे असते. त्यामुळे शासनकर्ते सतत शिक्षण घेत राहतील. शिक्षण हे श्रध्दांतीक राहणार असून व्यावहारिक राहिल.

**प्लेटोच्या शिक्षण योजनेतून खालील गोष्टी स्पष्ट होतात -**

१. शिक्षणाची योजना प्रदिर्घ स्वरुपाची असून वयाच्या ५० व्या वर्षापर्यंत अभ्यासक्रम शिकावयाचा आहे.

२. फक्त निवडक विद्यार्थ्यांनाच उच्च शिक्षण आहे. प्राथमिक शिक्षणाचा शेवट चाचणी परीक्षेच्या योजनेत आहे.

३. शिक्षणात तात्वीक शिक्षणाला महत्व असले तरी वयाच्या ३६ व्या वर्षापर्यंत निवड लोकांना राज्यकारभाराचे व व्यावहारिक शिक्षण देण्याची योजना आहे.

४. शिक्षणातून शरीर, मन, बुध्दी यांचा विकास व्हावा अशी अपेक्षा आहे. शारिरीक विकासासाठी व्यायामशास्त्र, वैद्यकिय व आहार यांचा समावेश आहे. मानसिक विकासासाठी संगीत शास्त्र आहे. बौध्दिक विकासासाठी तर्कशास्त्र, गणित तत्वज्ञान हे विषय आहेत.

५. बालवयातच मुलांवर उत्तम संस्कार झाले पाहिजेत म्हणून त्यांना धार्मिक, नैतिक धडे वयाच्या ६ वर्षांपर्यंत द्यावेत.

६. देशाच्या रक्षणाची जबाबदारी नागरिकांची असल्याने त्यांना लष्करी शिक्षण देण्याची व्यवस्था आहे.

७. अभ्यासक्रमात विविधता असून त्यात वाङमय, कला याबरोबर तर्कशास्त्र व गणितीशास्त्र आहे.

८. अभ्यासक्रमातून हे स्पष्ट दिसते की, राज्यकर्ता हा सुसंस्कारित असतो व त्याच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास हा झाला असल्याने तो प्रशासन करण्यास लायक असतो. त्याला "सत्यं-शिवम्-सुंदरम" या तत्वाचे आकलन झालेले असते व त्याआधारे तो समाजाचे कल्याण करु शकतो.

**प्लेटोच्या शिक्षण व्यवस्थेतील दोष :**

१. प्लेटोने प्राथमिक शिक्षण सर्व वर्गांसाठी खुले ठेवले असले तरी त्याने शेतकरी व कारागीर यांना शिक्षण द्यावे असे कुठेच म्हटलेले नाही. त्याचे लक्ष्य फक्त तत्वज्ञ राजाच्या शिक्षणावर केंद्रीत झालेले आहे. समाजातील फार मोठा वर्ग त्याने शिक्षणापासून दूर ठेवलेला आहे.

२. प्लेटोने रचलेला अभ्यासक्रम दिर्घ स्वरुपाचा आहे. वयाच्या ६ व्या वर्षापासून ५० व्या वर्षापर्यंत एखादी व्यक्ति सतत विद्यार्थी असावी अशी प्लेटोची अपेक्षा आहे. परंतु अशा दिर्घ शिक्षणामुळे संस्कार होण्याऐवजी विपरित परिणामच होतील. शिक्षणाचा हेतू व्यक्तिला

चिंतनशिल करणे हा आहे. परंतु चिंतनशिल व्यक्ति व्यावहारिक प्रश्न सोडवू शकत नाही. शिक्षण व व्यवहार यांचा संबंध जोडण्यात प्लेटो यशस्वी झालेला नाही.

३. प्लेटोच्या अभ्यासक्रमात निरनिराळे विषय आहेत. परंतु त्यांचा परस्परांशी संबंध नाही. तत्वज्ञ राजाने गणित व तत्वज्ञान असे दोन्ही विषय शिकावयाचे असून त्यांचा एकमेकांशी संबंध नाही.

४. प्लेटोच्या शिक्षण व्यवस्थेतून अनियंत्रित सत्ता निर्माण होणार आहे. तत्वज्ञ राजाचा अधिकार अमर्याद आहे. अशी अनियंत्रीत सत्ता धोकेदायक आहे.

**प्लेटोच्या शिक्षण विषयक योजनेचे परिक्षण -**

प्लेटोची शिक्षण विषयक योजना राज्यकर्त्यांमध्ये आणि सैनिक वर्गाच्या लोकांपुरतीच मर्यादित आहे. सर्वसामान्य लोकांसाठी फक्त प्राथमिक शिक्षणाची शिफारस प्लेटोने केलेली आहे. समाजाची उन्नती समाजातील सर्व घटकांच्या उन्नतीवर अवलंबून असते. सर्व घटकांची उन्नती होण्यासाठी त्यांना योग्य प्रकारचे शिक्षण दिले पाहिजे. प्लेटोने मात्र या गोष्टींकडे दुर्लक्ष केलेले आहे.

दुसरे असे की, शिक्षणात गणितावर आणि तर्कशास्त्रावर अतिशय भर देण्यात आलेला आहे व साहित्याकडे मात्र अगदीच दुर्लक्ष करण्यात आले आहे. साहित्य हे मनुष्याच्या संस्कृतीचे प्रतीक असते. परंतु प्लेटोने त्याकडे दुर्लक्ष केलेले आहे. त्याचप्रमाणे प्लेटोची शिक्षण पध्दती इतकी कडक स्वरुपाची आहे की, त्यात व्यक्तिच्या स्वतंत्र विकासाला वाव नाही. या शिक्षणक्रमानुसार आदर्श तत्वज्ञ निर्माण होईल, परंतु आदर्श मनुष्य निर्माण होईल की नाही याची शंका वाटते. प्लेटोच्या शिक्षण पध्दतीत अनेक दोष असले तरी शिक्षणाचा मुख्य उद्देश न्यायाची वाढ करणे असल्याने हे एकदा विचारात घेतल्यावर त्याची ही योजना आदर्श राज्याच्या योजनेला शोभेल अशीच आहे हे मान्य करावे लागते. या योजनेत चारित्र्य आणि सद्‌गुण यावर योग्य तो भर दिलेला असून परिक्षा पध्दती ही विद्यार्थ्याची खरी योग्यता दर्श्रविणारी आहे.

अशाप्रकारे प्लेटोची ही शिक्षण विषयक योजना गुणदोष मिश्रीत आहे, असेच म्हणावे लागेल.

**प्लेटोचा साम्यवादाचा सिध्दांत - (Theory of Communism)**

प्लेटोने न्यायाचे राज्य प्रस्थापित करण्याच्या हेतूने जी साधने सांगितलीत त्यात साम्यवाद हे एक महत्वपूर्ण साधन आहे.

**अलेक्झांडर ग्रे** म्हणतो, "तत्वज्ञ राजा हा मुलतः बुध्दीमान आहे त्याचे प्रदिर्घ शिक्षण झाले आहे. त्याच्या हाती अनियंत्रीत आणि अमर्यादित अधिकार आहेत. त्याच्याकडून अशा प्रकारच्या अधिकाराचा दुरुपयोग होण्याची शक्यता आहे. तो दुरुपयोग टाळण्यासाठी तत्वज्ञ राजाच्या विचारांचे शुध्दीकरण करणे आवश्यक आहे. तत्वज्ञ राजातील स्वार्थ आणि अहंकार नष्ट झाला पाहिजे, समाज कार्यात सतत मग्न राहीला पाहिजे. त्यासाठी त्याची जीवन पध्दती साम्यवादी स्वरुपाची असली पाहिजे."

**नेटलशिप -** या विचारवंताच्या मते, प्लेटोची साम्यवादाची कल्पना त्याच्या शिक्षण विषयक विचाराला पुरक आहे. शिक्षणातून तत्वज्ञ राजाने जे प्राप्त केले ते अधिक परिणामकारक होण्यासाठी साम्यवादाची आवश्यकता आहे.

**साम्यवादाचे उद्देश -**

१) **राज्याच्या एकतेचे रक्षण -** राज्याच्या एकतेला सर्वात मोठा धोका राज्यातील संघर्षापासून निर्माण होतो. ग्रीकमधील संघर्षाची भयानक रुपे प्लेटोने पाहिली होती. संघर्षाचे मुळ कारण कणक व कांता आहे. अशी त्याची धारणा होती आणि म्हणून प्लेटोने राज्यात एकता प्रस्थापित करण्यासाठी साम्यवाद मांडला.

२) **शासकांचा शुध्द विवेक कायम ठेवणे -** प्लेटोच्या मते आदर्श राज्य शासकाच्या शुध्द विवेकावर अवलंबून असते. शासकाला मोह पाडणाऱ्या आणि भ्रष्ट करणाऱ्या दोन गोष्टी असतात व त्या म्हणजे कांचन व कांता. या दोन गोष्टींच्या मागे लागून राज्यकर्ते भ्रष्ट होवू नयेत म्हणून प्लेटोने साम्यवादाचा सिध्दांत पालक वर्गासाठी सांगितला आहे.

३) **राजकिय आणि आर्थिक सत्ता यांचे पृथ्थकरण -** राजकिय आणि आर्थिक सत्ता या दोन्ही सत्ता एकत्र आल्यावर त्याठिकाणी निरंकुश

राज्य प्रस्थापित होण्याची शक्यता असते. कारण आर्थिक सत्तेच्या आधारे राजकिय सत्ता प्राप्त करुन गरिबांची पिळवणूक राज्यकर्ते करतात. म्हणून प्लेटोने पालक/शासक वर्गाला आर्थिक सत्तेपासून दूर ठेवणासाठी साम्यवाद सांगितला.

४) **योग्य संतती -** वैयक्तिक परिवारापासून राज्यकर्त्यांना वंचीत ठेवण्यामागे उत्कृष्ठ प्रजोत्पादन करण्याचा प्लेटोचा उद्देश हो ता. संतती शास्त्राचा नियम कार्यान्वित करण्याचा त्याचा उद्देश होता. निरोगी स्त्री-पुरुष एकत्र आले तर जन्माला येणारी मुले बुध्दीमान आणि निरोगी व तेजस्वी राहतील अशी प्लेटोची धारणा होती.

५) **स्त्रीयांना मुक्त करणे -** स्त्री पुरुषांच्या समानतेवर प्लेटोचा विश्वास होता. समाजातील हे दोन्ही घटक सारखे असतांना स्त्रीयांना चार भिंतीत कोंडून ठेवणे प्लेटोला योग्य वाटले नाही. सार्वजनिक व राजकिय कार्यात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया कार्य करु शकतात म्हणून त्यांना समान संधी मिळून देण्याच्या दृष्टीने प्लेटोने स्त्रीविषयक साम्यवाद सांगितला.

**प्लेटोचा साम्यवाद दोन प्रकारचा -**

१. **संपत्ती विषयक**

२. **स्त्री विषयक**

१. **संपत्ती विषयक साम्यवाद -** प्लेटो शासक वर्गाला खाजगी संपत्ती बाळगण्याचा अधिकार देत नाही. कारण संपत्तीमुळे शासक वर्गातील लोक भ्रष्ट होण्याची शक्यता आहे. व्यक्तिला आपल्या मार्गापासून पदभ्रष्ट करणारी संपत्ती हे फार मोठे आकर्षण आहे. कितीही संपत्ती प्राप्त केली तरी मुनष्याचा संपत्तीचा मोह कमी होत नाही. सत्ता आणि संपत्ती या दोन्ही गोष्टी केंद्रीत झाल्यास ते शासन निरंकुश होवून त्यांच्यापासून अनेक प्रकारचे प्रमाद घडतील ते स्वमनाने राज्य करतील म्हणून प्लेटोने शासनकर्त्या वर्गाला खाजगी मालमत्तेपासून अलग ठेवले आहे. शासकांना संपत्तीपासून दूर ठेवण्याचा उद्देश म्हणजे त्यांनी भ्रष्टाचाराला बळी पडू नये, संपत्तीची लालसा धरु नये. निस्वार्थ मनाने सार्वजनिक सेवा करावी हा आहे. प्लेटो म्हणतो

आदर्श राज्यात पालक वर्गातील लोक सरकारी भोजनालयात भोजन करतील आणि सरकारी कार्यालयात वास्तव्य करतील. त्यांची राहण्याची व भोजनाची व्यवस्था राज्यच करीन. त्यामुळे त्यांना संपत्तीची आवश्यकता राहणार नाही. सबाईन म्हणतो - शासनावर संपत्तीचा पडणारा भयानक प्रभाव पाहूनच तो दूर करण्यासाठी प्लेटोने शासक वर्गातून संपत्तीचा नाश केला आहे.

२. **स्त्री विषयक साम्यवाद -** प्लेटोला कुटूंबविषयक साम्यवाद चमत्कारिक वाटतो. व्यक्तिगत कुटुंबामुळे माणूस स्वार्थी बनतो. हे माझे ते तुझे ही भावना मनुष्याच्या मनात कुटूंबामुळे निर्माण होतो. पत्नी आणि मुले यांच्या मोहजालात तो गुंतून जातो. त्या व्यक्तिच्या उन्नतीचा आणि विकासाचा तो विचार करतो. त्यामुळे त्याचे विचार संकुचित बनतात असा मनुष्य निरपेक्ष वृत्ती आणि निर्लोभवृत्तीने सार्वजनिक कार्य करु शकत नाही. म्हणून प्लेटोने कुटूंबाच्या मोहापासून शासक वर्गाला दूर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. कुटुंबाचा मोह हा संपत्तीच्या मोहापेक्षाही अधिक असतो. स्वतःच्या कुटूंबाच्याच हितासाठीच मनुष्य अनुचित / अनैतिक कोणतेही कार्य करावयास मागे पुढे पाहत नाही. तो मुलांबद्दलच्या प्रेमामुळे कोणतेही कार्य करावयास मागे पुढे पाहत नाही. मुलांबद्दलच्या प्रेमामुळे आणि काळजीमुळे मनुष्य स्वार्थी बनत असतो आणि म्हणूनच प्लेटोने पालक वर्गाला कुटूंब संस्थेपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रीयांचा साम्यवाद सांगण्यामागील प्लेटोचा दुसरा उद्देश असा होता की, स्त्रीयांना दास्यत्वापासून मुक्त करणे. प्लेटोच्या वेळी ग्रीसमध्ये स्त्रीयांची स्थिती फारच दयनिय होती. चार भिंतीच्या बाहेर त्या पडू शकत नव्हत्या. चुल आणि मुल हेच त्यांचे कार्यक्षेत्र होते. स्त्री जातीच्या उन्नतीच्या दृष्टीने आणि त्यांचे कार्यक्षेत्र व्यापक करण्याच्या दृष्टीने प्लेटोने परंपरागत विवाह पध्दतीचा अंत केला. याशिवाय स्त्री विषयक साम्यवाद सांगण्याचे तिसरे कारण असे की, प्लेटोच्या वेळी प्रचलित असलेल्या विवाहपध्दतीमुळे चांगले आणि अनुरुप निरोगी स्त्री-पुरुष एकत्र येवू शकत नव्हते. त्यामुळे त्यांची मुल देखील दुर्बल

आणि बुध्दीहीन होती. आदर्श राज्यासाठी चांगली संतती प्राप्त व्हावी या दृष्टीने पालक वर्गातील स्त्री-पुरुषांचे तात्पुरते विवाह राज्याच्या नियंत्रणाखाली व्हावेत, तसेच चांगल्या स्त्री-पुरुषांच्या जोड्या राज्यानेच कराव्यात व त्यांच्यापासून होणाऱ्या संततीचे संगोपन राज्यानेच करावे अशी योजना प्लेटोने मांडली.

**प्लेटोच्या साम्यवादाचे परिक्षण -**

प्लेटोच्या साम्यवादावर अनेक आक्षेप घेण्यात आलेले आहेत. त्यापैकी काही आक्षेप पुढील प्रमाणे :

१. प्लेटोची साम्यवादाची कल्पना मनुष्य स्वभावाच्या विरोधी जाणारी आहे. प्लेटोने साम्यवादाचा सिध्दांत मांडतांना मनुष्याच्या स्वाभाविक प्रवृत्तीकडे दुर्लक्ष केलेले आहे. खाजगी मालमत्ता मानवाच्या सर्वांगिण विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे. संपत्तीच्या मोहामुळे मनुष्य कार्य करित असतो. आत्मरक्षण आणि स्वकियांचे रक्षण या माणसाच्या मुळ प्रवृती आहेत. त्यासाठी मनुष्य संपत्ती प्राप्त करण्याचा प्रयत्न करित असतो. कुटूंबसंस्था ही देखील मानवी जीवाच्या विकासाला अत्यंत आवश्यक अशी संस्था आहे. सामाजिक गुणांची ती शाश्वत पाठशाळा आहे. कुटूंब समाजाचा मुळ आधार आहे. कुटूंबाकडून राहणे ही मनुष्याची सहज प्रवृत्ती आहे. अशा या महत्वपूर्ण कुटूंब संस्थेला पालक वर्गाची भिती नष्ट करण्याची प्लेटोची कल्पना अव्यवहार्य व अनैतिक वाटते.

२. प्लेटोचा साम्यवाद स्वातंत्र्याच्या विरोधी आहे. प्लेटोच्या साम्यवादामुळे मनुष्य जखडला जातो. त्याला स्वतंत्रपणे आपल्या अंगी असलेल्या सुप्त गुणांचा विकास घडवून आणण्याची संधी प्राप्त होत नाही.

३. प्लेटोचा साम्यवाद समता दर्शवत नाही. साम्यवादाच्या कक्षेत केवळ पालक वर्ग आहे. शेतकरी व कामगार यांना साम्यवादापासून होणारे फायदे प्राप्त होणार नाही अशा प्रकारे प्लेटोने वर्गभेद करुन समाजात विषमता प्रस्थापित केलेली आहे.

४. प्लेटोच्या साम्यवादामुळे समाजाचे दोन तुकडे झाले आहेत. एक तर खाजगी मालमत्ता धारकांचा वर्ग व दुसरा खाजगी मालमत्ता नसलेला पालकवर्ग अशा प्रकारच्या वर्गामुळे समाजात एकात्मता निर्माण होणार नाही.
५. प्लेटोच्या साम्यवादामुळे स्त्रीची अवनती होणार आहे. स्त्री ही पत्नी व माता आहे. या भुमिकेमुळेच तिला वेगळे महत्व प्राप्त झाले आहे. प्लेटोच्या साम्यवादामुळे मात्र या भूमिकेला तडा जाणार आहे. तात्पुरत्या विवाहामुळे स्त्री-पुरुषांचे पशूत रुपांतर होईल.
६. बुध्दीमान व साहसी पुरुषांची मुले बुध्दीमान व साहसी होतीलच अशी खात्री नाही. उलट मुलांना मातृ-पितृ सुख न मिळाल्यामुळे त्यांची खरीखुरी प्रगती होणार नाही.
७. स्त्री-पुरुष यांच्यातील पती-पत्नी हे नाते केवळ अपत्य प्राप्ती आणि अपत्य संगोपन यापुरतेच मर्यादित नसते. तर ते दोघेही जन्माचे सोबती असतात व एकमेकांच्या सुखदु:खाचे भागिदार असतात. प्लेटोने या गोष्टीकडे दुर्लक्ष केले आहे.
८. प्लेटोचा शिष्य ॲरिस्टॉटल याने तर आपल्या गुरुच्या साम्यवादावर कडाडून टिका केली आहे. त्याच्या मते साम्यवादामुळे जीवनाची समृध्दता नष्ट होईल तसेच एकात्मतेच्या अतिरेकी प्रयत्नातून विविधता नष्ट होईल. सर्वांचे मुल हे कुणाचेच मुल असणार नाही. त्यामुळे मुलांचे संगोपण होणार नाही.

टेलर म्हणतो - "समाजवाद किंवा साम्यवाद Republic ग्रंथात नाही. साम्यवादाची कल्पना एखाद्या स्वप्नाप्रमाणे आहे. त्याला व्यवहारात फारसा अर्थ नाही"

**प्रो. मॅक्सी** म्हणतात, "साम्यवादाचा उगम प्लेटोत सापडतो असे म्हणणे चुक आहे.

**प्लेटोचे आदर्श राज्य :**

प्लेटो हा महान ग्रीस विचारवंत होता. इतर विचारवंतांप्रमाणेच त्याच्या विचारांवरही परिस्थितीचा प्रभाव पडलेला आढळून येतो. राज्यशास्त्राच्या दृष्टीकोनातून विचार केला तर प्लेटोचे सर्व राजकिय विचार

तत्कालीन नगर राज्याच्या पाश्र्वभूमीवर मांडलेले होते. Republic या ग्रंथात त्याने आदर्श राज्याची कल्पना मांडली आहे. प्लेटोला आत्मविश्वास होतो की, त्याचे आदर्श राज्य हे काल्पनिक असून देखील त्या आदर्श राज्याला वास्तविकतेमध्ये आणता येवू शकते.

प्लेटोने ज्या आधारावर आदर्श राज्याची कल्पना केली आहे ते आधार पुढील प्रमाणे-

**१. उच्च जिवनासाठी राज्य आवश्यक -**

राज्य ही एक स्वाभाविक संस्था आहे असे प्लेटो मानतो. राज्याशिवाय मनुष्याला आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास साध्य करता येत नाही. अन्न, वस्त्र, निवारा यासाठी मनुष्य दुसऱ्यावर अवलंबून असतो. या गरजा राज्याच्या सहाय्याने पूर्ण होवू शकतात. जिवीताचे रक्षण करण्यासाठी राज्यसंस्था आवश्यक आहे.  याचे कारण या संस्थेच्या अभावीमनुष्य जीवनाला अर्थच राहीला नसता. प्लेटोच्या मते राज्य ही संस्था केवळ मनुष्याच्या गरजांची पुर्ती करणारी संस्था नव्हे तर मनुष्याचे जीवन अधिक सुंदर कसे होईल याचाही विचार राज्य संस्थेला करावा लागतो.

**२. आदर्श वर्ग व्यवस्था -**

प्लेटोचा आदर्श राज्याचा दुसरा आधार म्हणजे त्याने प्रतिपादन केलेली वर्गव्यवस्था. बुध्दीचे प्रतिनिधीत्व करणारा तत्वज्ञ वर्ग, साहस हा मनुष्याच्या गुणांचे प्रतिनिधीत्व करणारा सैनिक वर्ग, क्षुधा किवा वासना या गुणांचे प्रतिनिधीत्व करणारा उत्पादक वर्ग. प्लेटोने आदर्श नितीचे आधार मानलेत. कारण प्लेटोला राज्याचे सेंद्रीय स्वरुप मान्य होते.  राज्य ही मोठी व्यक्ती आहे. जिच्यामध्ये मनुष्यातील गुणधर्म प्रकर्षाने दिसून येतात.

**३. प्रत्येक वर्ग आपआपले कार्य करतील -**

प्लेटोने आदर्श राज्यासाठी जी वर्गीय व्यवस्था सांगितली त्या तीनही वर्गातील व्यक्ति आपआपले कार्य आपल्या गुणधर्मानुसार करतील आणि इतर वर्गाच्या कार्यात हस्तक्षेप करणार नाहीत असे झाले तर चांगले जीवन प्राप्त करुन देण्याचे आदर्श राज्याचे ध्येय साकार होवू शकेल. थोडक्यात आदर्श राज्य हे न्यायावर अधिष्ठीत असलेले राज्य असेल.

**प्लेटोच्या आदर्श राज्याची वैशिष्ट्ये -** प्लेटोच्या आदर्श राज्याची काही प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१. तत्वज्ञ शासकाची कल्पना -**

प्लेटोने आपल्या आदर्श राज्यामध्ये तत्वज्ञानी मनुष्याला फार महत्व दिले आहे. राजा हा तत्वज्ञानी असावा यावर त्याचा विशेष भर होता. या संबंधात प्लेटो असे म्हणतो की, जोपर्यंत राजे तत्वज्ञ होणार नाहीत किंवा राजे आणि राजपुत्र यांना तत्वज्ञानाची आवड निर्माण होणार नाही तोपर्यंत नगरराज्ये दोषमुक्त होणार नाहीत. प्लेटोच्या मते मानव जातीच्या चिंतेचे आणि दुःखाचे सर्वात महत्वाचे जर काही कारण असेल तर लोकांचे मार्गदर्शक आणि नेते अज्ञानी असतात जोपर्यंत अज्ञानी लोक राज्यकारभार करतील तोपर्यंत नगरराज्याच्या परिस्थितीमध्ये कोणतीही सुधारणा घडून येणार नाही. यातून सुटका करावयाची असेल तर एकच मार्ग आणि तो म्हणजे ज्ञानाचा मार्ग मोकळा करणे. याचा अर्थ राज्यकारभार चालविण्यासाठी कुशल, बुध्दीमान आणि निस्वार्थी व्यक्तींनी पुढे यावे ज्यांच्या अंगी राजकिय शहाणपण आहे आणि मनाची व्यापकता आहे व जे वैयक्तिक स्वार्थाच्या पलीकडे जावून कार्य करु शकतील अशा लोकांनी राज्यकारभार करावा. प्लेटो राज्याची सर्व सुत्रे एका तत्वज्ञानी राजाच्या हाती सोपवू इच्छितो. वेबर नावाचा लेखक या बाबतीत असे म्हणतो की, "ज्याप्रमाणे जहाजाची सुरक्षितता ही कुशल नाविकावर अवलंबून असते त्याचप्रमाणे राज्याची सुरक्षितता ही शासकावर अवलंबून असते." आणि म्हणूनच प्लेटोने राजा हा तत्वज्ञानी असावा असा आग्रह धरला. त्याने आपल्या आदर्श राज्यासाठी जी तत्वज्ञ शासकाची कल्पना केलेली आहे तो तत्वज्ञ समाजाभिमुख असा आहे. गिरीकंदरामध्ये जावून तपश्चर्या करणारा, स्वतःची आत्मोन्नती साध्य करणारा, चिंतनामध्ये मग्न असलेला व जगाच्या रहाट गाडग्यापासून दूर असणारा असा तत्वज्ञ प्लेटोला अभिप्रेत नव्हता. याचा अर्थ त्याला अभिप्रेत असलेला तत्वज्ञ समाजातच असतो व समाजातील लोकांची दुःखे जाणून घेण्याचा सतत प्रयत्न करीत असतो.

**२. वर्गीय विभाजन -**

प्लेटोच्या मते व्यक्तिमध्ये तीन प्रवृत्ती असतात. बुध्दी, साहस, वासना या तिन्ही प्रवृत्ती सर्व व्यक्तिमध्ये सारख्या प्रमाणात असतात असे नाही. ज्यांच्यामध्ये बुध्दीचे प्रमाण जास्त आहे ते तत्वज्ञ होत. ज्यांच्यात साहसाची प्रवृत्ती जास्त ते सैनिक होत व ज्यांच्यामध्ये वासनेचे प्रमाण जास्त ते उत्पादक होत. अशा प्रकारे समाजामध्ये या तीनही गुणांचे प्रतिनिधीत्व करणारे तीन वर्ग पडतात.

१) तत्वज्ञ वर्ग, २) सैनिक वर्ग, ३) उत्पादक वर्ग. या तिन्ही वर्गातील लोकांनी आपल्या गुणधर्मानुसार आपआपले कार्य करावे व इतरांच्या कार्यात हस्तक्षेप करु नये.

**३. कौशल्य किंवा नैपुण्य -**

समाजाचे केवळ तीन वर्गामध्ये विभाजन करुन चालणार नाही, तर प्रत्येक वर्गातील व्यक्तीने आपल्या गुणधर्मानुसार कार्य केले पाहिजे. उत्पादक वर्गाने शेती उद्योगधंदे आणि व्यापार यामध्ये नैपुण्य मिळविले पाहिजे. साहस हा गुणधर्म असणाऱ्या सैनिकांनी समाजातील लोकांचे अंतर्गत आणि बाह्य शत्रुपासुन संरक्षण करण्याच्या बाबतीत कौशल्य दाखविले पाहिजे तर जे लोक बुध्दीचे प्रतिनिधीत्व करतात त्या तत्वज्ञानी लोकांच्या अडीअडचणी व प्रश्न लक्षात घेवून उन्नत प्रकारे त्यांनी राज्यकारभार चालविला पाहिजे. असे झाले तरच न्यायावर अधिष्ठीत असलेले राज्य निर्माण होवू शकेल.

**४. न्याय -**

प्लेटोने आदर्श राज्याचा विचार करित असतांना न्यायाला विशेष महत्व दिले आहे. किंबहुना त्याला न्यायावर आधारित राज्य निर्माण करावयाचे होते. न्यायाशिवाय राज्य टिकूच शकत नाही. पण प्लेटोला अभिप्रेत असलेला न्याय हा कायद्यावर आधारित नाही. तर तो तिन्ही वर्गातील लोकांच्या प्रामाणिक कार्यावर अवलंबून आहे. प्रत्येक वर्ग आपआपले कार्य व्यवस्थितपणे करेल आणि दुसऱ्यांच्या कार्यात हस्तक्षेप करणार नाही तरच न्यायाची प्रस्थापणा होवू शकेल.

### ५. शिक्षण -

प्लेटोने आपल्या आदर्श राज्याच्या कल्पनेत शिक्षण व्यवस्थेला अनन्यसाधारण महत्व दिले आहे. शिक्षणामुळे प्रत्येक व्यक्तिला आपल्या कार्याची जाणिव होईल. श्रेष्ठ नागरिक उत्तम सैनिक आणि उत्कृष्ट तत्वज्ञ निर्माण होण्यासाठी शिक्षणाची व्यवस्था प्लेटोने प्रतिपादन केली या शिक्षण व्यवस्थेत त्याने प्राथमिक आणि उच्च असे दोन प्रकारचे शिक्षण घेण्याची व्यवस्था सांगितली आहे. त्याच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये संगीत, गणित, तत्वज्ञान आणि शारिरीक शिक्षण यावर विशेष भर दिला आहे. स्त्री आणि पुरुष असा भेदभाव न करता सर्वांनाच सारखी शिक्षण पध्दती त्याने सांगितली आहे.

### ६. साम्यवाद -

प्लेटोने आदर्श राज्याच्या निर्मितीत साम्यवादाची कल्पना मांडली आहे. हा साम्यवाद दोन प्रकारचा आहे. १) स्त्रीविषयक, २) संपत्तीविषयक साम्यवाद. प्लेटो स्त्रीयांना पुरुषांप्रमाणेच समान समजतो आणि म्हणूनच चूल आणि मुल या परंपरागत कार्यक्षेत्रातून त्यांना मुक्त करु इच्छितो. स्त्रीयांनी राजकारणात भाग घ्यावा असे त्याचे मत होते. कणक आणि कांता या दोन गोष्टी मनुष्यामध्ये मोह निर्माण करतात. या मोह निर्माण करणाऱ्या गोष्टींपासून शासक वर्गाला अलग ठेवण्यासाठी प्लेटोने स्त्रीविषयक आणि संपत्ती विषयक साम्यवाद सांगितला आहे.

### ७. कला आणि साहित्यांवर नियंत्रण -

प्लेटोच्या आदर्श राज्यामध्ये कला आणि साहित्यावर संपूर्ण राज्याचे नियंत्रण राहिल. त्याच्या मते साहित्यावर राज्याचे नियंत्रण प्रस्थापित करण्याचे मुख्य कारण म्हणजे भावनांना आव्हान करणारे साहित्य तरुणांच्या हातात पडावयास नको. तरुणांची मने सुधारण्यासाठी योग्य प्रकारचे साहित्य राज्याच्या मान्यतेने प्रकाशित व्हावे.

### आदर्श राज्यावरील आक्षेप -

१) प्लेटोच्या आदर्श राज्यात नागरिकांना वैयक्तिक स्वातंत्र्य फारसे राहणार नाही. त्यामुळे कोणत्याही नागरिकांच्या सर्व गुणांचा पूर्ण विकास होणार नाही. एखाद्या विशिष्ट धंद्यात प्राविण्य मिळविण्याच्या कल्पनेमुळे मनुष्य केवळ यंत्रासारखा बनण्याचा संभव आहे.

२) प्लेटोने आदर्श राज्याच्या योजनेत राज्यातील बहुसंख्य अशा उत्पादकांकडे दुर्लक्ष केले आहे. त्यांना कोणत्याही प्रकारचे जबाबदारीचे स्थान आदर्श राज्याच्या योजनेत त्याने दिले नाही. प्लेटो चारित्र्यापेक्षा बुध्दीला जास्त महत्व देतो. म्हणून दलित वर्गाच्या उध्दारासाठी कोणतीही निश्चित कल्पना त्याने मांडली नाही.

३) त्याच्या आदर्श राज्यातील सर्वात मोठे वैगुण्य म्हणजे मुला-मुलीसंबंधी काहीही सांगितलेले नाही. त्याकाळी गुलामगिरीची पध्दत असतांना त्याबद्दल त्याने अनुकूल अथवा प्रतिकूल असा कोणताही अभिप्राय व्यक्त केला नाही.

४) राज्यातील वरच्या दोन वर्गात म्हणजेच राज्यकर्त्यांच्या आणि सैनिकांच्या वर्गात साम्यवाद स्थापन करावा असे म्हणतो. त्यासाठी या दोन वर्गातून कुटूंब व खाजगी मालमत्ता नष्ट करावी असे त्याने सांगितले. त्याचा साम्यवाद अतिरेकी स्वरुपाचा असून मानवी स्वभावाविरुध्द जाणारा आहे आणि अव्यवहार्य आहे. अशा प्रकारची कृत्रिम योजना समाजात अंमलात आणणे फार कठीण आहे.

५) आदर्श राज्यात कायद्याची आवश्यकता नाही असे प्लेटो मानतो. पण कायद्याची राज्यात मग ते आदर्श राज्य असले तरी अगदीच आवश्यकता नाही असे मानणेही चुकीचे आहे. कायदा नसेल तर न्यायदान करणे अतिशय कठीण होईल. कोणत्याही एका व्यक्तिच्या विकासापेक्षा कायदा नेहमीच जास्त संयमशिल असतो. तसेच कायदा हा निष्पक्षपाती व अनेक पिढ्यांच्या अनुभवावर आधारलेला असतो. म्हणून कायद्याचे अस्तित्व लोकांच्या हिताचेच होते.

असे अनेक आक्षेप प्लेटोच्या आदर्श राज्याच्या योजनेवर घेतले जातात. प्लेटोच्या आदर्श राज्याच्या योजनेतील ठळक दोषांचे वर्णन वर केलेले आहे. त्याच्या या कल्पनेतील केवळ काल्पनिक भाग कोणता व वास्तविक भाग कोणता याचे पृथःकरण करणे आवश्यक ठरेल. त्याच्या आदर्श राज्याच्या योजनेतील समाजातील तीन वर्गात विभाजन करणे वरच्या दोन वर्गातून कुटुंबसंस्था व खाजगी मालमत्ता नष्ट करणे, स्त्री आणि पुरुष यांची सर्वच बाबतीत अगदी समान योग्यता आहे असे मानणे या गोष्टी केवळ काल्पनिक

वाटतात. याच्या उलट आदर्श राज्याचा उद्देश न्याय राज्य व्यवस्था स्थापून न्यायाची वाढ करण्याचा आहे, असे जे प्लेटोने म्हटले आहे ते त्याचे विचार वास्तविक महत्वाचे आहेत. न्याय हे राज्याचे उद्दिष्ट आहे, निती राज्याचे सामर्थ्य आहे, शिक्षण हा नितीचा पाया आहे, आणि तत्वज्ञ शासक हा योग्य शासक आहे इ. आदर्श राज्याच्या कल्पनेतील त्याचे विचार ध्येयदर्शी आणि वास्तविक स्वरुपाचे आहेत. त्यांना व्यवहारात उतरविणे कठिण आहे, पण ते विचार अवास्तव व काल्पनिक नाहीत.

***

## प्रकरण २

# ॲरिस्टाटल (Aristotle)

## (जन्म इ.स. ३८४ ते इ.स. ३२२)

**जीवन परिचय :**

विद्येचा असामान्य भक्त, तत्वज्ञानाचा प्रकाशरुप व ग्रीसचा सुर्य ॲरिस्टॉटलचा जन्म इ.स. पूर्व ३८४ मध्ये स्टॅटगिरा येथे झाला. त्याचे वडील मॅसिडोनियाच्या राजदरबारी वैद्य असल्याने त्याचे जीवन सुखी संपन्न होते. ॲरिस्टॉटल मॅसिडोनियाचा राजपूत्र ॲलेक्झांडर याचा काही काळ शिक्षक व सल्लागार होता. वयाच्या सतराव्या वर्षी त्याचे आई वडील वारले. त्यानंतर अथेन्स येथे प्लेटोच्या विद्याश्रमात प्रवेश मिळवुन वीस वर्ष त्याने परिश्रमपूर्वक विद्या संपादन केली. त्याच्या बुध्दीमत्तेची आणि विद्वत्तेची कीर्ती सर्वत्र पसरली. सॉक्रेटिस, प्लेटो या विचारसाखळीतील तिसरा विचारवंत म्हणजेच ॲरिस्टॉटल होय. ॲरिस्टाटलचा पिंड शास्त्रज्ञाचा होता. राजकारणाचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास करण्यास त्यांनी सुरुवात केली. त्यांना राजकारणाचा जनक म्हटले जाते. राज्यशास्त्र, नितिशास्त्र, धर्मशास्त्र, मानसशास्त्र, तर्कशास्त्र इत्यादी विषयांवर त्यांनी लिखाण केले. ॲरिस्टाटलने राज्यशास्त्राला स्वतंत्र शास्त्राचा दर्जा प्रदान करुन दिला. द पॉलिटिक्स आणि द कॉन्स्टीट्युशन या दोन ग्रंथातून ॲरिस्टाटलने राजकीय विचारांची मांडणी केली आहे. वास्तविकतेचे निरीक्षण, त्याचे विश्लेषण व सर्वसाधारण निष्कर्ष अशा स्वरुपाची मांडणी त्यांनी केली. प्लेटोप्रमाणे काल्पनिकता व तार्किकतेच्या जोरावर त्यांनी विचारांची मांडणी केली नाही. त्यांनी १५८ तत्कालीन राज्यघटनांचा अभ्यास करुन 'द पॉलिटिक्स' या ग्रंथाची निर्मिती केली. राजकारणाचा अभ्यास तुलनात्मक पध्दतीने करण्यास त्यांनीच सुरुवात केली. राज्याचे वर्गीकरण व आदर्श राज्याचे त्यांचे विचार महत्वपुर्ण आहेत. ॲरिस्टाटलला राज्यशास्त्राचा जनकच मानले जाते. विश्लेषणात्मक आणि विविध घटनांच्या अभ्यासातुन सर्वसामान्य निष्कर्ष काढण्याची आगमनात्मक पध्दत त्याने स्विकारली व त्यास तौलिक पध्दतीची

जोड दिली. राज्यशास्त्रात हा नविन प्रयोग होता. कॅलिसस येथे इ.स. पुर्व ३२२ मध्ये ॲरिस्टाटलचा मृत्यु झाला.

**ॲरीस्टॉटलचे राज्यासंबंधीचे विचार -**

१५८ राज्यघटनांचा अभ्यास करुन ॲरिस्टॉटलने राज्यशास्त्र नावाचे पुस्तक लिहिले. प्लेटोचे जे विचार त्याला आवडले ते त्याने मान्य केले व जे विचार त्याला आवडले नाहीत (उदा. साम्यवादासारखे) त्यावर त्याने कडाडून टिका केली. प्लेटोचे राज्यासंबंधीचे विचार त्याने मान्य केले.

ॲरिस्टॉटलने "Politics" या ग्रंथात आपले सर्व राजकिय विचार ग्रंथीत केले आहेत. प्लेटोचा शिष्य असल्यामुळे प्लेटोच्या विचारांचा प्रभाव त्याच्या विचारांवर पडलेला आढळून येतो. पण याचा अर्थ असा नव्हे की, त्याने आपल्या गुरुच्या विचारांचे अंधानुकरण केले आहे. ॲरिस्टॉटल शास्त्रीय दृष्टीकोनातून विचार करणारा होता. त्याने तत्कालीन १५८ राज्यांच्या राज्यघटनांचा तुलनात्मक अभ्यास करुन आपले विचार मांडले आहेत. त्यामुळे स्वाभाविकच त्याच्या विचारात तर्कशुध्दता आली आहे. राज्याच्या स्वरुपाबद्दल व ध्येयाबद्दल त्याने सखोल विचार केला. राज्याचे स्वरुप, राज्याचा विकास, राज्याची उत्पत्ती व उद्देश याची अत्यंत सुक्ष्म मिमांसा ॲरीस्टॉटलने केली आहे व म्हणूनच आज देखील त्याच्या विचारांना व्यापक स्वरुपाची मान्यता प्राप्त झाली आहे.

**ॲरिस्टॉटलच्या राज्यविषयक विचारांची काही वैशिष्ट्ये - (State is a natural assionation)**

**१. राज्य हि एक स्वाभाविक संस्था -**

ॲरिस्टॉटलच्या मते राज्य ही एक स्वाभाविक संस्था आहे. सोफिस्ट राज्यसंस्थेला एक कृत्रिम संस्था मानत असत. आपल्या राज्यकर्त्याच्या पुर्तीसाठी लोकांनी करार करुन राज्यसंस्था स्थापन केली आहे. अशी सोफिस्टांची धारणा होती. ॲरिस्टॉटलला राज्यसंस्थेसंबंधीचे सोफिस्टांचे हे विचार मान्य नव्हते. त्याच्या मते राज्य ही एक स्वाभाविक संस्था आहे. तिची उत्पत्ती विकासातून झालेली आहे. मनुष्य हा केवळ समाजशील प्राणी नव्हे तर तो एक राजकिय प्राणी देखील आहे. मानवाच्या भौतिक गरजांची पुर्ती करण्याकरीता राज्यसंस्थेचा उदय झाला आहे व मानवाचे जीवन अधिकाधिक

उन्नत व्हावे म्हणून राज्यसंस्था अद्यापही कायम आहे. ॲरिस्टॉटलच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास राज्याचा जन्म व्यक्ती जीवनासाठी झाला आणि सुखी जीवनासाठी ते कायम आहे. ॲरिस्टॉटलने नैसर्गिक, राजकिय, सामाजिक हे शब्द विशिष्ट अर्थाने वापरले आहेत. त्यामुळे प्रत्येक शब्द समजून घेणे आवश्यक आहे. राजकीय प्राणी या शब्दावरुन गैरसमज होण्यासारखा आहे. आजच्या व्याख्येप्रमाणे प्रचलित शक्तीचे वाटप किंवा सत्ता संतुलन बदलू पाहणारा आपली बुध्दी व साधन सामुग्री यासाठी खर्च करणारा सामर्थ्य संपादन करुन आपल्या प्रतिस्पर्ध्याचे सामर्थ्य खच्ची करणारा तो राजकिय त्याचप्रमाणे प्राणी या शब्दाचा इंग्रजी अथवा मराठी अर्थ मानवाहून खालच्या पातळीचा सेंद्रीय किंवा शरीरधारी जीव असा होईल. परंतु ॲरिस्टॉटलला जे अर्थ अभिप्रेत आहेत ते वेगळेच आहेत. ॲरिस्टॉटल लेखी राजकीय म्हणजे सामाजीक अर्थात मानव समाजावर प्रेम करणारा, समाजातच राहण्याचे ज्याच्या ललाटी (कपाळी) आहे असा कळप करुन राहणारा, शेजारधर्म पाळणारा दुसऱ्याचे उपकार घेणारा व दुसऱ्यावर उपकार करणारा असा राजकिय या शब्दाचा अर्थ ॲरिस्टॉटलने सांगितला.

प्राणी या शब्दाची व्याख्या त्याने वेगवेगळ्या प्रकारे केली आहे. ज्याला शरीर, मन, बुध्दी आहे व जी आपल्या प्रत्येक व्यवहारात तो त्या कार्यान्वित करतो असा जीवशास्त्रीय, मानसशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय अर्थ प्राणी या शब्दाचा अभिप्रेत आहे.

### २. राज्य मानवी शरिरासारखे - Organic nature of the state -

ॲरिस्टॉटलच्या मते राज्य सेन्द्रीय असते. मानवी शरिराप्रमाणे राज्य आहे. शरिराचे विभिन्न अवयव एक सुत्रात बांधलेले असतात. त्यातील एक अवयव अलग झाल्यास त्याला काही एक महत्व राहात नाही. त्याचप्रमाणे व्यक्ति आणि समुदायाचे मुल्य राज्याच्या सजीवांवर अवलंबून आहे. व्यक्ति, समुदाय, शासकवर्ग, प्रजा ही सर्व राज्याची अवयव आहेत. त्यांचे अस्तित्व राज्यावर अवलंबून आहे. शरिराच्या अवयवाप्रमाणे राज्याच्या अवयवांनी व्यवस्थित कार्य केल्यास राज्याला सुस्थिरता प्राप्त होते. शरिर नष्ट झाले तर राज्याच्या घटकांना महत्व राहणार नाही.

## ३. राज्य एक सर्वोच्च समुदाय - (The state is the superim Association)

मनुष्याला अनंत गरजांची पूर्ती करावी लागते, कारण गरजांच्या पुर्तीवरच मनुष्याचे जीवन अवलंबून असते. या गरजांच्या पुर्तीसाठी मानवाने विविध प्रकारच्या संस्था समाजात निर्माण केलेल्या आहेत. उदा. आर्थिक गरजांसाठी आर्थिक सत्ता, सामाजिक गरजांसाठी सांस्कृतिक संस्था इ. या संस्था आपआपल्या परीने मानवाला मदत करीत असतात. ॲरिस्टॉटल राज्यसंस्थेला या संस्थापैकी एक संस्था मानत नाही. तर तो तिला सर्वोच्च संस्था मानतो. त्याच्यामते राज्य म्हणजे केवळ समुदायाचा समुदाय नव्हे तर त्या समुदायांमधला ज्येष्ठ समुदाय आहे. राज्यसंस्थेलाच सर्वोच्च संस्था मानण्याचे कारण ही संस्था विविध संस्थांमध्ये समन्वय घडवून आणण्याचे महत्वाचे कार्य करते. समाजात इतर सर्व संस्थांचे भवितव्य राज्यसंस्थेवर अवलंबून आहे. इतर समुदायांच्या उद्देशांपेक्षा राज्यसंस्थेचा उद्देश अधिक व्यापक आहे. इतर संस्था मानवाच्या विशिष्ट गरजांची पुर्तता करित असतात तर राज्यसंस्था संपूर्ण मानवी जीवन सुखी करण्याचा प्रयत्न करित असते.

## ४. राज्य व्यक्तिच्या पहिले /आधी -

राज्यसंस्था व्यक्तिच्या पहिले आलेली आहे. हे ॲरिस्टॉटलचे मत विचित्र वाटते. ऐतिहासिकदृष्ट्या विचार केला तर व्यक्ति राज्याच्या पहिले आलेली आहे. व्यक्तिने कुटंूब बनविले. अनेक कुटूंबांचे गाव वसले. गावातून शहरांची निर्मिती झाली आणि सरतेशेवटी राज्यसंस्था अस्तित्वात आली. यावरुन व्यक्ति राज्याच्या पहिले आलेली आहे ही वस्तुस्थिती आहे. परंतू ॲरिस्टॉटल सारखा महान विचारवंत जेव्हा असे सांगतो की, राज्य हे व्यक्तीच्या पहिले आहे तेव्हा त्याचा मतितार्थ समजून घेणे आवश्यक आहे. विचारांच्या जगतात संपूर्ण वस्तू अगोदर येते, त्यानंतर त्या वस्तूंच्या भागांचा विचार होतो. "खुर्ची हा शब्द उच्चारताच संपूर्ण खुर्ची डोळ्यासमोर येते. त्यावेळी ज्या घटकांमुळे खूर्ची निर्माण झाली त्याचा विचार होत नाही. परंतू खुर्ची कशी निर्माण झाली असा विचार येताच त्या खुर्चीच्या विविध भागांचा विचार व्हावयास सुरुवात होते."

ॲरिस्टॉटलच्या मते राज्य हे पूर्ण शरिरासारखे आहे आणि पूर्ण शरिराच्या उत्पत्तीशिवाय अवयवांची उत्पत्ती अर्थहीन आहे. शरिराशिवाय अंगाची कल्पना निरर्थक आहे. मनुष्याच्या खऱ्या जीवनाला राज्यसंस्था निर्माण झाल्यानंतर सुरुवात झाली. राज्यसंस्थेमुळेच मनुष्याला मनुष्यत्व प्राप्त झाले. राज्याशिवाय राहणारी व्यक्ती एक तर पशू तरी असेल किंवा देवता तरी असेल. म्हणून विचारांच्या जगतात किंवा सैध्दांतिकदृष्ट्या राज्य व्यक्तिच्या पहिले बनले आहे.

**५. विविधतेत एकता -**

प्लेटोने आपल्या आदर्श राज्यासाठी एकतेवर अतिशय भर दिला. प्लेटोचा साम्यवाद एकतेचेच द्योतक आहे. राज्याने नागरिकांच्या सर्वच गोष्टी नियंत्रित कराव्यात असे प्लेटोचे मत होते. तर याउलट ॲरिस्टॉटलने राज्यातील विविधतेला विशेष महत्व दिले आहे. राज्यात भिन्न-भिन्न प्रकारचे लोक असतात. त्यांच्यातील भिन्नता नष्ट करणे म्हणजे अत्यंत खालच्या दर्जाचे राज्य निर्माण करण्यासारखे आहे. निरनिराळे राग, स्वर, ताल आणि आलाप यांच्या मिलनातून जसे सुंदर संगीत निर्माण होते, त्याचप्रमाणे राज्याच्या विविधतेमध्ये एकता निर्माण केल्यास त्या राज्यात एकतेचे स्वर निनादू लागतील.

**ॲरिस्टॉटलच्या राज्याचे वर्गीकरण :**

ॲरिस्टॉटलने नगर राज्याच्या पाश्‍र्वभूमीवर राज्याचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याने जवळजवळ १५८ देशांच्या राज्यघटनेचा अभ्यास करुन आपले राजकिय विचार मांडलेले आहेत. त्यामुळे त्याचे विचार वस्तुनिष्ठ स्वरुपाचे आहेत. त्याने केलेले राज्याचे वर्गीकरण देखील शास्त्रीय स्वरुपाचे आहे. त्याने राज्याचे वर्गीकरण करित असतांना दोन प्रकार सांगितले आहेत.

१) शुध्द प्रकार, २) अधपतित राज्य / विकृत प्रकार

१) शुध्द प्रकार : ज्या राज्यातील राज्यकर्ते हे निस्वार्थी आणि समाजाचे हित पाहणारे असतील ते शुध्द राज्य होय.

२) ज्या राज्यातील राज्यकर्ते हे स्वार्थी आणि दृष्ट असतील तर ते राज्य अधिपतीत राज्य/विकृत राज्य समजले जाते.

**राज्याच्या वर्गीकरणाचे प्रकार -** ॲरिस्टॉटलने केलेल्या राज्याच्या वर्गीकरणावर प्लेटोच्या 'स्टेटसमन' या ग्रंथाची छाप पडली व त्याने राज्याचे वर्गीकरण करतांना दोन तत्वे वापरली.

१. **संख्यात्मक -** संख्यात्मक म्हणजे राज्यातील सार्वभौम सत्तेचा वापर करणाऱ्या व्यक्तीची संख्या किती आहे हे त्याने प्रथम लक्षात घेतले.

२. **गुणतत्व -** गुणतत्व म्हणजे राज्यसत्ता वापरण्यामागील त्या व्यक्तिचा हेतू/उद्देश कोणता आहे म्हणजेच ते स्वार्थी आहेत कि निस्वार्थी आहेत हे त्याने पाहिले व या आधारावरच त्याने राज्याचे तीन शुध्द प्रकार आणि तिन विकृत प्रकार असे एकूण ६ प्रकार सांगितले आहेत.

ॲरिस्टॉटलच्या राज्याचे वर्गीकरण पुढील तक्त्याच्या आधारे स्पष्ट करता येईल -

| अ.क्र. | राज्याची सत्ता किती लोकांच्या हाती | सत्तेचा वापर जनहितासाठी शुध्द प्रकार | सत्तेचा दुरुपयोग विकृत प्रकार |
|---|---|---|---|
| १. | एका व्यक्तिच्या हाती | राजेतंत्र/राजसत्ता Monarchy | निरंकुश / एकतंत्र हुकूमशाही Tyranny |
| २. | काही व्यक्तिंच्या हाती | महाजनशाही/कुलीन तंत्र Aristocarcy | निरंकुश/ अल्प जनसत्ता Oligarchy |
| ३. | अनेक लोकांच्या हाती | समतोल सत्ता/लोकतंत्र/ जनतंत्र Polity | समुह तंत्र/ झुंडशाही Democracy |

वरील तक्त्याच्या आधारे ॲरिस्टॉटलने केलेल्या ६ राज्याचे वर्गीकरण पुढील प्रमाणे-

१. **राजतंत्र किंवा राजसत्ता -** जेथे राज्याची सत्ता एका व्यक्तिच्या हाती असेल व ती व्यक्ति त्या सत्तेचा वापर जनहितासाठी किंवा प्रजेच्या हितासाठी करित असेल तर त्या राज्याच्या प्रकाराला राजसत्ता असे म्हणतात.

२. **महाजन सत्ता -** जेव्हा राज्याची सार्वभौम सत्ता काही व्यक्तिच्या हाती आणि ते राज्यकर्ते त्या सत्तेचा वापर जनहितासाठी करित असतील तर त्या राज्याच्या प्रकाराला महाजन सत्ता असे म्हणतात.

३. **समतोल सत्ता -** जेव्हा राज्याची सार्वभौम सत्ता सर्व लोकांच्या हाती असते व सर्वांच्याच हितासाठी राज्यकर्ते दक्ष असतील तर त्या राज्याच्या प्रकाराला समतोल सत्ता असे म्हणतात.

वरील तिनही प्रकारची राज्ये ॲरिस्टॉटलने शुध्द स्वरुपाची मानलीत. कारण या तिनही प्रकारांमध्ये राज्यकर्ते निस्वार्थी असून सत्तेचा वापर जनहितासाठी करतात.

**४. एकतंत्र -** जेव्हा राज्याची सत्ता एका व्यक्तिच्या हाती असेल आणि ती व्यक्ती आपल्या फायद्यासाठी किंवा स्वतःच्या स्वार्थासाठी सत्तेचा वापर करीत असेल तर त्या राज्याला एकतंत्र हुकूमशाही राज्य असे म्हणावे.

**५. धनिक तंत्र -** जेव्हा राज्याची सत्ता काही धनवान लोकांच्या हाती असेल व ते धनवान लोक स्वतःच्या फायद्यासाठीच आपल्या सत्तेचा दुरुपयोग करित असतील त्या राज्याच्या प्रकाराला ॲरिस्टॉटल धनिक तंत्र / अल्पजनशाही असे म्हणतो.

**६. समूहतंत्र -** राज्याची सत्ता सर्वच लोकांच्या हाती असेल व ती सर्व जनसमुदाय स्वतःच्या वैयक्तिक फायद्यासाठी सत्तेचा दुरुपयोग करित असेल व त्यामुळे समाजामध्ये गोंधळ आणि अराजकता निर्माण होत असेल तर त्या राज्याच्या प्रकाराला ॲरिस्टॉटल समुहतंत्र/लोकशाही असे म्हणतो.

अशा रितीने ॲरिस्टॉटलने तीन शुध्द आणि तिन विकृत प्रकार केलेले आहेत. म्हणजेच त्याने आपल्या वर्गीकरणात राज्याचे एकूण ६ प्रकार केलेले आहेत. प्रत्येक शुध्द प्रकारच्या जोडीला एक अधःपतीत प्रकार सांगितला. तसेच ॲरिस्टॉटल म्हणतो की, प्रत्येक देशाच्या इतिहासाच्या दृष्टीकोनातून राज्य हि एका मागून एक चक्रगतीने आपोआप अस्तित्वात येतात आणि नष्ट होतात.

**राज्याचे वर्गीकरणाचे आक्षेप/परिक्षण -**

**ॲरिस्टॉटलने केलेल्या राज्याच्या वर्गीकरणावर पुढील आक्षेप घेतले जातात -**

१. काही टिकाकारांनी ॲरिस्टॉटलच्या वर्गीकरणाचे परिक्षण करतांना असे म्हटले आहे की, त्याने संख्या तत्वावर अधिक भर दिला आणि गुणतत्वाकडे मात्र पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे. म्हणून त्याचे राज्याचे वर्गीकरण यांत्रीक स्वरुपाचे झालेले आहे. परंतु हा आक्षेप चुकीचा आहे. ॲरिस्टॉटलने राज्याचे ध्येय उच्च नैतीक जीवन प्राप्त करण्याचे आहे, हे सांगितल्यामुळे तो गुण तत्वाकडेही तेवढेच लक्ष पुरवितो हे मान्य करावे लागते. संख्येचे स्वरुप कसे असते हे स्पष्ट करण्याचा त्याचा प्रयत्न आहे.

२. दुसरा आक्षेप घेतला जातो की, ॲरिस्टॉटलने केलेले राज्याचे वर्गीकरण हे वस्तुतः राज्याचे वर्गीकरण नसून शासनाचे वर्गीकरण आहे कारण राज्याचे वर्गीकरण कधीच होवू शकत नाही. सर्व राज्ये सार्वभौम असतात आणि सार्वभौम राज्ये समान असतात. ॲरिस्टॉटलच्या वर्गीकरणावर घेतलेला हा आक्षेप खरा आहे. लोकराज्य रचनेच्या दृष्टीने विचार केला तर सारखेच असते आणि म्हणून राज्याचे वर्गीकरण होवु शकत नाही. परंतू या बाबतीत ॲरिस्टॉटलला जबाबदार धरता येत नाही. कारण त्याच्या काळात राज्य आणि शासन यात सुक्ष्म भेद केला जात नाही.

३. ॲरिस्टॉटलचे वर्गीकरण आधुनिक काळात उपयोगी पडणार नाही. कारण आधुनिक काळात अनेक मिश्र स्वरुपाची राज्ये निर्माण झ ाालेली आहेत. आधुनिक काळातील संसदिय शासन, अध्यक्षीय शासन पध्दती, संघराज्यात्मक शासन पध्दती, एककेद्रात्मक शासन पध्दती, साम्यवादी शासन पध्दती इ. विविध प्रकार जे आधुनिक काळात अस्तित्वात आहेत त्यांना ॲरिस्टॉटलच्या वर्गीकरणात स्थान नाही. पण याबाबतीत देखील ॲरिस्टॉटलला दोष देता येत नाही. कारण त्याचे विचार नगर राज्याच्या पाश्‍वभूमीवर तयार झालेले आहेत. त्यामुळे त्याच्या काळातच अस्तित्वात नसलेल्या शासन

पध्दतीचे तो वर्गीकरण असे करणार तरी देखील त्याच्या काळात अस्तित्वात असलेल्या १५८ देशांचा राज्यघटनांचा अभ्यास करुन त्याने राज्याचे वर्गीकरण केले. त्यामुळे ते वस्तुनिष्ठ व महत्वाचे मानावे लागते.

**ॲरिस्टॉटलचे गुलामगिरी व नागरिकत्वासंबंधीचे विचार**

**गुलामगिरी पध्दतीसंबंधी विचार -** ॲरिस्टॉटलच्या काळात ग्रीक नगर राज्यांमध्ये गुलामगिरीची पध्दती प्रचलित होती. प्लेटोने गुलामगिरी प्रथेसंबंधी कोणताच विचार मांडलेला नाही. परंतू ॲरिस्टॉटलने मात्र गुलामगिरीचे समर्थन केलेले आहे. ॲरिस्टॉटलच्या काळात काही क्रांतीकारी सोफिस्टांनी या गुलामगिरीच्या पध्दतीविरुध्द विचार मांडण्यास सुरुवात केली होती. एन्टीफोन आणि एल.सी. डेमॉस या सारख्या सॉफिस्ट विचारवंतांनी गुलामगिरीला कडाडून विरोध केला होता. कारण ते व्यक्तिस्वातंत्र्याचे कट्टर पुरस्कर्ते होते. या सोफीस्ट विचारवंतांच्या मते निसर्गाने समान समान केले आहे. आणि म्हणूनच कोणालाही इतरांवर शासन करण्याचा नैसर्गिक अधिकार प्राप्त होवु शकत नाही. ॲरिस्टॉटलने सोफीस्टांनी व्यक्त केलेल्या विचारांना विरोध केला, एवढेच नव्हे तर त्याच्या काळी प्रचलित असलेल्या गुलामगिरी पध्दतीचे समर्थन केले. ॲरिस्टॉटल जास्त व्यवहारवादी असल्याने गुलामगिरीची पध्दत जर नष्ट करण्यात आली तर त्याचा ग्रीक देशाच्या आर्थिक परिस्थितीवर विपरीत परिणाम होईल असे तो मानत होता. कारण त्याकाळी गुलामगिरीची संख्या ही तत्कालीन समाजाचे एक अंग बनली होती. ॲरिस्टॉटलच्या मते घरगुती कामासाठी काही साधनांची आवश्यकता असते ही साधने सजीव व निर्जीव अशा दोन प्रकारची असतात. सजीव साधनांमध्ये गुलामांचा समावेश होतो तर गुलाम हा केवळ आपल्या मालकाचा नोकर नसून तो त्याची खाजगी मालमत्ताच असते. गुलामांचा कशाही प्रकारे वापर करण्याचा मालकांना अधिकार असतो. गुलाम आणि मालक यामध्ये फरक असतो. तो म्हणजे मालकाला बुध्दी असते तर गुलामाला ती नसते. गुलाम आणि इतर प्राणी यांच्यात असा भेद असतो की, प्राण्यांना बुध्दीची कल्पना नसते, परंतु गुलामांना मनुष्यातील बुध्दीच्या गुणांची जाणीव असते. याचा अर्थ गुलाम हा पूर्ण मनुष्यही नाही आणि जनावरही नव्हे तर या दोन्ही अवस्थांमधला एक

मनुष्याकृती प्राणी यांच्यामध्ये नैसर्गिक फरक असतोच. मालक बुध्दीमान तर गुलाम बुध्दीहिन असतो. त्यामुळे मालकाने गुलामांना आज्ञा करणे आणि आपल्या आज्ञेत ठेवणे नैसर्गिक आहे. ॲरिस्टॉटलने गुलामगिरीचे समर्थन दे ान तत्वांवर केले आहे.

१) काही लोक जन्मतःच शासन करण्यास योग्य असतात व काही लोक शासित होण्यासाठी जन्मलेले असतात.

२) प्रत्येक मनुष्यामध्ये निसर्गतःच वेगवेगळे गुण कमी अधिक प्रमाणात असतात. प्रत्येकाची बुध्दी निसर्गतःच वेगवेगळ्या प्रकारची असते. काहींनी राज्य करावे आणि काहींनी राज्ये करुन घ्यावी ही गोष्ट केवळ आवश्यक नाही तर व्यवहार्य आहे. जन्मतःच काही लोक शासित असतात तर काही शासक आणि शासित यांचा परस्पर संबंध आला आणि शरिर यांच्या संबंधाप्रमाणे आहे. शरिर ज्याप्रमाणे आत्म्याच्या आज्ञेनुसार कार्य करते त्याप्रमाणे गुलामाने मालकाच्या आदेशानुसार कार्य केले तर मालक आणि गुलाम या दोघांचेही हित साध्य होते. ॲरिस्टॉटलने गुलामांचे दोन प्रकार सांगितले आहेत.

**१. नैसर्गिक गुलाम -** जन्मतःच बुध्दीहीन, अकुशल, अयोग्य लोकांचा समावेश नैसर्गिक गुलामांच्या वर्गात होतो.

**२. वैधानिक / कायदेशिर गुलाम -** कायद्याने ज्यांच्यावर गुलामगिरी लादली आहे, असे कायदेशिर गुलाम युध्दात पराजीत झालेल्यांना ॲरिस्टॉटल ग्रिक लोकांच्या वांशिक श्रेष्ठतेवर विश्वास ठेवतो. ग्रीक लोकांशिवाय इतर सर्व लोक अयोग्य आहेत, आणि म्हणूनच ते गुलाम होण्याला लायक आहेत असे त्याचे मत होते. मालकांना घरगुती कामकाजापासून मुक्त करणे आणि मालकांची सेवा करणे हे गुलामांचे मुख्य कार्य आहे. तसेच मालकांच्या सान्निध्यात आल्याने गुलामांना देखील बुध्दीची जाणिव होवून ते कालांतराने बुध्दीमान होवु शकतात. म्हणूनच ॲरिस्टॉटलने गुलामगिरीची आवश्यकता आहे असे सांगून गुलामगिरीच्या पध्दतीचे समर्थन केले आहे. मालकाने गुलामांच्या बाबतीत निर्दयी व्यवहार करु नये. तसेच

गुलाम बुध्दीमान होताच त्याला गुलामगिरीतून मुक्त करावे असा विचार ॲरिस्टॉटलने मांडला आहे.

**परिक्षण -** ॲरिस्टॉटलने गुलामगिरीच्या पध्दतीकडे दुर्लक्ष केले नसून गुलामगिरीच्या पध्दतीनेच प्रत्यक्ष समर्थन केले आहे.

१. ॲरिस्टॉटलसारख्या थोर तत्वज्ञाने गुलामगिरीसारख्या अनैसर्गिक अस्वाभाविक आणि अमानुष पध्दतीचे समर्थन करावे ही खरोखरच खेदाची गोष्ट आहे. नागरिकांना राज्यकारभाराकडे पूर्ण लक्ष देता यावे म्हणून गुलामगिरीची पध्दत आवश्यक आहे आणि ग्रीकेतर लोक हे निसर्गतःच गुलाम असतात. म्हणून त्यांना गुलाम करण्यात अमानुष काहीच नाही असे मानने हास्यास्पद आहे. या गोष्टींनी काही गुलामगिरीचे समर्थन होऊ शकत नाही.

२. ॲरिस्टॉटलने एवढे म्हटले आहे की, मालकाने गुलामास चांगल्या रितीने वागवावे, त्याच्याशी निर्दयतेचे वर्तन करु नये आणि बुध्दीमान लोकांवर गुलामगिरी जबरदस्तीने लादली जावू नये. परंतू एवढ्याने ॲरिस्टॉटलची जबाबदारी संपते असे म्हणता येत नाही. मालकाने गुलामाला योग्य रितीने वागविल्यास दोघांचेही हित होते आणि गुलामगिरीची पध्दत सर्वांनाच हितावह ठरते असे ॲरिस्टॉटल मानतो. पण सर्वसामान्य मालक गुलामाविषयी इतका आपलेपणा दाखविल असे मानता येत नाही.

३. ॲरिस्टॉटल एकीकडे दासप्रथा स्वाभाविक आहे असे म्हणतो तर दुसऱ्या ठिकाणी स्वतंत्र जीवन व्यतीत करण्यास लायक असलेल्या दासांना मुक्त करावे असेही म्हणतो.

४. केवळ बुध्दीच्या आधारावर समाजाचे दोन भागात दास आणि स्वामी असे विभाजन करणे अयोग्य आणि अस्वाभाविक आहे. गुलाम बुध्दीशुन्य असतात हे मानने चुकीचे आहे. ॲरिस्टॉटल असे म्हणतो की, स्वामीच्या आज्ञा समजण्यासाठी गुलामांमध्ये बुध्दी पाहिजे. त्याचप्रमाणे स्वामींनी दासाशी मनुष्याप्रमाणे मैत्रीपूर्ण व्यवहार करावा. हे विधानही विसंगत वाटते. कारण गुलामगिरी एका दृष्टीने मनुष्य समजते तर सर्वच दृष्टीने त्याला मनुष्य समजायला पाहिजे.

ॲरिस्टॉटलचे विचार आधुनिक काळात प्रतिगामी स्वरुपाचे वाटणे साहजीकच आहे. कारण ॲरिस्टॉटलने समानता, स्वतंत्रता व नैतिकता यांचाच बळी दिला. जी व्यक्ती राज्याच्या प्राथमिक अवस्था पूर्ण करते तिलाच ॲरिस्टॉटलने राज्यातील सवलतींपासून वंचित केले आहे. एकप्रकारे त्याने मानवतेचा हा अपमानच केला आहे.

अशा प्रकारेच दासप्रथा समाजाला घातक आहे व अशी घातक दासप्रथा असल्यास सामाजिक एकता राहु शकत नाही.

**ॲरिस्टॉटलचे नागरिकत्वासंबंधी विचार -**

ॲरिस्टॉटलने नागरिकत्वासंबंधी फार सखोल विचार केला आहे. अर्थात त्याच्या नागरिकत्व संबंधावर तत्कालीन नगर राज्यातील परिस्थितीचा प्रभाव पडल्याचे आढळुन येते. नागरिक कुणाला म्हणावे यासंबंधीचा विचार करित असतांना त्याने नागरिक कोण नाही असा विचार आधी मांडला. त्याने नागरिकांची अत्यंत सोपी व्याख्या केली आहे. "ज्या मनुष्याला राज्यकारभारामध्ये भाग घेता येतो तो नागरिक." नागरिक बनण्यासाठी काही विशिष्ट प्रकारची योग्यता असली पाहिजे आणि ती योग्यता नैसर्गिक असते असे ॲरिस्टॉटल म्हणतो. शासन करणे आणि शासन करुन घेणे अशी योग्यता ज्याच्या अंगी असते त्यालाच नागरिक म्हणता येईल. नागरिकाचे मुख्य लक्षण राज्यकारभारात भाग घेणे हे आहे. तो म्हणतो शासन करणे आणि त्यासाठी वेगवेगळ्या विधी नियमांची निर्मिती करणे ही राज्याची प्रधान कार्ये होत. आणि कार्य करण्याची पात्रता ज्याच्या अंगी आहे तोच नागरिक असे ॲरिस्टॉटल म्हणतो. जो इतरांना आज्ञा करु शकतो आणि इतरांच्या आज्ञांचे आणि राज्याच्या आज्ञांचेही पालन करु शकतो त्याला नागरिक संबोधणे योग्य होईल.

नागरिकांचे मुख्य लक्षण राज्यकारभारात भाग घेणे आणि राज्यकारभारात भाग घेण्याची क्षमता अंगी असणे हेच होय. म्हणून नागरिक घरगुती कामकाजांपासून आणि काळज्यांपासून मुक्त असला पाहिजे. उलट रितीने असे म्हणता येईल की, जे घरगुती कामकाजांपासून मुक्त असतात त्यानांच नागरिकत्वाचे अधिकार देण्यात यावे. म्हणूनच ॲरिस्टॉटलने स्त्रीया, मुले, निरनिराळी उपजीवीका करणारे लोक, शेतमजूर परकिय आणि शारिरीक

श्रमांवर उपजीवीका करणारे लोक नागरिकत्वापासून वंचीत ठेवण्यात येत होते. आपल्या "The Politics" या ग्रंथात ॲरिस्टॉटलने नागरिकत्वासंबंधी चर्चा केली आहे. सर्वप्रथम ॲरिस्टॉटल राज्य म्हणजे काय असा प्रश्न स्वतः समोरच निर्माण करतो आणि त्या प्रश्नाचे स्वतःच उत्तर देतो. राज्य म्हणजे नागरिकांचा समुदाय होय. यातूनच प्रश्न निर्माण होतो की, नागरिक कुणाला म्हणावे याचे उत्तर देतांना प्रथम ॲरिस्टॉटल नागरिक कोण नाहीत या संबंधीचे विचार प्रस्तुत करतो. राज्यात परकिय आणि गुलाम असे लोक असतात. त्यांना नागरिकत्व प्राप्त झालेले नसते. न्यायालयाद्वारा न्याय प्राप्त करुन घेणाऱ्या व्यक्तिंना देखील राज्याचे नागरिक म्हणून संबोधण्यात येत नाही. कारण राज्यातील न्यायालयाद्वारे न्याय प्रापत करुन घेण्याचा अधिकार हा काही विशिष्ट प्रकारच्या तत्वांद्वारे परकियांना देखील प्राप्त होवू शकतो. पण म्हणून ते काही त्या राज्याचे नागरिक होवू शकत नाहीत. राज्यामध्ये राहणारे निर्धन आणि दरिद्री यांना देखील तो नागरिकत्वापासून वंचित ठेवतो. नागरिकांचा अधिकार प्राप्त होण्यासाठी कुटूंब आणि संपत्ती या दोन गोष्टी आवश्यक आहेत. कुटूंब नसलेल्या, कौटुंबिक जीवन नसलेल्या आणि संपत्ती नसलेल्या व्यक्तिंना नागरिकत्व देण्यात येवू नये. असे आपले स्पष्ट मत ॲरिस्टॉटलने मांडले आहे. त्याने सांगितलेल्या नागरिकत्वासंबंधाच्या अटी विचारात घेतल्या तर कोणत्याही नगर राज्यामध्ये नागरिकांची संख्या फार थोडी राहिल हे उघड आहे.

**नागरिकांच्या विचारांचे परिक्षण -**

ॲरिस्टॉटलच्या नागरिकत्वासंबंधीच्या विचारांवर अनेक आक्षेप घेण्यात आलेले आहेत.

१. ॲरिस्टॉटलची कल्पना नागरिकत्वासंबंधी अतिशय अनुदार आहे. यात शंका नाही. राज्याचा उद्देश जास्तीतजास्त लोकांचे सुख हा असेल तर जास्तीत जास्त लोकांच्या अनुभवाचा आणि कर्तबगारीचा लाभ राज्याला मिळावयास पाहिजे. ॲरिस्टॉटलने याकडे संपूर्ण दुर्लक्ष केलेले दिसते.

२. एका लहान वर्गापुरतचे ॲरिस्टॉटलने नागरिकत्व मर्यादित ठेवलेले असल्यामुळे त्या वर्गाचे सर्व अधिकारी राज्य निर्माण होईल अशी भिती व्यक्त केलेली आहे. राज्यकर्ता वर्ग आपल्याच फायद्याकरीता

कायदे करील आणि इतरांना नेहमी सत्तेपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करिन. हा दोष प्रामुख्याने ॲरिस्टॉटलच्या विचारात आहे.

ॲरिस्टॉटलच्या नागरिकत्वासंबंधीच्या विचारांमध्ये वर निर्देश केलेले दोष जरी असले तरी ॲरिस्टॉटलच्या काळी विशिष्ट हक्कांच्या संदर्भात नागरिकत्वाची कल्पना सांगण्यात आलेली नाही. तर विशिष्ट कार्य आणि जबाबदारी पार पाडता येते. नागरिकत्व प्राप्त करण्यासाठी आवश्यक होते. ही योग्यता फार थोड्या लोकांच्या अंगी असते. त्यातून नागरिकत्व मर्यादित असणे स्वाभाविक आहे. परंतू त्याबाबतीत ॲरिस्टॉटलला फारसे दोषी धरता येणार नाही.

**ॲरिस्टॉटचे क्रांतीसंबंधीचे विचार -**

क्रांती का होते? असमाधान व अन्याय या दोन कारणांमुळे क्रांती होते. प्रथम वैचारिक क्रांती होते मग प्रत्यक्ष क्रांती होते.

ॲरिस्टॉटल याने 'The Politics' या आपल्या ग्रंथात राज्यक्रांतीविषयी अत्यंत सखोल विचार व्यक्त केले आहेत. त्याचे क्रं तीसंबंधीचे विचार हे नाविन्यपूर्ण असे आहेत. सर्वसाधारणपणे आपण जो क्रांतीचा अर्थ घेतो तो ॲरिस्टॉटलला मान्य नव्हता. शासनसंस्थेत परिवर्तन होणे म्हणजेच क्रांती असे ॲरिस्टॉटलचे मत होते. ॲरिस्टॉटलचा काळ हा शांततेचा काळ होता. त्याच्या काळात ग्रीक नगर राज्यांच्या शासन (संस्थेत) व्यवस्थेत बदल होत होते. त्यामुळे ॲरिस्टॉटलने या विषयाकडे विशेष लक्ष दिले. ॲरिस्टॉटल म्हणतो शासन संस्थेमध्ये बदल होत जाणे अपरिहार्य आहे. एका व्यक्तीचे, काही व्यक्तीचे आणि अनेक व्यक्तींचे राज्य क्रमाक्रमाने स्थापन होते व नष्ट होते. हा एकप्रकारे स्वाभाविक नियम आहे. राज्यकर्त्यांच्या योग्यतेमध्ये बदल झाला की क्रांती होते.

**ॲरिस्टॉटलने राज्यक्रांतीचे सांगितलेले स्वरुप -**

१. अशी क्रांती की, ज्यामुळे शासनातील अधिकाऱ्यांना पदभ्रष्ट केले जाते. पण राज्यघटना मात्र बदलत नाही. थोडक्यात क्रांतीमध्ये सरकार बदलते. राज्याचे संविधान आणि स्वरुप बदलत नाही.
२. ज्या क्रांतीमुळे एका वर्गाच्या हाती असलेली सत्ता दुसऱ्या वर्गाच्या हाती जाते. उदा. आधुनिक काळात १९१७ मध्ये रशियात झालेली

कामगार क्रांती. रशियातील राज्यसत्ता झार राजाच्या हातून कामगार वर्गाकडे क्रांतीनंतर गेली.

३. अशी क्रांती की, ज्यात संपूर्ण शासन बदलले जात नाही तर शासनातील काही थोड्या लोकांनाच पदभ्रष्ट केले जाते.

**क्रांतीची कारणे -**

क्रांती होण्याची कारणे कोणतीही असोत. सर्वप्रथम क्रांती करण्याचा विचार मनुष्याच्या मनात निर्माण होतो. जर नागरिकांवर अन्याय होत असेल तर अन्याय अशा शासनाविरुध्द उठावणी करण्याचे विचार मनुष्याच्या मनात निर्माण होतात व तेथूनच वैचारिक क्रांतीला सुरुवात होते. या संबंधात ॲरिस्टॉटलच्या मते पक्षपाती वर्तणुकीमुळे क्रांती होऊ शकते. प्रत्येक नागरिकाला राज्यकारभारामध्ये भाग घेण्याची समान संधी असावी असे वाटते. एकच गट सत्ताधारी असेल तर बाकीचे गट नाराज होतात आणि सत्तेसाठी स्पर्धासुरु होवून त्यातून क्रांती निर्माण होते. त्याचप्रमाणे मनुष्याला त्याच्या योग्यतेप्रमाणे त्याच्या कार्याच्या प्रमाणात जर मोबदला दिला नाही तर क्रांती करण्यास तो उद्युक्त होतो. ॲरिस्टॉटलने राज्यक्रांती सामान्यतः तीन कारणांमुळे होते असे सांगितले.

१. विशिष्ट पदावर कार्य करण्याची व्यक्तीची आकांक्षा
२. समान प्राप्तीची ईच्छा
३. समानतेची आकांक्षा

जर राज्यातील सर्व वर्गातील लोकांना योग्य प्रतिनिधीत्व शासनात दिले गेले तर क्रांती टाळता येते. राज्यकर्त्यांची उध्दट वर्तणूक व पक्षपाती वागणूक क्रांतीसाठी कारणीभूत होतात.

ॲरिस्टॉटलने क्रांतीचा विचार करित असतांना वेगवेगळ्या प्रकारच्या राज्यामध्ये क्रांतीची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला. समुह तंत्रात धनवान लोकांवर अत्याचार आणि अन्याय होवु शकतो. तेव्हा ते लोक सत्ताधाऱ्यांबद्दल मसलत करुन क्रांती घडवून आणतात. महानज सत्तेत बुध्दीमान नेत्यांमधील मतभेद इतके विकोपाला जातात की, त्यातूनच त्यांच्यात कलह आणि संघर्ष होतात आणि क्रांती होते. अप्रतिष्ठित असे जर राजाचे वर्तन असेल तर राजतंत्रात क्रांती झाल्याशिवाय राहत नाही.

**ॲरिस्टॉटलने क्रांती टाळण्यासाठी सांगितलेले उपाय -**

ॲरिस्टॉटलने क्रांतीच्या कारणांची चिकित्सा केल्यानंतर क्रांती टाळण्याचे काही उपाय सांगितले आहेत. हे उपाय सांगत असतांना त्याने राज्याच्या प्रकारांचाही विचार केला आहे. ॲरिस्टॉटल म्हणजे राज्यकर्ते सावध आणि दूरदृष्टी ठेवून राज्यकारभार करतील, तर क्रांती टाळता येईल. नागरिकांमधील विषमता, नागरिकांवरील अन्याय, वर्तणूक, राज्यकर्त्यांचा उध्दटपणा, पक्षपाती वर्तणुक आणि नागरिकांमधील पारस्पारिक द्वेष ही सर्व सामान्य क्रांतीची कारणे आहेत. क्रांती टाळता येते आणि ती टाळणे योग्यही आहे. क्रांती टाळण्याच्या दृष्टीने ॲरिस्टॉटलने जे उपाय सांगितले आहेत ते असे -

**क्रांती टाळण्याचे उपाय -**

१. क्रांती टाळण्याचा सर्वात महत्वाचा उपाय म्हणजे सत्तेचे विकेंद्रीकरण होय. कोणत्याही एका व्यक्तिच्या / व्यक्तिसमुदायाच्या हाती अतिरेकी सत्तेचे विकेंद्रीकरण होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

२. समाजामध्ये निरनिराळे वर्ग असतात. या सर्व वर्गांना समान वर्तणूक दिली गेली तर क्रांतीची संभावना कमी होते. एका विशिष्ट वर्गाच्या हाती सत्तचे केंद्रीकरण होता कामा नये. सामाजातील सर्व वर्गाच्या लोकांना राजकारणामध्ये आणि सत्ता स्पर्धांमध्ये समान संधी दिली गेली पाहिजे तसे झाले तर क्रांती टाळता येईल.

३. अधिकारपदातील विषमता हे क्रांतीचे एक महत्वाचे कारण आहे आणि म्हणूनच राज्यातील अधिकारांच्या जागा सर्व व्यक्तिंना सन्मानदर्शक पदव्या अर्पण केल्या जाव्यात, सन्मानदर्शक पदव्या देतांना शासकाने पक्षपात करु नये. जो मनुष्य अधिक कर्तृत्ववान आहे, जो पात्र आणि लायक आहे अशांना राजकिय जीवनात महत्वपूर्ण कार्य करण्याची संधी दिली गेली पाहिजे. त्या दृष्टीने राज्यातील सत्तापात्रता असलेल्या व्यक्तिंना मिळतील असे वातावरण उपलबध करुन देणे आवश्यक आहे. राज्यामधील कमी महत्वाची पदे जास्त काळपर्यंत जास्त महत्वाची पदे कमी काळपर्यंत असावीत.

एकच व्यक्ती महत्वाच्या पदावर जास्त काळ राहिली तर ती व्यक्ति भ्रष्ट होण्याची शक्यता असते आणि म्हणून महत्वाच्या पदावर कार्य करणाऱ्या व्यक्तिचा कार्यकाल कमी असावा, जेणेकरुन अनेक इच्छुकांना ते पद विभूषीत करता येईल.

४. क्रांती होण्याचे मुख्य कारण भ्रष्ट प्रशासन असते. राज्याचे शासन तशा प्रकारचे असावे आणि शासनाचे संघटन अशाप्रकारचे करण्यात यावे की, जेणेकरुन सत्ताधाऱ्यांना त्यांच्या पदाचा फायदा नागरिकांकडून पैसे उकळण्यासाठी करताच येणार नाही. उच्च अधिकाऱ्यांना लाचलुचपत आणि भ्रष्टाचार इ. गोष्टी करण्याकरिता संधीच मिळणार नाही असे वातावरण राज्याने निर्माण करणे आवश्यक आहे.

५. राज्याच्या अर्थव्यवस्थेवर लोकांचे नियंत्रण असावे तसेच सार्वजनिक अर्थव्यवस्थेचा कोणताही भाग तपासून पाहण्याचा अधिकार नागरिकांना देण्यात यावा. असे झाल्यास शासनाला स्थैर्य व लोकप्रियता प्राप्त होते.

६. नागरिकांना राजकिय शिक्षण देणे क्रांती टाळण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. घटनेची उद्दिष्टे कोणती याची कल्पना, नागरिकांना जर असेल तर राज्यकर्त्यांवर नियंत्रण ठेवणे जनतेला शक्य होईल व क्रांती टळेल.

७. राज्यातील सर्व नागरिकांना समान संधी उपलब्ध करुन दिल्यास राज्याचे स्थैर्य टिकते आणि म्हणून पात्रतेप्रमाणे प्रत्येकाला संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे.

शासनाने लोकांना सदैव परकिय आक्रमणाची भिती दाखवावी व त्यांची मते अंतर्गत बंडाळीपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करावा.

राज्याच्या सुरक्षिततेसाठी नागरिकांच्या व्यक्तिजीवनातही राज्याने हस्तक्षेप करावा असे ॲरिस्टॉटल म्हणतो.

**ॲरिस्टॉटलचे खाजगी मालमत्ता, संपत्ती संबंधीचे विचार -**

ॲरिस्टॉटल हा प्लेटोचा शिष्य होता, तरी त्याच्या विचारांवर प्लेटोच्या विचारांचा प्रभाव पडला होता. म्हणूनच काही बाबतीत ॲरिस्टॉटलचे

विचार प्लेटोच्या विचारांपेक्षा फार भिन्न होते. विशेषतः खाजगी मालमत्तेसंबंधी दोघांचेही विचार फार भिन्न होते आणि म्हणूनच प्लेटोच्या संपत्तीविषयक साम्यवादावर प्रखर टिका केलेली आहे. त्याने संपत्तीही तीन प्रकारची असते असे सांगितले.

१. जमीनीची व्यक्तिगत मालकी, परंतू त्यापासून निर्माण होणाऱ्या उत्पादनाचा सामूहिक उपभोग
२. सामूहिक संपत्ती परंतू व्यक्तिगत रितीने तिचा उपभोग
३. सामूहिक संपत्ती आणि सामूहिकरित्याच तिचा उपभोग

अशी तीन प्रकारची खाजगी मालमत्ता असू शकते. प्लेटोच्या संपत्तीच्या साम्यवादावर टिका करतांना ॲरिस्टॉटल म्हणतो की, सामुहिक संपत्तीच्या योजनेमध्ये जे जास्त कष्ट करतात परंतु ज्यांना त्यांच्या श्रमाचा मोबदला कमी मिळतो ते कमी श्रम करुन अधिक मोबदला मिळणाऱ्या व्यक्तिविरुध्द तक्रार करु शकतात, आणि त्यातून समाजामध्ये वैमनस्य निर्माण होते. ॲरिस्टॉटलला अशा प्रकारची विषमता असलेला समाज अभिप्रेत नव्हता. वस्तूतः व्यक्तिगत लाभ होण्याची शक्यता दिसून आल्यास आपले कार्य अधिक कार्यक्षमतेने व्यक्ति करु शकते. ॲरिस्टॉटल म्हणतो, "खाजगी मालमत्ता ही प्रगतीसाठी आवश्यक असून स्वाभीमानाला पोषक आहे." त्याप्रमाणे खाजगी मालमत्ता नष्ट केल्यास दान आणि औदार्य हे दोन गुण नष्ट होतील. समाजामध्ये ऐक्य प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने खाजगी संपत्ती नष्ट करणे आवश्यक आहे. असे प्लेटो म्हणतो. परंतू याबाबतीत ॲरिस्टॉटलने असे मत स्पष्ट केले आहे की, खाजगी मालमत्ता नष्ट केल्याने समाजात ऐक्य निर्माण होईल हा विचार चुकीचा आहे. कारण खाजगी मालमत्ता उत्पादक वर्गामध्ये राहणार आहे. त्यामुळे खाजगी मालमत्ता नष्ट करणे हितावह राहणार नाही असे मत ॲरिस्टॉटलने मांडले. तो म्हणतो, व्यक्तिगत संपत्तीच्या आधारावर असलेल्या वस्तूच्या सामुहीक उपभोग घेण्याची व्यवस्था अधिक उपयुक्त आणि योग्य आहे. खाजगी मालमत्तेचा हक्क हा नैसर्गिक हक्क आहे आणि त्या हक्कामुळेच व्यक्तिमत्वाचा विकास होवू शकतो. खाजगी मालमत्ता नष्ट करणे म्हणजे व्यक्तिच्या खाजगी स्वभावावर कृत्रीम सामाजिक बंधनाचे नियंत्रण प्रस्थापित करण्यासारखे आहे. उलट योग्य शिक्षणाद्वारे व्यक्तिला

खाजगी मालमत्तेचे महत्व पटवून दिले तर व्यक्तिच्या दृष्टीनेच नव्हे तर संपूर्ण समाजाच्या दृष्टीने खाजगी मालमत्ता उपयुक्त ठरेल. थोडक्यात प्रत्येक व्यक्तिला उन्नतीसाठी काही किमान संपत्तीची आवश्यकता असते आणि ही किमान संपत्ती त्यास न देणे म्हणजे त्याच्या व्यक्तित्वाचा विकास खुलविणे होय. खाजगी मालमत्ता सामाजिक अर्थव्यवस्थेचा एक भाग आहे आणि म्हणून ॲरिस्टॉटलने खाजगी मालमत्तेला महत्वाचे स्थान दिलेले आहे.

**ॲरिस्टॉटलचे कुटूंबासंबंधीचे विचार -**

ॲरिस्टॉटलच्या मते कुटूंब समाज जीवनाची प्राथमिक पाठशाळा आहे. सामाजिक जीवनाच्या भव्य मंदिराची कुटूंब ही आधारशिला आहे. प्लेटोच्या मते कौटुंबिक बंधन व्यक्तिला स्वार्थाच्या मार्गाकडे नेते. प्लेटो कुटूंबाला प्रगतीच्या मार्गातील एक अडथळा मानतो. त्याच्यामते कुटूंब स्वाभाविक आणि आवश्यक आहे. कुटूंब मानवतेची अशी पाठशाळा आहे की, ज्यात सहकार्य, सहानुभूती, स्नेह, प्रेम व त्याग यांचे पहिले धडे शिकविले जातात. कुटूंबामध्ये तीन विभिन्न प्रकारचे संबंध असतात.

१. पती-पत्नी संबंध
२. आई-वडील आणि मुले यांचा संबंध
३. स्वामी आणि सेवक यांचा संबंध

हे तीनही प्रकारचे संबंध व्यक्तिच्या व्यक्तित्वाचा विकास करण्यास मदत करतात. कुटूंबाचे सदस्यत्व नैसर्गिक असते. पितृसत्ताक कुटूंब पध्दतीचा तो पुरस्कार करतो. पुरुष कुटूंबाचा संचालक आणि शासक असतो. स्त्रीपेक्षा पुरुष अधिक गुणवान असल्याने तो कुटूंबावर पूर्ण नियंत्रण ठेवतो. गुलाम बुध्दीहीन असल्याने स्वामीचे त्यावर शासन आवश्यक असते. मुले लहान आणि अनुभवहीन असल्याने ती पदभ्रष्ट होवू शकतात. म्हणून कुटूंबाचा मुख्य हा कुटूंबातील वयोवृध्द पुरुषच असावा.

ॲरिस्टॉटलच्या मते, कुटूंबात मैत्रीपूर्ण वातावरण असले पाहिजे. प्लेटोने चार भिंती बाहेर काढलेल्या स्त्रीला पुन्हा चार भिंतीत ॲरिस्टॉटलने कोंबले. त्याच्या मते, स्त्रीयांचे कार्यक्षेत्र म्हणजे "चुल आणि मुल" हेच आहे. म्हणजेच ॲरिस्टॉटल स्त्रीयांचे कार्यक्षेत्र कुटूंबापुरतेच मर्यादित ठेवतो. ॲरिस्टॉटल कुटूंबाचा पुरस्कार करतो पण त्याला पूर्ण स्वातंत्र्य देत नाही.

लोकसंख्येच्या दृष्टीने जनसंख्या रोखण्यासाठी राज्याला नियम बनविण्याचा तो अधिकार देतो.

प्लेटोने स्त्रीयांचा साम्यवाद सांगून कुटूंबसंस्थेवरच आघात केला होता. लहान मुलां बद्दल मातापित्यांपासून स्वाभाविक असणाऱ्या प्रेमापासून वंचित केले होते. परंतू ॲरिस्टॉटलने मात्र कुटूंबाचे महत्त्व मान्य केले. मनुष्यातील स्वाभाविक वृत्तीचा त्याने सन्मान केला.

***

## प्रकरण ३

# मॅकिया व्हेली (Machiavelli)

## (इ.स. १४६९ ते १५२७)

मॅकियाव्हेली हे नाव राज्यशास्त्रात वास्तववादी विचारवंत म्हणून परिचित आहे. राजकारण व नितीशास्त्रात फारकत करणारा व त्या फारकतीची आवश्यकता प्रतिपादन करणारा महान विचारवंत म्हणून ओळखले जाते. वास्तवाचे वैचारिक प्रतिपादन करणारा अभ्यासक म्हणून त्यास ओळखले जाते.

**जीवन परिचय :** मॅकियाव्हेली याचा जन्म इ.स. १४६९ मध्ये इटालीतील फ्लॉरेन्स येथे झाला. त्याचे वडील वकिल व्यवसायामध्ये होते. त्याला फारसे शिक्षण घेता आले नाही. त्यामुळे नोकरी मिळविण्यासाठी कष्ट पडले. इ.स. १४९० मध्ये सामान्य प्रशासनात नोकरी मिळवून वयाच्या एकोणतिसाव्या वर्षी तो फ्लॉरेन्सच्या नगर राज्याचा सचिव झाला. अंतर्गत व्यवहार आणि युध्दकार्य यासाठी दहा जणांचे एक मंडळ होते. त्याचा तो सुमारे चौदा वर्ष सचिव होता. परराष्ट्रीय वकील म्हणून त्याने पॅरिस, रोम, बर्लीन आणि सीझर बेर्जियाचा दरबार इत्यादी ठिकाणी तेवीस वर्ष अनुभव घेतला. या अनुभवाचा लाभ घेतांनाच त्याने फ्रान्स, स्वित्झरलँड, जर्मनी या देशांच्या राजकीय पध्दती आणि राजकारणाचा सखोल अभ्यास केला. स्विस संघराज्याच्या कल्पनेमुळे तो बराच प्रभावित झाला. फ्रान्स, स्पेन हि राज्ये संघटीत होऊन बलशाली बनली व पुढे गेली. तसेच इटालीतील विविध नगरराज्ये एकत्रित येऊन संघटितरित्या त्यांनी प्रगती करावी असे त्यांचे मत होते. इतिहासातील घटनांचा वापर त्याने आपल्या विचारांच्या समर्थनासाठी केला. त्यामुळे त्याची अभ्यासपध्दती ऐतिहासिक म्हणण्यापेक्षा निरीक्षणात्मक स्वरुपाची होती असे म्हणणे योग्य ठरेल. त्यांच्या ग्रंथांपैकी 'The Prince' हा ग्रंथ महत्वाचा आहे. त्या ग्रंथात राजसत्तांची निर्मिती, ती टिकविण्याचे तंत्र आणि ती नष्ट का व कशी होते याचे सविस्तर विवेचन आढळते.

**साध्य आणि साधन याविषयी मॅकॅव्हेलीचे विचार -**

प्रत्येक राजकिय विचारवंताच्या विचारावर परिस्थितीचा प्रभाव पडत असतो. प्रत्येक विचारवंत आपल्या युगातील समस्या सोडविण्याच्या दृष्टीने विचार मांडत असतो. समकालीन परिस्थितीचा प्रत्येक विचारवंताच्या विचारांवर प्रभाव पडत असतो. प्लेटो आणि ॲरिस्टॉटल या दोन्ही विचारवंतांनी आपआपल्या युगातील समस्या सोडविण्यासाठीच आपले राजकिय विचार मांडले असे म्हटल्यास वावगे होणार नाही. परंतू इतर विचारवंतांच्या मानाने समकालीन परिस्थितीचा विचार मॅकॅव्हेलीने अधिक प्रमाणात केला आणि म्हणूनच त्याला आधुनिक युगाचा शिशू म्हणून संबोधिले जाते. त्याच्या विचारांवर त्याच्या काळातील परिस्थितीचा ठसा स्पष्ट उमटलेला दिसून येतो. त्याने तत्कालीन इटालीयन समाजाचे अत्यंत सुक्ष्म अध्ययन केले होते. त्याने मानवी स्वभावासंबंधीचे जे विचार व्यक्त केले ते तत्कालीन इटालियन समाजातील लोकांच्या स्वभावाच्या अध्ययनावर आधारलेले आहेत. मॅकॅव्हेलीच्या संबंधात डनिंग असे म्हणते की, "प्रतिभासंपन्न फ्लॉरेन्सवासी खऱ्या अर्थाने त्याच्या युगाचे अपत्य होता."

मॅकॅव्हेलीने अतिधार्मिकतेचा नेहमी विरोध केला. त्याने धार्मिक अंधविश्वास आणि अंधश्रध्दा याविरुध्द आपल्या लिखाणातून प्रखर हल्ला केला. धर्मराज्यामध्ये त्याचा अजिबात विश्वास नव्हता. धर्म आणि राज्य या दोन अलग गोष्टी आहेत. त्यामुळे धर्माला राज्यापासून अलग ठेवणेच राज्याच्या दृष्टीने हितावह ठरेल असा विचार त्याने मांडला. इटालीच्या स्वातंत्र्यातच इटालीचे कल्याण अभिप्रेत आहे हा विचार त्याने आग्रहपूर्वक प्रतिपादन केला. राष्ट्रीयत्वाबद्दलचे अत्यंतीक महत्वाचे विचार त्याच्या लिखाणातून स्पष्ट होतात. मॅकॅव्हेलीच्या काळापर्यंत मध्ययुगीन पवित्र रोमण साम्राज्य नष्ट झाले होते. युरोपमधील इतर राष्ट्रांनी आपआपली स्वतंत्र राज्ये स्थापन करुन राष्ट्रीय ऐक्य आणि त्यापासून मिळणारे सर्व फायदे आत्मसात केले होते. ही सर्व राष्ट्र वैभव संपन्न झालेली होती. परंतू याउलट इटालीयन राष्ट्राची परिस्थिती मात्र अगदी चिंताजनक झाली होती. फ्रान्स आणि स्पेन या दोन राष्ट्रांमध्ये इटालीवर प्रभुत्व गाजविण्यासंबंधी स्पर्धा सुरु होती. या सर्व गोष्टी मॅकॅव्हेलीच्या सुक्ष्म दृष्टीतून सुटल्या नाहीत आणि म्हणून संपूर्ण

इटालीला एका राष्ट्रीयतेच्या सुत्रात बांधून फ्रान्स, स्पेन आणि ब्रिटन या प्रमाणेच एक भव्य आणि दिव्य राष्ट्र राज्य निर्मित करावे हे मॅकॅव्हेलीच्या डोक्यात येणे स्वाभाविक होते.

मॅकॅव्हेलीस राजकिय क्षेत्रातील व्यवहारिक अनुभव फार मोठ्या प्रमाणात प्राप्त झाले असल्याने आपल्या ध्येयप्राप्तीसाठी केवळ नैतिक साधनांचा वापर करुन चालणार नाही याची त्याला जाणीव होती आणि म्हणूनच वाटेल त्या मार्गाने स्वातंत्र्य प्राप्तीचे ध्येय आपण साध्य केले पाहीजे असे मत त्याने निर्भयपणे मांडले. बुध्दी आणि बळाचा योग्य वापर केल्यास इटालीतही ऐक्य प्रस्थापित होवू शकेल असा त्याला विश्वास होता. अर्थात त्याचे हे विचार समकालीन विचारवंताना मान्य नसल्याने त्यांनी मॅकॅव्हेलीवर अत्यंत कडक शब्दात टिका केली. पुढे राज्यशास्त्रात कुटील नितीला 'मॅकॅव्हेलीयन डिप्लोमसी' असे संबोधण्यात येवू लागले व त्याच्या राजवटीस अत्यंत निर्घुन आणि हीन प्रकार मानण्यात येउ लागला. मॅकॅव्हेलीने राजकारणाबाबत जे विचार मांडले त्याचा प्रभाव त्याच्या मृत्युनंतर जवळजवळ ३५० वर्षांनी अनेक विचारवतांवर म्हणजेच काहूर, गॅरिबॉल्डी, व्हिक्टर इ. वर प्रभाव पडला व त्यांनी इटालीला स्वतंत्र करण्यासाठी मॅकॅव्हेलीने सांगितलेल्या साधनांचा वापर केला व इटालीला मुक्त केले. या सर्व राष्ट्रभक्तांना इटालीने थोर राष्ट्रभक्त म्हणून गौरविले. यातच मॅकॅव्हेलीच्या विचारांचे व्यवहारिक राजनितीच्या दृष्टीने श्रेष्ठत्व सिध्द होते. मॅकॅव्हेलीने राज्याच्या स्थैर्याचा प्रश्न महत्वाचा मानला. राजकिय तत्वज्ञानापेक्षा राजकिय व्यवहाराला त्याने विशेष महत्व दिले. मॅकॅव्हेलीने इटालीसाठी अशा एका सामर्थ्यवान राज्याची कल्पना केली आहे की, जो इटालीमध्ये सामर्थ्यवान राजतंत्र प्रस्थापित करु शकेन. त्याच्या फ्लॉरेन्स या नगर राज्यामध्ये अनेक लोक सत्ता स्पर्धा करित होते त्या नगर राज्यामधील स्पर्धा तत्वे त्याला स्पष्ट दिसत होती. भाडोत्री सैन्याच्या मदतीने आपआपली सत्ता टिकविण्याचा किंवा प्राप्त करण्याचा अनेक जण प्रयत्न करित होते. या सर्वांवर कडक नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने राजा सामर्थ्यवान असणे अत्यंत आवश्यक होते आणि म्हणूनच त्याने आपल्या "The Prince" या ग्रंथात अमर्यादीत राजतंत्राचा पुरस्कार केला आहे.

देशाचे स्थैर्य आणि देशाचा विकास सामर्थ्यवान राजाशिवाय अन्य कोणीही करु शकणार नाही याची मॅकव्हेलीला खात्री होती.

मॅकव्हेलीने नितीशास्त्र आणि धर्मशास्त्रापासून राज्यशास्त्राला अलग करुन नितीशास्त्र आणि राज्यशास्त्र यांची परस्परातून कायमची फारकत त्याने केली. त्याचे हे विचार देखील तत्कालीन समाजातील अतिधार्मिकतेच्या दोषातूनच निर्माण झाले होते. मॅकव्हेली असे म्हणतो की, जर नैतीक मार्गाचा वापर करुन राज्याचे संरक्षण करणे शक्य होत नसेल तर त्याचा अवलंब अवश्य करण्यात यावा. परंतू जर राज्याच्या रक्षणासाठी अनैतिक मार्गांचाच वापर करण्याची पाळी आली तर तसे करण्यास कोणतीही हरकत नाही. कारण राज्य रक्षणाचे ध्येय अत्यंत उदात्त असल्याने ते ध्येय ज्या मार्गाने साध्य होत असेल ते मार्ग हाताळण्यास अगतिक आणि अनैतिक काहीच नाही म्हणून राजाने प्रत्येक परिस्थितीशी तोंड देण्याची आपली तयारी ठेवावी. नैतिकतेच्या आणि धार्मिकतेच्या शुध्द सिध्दांतांच्या आधारावर सार्वजनिक कार्याचे संचालन करणे केवळ अशक्य आहे असा अनुभव त्याला स्वतःला आला होता आणि म्हणूनच नैतिक आणि धार्मिक कल्पना गुंडाळून शासकाने राज्यरक्षणासाठी सदैव तयार असले पाहिजे असे त्याने निर्भिडपणे प्रतिपादन केले. यासंबंधी त्याचे विचार अत्यंत स्पष्ट होते. मॅकव्हेलीच्या मते एकाचवेळी राजा आणि ईश्वर यांची सेवा करुन किंवा धार्मिक आचरण करुन जर राज्य धोक्यात येत असेल तर राज्याची सेवा करुन माहित नसलेल्या व कधीही दृष्टीला न पडणाऱ्या ईश्वरापेक्षा राज्यालाच प्राधान्य द्यावे. कोणत्याही मार्गाने राज्याच्या हितासाठी प्रयत्नशिल राहणे हाच श्रेष्ठ राजधर्म ठरतो असे त्याने सांगितले.

मॅकव्हेलीचे हे सर्व विचार तत्कालीन ज्ञान पुर्नउदयाच्या चळवळीचे प्रतिनिधीत्व करतात आणि म्हणूनच मॅकव्हेलीला युगाचा शिशु म्हणतात.

**मॅकव्हेलीचे मनुष्य स्वभाव व नैतिकता संबंधी विचार**

**१) मनुष्य स्वभावासंबंधी विचार -**

मॅकव्हेलीचे संपूर्ण राजकिय विचार हे त्याने मनुष्यस्वभावासंबंधी रेखाटलेल्या चित्रावर अवलंबून होते. त्याने आपल्या "The Prince" या ग्रंथात मनुष्य स्वभावाचे विवेचन केले आहे. त्याचे मनुष्यस्वभावासंबंधीचे विचार हॉब्जच्या विचारांशी मिळते जुळते आहेत. मॅकव्हेलीच्या मते मनुष्य हा

निसर्गतःच स्वार्थी आणि दृष्ट असतो. प्रत्येक मनुष्याचे चारित्र्य हे अनेक दोषांनी युक्त असते. मनुष्यामध्ये मुर्खपणा आणि दुर्बलता हे दोष असतात आणि म्हणून अशा लोकांवर नियंत्रण स्थापन करुन त्यांच्यामध्ये सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. मॅकॅव्हेली म्हणतो प्रत्येक मनुष्य स्वार्थी असल्याने त्याच्यातील स्वार्थ त्याला कार्य करण्यास उत्तेजन देत असतो. मनुष्य हा मुलतः स्वार्थी, कृतघ्न, विश्वासघातकी, भित्रा, चंचल असतो. मनुष्य चांगले होण्याचा प्रयत्न जेव्हा चांगले होणे फायद्याचे असेल तेव्हाच करतो. मनुष्य स्वभावाचे आणखी एक महत्वाचे तत्व असे की, ते म्हणजे भिती. प्रेमापेक्षा देखील भितीने मानवी जीवन अधिक प्रभावीत झालेले असते. म्हणून राजाने प्रजावत्सल न वागता असे वागण्याचा प्रयत्न करावा की, जेणेकरुन त्याची प्रजेला भिती वाटेल. मॅकॅव्हेलीच्या मते, जोपर्यंत लोक राजाला भितील तोपर्यंत ते त्यावर प्रेम करतील. भयाशिवाय प्रेमभावना निर्माण होत नाही असे मॅकॅव्हेलीला वाटत असे आणि म्हणूनच मॅकॅव्हेलीने मनुष्यस्वभावासंबंधी आपले विचार मांडले आहेत. मनुष्यातील अपूर्णतेमुळेच शासनाची प्रस्थापना झाली आहे. मनुष्याच्या स्वार्थीपणामुळे समाजामध्ये अराजकता आणि गोंधळ माजेल म्हणून शासकाने प्रजेच्या संपत्तीचे रक्षण केले पाहिजे. मॅकॅव्हेली म्हणतो आपल्या संपत्तीवरुन मनुष्याचे अपहरण मनुष्य कधीही विसरत नाही. म्हणून शासकाने एखाद्यास मृत्युदंड दिला तर हरकत नाही. पण कोणत्याही संपत्तीचे राजाने अपहरण करुन नये. उलट मनुष्याच्या संपत्तीचे रक्षण करण्याचाच प्रयत्न करावा. अशाप्रकारे मॅकॅव्हेलीने मनुष्य स्वभावाचे वर्णन केले आहे.

**२) नैतिकतेसंबंधी विचार -**

१) व्यक्तिगत नैतिकता / राज्याची नैतिकता

२) प्रजेची नैतिकता / जनतेची नेतिकता

मॅकॅव्हेलीने नैतिकतेचा दोन प्रकारे विचार केला आहे. व्यक्तिच्या नैतिकतेचा आणि राज्याच्या नैतिकतेचा त्याने भेद केला आहे. याचा अर्थ नैतिकतेसंबंधीचा मॅकॅव्हेलीचा सिध्दांत दोन स्वरुपाचा आहे.

**१) व्यक्तिगत नैतिकता / राज्याची नैतिकता -**

त्याच्या मते कोणतेही कार्य मुळातच चांगले/वाईट नसते तर त्या कार्यापासून होणारे परिणाम त्या कार्याचा चांगलेपणा/वाईटपणा ठरवितात. राज्यासाठी जी गोष्ट हितकारक असेल तरी चांगली आणि जी अहितकारक असेल ती वाईट असे मॅकॅव्हेली म्हणतो. नैतिकतेसंबंधी विचार करतांना राज्याची निती आणि प्रजेची निती अशा दोन दृष्टीकोनातून मॅकॅव्हेलीने विचार केला आहे. आपल्या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी जे साधन राज्याला योग्य वाटेल त्या साधनाचा प्रयोग करण्याचा अधिकार राजाला आहे. मग ते साधन अनैतिक असेल तरीही हरकत नाही. राजा वापरित असलेल्या साधनांचे औचित्य, त्यापासून मिळणारी सफलता सिध्द करीत असते आणि म्हणूनच राज्याचे हित ज्या साधनांद्वारा साध्य होत असेल त्या साधनांचा निसंकोचपणे राजाने वापर करावा.

मॅकॅव्हेलीने राज्याच्या सुरक्षिततेचा जास्त विचार केला. त्याचे कारण त्याच्या काळात इटाली हे राष्ट्र असुरक्षित होते. चांगले उद्दिष्ट साध्य करण्यामध्ये त्याला यश प्राप्त झाले तर त्याच्याकडून वापरण्यात आलेली सर्व साधने योग्य आणि उचितच समजली जातील अशा रितीने राज्याची निती, व्यक्तिच्या निती अनितीच्या कल्पनेपेक्षा भिन्न असते असे मॅकॅव्हेली म्हणतो.

**२) प्रजेची/जनतेची निती -**

प्रजेच्या नैतिकतेचा विचार करतांना मात्र मॅकॅव्हेली असे म्हणतो की, प्रजेने सद्‌गुण संपन्न होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रजेने सार्वजनिक सेवाभावाची कल्पना आपल्या मनात रुजवली पाहिजे. समाज आणि राज्याच्या हितासाठी आपल्या व्यक्तिगत हिताचा त्याग करण्यास सिध्द असले पाहिजे. अशाप्रकारे व्यक्तिचे नितीशास्त्र आणि राज्याचे नितीशास्त्र अलग-अलग असेल असे मॅकॅव्हेलीचे मत होते.

मॅकॅव्हेलीच्या मते ज्या राज्यांमध्ये वाघ आणि कोल्हा यांच्या गुणांचा समन्वय साध्य झाला असेल तोच राजा आदर्श राजा होय. राजाने वाघाप्रमाणे शुर आणि पराक्रमी असले पाहिजे. तसेच कोल्ह्याप्रमाणे चपळ आणि धुर्त असले पाहिजे. आवश्यकतेनुसार बळाचा वापर त्याने करावा. दिलेली वचने पुर्ण केल्याने आपले हित होणार असेल तर दिलेली वचने त्याने पाळावी, परंतू वचन पुर्तीमुळे स्वतःचे अहित होणार असेल तर राजाने निसंकोचपणे वचनभंग

करावा असा आदेश मॅकॅव्हेलीने राजाला केला. त्याने नागरिकांच्या दृष्टीने विचार करतांना असे सांगितले की, नागरिकांनी परस्परांशी मित्रत्वाचे संबंध ठेवावेत. आपल्या शेजारच्या नागरिकांवर प्रेम करावे, परंतु राजाने मात्र आपल्या शेजारच्या राज्यापासून सदैव सावध आणि सतर्क असावे आणि योग्य संधी मिळताच शेजारच्या राज्यावर आक्रमण करुन त्याचे राज्य आपल्या राज्याला जोडून टाकावे. राजाने भावनेच्या आहारी कधीही जावू नये. भावनायुक्त बनण्याचा त्याने प्रयत्न करावा. तसेच विवेकयुक्त बनण्याचा त्याने प्रयत्न केला पाहिजे. निती-अनितीच्या कल्पनेतून राजाने स्वतःला गुरफटून घेवू नये. धर्म-अधर्म, निती-अनिती या कल्पनेतून राजाने स्वतःला मुक्त करावे. ज्या कार्यामध्ये राज्यहीत साध्य होते ते धार्मिक दृष्टीने जरी अधार्मिक समजले जाणारे कृत्य असले तरी राजाने ते कार्य अवश्य करावे. मॅकॅव्हेलीच्या या विचारांवर तत्कालीन परिस्थितीचा प्रभाव आढळतो. त्याच्या काळात धर्मसत्तेचा, राज्यसत्तेवर फार मोठा प्रभाव पडला असल्याने राज्यसत्तेवर त्याचे अनिष्ट परिणाम झाले होते आणि म्हणूनच मॅकॅव्हेलीने अधार्मिकतेपासून राज्याला वाचविण्यासाठी धर्म आणि निती यांना राजकारणापासून अलग केले.

मॅकॅव्हेलीने राज्याच्या स्थैर्याबद्दल अत्याधिक विचार केला. राज्याचे संरक्षण करणे हे राजाचे प्रथम कर्तव्य असते असे मानले आणि म्हणूनच राज्य संरक्षणार्थ अधार्मिक आणि अनैतिक साधनांचा वापर देखील राजा करु शकतो.

**आधुनिक राजकीय विचारांचा जनक मॅकॅव्हेली :**

मॅकॅव्हेलीला आधुनिक राजकिय विचारांचा जनक मानले जाते. कारण मॅकॅव्हेली आधुनिक युगातील पहिला राज्यशास्त्रज्ञ होता असे त्याच्या काळात अनेक लेखक सांगतात. त्याचे कारण मॅकॅव्हेलीच्या विचारांचा परिणाम फार मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. वस्तूतः मॅकॅव्हेली हा पूर्णपणे मध्ययुगीन प्रवृत्तीचेही प्रतिनिधित्व करीत नाही व पूर्णपणे आधुनिक युगाचेही प्रतिनिधीत्व करित नाही. त्याची स्थिती दोन्हीही युगाच्या सिमारेषेजवळ विचारकांवर उभी आहे आणि म्हणून मध्ययुग आणि आधुनिक युग या दोन्ही युगाच्या प्रवृत्तीचे प्रतिबिंब त्याच्या विचारांमध्ये आपल्याला आढळते. तरी देखील त्याला आधुनिक युगाचा पहिला विचारवंत म्हणून संबोधले जाते. त्याची काही कारणे पुढीलप्रमाणे -

१) त्याने स्विकारलेली अध्ययन पध्दती ही आधुनिक काळाची निर्देशक आहेत. धार्मिक अंधविश्वास आणि अंधश्रध्दा यांनी राजकिय विचारांमध्ये हस्तक्षेप केल्याने अनेक प्रकारचे वाद राज्यविषयक क्षेत्रामध्ये निर्माण झाले होते. मॅकव्हेलीने प्रथम विशुध्द लौकीक दृष्टीकोनातून राजकारणाचा विचार केला. निरीक्षणपध्दती, शास्त्रीय पध्दती, ऐतिहासिक पध्दती व यथार्थवादी अभ्यास पध्दतीच्या दृष्टीने त्याने आपले राजकिय विचार स्थिर केले. धार्मिक गोष्टींना राज्यशासन विषयक विचारांमध्ये स्थान न दिल्याने आणि फक्त लौकीक जगाचा त्याने विचार केल्याने राजकिय तत्वशासकाला धार्मिकतेच्या प्रपंचातून मुक्त केले. विज्ञानाच्या अभ्यासाच्या ज्या पध्दती असतात त्या पध्दतीचा अवलंब करुन त्याने आपले विचार स्थिर केलेत.

२) मॅकव्हेलीने धर्म आणि राजकारण यांची फारकत करुन राज्यसंस्थेचाच प्रामुख्याने विचार केला. धर्मापेक्षा राज्य श्रेष्ठ असते आणि पोपच्या सत्तेपेक्षा राजाची सत्ता श्रेष्ठ असते. म्हणून राज्यविषयक विचारांमध्ये धर्माने हस्तक्षेप करता कामा नये असे मॅकव्हेलीने स्पष्ट केले. धर्माला राज्याच्या राजकिय जीवनात कोणतेही स्थान नाही असे विचार त्याने सर्वप्रथम मांडून आधुनिक धर्मनिरपेक्ष राज्याचा पाया त्याने रचला. आधुनिक काळात धर्म ही व्यक्तिची व्यक्तिगत बाब मानली जाते. धर्म ही राज्याची बाब नाही आणि ती नसावी असे विचार आधुनिक काळात सांगितले. राज्यात त्या विचाराचे गुरु मॅकव्हेलीच्या विचारांमध्ये सापडते. केवळ भौतिक आणि अधिक गोष्टीचाच राज्यामध्ये विचार केला जावा आणि परमार्थकविषयक राज्याच्या कक्षेत देवू नये हे आधुनिक काळातले विचार मॅकव्हेलीच्या काळापासून सुरु झाले.

३) मॅकव्हेलीने राज्यशास्त्राला नितीशास्त्रापासून अलग केले. मॅकव्हेली हा व्यक्तिशः अधार्मिक/दुराचारी नव्हता. व्यक्तिगत जीवनात धर्माचे आणि नितीचे महत्व त्याने सांगितले. फक्त राजकिय जीवनामध्ये धार्मिक विचार आणि नैतिक विचारांमुळे अनेक वेळा राज्याचे

अस्तित्व धोक्यात येते आणि म्हणून नितीविषयक कल्पनांनी राज्याच्या क्षेत्रात हस्तक्षेप करुन नये. हा मॅकॅव्हेलीचा विचार तत्कालीन इटालीच्या परिस्थितीतून निर्माण झाला आहे.

मॅकॅव्हेलीच्या मृत्युनंतर ३५० वर्षांनी इटालीला स्वतंत्र करण्यासाठी काहूर, गॅरिबाल्डी इ. देशभक्तांनी जे मार्ग स्विकारले, जी साधने वापरलीत ती सर्व मॅकॅव्हेलीद्वारा मान्यता प्राप्त होती. काहूरने तर एकेठिकाणी असे स्पष्ट केले होते की, "इटालीला स्वतंत्र करण्यासाठी ज्या मार्गाचा अवलंब आम्ही केला तो मार्ग आणि ती साधने जर आम्ही आमच्या वैयक्तिक स्वार्थासाठी वापरली असती तर आमची एक नंबरचे बदमाश म्हणून ख्याती झाली असती" यातच मॅकॅव्हेलीने व्यवहारिक दृष्टीने प्रतिपादन केलेल्या विचारांचे व्यावहारिक महत्व किती मोठे आहे हे सिध्द होते. काहूर, गॅरिबॉल्डी, मॅझीनी या देशभक्तांना मॅकॅव्हेलीच्या विचारांमुळेच प्रेरणा मिळाली. आजदेखील राष्ट्राराष्ट्राच्या पारंपारिक संबंधांमध्ये मॅकॅव्हेलीने सांगितलेल्या कुट नितीचा वापर केला जातो. राजकिय तत्वज्ञानाच्या इतिहासात मॅकॅव्हेलीचे स्थान म्हणूनच असामान्य आणि श्रेष्ठ दर्जाचे आहे.

**मॅकॅव्हेलीचे धर्मासंबंधीचे विचार :**

मॅकॅव्हेलीने राजकारण जसे नितीनियमांपासून मुक्त केले तसेच त्याने राज्यावर असलेले धर्माचे बंधन तोडले आहे. कारण मॅकॅव्हेलीच्या वेळी पोप आणि चर्चचे अधिकारी धर्माच्या नावावर अत्याचार करित होते व खरा धर्म लुप्त झाला होता. सर्वत्र अनिती पसरली होती. त्याच्यावेळी राजासुध्दा या धार्मिक बंधनांपासून मुक्त नव्हता. याच कारणामुळे इटाली हा देश संकटात सापडलेला आहे असे त्याला नेहमी वाटे. मॅकॅव्हेलीने स्पष्टपणे राजकारण आणि धर्म यात अंतर दाखवून राजा हा धर्मापेक्षा श्रेष्ठ व मुक्त आहे असे सांगितले.

**(अ) धर्म राज्यहिताला पोषक असावा -**

मॅकॅव्हेलीच्या मते धर्म ही व्यक्तिच्या आत्म्याची श्रध्दा असल्यामुळे ती व्यक्तिगत बाब आहे. प्रत्येक व्यक्तिने कोणत्या धर्माचे पालन करावे हे त्याचे त्याने ठरवावे. राज्य धार्मिक बाबतीत हस्तक्षेप करु शकत नाही. परंतु याचा अर्थ असा नव्हे की, धर्म राज्यापेक्षा श्रेष्ठ आहे. धर्म जर राज्याच्या

हिताच्या आड आला / राजाविरुध्द कार्य करु लागला तर धर्म आपली मर्यादा सोडतो असे समजावे आणि अशावेळी राजाला धर्मावर नियंत्रण घालण्याचा व तो नष्ट करण्याचा पूर्ण अधिकार आहे. उपयोगिताच्या आधारावर धर्माचे महत्व ठरत असते. धर्मामुळे राजाचे हीत होत असेल तर तो धर्म चांगला अन्यथा वाईट समाजावा. व्यक्तिने धर्मानुसार वागावयास पाहीजे. त्याच्याकरिता पाप, दृष्टपणा, संपत्तीचे अपहरण या सर्व गोष्टी अधार्मिक आहेत. परंतू राजाकरिता ह्या सर्व गोष्टी धार्मिक / अधार्मिक ठरत नाहीत. व्यक्तिने कोणत्या धर्माचे पालन करावे, पुजा कशी करावी हा व्यक्तिचा खाजगी प्रश्न आहे. राजाला याबाबत काहीही कर्तव्य नाही. अशारितीने मॅकॅव्हेलीने दोन प्रकारच्या नैतिकतेप्रमाणेच दोन प्रकारचे धर्म सांगितले आहेत.

**१) व्यक्तिगत धर्म -**

वैयक्तिक श्रध्देवर आधारित आहे आणि त्यात हत्या, दुराचार, चोरी, फसवणूक इ. गोष्टी अनैतिक असून त्या केल्यास व्यक्तिला परलोकात नरक प्राप्त होते.

**२) राजधर्म -**

राजधर्मात हत्या, मृत्युदंड, संपत्तीचे अपहरण, शत्रूचा नाश, विश्वासघात ह्या सर्व गोष्टी शास्त्रानुसार असून त्याला धर्माची संमती आहे. कारण मॅकॅव्हेली म्हणतो, धर्माची परीक्षा त्याच्या उपयोगीतेवर आधारीत आहे. वरील गोष्टी केल्याने जर राजाचा फायदा होत असेल तर त्या गोष्टी धर्मानुसार आहेत असे समजावे.

**(ब) राजाने धर्माचा उपयोग राज्य हितासाठी आवश्यकतेनुसार करावा -**

याचा अर्थ मॅकॅव्हेली धर्माविरुध्द होता असे मात्र नाही. धर्म ही एक महाशक्ती आहे, हे त्याला मान्य होते. त्यामुळे धर्माचा उपयोग राजाने राज्यहितासाठी करावा कारण राज्य केवळ शक्ती आणि भय या आधारावरच चालु शकत नाही. धर्माच्या प्रभावामुळे मनुष्य अनुचित कार्य करण्यास उद्युक्त होत नाही. जेथे कायदा, भय आणि शक्ती यांचा उपयोग होत नाही तेथे राजाने धर्माचा आपल्या कार्यसिध्दीसाठी उपयोग करावा असे मॅकॅव्हेली म्हणतो. राजाने धार्मिक कार्यास सढळ हाताने मदत करावी. राजा गुणवान आणि धार्मिक नसला तरी चालेल परंतू त्याने आपले व्यक्तिमत्व जनतेसमोर

अशारितीने प्रदर्शित करावे की, ज्यामुळे त्याला पाहिल्याबरोबर लोकांना असे वाटावयास पाहिजे की, त्यांचा राजा हा दयाळु, शुध्द अंतकरणाचा, चारित्र्यसंपन्न आणि धर्माचे जागृत स्वरुप आहे.

अशा रितीने त्याने धर्माचे महत्व मान्य केले. नितीमत्ता आणि धर्म यांच्या आधारभूत गुणांबद्दल त्याला आदर होता. त्याच्यामते धर्माचा ऱ्हास हा राजाच्या विनाशाचे लक्षण होय. धर्माचे पालन करण्यात राजाची महानता दिसते व धर्माची उपेक्षा करण्यात राजाचा विनाश दिसतो. शेवटी मॅकव्हेलीने धर्माचा उपयोग आपल्या कार्यसिध्दीचे साधन म्हणून करण्याचा राजाला सल्ला दिला.

अशाप्रकारे मॅकव्हेलीने नितिमत्ता आणि धर्म यांचे महत्व प्रतिपादन करुनही राजाला मात्र त्यापासून मुक्त ठेवतो. त्याचे कारण म्हणजे राज्याच्या अस्तित्वावर धर्म आणि नितिमत्ता यांचे अस्तित्व अवलंबून आहे. राज्यच नष्ट झाले तर धर्माला काहीच स्थान उरत नाही. अशा रितीने तो राज्याला धर्महीन बनवू इच्छित नाही. तर धर्मनिरपेक्ष बनवु इच्छितो. राजाला आचारहिन बनविण्याचे त्याचे स्वप्न नाही तर राजाला आचारापासून निर्माण होणाऱ्या अडीअडचणींपासून मुक्त करण्याचे त्याचे स्वप्न आहे. राज्याच्या हितासाठी आणि जनतेच्या कल्याणासाठी तो धर्म आणि नितिमत्ता राजकारणापासून दूर ठेवू इच्छितो. व्यक्तिगत आणि सामाजिक जिवनात धर्म आणि नितिमत्ता यांच्या नियमांचे पालन झालेच पाहिजे या विचारांचा मॅकव्हेली होता. शास्त्रीय दृष्टीने विचार केल्यास मॅकव्हेलीच्या धर्म आणि नैतिकता या संबंधीच्या विचारांचे समर्थन करता येते. आधुनिक राजकारणातील विविध प्रश्नांची उत्तरे त्याच्या या प्रश्नामुळे आपोआप मिळतात.

***

## प्रकरण ४

# थॉमस हॉब्ज (Thomas Hobbes)

## (इ.स. १५८८ ते इ.स. १६७९)

**जीवन परिचय :**

हॉब्ज सतराव्या शतकातील सर्वश्रेष्ठ राजकीय तत्वज्ञ होता. सामाजीक कराराच्या सिध्दांताचे सांगोपांग विवेचन त्यानेच प्रथम केले. इंग्रजी विचारवंतांमध्ये त्यांच्यापुर्वी राजकीय तत्वज्ञानाचा इतका सखोल आणि मुलगामी अभ्यास कोणीही केलेला नाही. त्याचा जन्म इंग्लंडमध्ये माल्सबरी येथे ६ एप्रिल १५८८ रोजी झाला. इंग्लडमधील ऑक्सफर्ड विद्यापीठाची पदवी संपादन केल्यानंतर अर्ल ऑफ डेव्हनशायर या सरदार घराण्यातील मुलांना शिकविण्याची जबाबदारी त्याने पत्करली. मधली थोडी वर्ष वगळल्यास आयुष्याच्या अखेरपर्यंत याच घराण्याशी त्याचा परस्पर संबंध टिकून राहिला होता. गणित व तत्वज्ञान हे दोन विषय त्याच्या विशेष आवडीचे व अभ्यासाचे होते. हॉब्जचा प्रमुख ग्रंथ 'लेव्हियाथन' होय. त्याच्या या ग्रंथाच्या संदर्भात असा अभिप्राय व्यक्त केला जातो की त्यांनी इंग्लंडमधील स्टुअर्ट शासनकर्त्याच्या निरंकुशरतेचे समर्थन या ग्रंथात केले आहे. अर्थात त्यांच्या पुस्तकाकडे पाहण्याचा हा एक दृष्टीकोन आहे. 'लेव्हियाथन' हे राज्यशास्त्रातील स्वयंपूर्ण व तर्कशुध्द लिखान आहे. हॉब्जच्या विचारांमध्ये व्यावहारीकतेस फारसे स्थान नाही. त्यात तार्किकता अधिक आहे. हॉब्जनी विचार मांडतांना भुमिती शास्त्रामधील पध्दतीचा वापर केला आहे. हॉब्ज विचार मांडतांना प्रथम गृहित तत्वे मांडतो व त्यावर आपली राजकीय प्रमेये मांडतो. इतिहास व अनुभवजन्य अभ्यास पध्दतीस त्याने महत्व दिले नाही. राज्याच्या उदयाचे अनेक सिध्दांत आहेत. त्यापैकी एक सिध्दांत आहे सामाजिक कराराचा सिध्दांत. 'लेव्हियाथन' या ग्रंथातून हॉब्जने राजकीय सिध्दांत मांडले आहेत.

**हॉब्जचे निसर्ग अवस्था व मनुष्यस्वभाव विषयी विचार -**

प्रत्येक विचारवंतावर तत्कालीन परिस्थितीचा प्रभाव पडत असतो. हॉब्ज हा विचारवंत याला अपवाद नाही. हॉब्ज देखील त्याच्या काळाचेच

प्रतिनिधित्व करतो असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. जन्मतःच हॉब्जला भिती आणि चिंता यांनी ग्रासले होते. तो लहान असतांना ब्रिटनवर आक्रमण झ ााले होते. ब्रिटनमध्ये गृहयुध्द सुरु होते. उलटसुलट विचार प्रदर्शित केले जात होते. स्टुअर्ट वंशाचे राजे स्वतःला ईश्वराचे प्रतिनिधीच मानत असत. दुसऱ्या बाजूला लोकशाहीवादी जनता व्यापारी आणि मध्यम वर्ग राज्याच्या सत्तांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करित होते. एका बाजूने जनता राजाला विरोध करीत होती, तर दुसऱ्या बाजूने पोप धर्मसत्तेचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करित होता. एकमेकांविरुध्द संघर्ष, राजसत्तेविरुध्द संघर्ष सतत सुरु होता. या सर्व परिस्थितीचा प्रभाव हॉब्जवर पडला होता.

**मनुष्य स्वभाव (Human Nature) -**

विशेषतः मनुष्य स्वभावाचे वर्णन हॉब्जच्या काळात जी अंधाधुंदीची परिस्थिती होती व त्या काळात मनुष्य जसा वागत होता तसेच वर्णन त्याने केले आहे. तेव्हा राज्यही आणि समाजही नव्हता अशा अवस्थेला हॉब्ज नैसर्गिक अवस्था म्हणतो. या अवस्थेमध्ये मनुष्य कसा होता याचा विचार हॉब्जने केला. हॉब्जने वर्णन केलेली निसर्ग अवस्था ही समाजपूर्व आणि राज्यपूर्व अशी अवस्था होती. या अवस्थेमध्ये मनुष्य आपली सर्व प्रकारची कामे स्वार्थाने प्रेरीत होवूनच करीत होता. व्यक्तिगत स्वार्थानुसार प्रत्येक कार्याचे संचालन होत होते. प्रत्येक कृती मनुष्याच्या भावनेवर अधिष्ठित होती. बुध्दीचा वापर करुन कुणीही वागत नसे. सामान्यतः सामाजिक व्यवहारामध्ये मनुष्य या गोष्टीचा सतत प्रयत्न करतो की, त्याची संपत्ती सुरक्षित असावी, त्याचे जीवन बंधनापासून मुक्त असावे आणि त्याची संपत्ती सुरक्षित असावी. त्याचे जीवन बंधनापासून मुक्त असावे आणि त्याची इच्छा वासना आणि भूक इत्यादी पूर्ण व्हाव्यात. सुरुवातीपासूनच मनुष्य आपल्या अतृप्त वासना पूर्ण करण्याचा प्रयत्न करित आहे. स्वतःला जीवंत ठेवण्याकरिता तो दुसऱ्याला नष्ट करण्यास मागे पुढे पहात नाही. म्हणूनच हॉब्ज म्हणतो, "व्यक्तिच्या बौध्दिक आणि मानसिक व्यवहाराचे मुळ केंद्र स्वार्थ आहे. मनुष्याच्या स्वभावामध्ये सहकार्याला मुळीच स्थान नाही आणि ज्या ठिकाणी सहकार्याचा अवलंब केला जातो त्याच्या पाठीमागे व्यक्तिची मुख्य स्वार्थी भावनाच असते. संघर्ष, वर्चस्व प्राप्त करण्याची इच्छा, भोग, लालसा, संपत्ती आणि यशाची

प्राप्ती ही मुळ प्रवृत्ती स्वार्थी प्रवृत्तीचेच परिणाम आहे." एका बाजूला भोग लालसा, इच्छा झाली दुसऱ्या बाजूला अनिच्छा मानवामध्ये विषय वासना निर्माण करतात. संपत्तीची हाव किर्ती आणि सत्ता इ. प्रकारची भूक अनंत काळापासून आहे आणि ही भूक कधीही न मिटणारी आहे. हॉब्ज म्हणतो, इतिहासाची सर्व पाने वरिल प्रकारच्या भूकेचा इतिहास आहे. दया, निस्वार्थता इ. गोष्टी कुठेच आठवत नाहीत. निसर्गामध्ये सर्व व्यक्ति समान आहेत. जर एखादी व्यक्ति/व्यक्तिसमुह निसर्गतः हाच श्रेष्ठ असता तर त्याचे वर्चस्व इतरांवर प्रस्थापित झाले असते. परंतु निसर्ग अवस्थेमध्ये सर्व व्यक्ती समान होत्या. काही व्यक्ति शारिरीकदृष्ट्या श्रेष्ठ होत्या तर काही बौध्दिकदृष्ट्या श्रेष्ठ होत्या. निसर्ग अवस्थेमध्ये व्यक्तिव्यक्तिमध्ये सतत संघर्ष सुरु होता. कोण केव्हा दुसऱ्यावर आक्रमण करेल याचा नेम नव्हता. अशी ही भितीदायक आणि सहन न करण्यासारखी अवस्था सर्वत्र होती. हॉब्जने या सं घर्षाची तीन कारणे सांगितली आहेत.

१. समान इच्छेच्या प्राप्तीकरिता अविरत लढा
२. दुसऱ्यांबद्दल भय, अविश्वास आणि दृष्टतेची भावना
३. यशप्राप्ती, संपत्ती, वासना इ.

जीवनाची ही यथार्थ वास्तविकता सर्व सुखदुःखाला जन्म देते. मनुष्य हा पूर्णपणे अहंकेंद्रीत असतो. आपणच श्रेष्ठ ही भावना त्याच्यात आढळते. अशाप्रकारे हॉब्जने मनुष्य स्वभावाचे वर्णन केले आहे.

**हॉब्जचे निसर्ग अवस्थेचे वर्णन/विचार**

निसर्ग अवस्थेचे हॉब्जने जे वर्णन केलेले आहे ते लक्षात घेण्यापूर्वी एक महत्वाची गोष्ट विसरता कामा नये. ती गोष्ट म्हणजे हॉब्जने वर्णन केलेली निसर्ग अवस्था ही राज्यपूर्व तसेच समाजपूर्व अवस्था होती. समाजही निर्माण झ ालेला नव्हता आणि राज्यही अस्तित्वात आलेले नव्हते. ती नैसर्गिक अवस्था अराजकपूर्व स्थिती आहे. अशा स्थितीमध्ये मनुष्याला स्वतःच्या संरक्षणाची सतत काळजी घ्यावी लागत होती. अशा प्रकारची नैसर्गिक अवस्था कल्पून असे सिध्द केले आहे की, मनुष्याचे जीवन दरिद्री (Poor) पशुतुल्य ओंगळ आणि तोटके असे झाले. या स्थितीमुळे मनुष्य हिंसाचारी बनला. प्रत्येक व्यक्ती दुसऱ्याशी संघर्ष करित होती. योग्य-अयोग्य याचा व्यक्ति कधीही विचार करित

नसे. न्याय-अन्याय या गोष्टींना देखील त्या अवस्थेत स्थान नव्हते. दुसऱ्याची काही व्यक्तिगत संपत्ती असू शकते असे कोणीच मानत नसे. त्या अवस्थेमध्ये शक्तीसंपन्न व्यक्ती नसल्यामुळे कायदा नव्हता, न्याय नव्हता, परिणामतः सुरक्षिततेची हमी नव्हती आणि सुरक्षिततेची शाश्वती नसल्यामुळे कुणालाही आपल्या अस्तित्वाची खात्री वाटत नव्हती. जीवनाची शाश्वती कुणालाच नव्हती. 'बळी तो कानपिळी' हा न्याय सर्वत्र दिसून येत होता. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये सतत संघर्ष सुरु होता. थोड्याशा प्राप्तीमुळे समाधान वाटत नव्हते. थोडा आनंद मिळाला तर अधिक आनंद मिळविण्याचा प्रत्येक जण प्रयत्न करित होता. त्यामुळे सतत संघर्ष सुरु होते. कुणीही कुणाचा संरक्षक नव्हता. सर्वच एक दुसऱ्याचे भक्षक होते. प्रत्येक जण दुसऱ्याचे जीवन नष्ट करु पाहत होता. अशा या संघर्षामुळे जीवन टाकावू बनते. सर्वत्र भितीचे वातावरण होते. आपल्यावर कोण देश आक्रमण करिल याची कल्पना नव्हती. मृत्यु सतत डोळ्यासमोर नाचत होता. अशा स्थितीमध्ये उद्योगधंद्यांचा विकास होणे शक्यच नव्हते. हॉब्जच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास अशा या निसर्ग अवस्थेमध्ये मनुष्याचे जीवन (Solidary) एकाकी (Poor) दरिद्री (Nasty) उपद्रवी (Brutish) बुध्दीहीन, पशुतुल्य (Short) तोटके. त्यामुळे संस्कृती, उद्योगधंदे, ज्ञान आणि कला या गोष्टींचा विकास होणे अशक्य होते. सर्वत्र अन्याय दिसत होता. मनुष्य स्वेच्छाचारी होता. एक मनुष्य दुसऱ्याकरिता लांडग्याप्रमाणे वाटत होता. बलप्रयोग, अत्याचार या गोष्टींना योग्य मानण्यात येत होते. समाजाचे अस्तित्व कुठेच नव्हते. असे असून देखील मनुष्याला शांतता आणि सुरक्षितता असावी असे वाटत होते. निसर्ग अवस्थेला लोक कंटाळलेले होते. निसर्ग अवस्थेतील अनुभवाला अनुसरुन ही अवस्था नष्ट करावी असे प्रत्येकाला वाटू लागले व त्यातूनच सामाजिक करार झाला असा विचार हॉब्जने मांडला.

**परिक्षण -** हॉब्जने मनुष्य स्वभाव आणि निसर्ग अवस्था यासंबंधी जे विचार व्यक्त केले आहेत त्या विचारांवर अनेक आक्षेप घेता येवू शकतात.

१. पहिली गोष्ट अशी की, मनुष्य हा स्वभावतःच दृष्ट आणि स्वार्थी आहे हा हॉब्जचा विचार योग्य वाटत नाही. मनुष्यामध्ये सहकार्याची भावना असते आणि मनुष्य बुध्दीप्रधान आहे. याकडे हॉब्जने

हेतुपुरस्कर दुर्लक्ष केले आहे. मनुष्य स्वभावाची एकच बाजू रंगविण्याचा हॉब्जने प्रयत्न केला आहे. कदाचित सुरुवातीपासून ओढवलेल्या प्रसंगांचा तो परिणाम असावा. मनुष्य स्वभावाला अनुसरुन हॉब्जचे विचार एकांगी स्वरुपाचे आहेत. मनुष्यामध्ये दुष्टप्रवृत्ती बरोबरच सत्प्रवृत्तीशी असते याकडे हॉब्जने लक्ष दिलेले नाही.

२. दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, मनुष्य जर एकाकी जीवन जगणारा स्वार्थी आणि दृष्ट जर आहे तर साहजिकच प्रश्न निर्माण होतो की, अशा दृष्ट माणसामध्ये सामाजिक करार करण्याची भावना कशी निर्माण झाली. केवळ निसर्ग अवस्थेमध्येच मनुष्याला झालेल्या त्रासामुळे मनुष्यात सहकार्याची भावना निर्माण होवू शकत नाही. उलट तो जास्त दृष्ट बनला असता परंतु असे घडले नाही. सहकार्याची भावना मनुष्यामध्ये निर्माण झाल्याशिवाय करार घडून येवू शकत नाही.

३. तिसरी महत्वाची गोष्ट अशी की, राज्य आणि समाज एकदमच निर्माण झाले आहेत असे मानले जाते. त्यात कल्पलेली निसर्ग अवस्था आणि समाजपूर्व अवस्था अशी आहे. परंतु हॉब्जचे निसर्गअवस्थेसंबंधीचे हे विचार मनाला न पटणारे आहेत. आधी समाज निर्माण झाला आणि त्यानंतर सु-संघटीत समाजाचे घटक या दृष्टीने मनुष्याने राज्य निर्माण केले. मनुष्याच्या सामाजिक गरजांसाठी समाज आवश्यक आहे तर मनुष्याच्या राजकिय पुर्तीसाठी राज्य निर्माण झाले आहे. राज्यसंस्था समाजातील इतर संस्थांपैकी एक संस्था आहे ही एकमेव संस्था नाही याकडे हॉब्जने दुर्लक्ष केले आहे.

४. निसर्ग अवस्थेमध्ये परस्परांमध्ये संघर्ष होतात. प्रत्येक व्यक्ति दुसऱ्या व्यक्तिचा भक्षक होता, प्रत्येक जण प्रत्येकाचा शत्रू होता, मानवी जीवन असह्य झाले होते. हे हॉब्जचे विचार योग्य वाटत नाही. कारण निसर्गामध्ये सर्वच प्राण्यांमध्ये सहकार्य करण्याची भावना कमी-जास्त प्रमाणात आढळते. मनुष्य हा केवळ बुध्दीजीवी प्राणी नाही तर तो सामाजिक आणि राजकिय प्राणी देखील आहे.

मनुष्यामध्ये सहकार्याची भावना असते. मनुष्यत्वाचा विकास सहकार्यामुळेच झाला आहे. त्यामुळे हॉब्जचे निसर्गअवस्थेसंबंधीचे विचार वस्तुनिष्ठ स्वरुपाचे आहेत असे वाटत नाही.

**राज्याच्या उदयासंबंधीचा हॉब्जचा सामाजिक कराराचा सिध्दांत -**

**सामाजिक कराराचे स्वरुप ङ**

लोकांनी करार करुन राज्यसंस्था अस्तित्वात आणली हा राज्याच्या उदयासंबंधीचा हॉब्ज, लॉक आणि रुसो या तीन विचारवंतांनी विचार मांडला. परंतू या तिघांनीही शासनाच्या विशिष्ट प्रकाराचे समर्थन करण्याच्या दृष्टीकोनातून या सिध्दांताचा उपयोग करुन घेतल्यामुळे त्या तिघांच्याही विचारांमध्ये बऱ्याच बाबतीत तफावत आहे. हॉब्जने अशी संकल्पना केली आहे की, निसर्ग अवस्थेला कंटाळलेल्या लोकांनी एक सभा घेतली असावी व त्या सभेत प्रत्येकाने अशी प्रतिज्ञा केली की, "मी माझ्यावर प्रभुत्व गाजविण्याचा अधिकार एका विविष्ट व्यक्तीला किंवा व्यक्तिसमुदायाला एका अटीवर देतो ती अट हीच की, तु म्हणजे मी सोडून समुदायातील प्रत्येक व्यक्ति तुझ्यावर प्रभुला गाजविण्याचा अधिकार त्याच विशिष्ट व्यक्तिला अगर व्यक्ति समुदायाला द्यावयास तयार आहे." हॉब्जच्या मतानुसार करार म्हणजेच सामुहिक सत्तेला केलेले समर्पण होय आणि हिच सामुहिक सत्ता म्हणजे सार्वभौम सत्ता होय. निसर्ग अवस्थेमधील जीवन नष्ट करण्यासाठी जो करार झ ाला त्याची वैशिष्ट्ये आपल्याला पुढीलप्रमाणे सांगता येतील.

२. निसर्ग अवस्थेतील प्रत्येक व्यक्तिने स्वेच्छेने करार केला.

३. करारामुळे राज्य आणि एक राज्यकर्ता निर्माण झाला.

४. सार्वभौम हा कराराचा भागिदार नाही तो कराराचा परिणाम आहे.

५. ज्या करारामुळे सार्वभौम निर्माण झाला त्याच्यावर कराराच्या अटी बंधनकारक नाहीत.

६. करार करतांना प्रत्येक व्यक्तिने कोणताही अधिकार स्वतःकडे राखून ठेवला नाही. त्यामुळे करार मांडण्याचा किंवा राज्यकर्त्याला विरोध करण्याचा अधिकार कुणालाही मिळू शकत नाही.

७. सामाजिक कराराचा परिणाम म्हणून जे राज्य निर्माण झाले त्याचप्रकारे शासन संस्था देखील अस्तित्वात आली त्यामुळे

शासनाला विरोध करण्याचा व्यक्तिला अधिकार नाही. कारण शासन नष्ट झाले तर राज्य नष्ट होईल.

८. व्यक्तिच्या आत्मरक्षणाच्या विरोधी असा कोणताही आदेश शासन देवू शकत नाही. असा आदेश दिल्यास त्या आदेशाचे उल्लंघन करण्याचा प्रत्येक व्यक्तिल ा अधिकार राहिल.

**सार्वभौम सत्ता -** हॉब्जच्या सामाजिक कराराच्या सिध्दांताचा परिणाम स्वरुप सार्वभौम अस्तित्वात आलेला आहे. सार्वभौम सत्तेवर कराराचे बंधन नाही कारण सार्वभौम कराराचा परिणाम आहे. त्याला प्राप्त असलेली सार्वभौम सत्ता सर्वश्रेष्ठ अविभाज्य, सर्वसमावेशक अशीच आहे. अशा या सार्वभौमत्वाची आज्ञा म्हणजेच कायदा किंवा विधिनियम. सार्वभौम सत्तेला विरोध करता येत नाही. कारण व्यक्तिव्यक्तिमध्ये जो करार झाला व प्रत्येक जण एका विशिष्ट व्यक्तिच्या आज्ञापालन करण्यास तयार झाला. त्याचवेळी समाज आणि राज्य अस्तित्वामध्ये आहे असे हॉब्ज म्हणतो. समाज ही राज्यपूर्व अवस्था नाही. राज्य आणि समाज एकाचवेळी अस्तित्वात आला. हा करार ज्यावेळी झाला त्यावेळी प्रत्येक व्यक्तिजवळ आत्मरक्षण हाच फक्त एक विचार होता. थोडक्यात या करारामुळे मुख्यतः दोन गोष्टी साध्य झाल्यात.

१. या करारामुळे नैसर्गिक अवस्था नष्ट होवून प्रत्येक व्यक्तिला जीवनाची हमी मिळाली.

२. राज्य निर्माण होवून सर्वांवर नियंत्रण करणारी एक सत्ता उदयाला आली. उदयाला आलेली ही नविन सत्ता म्हणजेच सार्वभौम सत्ता असणारी व्यक्ति/व्यक्तिसमुह होय. सार्वभौम हा करारातील पक्ष नाही. कारण त्याने कोणत्याही व्यक्तिशी करार केलेला नव्हता तर हा करार लोकांशी आपसामध्ये केला व त्यानुसार त्यांनी एका व्यक्तिला सत्ता दिली, त्यामुळे त्याच्याविरुध्द जाण्याचा कोणालाही अधिकार नाही. उलट लोकांनी स्वच्छंदपणे त्याला अधिकार दिल्यामुळे राज्याला विरोध करण्याचा हक्क राहत नाही. या कराराच्या पाठीमागे शक्ती तसेच सत्ता आहे आणि दंड करण्याची पात्रता आहे तसे नसेल तर हा करार निरुपयोगी ठरेल. हॉब्जच्या मते केवळ शाब्दीक करारमुळे मनुष्याची वासनावृत्ती, महत्वाकांक्षा, क्रोध

आणि अन्य भावना नियंत्रीत करता येत नाही. याकरिता कठोर, निरंकुश आणि अद्वितीय अशा शक्तीची आवश्यकता असते. ही शक्ती ज्यांच्या ठिकाणी केंद्रीत आहे तीच सार्वभौम प्रभुत्व किंवा सार्वभौमत्व व्यक्ति समुहामध्ये असू शकते. अशी सार्वभौम व्यक्ति म्हणजे 'लेविएथन" (अजस्त्र प्राणी) लेविएथन म्हणजेच राज्य आणि समाजाचे प्रतिक आहे. त्याच्या इच्छेनुसारच संपूर्ण समाजजिवन विकसित होत असते. संपूर्ण समाज आणि मानवता याचा जन्मदाता लेविएथन/ विराट राष्ट्र स्वरुप हाच आहे.

**परिक्षण -**

हॉब्जच्या विचारांमध्ये अनेक प्रकारचे दोष आपल्याला आढळून येतात. त्यातील काही दोष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. हॉब्जने राज्य आणि समाज एकदमच निर्माण झाले आहेत असे मानले आहे. परंतु त्याचा हा विचार वस्तुनिष्ठ स्वरुपाचा नाही, राज्य ही समाजानंतरची अवस्था आहे. समाजातील इतर संस्थांसारखीच राज्यसुध्दा संस्था आहे, ती एकमेव संस्था नाही. मनुष्याच्या राजकिय गरजांची पुर्ती करण्यासाठी राज्यसंस्था निर्माण झाली. पण या राज्यनिर्मितीच्या अगोदर समाजामध्ये इतर संस्था अस्तित्वात आलेल्या होत्या. हे इतिहासावरुन स्पष्ट होते.

२. हॉब्ज राज्य आणि शासन यात फरक करता येत नाही असे म्हणतो. वस्तूतः राज्य आणि शासन यात मुलभूत स्वरुपाचा फरक आहे. राज्याची कार्ये पार पाडणारी यंत्रणा म्हणजे शासन. राज्यामध्ये सर्व लोकांचा समावेश असतो. तर शासनामध्ये काही थोडे लोक असतात. राज्य बदलता येत नाही. शासनामध्ये मात्र बदल करता येतो. राज्य सार्वभौम असते. शासन मात्र राज्याच्या वतीने त्या सत्तेचा वापर करित असते. शासनाला विरोध करण्याचा व्यक्तिला अधिकार असतो. राज्याला मात्र व्यक्ति विरोध करु शकत नाही.

३. हॉब्जची सार्वभौमत्वाची कल्पना व्यक्तिचे स्वातंत्र्य नष्ट करणारी आहे. कारण हॉब्जच्या सार्वभौम हा निरंकुश आणि अनियंत्रीत असा

आहे. प्रजा त्याला विरोध करु शकत नही असे हॉब्ज म्हणतो. त्यामुळे सर्व व्यक्तिंची स्थिती गुलामासारखी होते.

४. सार्वभौम सत्तेचा आत्मा म्हणजेच कायदा हे हॉब्जचे विधान चुकीचे आहे. कायद्याचे उगमस्थान वेगळा राज्यकर्ता नसतो तर रुढी, प्रथा, परंपरा, धर्म आणि राजकिय संकेत ही कायद्याची उगमस्थाने असतात याकडे हॉब्जने दुर्लक्ष केले आहे.

५. व्यक्ति कायद्याचे पालन केवळ दंडशक्तीच्या भितीने करित नाही तर कायदा हा उपयुक्त आणि आवश्यक असतो. अशी धारणा लोकांची असल्यामुळे लोक कायद्याचे पालन करतात. लोकांची इच्छा हाच कायद्याला आधार आहे.

**हॉब्जचा धर्म आणि राज्यासंबंधी विचार -**

हॉब्ज राज्यसंस्थेपेक्षा कोणत्याही संस्थेला श्रेष्ठ मानायला तयार नाही. राज्य ही सर्वात श्रेष्ठ संस्था आहे. राज्याच्या बरोबरीची कोणतीच संस्था नाही. हॉब्जच्या मते चर्च म्हणजे राज्याच्या अधिनस्त विभाग असून राज्याची बरोबरी चर्च करु शकत नाही. मनुष्याचा व्यक्तिगत समाजाशी काहीच संबंध नसतो. शिक्षण म्हणजे बुध्दीची अपेक्षा करुन अलौकिक अनुभवांच्या आधारे सत्य असल्याचे ज्ञान प्राप्त करणे त्याला मान्य नव्हते. त्यामुळे अराजकता निर्माण होते. रोमन कॅथालिक चर्चला त्याने अंधकाराचे राज्य म्हटले आहे. हॉब्जच्या मते धर्माचा आधार अदृष्य शक्तीची भिती आहे. मनुष्याला नरकाची भिती दाखवून त्याच्या दुर्बलतेचा फायदा चर्च घेते, ही अदृष्य शक्ती राज्य मानीत नाही. त्याला त्याने अंधविश्वास म्हटले आहे. हॉब्ज नास्तिक नव्हता. परमेश्वरावर त्याची श्रध्दा होती. राज्यानीच इतर संस्थांप्रमाणे कायदा, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक धर्मसंस्था देखील राज्याच्या अधिन असावी असे त्याचे मत होते. त्याने चर्चला पूर्णपणे राज्याच्या अधिन केले. धर्मसंस्थांच्या कृत्याला राज्याची संमतीनसेल तर ते कृत्य बेकायदेशीर समजले जाई. पोपचे वर्चस्व कमी करण्यासाठी त्याने असे म्हटले आहे की, राज्यातील सार्वभौम हीच सर्वोच्च आध्यात्मिक शक्ती आहे. पोप व इतर सर्व पदाधिकारी त्यांच्याच इच्छेने पदग्रहण करतात. चर्चचे अस्तित्वच राज्याच्या इच्छेवर अवलंबून आहे.

हॉब्ज हा पूर्णपणे अईश्वरवादी नव्हता. त्याची परमेश्वरावर श्रध्दा होती. धार्मिक संस्कारांबद्दल त्याला आदर होता. तो म्हणतो सार्वभौम सत्तेच्या परवानगीशिवाय धार्मिक संस्थानी केलेले कृत्य करणारी व्यक्ती शिक्षेस पात्र ठरु शकते. व्यक्तीचे स्थान धार्मिकदृष्ट्या कितीही उच्च असो यावरुन हॉब्ज धार्मिक बाबतीत विरोध करीत नव्हता. परंतू तत्कालीन ख्रिश्चन पोपच्या तो विरुध्द धर्माच्या नावावर स्वार्थासाठी लोकांवर अत्याचार करित असे. अशारितीने धर्माचे श्रेष्ठत्व नष्टे केले आणि राजसत्तेला त्याने धर्मनिरपेक्ष स्वरुप दिले. याचा अर्थ हॉब्ज धर्माच्याविरुध्द होता असा नव्हे तर धर्मावर अनंत श्रध्दा होती.

***

## प्रकरण ५

# जॉन लॉक (John Locke)

## (इ.स. १६३२ ते १७०४)

---

**जीवन परिचय :**

जॉन लॉकचा जन्म इंग्लडमधील एका लहान जमीनदार कुटूंबामध्ये झाला. त्याचे वडील कायदेपंडित होते. ऑक्सफर्ड विद्यापीठामध्ये त्याने शिक्षण घेतले. त्याला शास्त्रीय संशोधन आणि प्रयोग याची विशेष आवड होती. त्याने देकार्तेच्या ग्रंथाचे अध्ययन आणि रसायनशास्त्र, वैद्यकशास्त्र याचा अभ्यास केला होता. राज्यशास्त्र, तत्वज्ञान, शिक्षणशास्त्र या विषयांचे सखोल ज्ञान त्याने प्राप्त केले होते. काही काळ त्यावेळच्या व्हिग पक्षाच्या प्रमुख लॉर्ड शाफ्टस्बरी याचा चिटणीस म्हणूनही त्याने काम केले होते. त्यामुळे त्याला राज्यघटना आणि प्रत्यक्ष राजकारण यांचा भरपूर अनुभव मिळाला. जॉन लॉकच्या विचारांना इंग्लंडमधील रक्तहीन क्रांतीची पाश्र्वभूमी होती. तर हॉब्जच्या विचारपध्दतीवर इंग्लडमधील यादवी युध्दाची छाया होती. मूलतः धार्मिक विचारांचा लॉक इंग्लडमधील चर्चची भूमिका पाहुन चर्च आणि राजसत्ता यांच्यात फारकत करण्यास तयार झाला तथापि त्याचा पाया परस्पर सामंजस्य आणि स्विकृती असाच होता. उदारमतवादाचा आधार घेऊन धर्मसत्ता आणि राजसत्ता परस्पर सामंजस्याने व सहकाराने एकत्र राहु शकतील असा त्याचा विश्वास होता. जॉन लॉकला शासनाचाही अनुभव होता. त्याचे व्हिग पक्षातील नेत्यांशीही संबंध होते. त्याचा अनुभव आणि आशा, त्याची श्रध्दा आणि तत्कालीन सामाजिक स्थित्यंतराचा प्रभाव याचे मिश्रण लॉकच्या विचारांत दिसून येते. हॉलंडमधील धार्मिक सहिष्णुता व स्वातंत्र्य, हॉलंडमधील लोकांची निर्भय वृत्ती याचा परिणाम लॉकच्या तत्वज्ञानावर झालेला आहे. इंग्लडमधील राज्याच्या निरंकुष सत्तेच्या विरोधातील लढ्यात लॉकचे वडिल सक्रीय होते. 'टु ट्रिटीज ऑन गव्हमेंट' हा त्याचा ग्रंथ राजकीय वाङःमयात विशेष प्रसिध्द आहे.

**जॉन लॉकचे निसर्ग अवस्था व मनुष्य स्वभाव या संबंधीचे विचार -**

जॉन लॉक हा हॉब्जप्रमाणे एक करारवादी विचारवंत होता. परंतू लॉकचे विचार हॉब्जपेक्षा बऱ्याच बाबतीत भिन्न आहेत. लॉक हा उदारमतवादी विचारवंत होता. त्याने सामाजीक कराराच्या सिध्दांताचा फेरविचार करुन तो सिध्दांत उदार आणि संतुलीत बनविण्याचा प्रयत्न केला हे करित असतांना लॉकने काढलेले निष्कर्ष हॉब्जच्या विचारांशी पुर्णपणे निराळे आहेत. हॉब्जने अमर्याद राजतंत्राचा पुरस्कार केला तर लॉकने मात्र कराराच्याद्वारा राजतंत्राचे मर्यादित स्वरुप सांगितले. हॉब्जप्रमाणे निसर्गअवस्था, मनुष्य स्वभाव, सामाजिक करार, सार्वभौमसत्ता, व्यक्ति आणि समाज तसेच व्यक्ति आणि राज्य यासंबंधी आपले विचार व्यक्त केले आहेत. हॉब्जने कराराद्वारे व्यक्तिला बंदिस्त केले तर लॉकने बंदिस्त असलेल्या व्यक्तिला मुक्त करुन त्याला स्वातंत्र्य प्रदान केले. असा उदारमतवादी लॉकसुध्दा परिस्थितीचाच अपत्य होता. त्याच्या एकूण विचारांवर परिस्थितीचा प्रभाव आढळून येतो. लॉकचे १६४२ ते १६४९ या काळात चाललेल्या गृहयुध्दामुळे राजसत्तेच्या विरुध्द संसदिय लोकशाहीचे नुसतेच समर्थक नव्हते तर संसदिय पक्षाचे कार्यकारी सभासदही होते. अमर्याद राजतंत्राला सतत विरोध करित असल्यामुळे लॉकचे घरचे वातावरण उदारमतवादी असे होते. या वातावरणाचा लॉकवर प्रभाव पडून तो राजतंत्राचा विरोधक बनला. लॉकच्या काळात राजा आणि प्रजा यांच्यात संघर्ष सुरु झाला होता. या संघर्षाचा परिणामस्वरुप पहिला चार्लसची हत्या करण्यात आली होती. त्यानंतर क्रांबोलच्या नेतृत्वाखालील गणराज्य निमाण झाले होते. क्रांबोलच्या मृत्युनंतर दुसऱ्या चार्लस्‌ला राजा करण्यात आले. परंतू प्रतिनिधी सभेच्या परवानगीशिवाय कायदे करता येणार नाहीत असा राजाला आदेश देण्यात आला. चार्लस् द्वितीय नंतर जेम्स दुसरा गादीवर आला. परंतू त्याच्या ठिकाणी प्रतिनिधी सभेने विलियमला १६८८ मध्ये राजपदावर बसविले. अशाप्रकारे कोणत्याही प्रकारचा रक्तपात न करता इंग्लंडमध्ये लोकशाहीची स्थापना झाली. १६८८ या रक्तहिन क्रांतीचा प्रभाव लॉकच्या विचारांवर झालेला आढळून येतो. लॉकवर त्याचा गुरु हॉब्जच्या विचारांचा परिणाम झालेला होता. त्यामुळे अत्यंत उदारमतवादी विचार मांडण्याचा लॉकने प्रयत्न केला आहे.

### १) निसर्ग अवस्थेसंबंधी लॉकचे विचार -

नैसर्गिक अवस्था ही मनुष्याच्या स्वभावाला अनुकूल अशी अवस्था होती. या अवस्थेमध्ये उत्पादनाची साधने विपुल प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे या साधनांच्या प्राप्तीसाठी व्यक्तिव्यक्तिंमध्ये स्पर्धा/संघर्ष नव्हता. तर शांतता, सद्‌भावना, सहकार्य आणि सुरक्षितता असलेली ही निसर्गअवस्था मनुष्याला आपल्या व्यक्तित्वाचा विकास साध्य करण्यासाठी उपयुक्त ठरली. नैसर्गिक कायदे आणि नैसर्गिक अधिकार प्रचलित होते. त्यात विरोध नव्हता. वैयक्तिक स्वातंत्र्य, स्वतःचे रक्षण आणि व्यक्तिगत संपत्ती हे तीनही अधिकार म्हणजे मनुष्याच्या अंतर्गत गुणांचे बाह्य प्रदर्शन होते. त्यावेळी स्वातंत्र्य असले तरी स्वैराचार नव्हता. नैतिकतेवर आधारलेले नैतिक नियम होते आणि या नियमांचे पालन न केल्यास व्यक्तिला शिक्षा मिळत असे. थोडक्यात निसर्ग अवस्थेमध्ये मनुष्याचे जीवन समतेचे, सुखाचे आणि शांततेचे होते. स्वार्थ आणि दृष्टपणा कुठेही नव्हता. परंतू तरी देखील या अवस्थेमध्ये हळुहळु काही अडचणी निर्माण झाल्यात. त्यामुळे व्यक्तीची गैरसोय व्हायला लागली. परिणामतः लोकांनी करार करुन नैसर्गिक नियमांचा आणि नैसर्गिक हक्कांचा अर्थ लावणारी सत्ता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने विचार करावयास सुरुवात केली.

### २) लॉकचे मनुष्य स्वभावासंबंधीचे विचार -

हॉब्जप्रमाणेच लॉकने देखील निसर्ग अवस्थेतील मनुष्याच्या स्वभावाचे चित्र रेखाटले आहे. लॉकच्या मते हॉब्जने वर्णन केल्याप्रमाणे मनुष्य दृष्ट, स्वार्थी नाही तर तो मनुष्याच्या कार्याचा आधार भावना नसून विवेक आहे. निसर्ग अवस्थेमध्ये मनुष्य विवेकानुसार वागत होता. त्यामुळे त्याच्या मते न्यायाची भावना, सत्यता आणि नैतिकता भरपूर प्रमाणात होती. मनुष्य हा समाजशिल आणि परस्परांवर विश्वास ठेवणारा होता. नैतिकतेवर आधारित असलेल्या नैतिक नियमांमुळे त्याचे जीवन सुखी होते. अशा या नैसर्गिक नियमांच्या पालनामुळे मनुष्यामध्ये सत्य, अहिंसा, प्रेम आणि उदात्त भावना यांचा विकास झाला होता. त्यामुळे प्रत्येक व्यक्ति समान आहेत ही भावना त्याकाळी सर्वत्र आढळून येत होती. त्यामुळे प्रत्येक व्यक्ति दुसऱ्या व्यक्तिचा आदर करित होती. अशाप्रकारे लॉकने निसर्गावस्थेमधील मनुष्य स्वभावाचे वर्णन केले आहे. हॉब्ज हा विचारवंत मनुष्य, स्वार्थी, कपटी तसेच दुर्गुणांचा

पुतळा आहे असे म्हणतो तर लॉकने मनुष्य हा भौतिकवादी जरी असला तरी त्याच्या मते दया, प्रेम, क्षमा, सहानुभूती, संयोग, सहिष्णूता इ. गुण वास करतात असे म्हटले आहे. या नैसर्गिक गुणांबरोबरच मनुष्य हा परिश्रमी आहे असे लॉकने प्रतिपादन केले आहे. परिश्रम करुन उत्पदन आणि त्याचबरोबर आपली सपत्ती वाढविण्याची इच्छा मनुष्यात असते. भौतिक इच्छा पूर्ण तृप्त करण्याबरोबरच संपत्ती मिळविणे, संपत्तीची वाढ करणे आणि ती सुरक्षित ठेवणे इ. गुण मनुष्यामध्ये आहेत. नैसर्गिक साधने जमीन आणि इतर वस्तू ज्या उत्पादनासाठी आवश्यक आहेत त्या भरपूर आहेत. परंतू त्यापासून उत्पादन करावयाचे म्हटले म्हणजे मनुष्यश्रम आवश्यक आहे. कष्टाने नैसर्गिक वस्तूपासून उत्पादन केल्यास तिला महत्व येत असते. शेतीवर श्रम केले नसते तर शेतीला महत्व आले नसते. तसेच शेतीचा काहीच उपयोग झाला नसता. श्रमाने उत्पादन केलेली संपत्ती त्या श्रम करणाऱ्या व्यक्तिच्या मालकीची होते. ज्यांनी आपल्या कष्टाने संपत्ती निर्माण केली ते संपत्तीचे मालक बनतील. परंतू पुढे मनुष्याच्या बुध्दीचा जसजसा विकास होवू लागला तसतसे समाजात संघर्ष होवू लागलेत. नैसर्गिक नियमांना अनूसरुन मनुष्याचे जीवन संचलीत होत असे. त्या निसर्ग नियमांचा अर्थ लावणारी सत्ता अस्तित्वात नव्हती. परिणामतः निसर्ग अवस्थेमधील लोकांना सत्ता निर्माण करण्यासाठी सुसंघटीत होणे आवश्यक होवून बसते.

**जॉन लॉकचा सामाजीक करार सिध्दांत -**

मनुष्य स्वभाव आणि निसर्ग अवस्था या संबंधीचे लॉकचे विचार पाहिल्यानंतर राज्याच्या उदयासंबंधी त्याने जो सामाजिक कराराचा सिध्दांत प्रतिपादन केला आहे त्याचे स्वरुप लक्षात येणे आवश्यक आहे. राज्याची निर्मिती लोकांनी कराराद्वारे केली आहे. हा हॉब्जचा विचार लॉकला जरी मान्य असला तरी हॉब्जच्या सामाजिक कराराच्या सिध्दांतापेक्षा लॉकचा सामाजीक कराराचा सिंध्दांत वेगळ्या स्वरुपाचा आहे. निसर्गावस्थेमध्ये मनुष्य हा स्वार्थी, दृष्ट, भांडखोर नव्हता असे लॉक म्हणतो. मनुष्य हा समाजनिष्ठ होता, त्याची आंतरिक भावना चांगली होती. नैतिकदृष्ट्या सर्व लोक समान होते. कुणीही दुसऱ्यावर वर्चस्व गाजवित नसे. दया, क्षमा, शांती, सहानुभूती, सहिष्णूता इ. गुणांनी युक्त मनुष्य होता. परिश्रमपूर्वक संपत्ती मिळवणे, त्या संपत्तीची वाढ

करणे आणि ती संपत्ती सुरक्षित ठेवणे हा मनुष्याचा स्वभाव होता. अशाप्रकारे निसर्ग अवस्थेतील मनुष्याचे जीवन सुखी आणि समाधानी होते. परंतु परस्पर सहकार्याचे आणि शांतीचे जीवन असले तरी त्या निसर्ग अवस्थेमध्ये काही अडचणी होत्या आणि म्हणून करार करुन राज्य निर्माण करणे लोकांना आवश्यक वाटू लागले असा विचार लॉकने मांडला.

सामाजिक करार करण्याची कारणे - निसर्ग अवस्थेतील सुखी जीवन जगणाऱ्या लोकांनी करार करुन राज्य निर्माण का केले? याची कारणे देतांना लॉक असे म्हणतो की,

**इच्छेनुसार नियमाचा अर्थ -**

१) निसर्ग अवस्थेमधील नैसर्गिक नियमांची निश्चित कल्पना व व्याप्ती उरलेली नव्हती. निसर्ग नियमांचे पालन व्यक्तिगत स्वरुपाचे होते.

२) निसर्ग नियमांचा अर्थ प्रत्येक व्यक्ती स्वत:च्या बुध्दीनुसार लावत असल्यामुळे व्यक्तिनुसार निसर्ग नियमांचा अर्थ बदलत असे. त्यामुळे समाजात अडचणी निर्माण होत असत.

३) निसर्ग नियमांच्या अंमलबजावणीसाठी कोणतीही प्रभावी संस्था नव्हती. व्यक्तिने नैसर्गिक नियमांचे उल्लंघन केल्यास तिला शिक्षा देणारी सर्वमान्य अशी संस्था/सत्ता नव्हती.

वरील कारणांमुळे निसर्ग अवस्थेतील जीवन अनिश्चित आणि असुरक्षित झाले. त्यामुळे गोंधळ निर्माण झाला. निसर्ग नियमांचा सुनिश्चित आणि सर्वसामान्य अर्थ लावण्यासाठीच लोकांनी परस्परांमध्ये करार केला.

**कराराचे स्वरुप -** लॉकची निसर्ग अवस्था ही समाजपूर्व अवस्था नाही. समाज निर्माण झालेला होता. त्याची निर्मिती मनुष्याच्या समाजशिल वृत्तीतून झालेली होती. म्हणून लॉकने वर्णन केलेली निसर्ग अवस्था ही फक्त राज्यपूर्व अवस्था होती. नैसर्गिक अवस्थेतील अस्थिरता नष्ट करण्यासाठी व नैसर्गिक नियमांचा स्पष्ट अर्थ लावण्यासाठी लोकांनी करार केला. हा करार दुहेरी स्वरुपाचा होता. राज्यपूर्व अवस्थेतील लोकांनी आपआपसात करार करुन सर्वप्रथम राज्याची निर्मिती केली. त्यानंतर सुसंघटीत अशा राजकिय समाजातील लोकांनी दुसरा करार शासनाच्या निर्मितीसाठी केला. दुसऱ्या करारातून शासन संस्था निर्माण झाली. म्हणून त्याला शासनसंस्थेचा करार असे म्हणतात. याचा अर्थ लॉकने

ज्या शासनाची कल्पना केली आहे ते शासन कराराने बध्द आहे. पहिल्या करारानुसार लोकांनी निसर्ग नियमांचा स्पष्ट अर्थ लावण्याचा अधिकार स्वेच्छेने सर्वमान्य अशा समाजाकडे व व्यक्तिकडे सोपविला याचा अर्थ व्यक्तिने आपले नैसर्गिक हक्क सोडले असा होत नाही. शासन संस्था ही कराराद्वारेच निर्माण झाली. त्यामुळे ती करारबध्द म्हणजेच मर्यादित स्वरुपातील आहे. हॉब्जसारखा लॉक अनियंत्रीत आणि निरंकुश शासन संस्थेचा पुरस्कार करित नाही. त्याला मर्यादित शासन मान्य आहे. जे शासन करारानुसार आपले कर्तव्य पार पाडीत नसेल तर त्या शासनाला बदलण्याचा आणि त्या जागी दुसरे शासन आणण्याचा जनतेला अधिकार आहे, असे लॉक म्हणतो.

अशाप्रकारे लॉकच्या मते मनुष्यजीवन स्वातंत्र्य आणि संपत्ती विषयक नैसर्गिक अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी राजकिय समाजाची निर्मिती झाली. अशा समाजामध्ये बहुमताने निर्णय घेण्याचे लोकांनी कराराद्वारे मान्य केले. लोकांचे प्रतिनिधत्व करणारी संसद/पार्लमेंट सार्वभौम आहे असे लॉक म्हणतो. बहुमतानुसार शासन बदलले तरी राज्याला धोका पोहचत नाही. अशाप्रकारे लॉकने सामाजिक कराराचा सिध्दांत प्रतिपादन केला आहे. लॉकच्या सामाजीक करारातून खालील गोष्टी स्पष्ट होतात -

१) व्यक्तिंनी आपले अधिकार, निसर्ग नियमांचा अर्थ लावण्याचा, त्याची अंमलबजावणी करण्याचा तसेच निसर्ग नियमांच्या विरुध्द वर्तन करणाऱ्यास शिक्षा करण्याचा अधिकार इ. शासनाला, समाजाला सर्मपित केलेत.

२) समाजाने नंतर शासन संस्थेची निर्मिती करुन तिला व्यक्तिंनी दिलेले अधिकार सर्मपित केले व अशारितीने राजकिय समाज उदयास आला.

३) हा करार सर्व व्यक्तिंनी मिळून केला तसेच एकदा केलेला करार मोडता येत नाही असे स्पष्ट दिसते.

४) जरी व्यक्तिंनी नैसर्गिक नियमांचा अर्थ लावण्याचा आणि त्याची अंमलबजावणी करण्याचा अधिकार शासन संस्थेला दिलेला असला तरी लोकांनी नविन स्वातंत्र्य आणि संपत्ती हे आपले नैसर्गिक अधिकार अबाधित ठेवले.

५) सार्वभौम सत्ता जनतेमध्ये असते आणि जनता शासन संस्थेला आपल्या सार्वभौम सत्तेचा उपयोग करण्याचे स्वातंत्र्य देते.

६) हा करार प्रत्येक व्यक्तिचा इतर सर्वांशी झालेला करार आहे.

**परिक्षण**

**लॉकच्या तत्वज्ञानातील दोष -** लॉकने आपल्या सामाजीक कराराच्या सिध्दांताद्वारा मर्यादित शासनाचे महत्वाचे तत्व राज्यशास्त्रामध्ये प्रस्थापित केलेले आहे आणि त्याच्या विचारांमध्ये प्रातिनिधिक लोकशाहीची कल्पना आपल्याला दिसत असली तरी त्याच्या विचारांमध्ये काही दोषही आपल्याला आढळून येतात.

१) लॉकच्या मते समाजपूर्व अवस्थेमध्ये मनुष्य हा सद्‌गुणी आणि स्वविवेकानुसार वर्तन आणि कार्य करित असे. हे मनुष्य स्वभावासंबंधीचे विचार जर मान्य केले तर स्वाभाविकच असा प्रश्न निर्माण होतो की, त्या लोकांनी निसर्ग अवस्था नष्ट करण्याचा खटाटोप का केला? या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर लॉकच्या विचारात आढळत नाही.

२) रुसोच्या मते लॉक हा व्यक्तिचे समाजामध्ये दिसून येणारे गुण निसर्ग अवस्थेतही व्यक्तिच्या ठिकाणी होते, असे मानतो ही लॉकने फार मोठी चूक केलेली आहे. राज्यपूर्व अवस्थेतील मनुष्याचे जीवन आणि राज्य अस्तित्वात आल्यानंतरचे मनुष्याचे जीवन यात साहजीकच फरक पडु शकतो.

३) लॉकने निसर्ग अवस्थेचे जे वर्णन केले आहे ते वर्णन योग्य होते यासंबधीचा इतिहासात पुरावा आढळत नाही. त्यामुळे निसर्ग अवस्थेचे लॉकने केलेले वर्णन काल्पनिक स्वरुपाचे आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

४) लॉकची निसर्ग अवस्था समाजपूर्व नाही तर ती राज्यपूर्व आहे परंतू असे असून देखील राज्य आणि समाज यामध्ये स्पष्ट असा भेद करण्यास लॉक असमर्थ ठरला आहे. वस्तूतः समाज निर्माण झाल्यानंतर राज्य निर्माण झाले असे एकदा का मान्य केले की राज्य ही एक समाजाच्या अंतर्गत असलेली राजकिय स्वरुपाची संस्था

आहे. ती समाजातील एकमेव संस्था नाही हे स्पष्ट होते. परंतू लॉकने मात्र आपल्या विचारात कुठेही राज्य आणि समाज यातील भेद स्पष्ट केलेला नाही.

५) लॉकच्या विचारांमध्ये एक महत्वाची विसंगती आढळते, ती ही कि, एकीकडे राज्य ही मानव निर्मित संस्था आहे व मानवाचे प्रतिनिधित्व करणारी संस्था आहे असे लॉक म्हणतो तर दुसरीकडे निसर्ग नियमांचा अर्थ लावण्याकरिता आणि त्यांना कार्यान्वित करण्यासाठी राज्याची निर्मिती झालेली आहे, असे लॉक म्हणतो. याचा अर्थ लॉकला पोलीस राज्यच मान्य होते असे म्हणावे लागेल. लोकांच्या कल्याणासाठी आणि व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी राज्याची आवश्यकता असते याकडे लॉकने दुर्लक्ष केले आहे.

६) लॉक एकीकडे व्यक्तिवादी भूमिका घेतो तर दुसरीकडे तो व्यक्तिला श्रेष्ठ स्थान देतो. त्यामुळे राज्याच्या सुरक्षिततेला त्याने धोक्यात आणले आहे असे म्हणता येईल. दुसरीकडे व्यक्तिचे स्वातंत्र्य आणि राज्याची सत्ता यामध्ये समन्वय घडवून आणण्याच्या दृष्टीकोनातून त्याने सामाजिक कराराचे स्वरुप स्पष्ट केले असले तरी त्या करारामुळे व्यक्तिचे श्रेष्ठत्व वाढते व राज्याला गौणत्व प्राप्त होते असे आढळून येते.

७) लॉक बहुमताच्या निर्णयाला महत्व देवून अल्पमताकडे दुर्लक्ष करतो आणि त्याचवेळी व्यक्तिला शासनाविरुध्द क्रांती करण्याचा अधिकार देतो. त्यामुळे त्याच्या विचारांमध्ये सुसंगती आढळून येत नाही.

८) लॉकच्या कराराच्या अटीचे पालन न केल्यास सरकारला बदलण्याचा त्या शासनाला विरोध करण्याचा आणि शासनाविरुध्द क्रांती करण्याचा लॉक व्यक्तिला अधिकार देतो. वस्तूतः कोणत्याही राज्यामध्ये व्यक्तिला क्रांतीचा अधिकार असू शकत नाही, तसे मान्य केल्यास राज्याचे अस्तित्व धोक्यात येवू शकते.

अशा प्रकारे लॉकच्या राजकिय विचारांवर टिका होत असली तरी त्याचे मर्यादित राजसत्तेबद्दलचे विचार तसेच सत्ता विभाजनासंबंधीचे विचार आजही जगात मान्यता पावलेले आहेत. धर्माबाबतचा लॉकचा दृष्टीकोन

आधुनिक युगामध्ये देखील महत्वाचा ठरत आहे. मॉटेक्सू, रुसो, बेन्थॅम इ. विचारवंतांच्या विचारांवर लॉकच्या विचारांचा प्रभाव आढळून येतो. रुसोने लॉकच्या विचारातूनच प्रेरणा घेवून 'ज-तेचे सार्वभौमत्व' हा सिध्दांत प्रस्थापित केला. यातच लॉकच्या विचारांचे श्रेष्ठत्व सिध्द होते. इंग्लंडमध्ये जनजागृतीमध्ये तसेच इंग्लंड प्रागतीक विचारांच्या पुरस्कर्त्यांमध्ये लॉकचे स्थान अद्वितीय आहे आणि म्हणूनच प्रा. लास्की लॉकबद्दल म्हणतात की, "लॉकने जनस्विकृतीच्या सिध्दांताला राज्यशास्त्रात स्थिरत्व प्राप्त करुन दिले."

***

## प्रकरण ६

# जीन जॅक्स रुसो (Jean Jacques Roussequ)

## इ.स. १७१२ ते १७७८

---

**जीवन परिचय -**

लॉकच्या विचारांनी रुसो प्रभावित झालेला होता आणि त्याने लोकांच्या सार्वभौमत्वाची संकल्पना आर्थिक विकसीत करुन तिचे प्रजासत्ताकाच्या तत्वज्ञानामध्ये रुपांतर केले. सामाजिक कराराच्या सिध्दांताचे विस्तृत विवेचन अठराव्या शतकात फ्रेंच राज्यशास्त्रज्ञ रुसो याने केले. हॉब्ज व लॉक यांच्यापेक्षा त्याची भूमिका भिन्न स्वरुपाची होती. त्याचे कारण रुसोच्या काळात फ्रान्समधील सामाजिक परिस्थिती सतराव्या शतकातील इंग्लडमधील परिस्थितीपेक्षा निराळी होती. रुसोचा जन्म एका सामान्य कुटूंबात २८ जून १७७२ मध्ये जिनीव्हा येथे एका प्रॉटेस्टंट कुटूंबामध्ये झाला. आईचा मृत्यु व वडीलांचा स्वभाव या दोन्ही गोष्टींचा लहानपणीच त्याच्या मनावर परिणाम झाला. लहानपणापासुन कोणतेच शिक्षण त्यास मिळू शकले नाही. कौटुंबिक संस्कार त्याच्यावर होऊ शकले नाहीत. त्याचे जीवन लहानपणापासुन कष्टाचे, गुन्हेगारीशी संबंधित असे होते. त्याने विवाह केला नाही, परंतू त्याचा बऱ्याच स्त्रियांशी संबंध आला. मॅडम वॅरन यांच्या प्रेमात पडल्याने तिच्या विज्ञान मित्रांच्या सहवासाचा लाभ त्यास मिळाला. पॅरिस येथे डिडोराच्या Encyclopaedia याच्यात लेख लिहीण्याची संधी त्याला मिळाली. रुसो राजकारणी नव्हता, विद्वान, अभ्यासक, तत्वज्ञानीही नव्हता व हे सर्व नसल्याचा त्यास गौरव वाटत होता. तो एक अत्यंत प्रतिभाशाली व्यक्ती होता आणि त्याला वाङमयीन शब्दात विचार मांडण्याची, ऐकणाऱ्याची पकड घेण्याची अलौकिक पात्रता होती. आकर्षक अंदाज आणि तर्कशुध्द भासणारे विचार मांडण्याच्या त्याच्या शैलीमुळेच तो प्रकाशात आला असे मत प्रा. डर्निंग यांनी प्रगट केले आहे. रुसोने समानतेचा पुरस्कार केला. पण तो नैतिकतेच्या पायावर एक नैसर्गिक हक्क म्हणून नाही. नैतिक गुणांचा अविष्कार सामान्य माणसामध्ये दिसून येतो आणि त्यांचीच संख्या अधिक असते. माणसांमधील

नैसर्गिक समानता लक्षात घेता ज्या सामाजिक स्तरात सर्वात अधिक माणसे असतात. त्यांचाच सन्मान राखला पाहिजे अर्थात यामधून रुढीपरंपरेचे महत्व वाढते. कारण सर्वसामान्य माणसांवर त्याचा प्रभाव अधिक असतो. रुसोच्या लिखाणामध्ये एकाचवेळी आक्रमक व्यक्तीवाद आणि तितकाच आक्रमक समुदायवाद यांचे मिश्रण दिसून येते. समाज हाच नैतीकतेचा स्त्रोत आहे. त्याच्याशी व्यक्तीचे असलेले नाते हे खरे नैतीक नाते असते. या एकात्म वृत्तीने नागरीकत्व ग्रीक नगरराज्यातील नागरीकत्वासारखे भावनिक बनते. रुसोने त्याचा सांधा राष्ट्रराज्यास जोडून दिला. समाजकल्याण ही व्यक्तिगत कल्याणाची बेरीज नसून भाषेसारखा सर्व समाजाचा ठेवा आहे. व्यक्तीच्या सुखाचा तो उगम आहे. संगित, शिक्षण, समाजशास्त्र आणि राजकिय तत्वज्ञान या सर्व विषयावर त्याने ग्रंथ लिहीले आहेत. सोशल कॉन्ट्रॅक्ट (Social Contract) या ग्रंथात त्याचे राजकीय विचार व्यक्त झाले आहेत. राज्य मनुष्य निर्मित आहे आणि ते लोकांनी परस्परात केलेल्या करारामुळे निर्माण झालेले आहे. हा मुलभुत विचार मात्र त्याने मान्य केला आहे. समाजातील विषमतेची कारणे, मनुष्यस्वभावाचे वैशिष्ट्ये आणि सामाजिक ईहेचे स्वरुप याविषयी त्याने केलेले विवेचन विशेष महत्वाचे समजले जाते.

**रुसोचे मनुष्य स्वभाव व निसर्ग अवस्था यासंबंधी विचार :**

रुसो हा फ्रेंच विचारवंत होता. लोकांच्या भावना उत्तेजीत करण्यामध्ये तो यशस्वी ठरला. व्यक्तिच्या हक्कांचे त्याने आपल्या राजकिय विचारांमध्ये समर्थन केले. रुढीवादावर त्याने आपल्या राजकिय विचाराने कडाडून टिका केली. जनतेचे सार्वभौमत्व ही संकल्पना त्याने स्पष्टपणे मांडली. फ्रान्सची क्रांती आणि अमेरिकन स्वातंत्र्य युध्द यावर रुसोच्या विचारांचा प्रभाव होता. समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्वासाठी फ्रान्समध्ये जी क्रांती झाली त्या क्रांतीचे मुळ रुसोच्या राजकिय तत्वज्ञानात सापडते. त्याचे राजकिय विचार समजून घेण्याअगोदर त्याने त्याच्या विचारांची जी मुलभूत वैशिष्टे किंवा त्याच्या ज्या मुलभूत कल्पना आहेत त्या लक्षात घेणे आवश्यक आहे. त्याचे मुलभूत वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे -

१) मनुष्य जन्मतःच स्वतंत्र असतो. परंतू त्याचे जीवन सर्वात सामाजीक श्रृखलांनी जखडले आहे.

२) तसेच मनुष्याची कृती व्यक्तिगत स्वार्थ व व्यक्तिविषयीची सहानुभूती यावर आधारलेली असते.

३) त्याचे जीवन दोन प्रवृत्तीवर अवलंबून आहे.

अ) आत्मप्रेम ब) सहकार्य, सहानुभूती

४) मनुष्य स्वभावतःच चांगला आहे. परंतु संस्कृती त्याला बिघडवते.

५) व्यक्ति स्वतंत्र आणि राज्याची सार्वभौम सत्ता यामध्ये समन्वय घडविणे आवश्यक आहे.

रुसोने वरील मुलभूत संकल्पनांच्या आधारावर आपले राजकिय तत्वज्ञान मांडले. हॉब्ज आणि लॉकप्रमाणे त्याने राज्याच्या उदयासंबंधी सामाजिक कराराच्या सिध्दांताचा पुरस्कार केला. प्लेटो, ॲरिस्टॉटल, हॉब्ज, लॉक, मॅकॅव्हेली या विचारवंतांच्या विचारांचा त्याच्यावर प्रभाव पडला. परिस्थितीमुळे त्याला दारोदार भटकावे लागले. अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. या भटकंतीत त्याचा अनेक चांगल्या वाईट व्यक्तिशी संबंध आला आणि मनुष्यस्वभावासंबंधी विचार करतांना अनुभवाची छाप त्यावर पडली होती.

**अ) मनुष्य स्वभावासंबंधीचे विचार -**

१) रुसोच्या मते मनुष्य हा स्वभावतःच चांगला आणि सद्‌गुणी आहे.

२) मनुष्य निसर्गतःच सत्याकडे झुकणारा आहे.

३) मनुष्य हा विवेकशिल आहे.

४) विवेकामुळे तो चांगल्या किंवा वाईट मार्गाकडे वळतो.

हॉब्ज आणि लॉक प्रमाणेच रुसोने देखील नैसर्गिक अवस्थेचे जे वर्णन केले आहे ते मानवी स्वभावावर अवलंबून आहे. मनुष्य स्वभावतःच दृष्ट, लोभी, कपटी असतो हे हॉब्जचे मानवी स्वभावासंबंधीचे विचार रुसोला मान्य नव्हते. रुसो म्हणतो, "मनुष्य हा स्वभावाने अतिशय चांगला आहे, परंतु समाजातील इतर संस्थांमुळे तो दुर्गुणी झाला आहे." मनुष्याचा स्वभाव दोन गोष्टींवर अवलंबून असतो किंवा रोगप्रवृत्तीमुळे मनुष्याच्या स्वभावाला वळण मिळत असते.

१) आत्मप्रेम किंवा स्वरक्षणाची भावना

२) सहानुभूती किंवा सहकार्य

**१) आत्मप्रेम किंवा स्वरक्षणाची भावना**

आत्मरक्षणाच्या संदर्भात रुसो असे म्हणतो की, "मनुष्यामध्ये आत्मरक्षणाची भावना असते, म्हणून तो जीवंत राहतो." सामाजीक करारामध्ये भावना असते, म्हणून तो जीवंत राहतो. सामाजीक करारामध्ये देखील स्वतःचे रक्षण करणे ही पहिली भावना आहे.

**२) सहानुभूती किंवा सहकार्य -**

सहानुभूतीचा देखील मनुष्य स्वभावावर परिणाम होत असतो. मनुष्यामध्ये असलेली दुसरी भावना म्हणजे सहानुभूती होय. प्रत्येक मनुष्यात सहकार्याची भावना असल्यामुळे जीवनात तो यशस्वी सहकार्य करतो ते सुध्दा स्वार्थामुळेच परंतु रुसोच्या मते या सहकार्यामध्ये परस्पर हिताची भावना असते आणि यामुळेच मनुष्य चांगला आहे असे समजावे. आत्मसंरक्षण आणि सहकार्य यामध्ये जार संघर्ष निर्माण झाला तर एक नवीनच भावना जन्माला येते. त्या भावनेला रुसोने "विवेक" असे म्हटले आहे. ही भावना बुध्दीवर आधारित असून आत्मसंरक्षण आणि सहकार्य यांच्या संघर्षात उत्पन्न झालेली असते. विवेकामुळेच मनुष्य सत्याकडे आकर्षित होतो आणि असत्याचा तिटकारा करतो. चांगले आणि वाईट, योग्य आणि अयोग्य, उचित आणि अनुचित यामध्ये भेद करण्याची शक्ती विवेकामुळेच निर्माण होते. रुसोच्या मते अंतर्विचार कधीच चुक करित नाहीत. जर मनुष्य वाईट मार्गाकडे गेलाच तर तो विवेकाचा दोष आहे कि, ज्यामुळे सत्य आणि असत्य ओळखण्यात मनुष्य चुक करतो. आपला विवेक आणि मन यामध्ये तो समन्वय प्रस्थापित करु शकतो तो अधःपतनाकडे वळतो. स्वतःवरील प्रेम मनुष्यामध्ये गर्व निर्माण करते. म्हणूनच रुसो असे म्हणतो की, "विवेकाला सर्वांचा स्पर्ष व्हावयास नको."

**ब) निसर्ग अवस्थेसंबंधी विचार -**

मनुष्यस्वभावाप्रमाणे रुसोने निसर्ग अवस्थेचे देखील वर्णन केलेले आहे. परंतु हे निसर्ग अवस्थेचे वर्णन हॉब्ज आणि लॉक यांनी वर्णन केलेल्या निसर्ग अवस्थेपेक्षा भिन्न आहे. रुसोने निसर्ग अवस्थेचे रम्य चित्र रेखाटले आहे. रुसोच्या मते "निसर्ग अवस्था म्हणजे पृथ्वीवरील नंदनवन होय. अशा या स्वर्गतुल्य अवस्थेमध्ये मनुष्य सुखी आणि समाधानी होता. या

निसर्गअवस्थेमध्ये वास्तव्य करणारी प्रत्येक व्यक्ति स्वतंत्र होती. या अवस्थेमध्ये खाजगी संपत्तीची कल्पना देखील नव्हती. कारण साधनांची विपुलता होती." रुसोने आपल्या डिस्कोर्सेस (Discourses) या ग्रंथात निसर्ग अवस्थेचे वर्णन केले आहे. तो म्हणतो, "निसर्ग अवस्थेत मनुष्य आनंदाने आपले जीवन घालवित होता. त्याला कशाचीही चिंता नव्हती, तसेच निसर्ग अवस्थेत व्यक्तिव्यक्तित संघर्ष नव्हता. निसर्ग अवस्थेतील मनुष्य रानटी असला तरी उदात्त होता. मनुष्याची निसर्ग अवस्था "सुवर्ण युगा" सारखी होती. ते युग म्हणजे पृथ्वीवरील नंदनवनच होते."

या अवस्थेत मनुष्यावर कोणतेच बंधन नव्हते. अशा अवस्थेची व आजच्या कृत्रीम युगाची तुलना केल्यानंतर रुसो परत निसर्गाकडे जाण्याचा सल्ला देतो. तो म्हणतो, "आम्हाला आमचे अज्ञान आणि गरिबी परत द्या, त्यामुळे आम्ही सुखी होवू." (Give us back the ignorance and poverty, which alone can make us happy). निसर्ग अवस्थेतील हे निरागस आणि स्वर्गतुल्य जीवन फार काळ टिकले नाही. याचे कारण मनुष्यामधील असमानता होय. सर्व लोक समान राहिले असते तर ही प्राकृतिक अवस्था कायम राहिली असती. पण काही माणसे दुसऱ्यांपेक्षा अधिक शक्तीमान आणि कष्टाळू व बुध्दीमान होते. तसेच मनुष्यास थंडीवाऱ्यापासून रक्षण करण्यासाठी निवाऱ्याची आणि भूकेसाठी अन्नाची आवश्यकता असते. मनुष्याच्या आवश्यकता दिवसेंदिवस वाढु लागल्या आणि मनुष्य देखील बुध्दीनिष्ठ बनला. बुध्दीच्या विकासामुळे 'माझे आणि तुझे' ही भावना निर्माण झाली. रुसोच्या मते, "ज्या मनुष्याने जमीनीच्या तुकड्याभोवती कुंपण घालून 'ही माझी जमीन आहे', अशी प्रथम घोषणा केली आणि इतर व्यक्तिंनी त्यावर विश्वास ठेवला त्याच दिवशी राजकिय समाजाला प्रारंभ झाला. ('The first man who having encloses a piesce of ground he thought himself saying 'This is mine' and found people simple enough to believe him the real founder of civil society.")

**परिक्षण -** रुसोने मनुष्य स्वभाव आणि निसर्ग अवस्था या संबंधीचे जे विचार मांडले आहेत त्यावर अनेक आक्षेप घेण्यात आले आहेत.

१. "नैसर्गिक अवस्थेमध्ये मनुष्य हा स्वर्गतुल्य जीवन जगत होता असे रुसो म्हणतो. परंतु त्याने वर्णन केलेल्या निसर्ग अवस्थेमध्ये मनुष्य सुरक्षित होता याला इतिहासात पुरावा सापडत नाही.

२. मनुष्य निसर्ग अवस्थेमध्ये चांगला होता. परंतू समाजात इतर संस्था निर्माण होताच त्या संस्थांनी मनुष्याला भ्रष्ट केले हे रुसोचे मत योग्य नाही. कारण मनुष्याने आत्मरक्षणासाठी आणि स्वत:चे हीत साध्य करण्यासाठी संस्था निर्माण केल्या आहेत. त्या संस्था मनुष्याला भ्रष्ट करण्याऐवजी त्याच्या विकासाला अनुकूल असे वातावरण निर्माण करण्यास मदत करित असते. अशा स्थितीत संस्थांमुळे मनुष्याचे अध:पतन होते हे रुसोचे मत योग्य वाटत नाही.

३. संपत्तीमुळे मनुष्याच्या गरजांची पुर्ती होते. मनुष्याच्या अस्तित्वासाठी आणि विकासासाठी खाजगी संपत्तीचा हक्क असणे आवश्यक आहे. रुसोने मात्र मनुष्य संपत्तीमुळे भ्रष्ट झाला असे सांगितले हे त्याचे मत योग्य वाटत नाही.

४. चारित्र्य आणि नैतिकता ही मनुष्याच्या आत्म्याशी संबंधीत आंतरिक अशी बाब आहे. त्यामुळे नैतिक बनणे किंवा न बनने हे सर्वस्वी व्यक्तिवरच अवलंबून असते. कोणतीही संस्था मनुष्याला नैतिक बनवेल हे रुसोचे विचार न पटणारे आहेत.

५. रुसो म्हणतो, "मनुष्य हा स्वभावत:च चांगला आणि सद्‌गुणी आहे. बुध्दीच्या विकासामुळे तो दृष्ट आणि स्वार्थी बनला आहे. त्याचे अध:पतन होण्याचे मुख्य कारण समाजातील विकृत कला आणि सामाजिक परिस्थिती होय." परंतु रुसोचे हे विचार पूर्णत: सत्य आहेत असे वाटत नाही. मनुष्याला चांगले जीवन जगता यावे म्हणूनच मनुष्य प्रयत्नशिल असतो. मनुष्य मुलत: चांगला असता तर त्याने त्या संस्थांचा चांगल्यासाठीच उपयोग केला असता. परंतु ज्या संस्था उदात्त धोरणाने उदयाला आल्या त्यांना भ्रष्ट करण्याचे कार्य मनुष्यानेच केले आहे. त्याची अनेक कारणे आधुनिक काळात देता येतील. उदा. शिक्षण संस्थांचा चांगल्या कार्यासाठी निर्माण झ ाल्या आहेत. पण आज त्या संस्थांना धंद्याचे स्वरुप प्राप्त झाले आहे

हे कशामुळे तर मनुष्याच्या स्वार्थामुळेच. रुसोच्या विचारांशी संमत व्हावयाचे असेल तर आपण एवढे म्हणू शकतो की, 'मनुष्याचा स्वभाव चांगलाही असतो आणि वाईटही असतो.' मनुष्य हा चांगल्या आणि वाईट या दोन्ही प्रवृत्तींनी युक्त असतो. जे.एस. मील, कॉन्ट, ग्रीन यासारख्या विचारवंतांनी सुध्दा मनुष्याला चांगले आणि वाईट हे दोन्ही गुण असतात हे मान्य केले आहे.

रुसाचे नैसर्गिक अवस्थेसंबंधीचे विचार त्याच्या कल्पनेवरच आधारलेले आहेत. खुर्चीवर बसून निसर्ग अवस्थेत मनुष्य कसा होता त्याचे जीवन कसे होते. निसर्ग अवस्था राज्य पूर्व होती की, समाजपूर्व होती, त्या निसर्ग अवस्थेचे स्वरुप कसे होते इ. गोष्टीचा रुसोने विचार केला. त्यामुळे त्याचे सर्व विचार कल्पनेवर आधारलेले आहेत. निसर्ग अवस्था ही स्वर्गतुल्य अवस्था होती याला इतिहासात कुठेही आधार मिळत नाही. रुसोने राज्यसंस्था हा कराराचा परिणाम आहे आणि निसर्ग अवस्था समाप्त करण्याच्या दृष्टीकोनातून राज्य निर्माण केले गेले हे विचार पूर्णपणे काल्पनिक आहेत.

**रुसोचा सामाजिक कराराचा सिध्दांत -**

राज्याच्या उत्पत्तीसंबंधी अनेक सिध्दांत सांगण्यात आले आहेत. त्यापैकी सामाजिक कराराचा सिध्दांत एक महत्वाचा सिंध्दात मानला जातो. राज्य हे लोकांनी करार करुन निर्माण केले आहे किंवा राज्य हा कराराचा परिणाम आहे असा विचार हॉब्ज, लॉक आणि रुसो या तीन विचारवंतांनी मांडला. परंतु तिघांनीही वर्णन केलेले सामजिक करारचे स्वरुप मात्र सारखे नाही. हॉब्ज आणि लॉक या विचारवंतांपेक्षा रुसाचे विचार भिन्न आहेत. निसर्ग अवस्थेत मानवाला मिळणारी शांती आणि सुख नष्ट झाले आणि त्याजागी भिती, संघर्ष, द्वेष आणि जीवनाची अशाश्वतता जेव्हा निर्माण झाली तेव्हा लोकांनी परस्परांध्ये एक करार करुन राज्याची निर्मिती करावयाचे ठरविले. परंतु ते लोक आपले निसर्ग अवस्थेत मिळणारे स्वातंत्र्य गमावण्यास तयार नव्हते. कारण रुसोच्या शब्दात, "मुर्ख आणि निशिस्त अशा प्रकारे आपल्या स्वातंत्र्याचा त्याग करेल." याचा अर्थ लोकांनी अशाप्रकारे करार करुन राज्याची निर्मिती केली आहे. त्या लोकांनी अशाप्रकारे करार केला की, ज्यामुळे त्याचे स्वातंत्र्य तर कायम राहिलेच पण त्याचबरोबर संघर्ष

निवारण्यासाठी सत्ता देखील अस्तित्वात आली. रुसोच्या मते ज्या व्यक्ति स्वतंत्र राजकिय समाजाची स्थापना करण्यास इच्छुक होत्या त्या सर्वांनी एकत्र येवून आपल्या नैसर्गिक अधिकारांचा त्याग केला पण तसे करित असतांना त्यांनी असे म्हटले, "आमच्यातील प्रत्येक व्यक्ति आपले व्यक्तित्व आणि नैसर्गिक अधिकार सामाजिक इच्छेला अर्पण करते आणि सामुदायीक स्वरुपात प्रत्येक व्यक्तिच्या सामुदायीक एकात्मतेचा अविभाज्य घटक म्हणून त्यांचा स्विकार करते." रुसो पुढे असे म्हणतो की, "समूह बनविण्याच्या या प्रक्रियेत करारात भाग घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाच्या ठिकाणी एक नैतिक आणि सामुदायीक अशा संघटनेचा जन्म होतो अ ाणि हा संघ करारात भाग घेणाऱ्या सर्व व्यक्ति मिळून बनतो. सामुदायीक संघटना निर्माण होत असतांना निष्ठा आपली सत्ता, आपले जीवन, आपली एकता आणि इच्छा प्राप्त होते. सर्व व्यक्तिच्या संघटनेतून निर्माण झालेल्या या सार्वजनिक व्यक्तिला प्रथम नगर म्हणत. आता त्याला गणराज्य असे म्हणतात. संघीय भावनेतून पुढे राज्य निर्माण झाले.

रुसोने सामाजीक कराराचा सिध्दांत सांगत असतांना जनतेच्या सार्वभौमत्वाची कल्पना प्रामुख्याने मांडली. जेव्हा प्रत्येक व्यक्ति सर्वांसाठी आपले व्यक्तित्व समर्पित करते त्यावेळी कोणीच कोणाच्या अधीन होत नाही. प्रत्येक जण पूर्वीइतकाच स्वतंत्र राहतो. अशा रितीने सामाजीक करारानंतर व्यक्तिचे स्वातंत्र्य थोडे देखील कमी होत नाही. उलट त्यांना निसर्गअवस्थेत असलेल्या अधिकारांची तर हमी मिळालीचं पण त्याचबरोबर संरक्षण आणि सहकार्य या दोन नवीन गोष्टी प्राप्त झाल्या. अशा रितीने कराराद्वारे व्यक्तिचा राजकिय समाज अस्तित्वात आला.

वरील विवेचनावरुन आपल्याला रुसोने प्रतिपादन केलेल्या सामाजिक कराराची काही वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. प्रत्येक व्यक्ति आपले सर्व अधिकार समाजाला समर्पित करते आणि अशारितीने सामाजिक संस्था श्रेष्ठ बनते. कराराच्याद्वारा सर्वश्रेष्ठ सत्ता जरी निर्माण झाली असली तरी सर्व व्यक्तिचे अधिकार समान राहतात.

२. प्रत्येक व्यक्तिने कराराद्वारे आपले सर्व अधिकार समर्पित केले. परंतु हॉब्जने सांगितल्याप्रमाणे हे अधिकारांचे समर्थन एका व्यक्तिला नाही तर व्यक्तिच्या समुहाला केले. त्यामुळे निर्माण झालेल्या सामुदायीक संघटनेचा प्रत्येक मनुष्य अविभाज्य घटक बनला.

३. ज्या सामान्य इच्छेला प्रत्येक व्यक्तिने आपले अधिकार दिलेत ती अधिकार दिलेली इच्छाच पुढे सार्वभौम बनली.

४. या करारानुसार व्यक्तिचे कोणत्याही प्रकारे नुकसान होत नाही. कारण जो अधिकार इतर व्यक्ति इतरांना स्वतःबद्दल देते तोच अधिकार तिला समाजातील प्रत्येक व्यक्तिच्या बाबतीत प्राप्त होतो.

५. रुसोच्या मते हा करार म्हणजे एकदाच घडलेली गोष्ट नाही तर ती सतत चालणारी प्रक्रिया आहे. यात प्रत्येक व्यक्ति सतत भाग घेत असतो आणि आपल्या सहभागाच्या आधारे राज्याच्या कार्याला संमती प्रदर्शित करित असतो.

६. कराराच्या द्वारा निर्माण होणारे म्हणजेच "सामूहिक इच्छे"च्या आधारे निर्माण होणारे राज्य हे जीवंत प्राण्यासारखे आहे. प्रत्येक व्यक्ति राज्याची अविभाज्य घटक असल्यामुळे राज्यापासून ती अलग होवूच शकत नाही. तसेच राज्याच्या विरुध्द कार्य करण्याचा सुध्दा तिला अधिकार नाही. इच्छा आणि राज्य म्हणजेच पूर्णत्वाला पोहचलेला "राष्ट्रपुरुष" होय. या राष्ट्रपुरुषाला स्वतंत्र इच्छा म्हणून स्वतःचे स्वतंत्र असे व्यक्तिमत्व असते.

**परिक्षण -**

रुसोने राज्याच्या उत्पत्तीसंबंधीचा जो सामाजीक कराराचा सिध्दांत प्रतिपादन केला आहे त्यावर अनेक दृष्टीकोनातून टिका केली जाते. त्यातील काही महत्वाच्या टिकेचे मुद्दे पुढीलप्रमाणे -

**(अ) अस्पष्टता -** ज्याप्रमाणे रुसोने वर्णन केलेल्या नैसर्गिक अवस्थेला ऐतिहासिक पुरावा मिळत नाही. त्याचप्रमाणे नैसर्गिक अवस्थेतील लोकांनी परस्परांमध्ये करार करुन राज्याची निर्मिती केली. याला सुध्दा ऐतिहासिक आधार प्राप्त होत नाही. इतिहासामध्ये कुठेही रुसोच्या विचारांना पुरावा मिळत नाही. दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, रुसोने कराराच्या बाबतीत

परस्परविरोधी विधाने केली आहेत. एकीकडे तो सामाजिक कराराला ऐतिहासिक घटक मानतो तर काही ठिकाणी सतत चालणारी ती एक प्रक्रिया मानतो. आणखी एक महत्वाची गोष्ट अशी की, राज्याची निर्मिती कराराच्या द्वारा ज्यांनी निर्माण केली त्यांच्यावरच कराराचे बंधन राहील. इतरांवर ते राहु शकत नाही. परंतु प्रत्यक्षामध्ये मात्र असे दिसते की, राज्याच्या नियमांचे पालन पुढील पिढ्या देखील करित असतात. याचा अर्थ असा की राज्य हे कराराच्याद्वारा निर्माण झाले आहे असे म्हणता येत नाही.

**(ब) राज्याद्वारा मनुष्याला सुख प्राप्तच होते असे नाही -**

रुसोच्या मते, स्वतःला स्वतंत्र समान आणि सुखी करण्याकरिता मनुष्य सामाजिक करार करतो आणि राज्याची निर्मिती करतो. परंतु राज्य मनुष्याच्या फक्त बाह्य कृतीवरच नियंत्रण ठेवित असते. आंतरिक विचारांवर नाही, त्यामुळे मनुष्य जोपर्यंत अंतकरणात शुध्द चारित्र्यवान आणि नैतिक बनु शकत नाही तोपर्यंत तो कधिही सुख प्राप्त करु शकणार नाही. राज्यात मनुष्य सुखी होतो हे रुसोचे मत चुकीचे आहे.

**(क) निरंकुशता -**

राज्यामुळे मनुष्य सुखी होतो असे आपण गृहीत धरले तरी प्रश्न निर्माण होतो की, सुखी होण्यासाठी राज्य कसे असावयास पाहिजे. रुसोच्या मते करारातुन निर्माण झालेले राज्य निरंकुश आहे. त्या राज्याची प्रत्येक आज्ञा पाळणे हे मनुष्याचे कर्तव्य आहे. अशा परिस्थितीत स्वतःच्या मनाला मुरड घालून एखाद्या आज्ञेचे पालन करावे लागत असेल तर मनुष्य सुखी होवू शकेल काय? राज्याच्या सर्व आज्ञा चांगल्या असतीलच असे नाही. तरी देखील रुसो मात्र व्यक्तिला राज्याच्या इच्छेसमोर बळी देतो.

**(ड) तार्कीकदृष्ट्या अयोग्य -**

रुसोच्या मते राज्य करारातून निर्माण झाले. याला जसा इतिहासात पुरावा नाही त्याचप्रमाणे या विचाराला तर्काचा सुध्दा आधार नाही. कारण तर्क करावयाला सुध्दा काही घटक माहित असणे आवश्यक असते. राज्याचा उदय ऐतिहासिक विकासातून झाला आहे ही गोष्ट तार्किकदृष्ट्या योग्य वाटते परंतू लोकांनी कराराद्वारे राज्य निर्माण केले असे म्हणणे तार्किकदृष्ट्या योग्य ठरत नाही.

**(इ) असमाधानकारक विचार -**

निसर्गअवस्था ही सर्वतुल्य अवस्था होती. "पृथ्वीवरील नंदनवन" असे निसर्गअवस्थेचे रुसोने वर्णन केले आहे. या अवस्थेत मनुष्य स्वर्गीय सुख अनुभवत होता असे रुसो म्हणतो, करार करुन जनतेने राज्य निर्माण केले व स्वर्गतुल्य अशी निसर्गअवस्था नष्ट केली हा रुसोचा विचार न पटणारा आहे. निसर्गअवस्थेमध्ये बुध्दीच्या विकासामुळे लोक स्वार्थी बनले. दृष्ट झाले तर आपआपसात करार करावा ही भावना सर्वांमध्ये कशी निर्माण होणार? निसर्ग अवस्थेतील सर्व व्यक्तिमध्ये ही भावना उत्पन्न होवु शकेल काय? या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर रुसोला देता आले नाही.

अशाप्रकारे कराराच्या सिध्दांतावर आक्षेप घेण्यात येतात. ते आक्षेप खरे जरी असले तरी, रुसोच्या विचारांचा प्रभाव जगावर पडला. फ्रान्समधील क्रांती त्यामुळेच झाली. त्याच्या विचारापासून लोकांच्या प्रेरणा प्राप्त झाली हे अमान्य करता येत नाही.

**रुसोची सामुहिक इच्छेची कल्पना -**

जनतेचे सार्वभौमत्व ही कल्पना मांडणारा रुसो हा पहिला विचारवंत होय. "मनुष्याच्या वास्तविक इच्छांचा परिणाम म्हणजे समाज आणि समाजाच्या वास्तविक ईच्छांची गोळाबेरीज म्हणजे राज्य" असे रुसो म्हणतो.

रुसोने राज्याच्या उत्पत्ती संबंधीचा सामाजीक कराराचा सिध्दांत सांगत असतांना सामुहिक इहेची कल्पना मांडलेली आहे. किंबहुना राज्याचा आधार या दृष्टीकोनातून त्याने सामुहिक ईहेची कल्पना म्हणजे राज्यशासनाला मिळालेली मोठी देणगी होय. रुसोने जो सामुहिक ईहेचा सिध्दांत सांगितला, त्याने राजकिय क्षेत्रात एक प्रकारे क्रांती घडवून आणली. रुसोने सामुहिक इहेच्या कल्पनेच्या आधारे जनतेचे सार्वभौमत्व प्रस्थापित केले आणि लोकशाही शासन व्यवस्थेचा मार्ग खुला केला आहे. रुसोच्या सामुहिक इहेची संकल्पना निट समजून घेण्यासाठी तिचे स्वरुप जाणून घेणे आवश्यक आहे. रुसोच्या मते मनुष्याच्या मनात दोन प्रकारच्या इच्छा असतात.

१) खाजगी/व्यक्तिगत/भावना प्रधान इच्छा

२) आदर्श / वास्तविक इच्छा

**१) खाजगी/व्यक्तिगत/भावना प्रधान इच्छा**

खाजगी इच्छा ही मनुष्याच्या भावनेला अनुकूल असते व ती व्यक्तिला व्यक्तिगत स्वार्थ प्राप्त करण्यास प्रेरित करित असते. खाजगी इच्छेला बळी पडणारा मनुष्य विवेक सोडून कार्य कसे करतो. सर्वसामान्य लोकांच्या हिताची किंवा जनकल्याणाची तो तमा बाळगत नाही. व्यक्तिची ही इच्छा क्रांतीकारी असते. याच इच्छेने व्यक्तिचा दृष्टीकोन संकिर्ण बनतो अशी इच्छा विवेकहिन अदूरदर्शी, क्षणिक टिकणारी संकुचित आणि स्वार्थी तसेच स्वार्थबुध्दी हीच या इच्छेची प्रेरणा असते.

**२) आदर्श / वास्तविक इच्छा**

ही इच्छा खाजगी किंवा व्यक्तिगत इच्छेच्या अगदी उलट आहे. वास्तविक इच्छा ही विवेक आणि समाजहित यावर आधारित आहे. आदर्श इच्छेला औचित्याकडे लक्ष पुरविले जाते. ही श्रेष्ठ इच्छा आतून स्वातंत्र्याची द्योतक आहे. याच इच्छेमुळे स्थायी स्वरुपाचे निर्णय घेता येतात. वास्तविक इच्छा निस्वार्थी आणि कल्याणकारी असते. व्यक्तिगत हितापेक्षा सार्वजनिक हिताला यात श्रेष्ठ मानले जाते. मनुष्याच्या विवेक शक्तीचा तो परिणाम आहे. या इच्छेत दूरदर्शीपणा, स्थायित्व, शुध्दबुध्दी इ. गुण असतात.

**सामुहिक ईहा किंवा सामान्य इच्छा -**

रुसोने वरील प्रकारच्या दोन इच्छांचा विचार केल्यानंतर आपला सामुहिक ईहेचा सिध्दांत प्रतिपादन केला आहे. "समाजातील सर्व लोकांच्या वास्तविक इच्छांची गोळाबेरीज म्हणजे सामुहिक ईहा" अशी साधी आणि सोपी व्याख्या सामुहिक ईहेची करता येते. किंवा सामान्य इच्छा समाजातील सर्व व्यक्तिच्या वास्तविक इच्छांचा समन्वय आहे. वेबरच्या मते, "सामुहिक ईहा सर्व नागरिकांची इच्छा आहे. जेव्हा तो आपल्या व्यक्तिगत हितापेक्षा समाजहिताची ईच्छा करतात. सर्वांच्या भल्यासाठी सर्वांचा हा आवाज आहे असे समजतात." सामान्य इच्छा सामूहिक कल्याणाचे प्रतिनिधीत्व करते. रुसो म्हणतो, "सामुहिक ईच्छेच्या व्यवस्थेमध्ये सर्व लोक आपले सर्वस्व राज्याला सोपवितात. राज्याचे हीत हेच सर्व नागरिकांचे श्रेष्ठ हित आहे. म्हणूनच एखादी व्यक्ति सामुहिक ईहेची अवहेलना करीत असेल तर संपूर्ण समाज त्यावर दबाव आणू शकतो."

**सामूहिक ईहेची वैशिष्ट्ये -**

रुसोने मांडलेल्या सामूहिक ईहेची काही वैशिष्ट्ये आपणास स्पष्ट करता येउ शकतात -

१) सामुहिक ईहा प्रभुत्व संपन्न आहे.

२) सामुहिक ईहा अविभाज्य असते.

३) सामुहिक ईहा दोन रुपात कधीच असू शकत नाही. त्यामध्ये नेहमीच एकता राहते. विवेकावर ती आधारित असल्याने त्यात विसंगती नसते.

४) सामूहिक ईहा स्थायी असते याचे कारण ती भावनेवर आधारित नसून तो तर्क आणि बुध्दीचा परिणाम आहे.

५) समूहिक ईहा विवेकशिल, सुसंस्कृत आणि परहित साधणारी आहे. जनहित हेच तिचे ध्येय आहे. त्यामुळे तिचे स्वरुप कल्याणकारी आहे.

६) सामुहिक ईहा अदेय आहे तिचे हस्तांतर करता येत नाही.

७) सामुहिक ईहा शुध्द, निर्मळ आणि शाश्वत आहे.

८) "सामुहिक ईहा हा राज्याचा आधार आहे." असे ग्रीन म्हणतो.

९) सामुहिक ईहा मानवी कायद्यांचे उगमस्थान आहे.

**सामुहिक ईहेची निर्मिती -**

सामुहिक ईहेची निर्मिती कशी होते याचेही विवेचन रुसोने केले आहे. कोणत्याही समस्येकडे किंवा प्रश्नाकडे प्रथम व्यक्ति स्वतःच्या दृष्टीकोनातून पाहते यावेळी तिच्या मनात भावनात्मक व आदर्श अशा दोन्ही इच्छा समाविष्ट झालेल्या असतात. विवेकाच्या प्रकाशात यातली अशुध्द ईच्छा नष्ट होते. उरते ती केवळ आदर्श इच्छा सर्व लोकांच्या आदर्श इच्छेचा सुरेख समन्वय म्हणजे सामुहिक ईहा. उदा. 'अ', 'ब', 'क', 'ड' या व्यक्ति आहेत. त्यांच्या इच्छा क्रमानुसार 'अ', 'ब', 'क', 'ड' आहेत. या इच्छा आपापसात संघर्ष पावतील आणि त्या संघर्षामुळे त्यातील भावना प्रधानता कमी होईल व त्यातून 'अ२', 'ब२', 'क२', 'ड२' ही इच्छा उरेल व ही इच्छा सामुहिक ईच्छा होय. या इच्छेचे निर्णय कल्याणकारी असतील.

रुसोच्या सामुहिक इहेच्या सिध्दांतावर अनेकांनी टिका केलेली आहे. त्यातील काही प्रमुख टिका पुढीलप्रमाणे सांगता येतील -

**१) सामुहिक ईहेची अमुर्त कल्पना -**

रुसोने प्रतिपादन केलेली सामुहिक ईहेची कल्पना अस्पष्ट आहे. त्यामध्ये विरोधाभास आहे. सामुहिक ईहा ही बहुमताची ईहा नसल्यामुळे आजच्या लोकशाही कल्पनेच्या ती पूर्णपणे विरुध्द आहे. मनुष्यांच्या ईच्छांचे व्यक्तिगत इच्छा आणि वस्तूनिष्ठ इच्छा या दोन प्रकारांमध्ये वर्गीकरण करणे अशक्य आहे. सामूहिक ईहा प्रतिनिधींमार्फत व्यक्त होवू शकत नाही. म्हणजेच प्रातिनिधिक शासन अयोग्य आहे, असेच म्हणावे लागेल. रुसोच्या सामुहिक ईहेबद्दल असे म्हटले जाते की, ती ईहा सामान्यही नाही आणि इच्छाही नाही. तर ती एक निराधार अशी अमुर्त कल्पना आहे.

**२) अस्पष्टता -**

रुसोची सामुहिक ईहेची कल्पना स्पष्ट नाही. त्यात बऱ्याच ठिकाणी विरोधाभास आढळतो. सामुहिक ईहा ही एका व्यक्तिची नाही, बहुमताची नाही किंवा सर्व व्यक्तिंचीही नाही. असे रुसो म्हणतो. तर दुसरीकडे सामूहिक ईहा ही सर्वांची इच्छा, काहींची इच्छा किंवा एकाचीही इच्छा असू शकते असे रुसो म्हणतो आणि हि दोन्ही विधाने परस्पर विरोधी आहेत. व्यक्तिची आदर्श ईच्छा म्हणजे नेमकी कोणती ईच्छा हे कुणी ठरवायचे असे प्रश्न त्यातून निर्माण होतात.

**३) अव्यवहार कल्पना -**

रुसोची सामूहिक ईहेची कल्पना अन्यायकारी आहे. प्रत्यक्ष व्यवहारामध्ये सामूहिक ईहेची जाणीव होणे अशक्य आहे असे रुसो स्वतःच म्हणतो. नगर राज्याच्या बाबतीत सामूहिक ईहा कोणती हे सांगणे जर अशक्य असेल तर आधुनिक काळामध्ये राष्ट्र राज्यात सामूहिक ईहेचा अनुभव करणे अशक्य आहे.

**४) व्यक्तिस्वातंत्र्याला मारक -**

रुसोच्या मते सामूहिक इहेच्या आज्ञांचे पालन सर्वांनी केलेचे पाहिजे. जर एखादी व्यक्ति आज्ञांचे पालन करित नसेल तर त्या व्यक्तिला सामूहिक इहेच्या आज्ञा पाळण्यास बाध्य केले पाहिजे. त्यामुळे आज्ञेचे पालन करणे योग्य

वाटत नसून देखील आज्ञा पाळावी लागत असेल तर ती व्यक्ति खरोखरच स्वतंत्र आहे असे म्हणता येणार नाही. व्यक्तिला खऱ्या अर्थाने स्वतंत्र करण्याच्या नावाखाली समाजातील बहुसंख्य लोक अल्पसंख्यांकावर अत्याचार करतील त्यामुळे व्यक्ति स्वातंत्र्याला धोका निर्माण होईल.

**५) लोकशाही कल्पनेच्या विरोधी -**

रुसोची सामूहिक ईहेची कल्पना प्रातिनिधीक लोकशाहीच्या पूर्ण विरोधी आहे. कारण सामूदायिक ईहा प्रतिनिधीमार्फत व्यक्त होवू शकत नाही असे रुसो एके ठिकाणी सांगतो आणि जर असे असेल तर प्रातिनिधीक लोकशाहीचा काही अर्थ उरणार नाही व जेथे प्रातिनिधीक लोकशाहीला काही अर्थ उरणार नाही व जेथे प्रातिनिधीक लोकशाही आहे तेथे लोकप्रतिनिधींनी केलेल्या कायद्यात सामान्य हित नसते असे म्हणावे लागेल.

**६) निरंकुशतेला किंवा हुकूमशाहीला पोषक -**

रुसोची सामुहिक ईहेची कल्पना निरंकुश अथवा हुकूमशाहीला जन्म देणारी आहे. असे जर म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. कारण राज्यकर्ते जे काही करतात ते जनतेच्या सामान्य इच्छेनुसारच करित असतात असे रुसो म्हणतो. त्यामळे राज्यकर्त्याला विरोध करण्याचा अधिकार व्यक्तिसमुहाला नाही.

***

**प्रकरण ७**

# जॉर्ज विल्यम फ्रेडरिक हेगेल

# (Georg Wilhem Friedrich Hegel)

**(इ.स. १७७० ते १८३१)**

---

**जीवन परिचय -**

सामाजिक करारातून निर्माण झालेली राज्यसंस्था औद्योगिक समाजापुढील प्रश्नांचे निराकरण करण्यास अपुरी पडली. रक्तहीन क्रांतीमधून आलेली सनदशीर राजेशाही उदारमतवादाकडे झुकत होती. रुसोची सामाजिक ईहा प्रत्यक्ष वास्तवात व्यक्तीस्वातंत्र्याच्या रक्षणापेक्षा सर्वव्यापक नियंत्रणाकडे वळत होती. दोन्ही पध्दतीत राज्ययंत्रणेबरोबर ताबा असलेल्या वर्गाच्या हिताच्या दृष्टीनेच राज्याचे ध्येय राज्य आणि व्यक्तिचे संबंध यांचा विचार होत होता. अशावेळी जॉर्ज हेगेल या जर्मन विचारवतांने विचार करण्याच्या पध्दतीला नवी दिशा दिली. राज्याचे ध्येय आणि व्यक्ती व राज्य यांच्या संबंधांना त्याने नैतिक पातळीवर नेले आणि शास्त्रीय विचारसरणीला तर्ककठोरतेपेक्षा एक वेगळा अटळ द्वंद्ववादी पाया दिला. हेगेलचा जन्म दक्षिण जर्मनीत इ.स. १७७० मध्ये वर्टमबर्ग येथे झाला. तो लहानपणापासुन कुशाग्र बुध्दीचा होता. युवा अवस्थेत फ्रान्सच्या क्रांतीबद्दल त्यास सहानुभुती होती, परंतू शेवटी तो तिच्या विरुध्द गेला. फ्रान्सच्या क्रांतीचे "बौध्दिक उषःकाल" या शब्दात त्याने वर्णन केले. एक सामान्य शिक्षक जीन विद्यापीठाचा आणि न्युरेमबर्गचा प्राध्यापक असलेल्या हेगेलचे विज्ञान आणि तर्कशास्त्रावर तीन ग्रंथ प्रकाशित झाल्यानंतर जर्मनीचा थोर तत्वज्ञ म्हणून तो प्रसिध्द झाला. हेगेलच्या राजकीय विचारांवर तत्कालीन परिस्थितीचा प्रभाव पडला. हेगेल प्रखर राष्ट्रवादी होता. प्रत्येक विषय तर्काच्या आधारावर सिध्द करण्याचा त्याने प्रयत्न केला. त्याचा आदर्शवाद म्हणजे राष्ट्रवादाचीच अभिव्यक्ती होती. जर्मन एकीकरणाच्या आंदोलनाचा त्याच्यावर इतका प्रभाव पडला होता की, त्याने राज्याला ईश्वरी अर्थात दैवी रुप मानले. त्यासाठी सर्व शक्तीमान राज्याची

कल्पना मांडली. त्याने विवेक व ज्ञानाला फार महत्वाचे स्थान दिले. त्याने आपल्या तत्वज्ञानात द्वंद्वात्मक पध्दती आणि राज्याचे आदर्शीकरण ह्या दोन सिध्दांतांना अधिक महत्वाचे स्थान दिले. जॉर्ज हेगेल याने आदर्शवादी विचारांच्या तत्वज्ञानाची बांधणी केली आणि बिस्मार्कने त्याला राष्ट्रवादी व्यावहारिक स्वरुप दिले. त्याने 'दि फिलॉसाफी ऑफ राईटस्' 'दि सायन्स ऑफ लॉजिक' या ग्रंथाचे लिखाण केले. इ.स. १८३१ मध्ये या थोर आदर्शवादी विचारवंताचा कॉलऱ्याने बर्लिन येथे मृत्यु झाला.

**जॉर्ज विल्यम फ्रेडरिक हेगेलने मांडलेल्या द्वद्वात्मक भौतिकवादाची संकल्पना -**

हेगेलने मांडलेल्या द्वंदात्मक किंवा अध्यात्मकवादाची कल्पना - हेगेल हा एक थोर जर्मन विचारवंत होवून गेला. त्याच्या विचारांवर प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांच्या विचारांचा फार मोठा प्रभाव पडला. याचा अर्थ त्याच्या आदर्शवादाची बीजे ग्रिकांच्या विचारात देखील आपल्याला सापडतात. रुसोच्या सामुहिक ईहा या संकल्पनेचा देखील हेगेलच्या विचारांवर प्रभाव पडला. त्याने धर्मगुरु व्हावे अशी त्याच्या आई-वडीलांची फार इच्छा होती. तारुण्यावस्थेत असतांना फ्रान्सच्या क्रांतीबद्दल त्याला फार आदर वाटत होता आणि म्हणूनच त्याने त्या क्रांतीचे "बौध्दीक उषःकाल" या शब्दात वर्णन केले आहे. रुसोच्या ग्रंथाचे त्याने फार गहन अध्ययन केले. ॲरिस्टॉटलप्रमाणे अनेक शास्त्राचा खोलवर विचार त्याने केला. हेगेलचे तत्वज्ञान राज्याचे तत्वज्ञान बनले. बिस्मार्कने हेगेलच्या सिध्दांताला व्यावहारिक रुप दिले. हेगेल हा उच्चकोटीचा राष्ट्रवादी होता. प्रत्येक विषय तर्काच्या आधारावर समजण्याचा त्याने प्रयत्न केला. हेगेलचा आदर्शवाद म्हणजेच राष्ट्रवादाची अभिव्यक्ती होय.

हेगेलच्या राजकिय विचारांच्या मुख्य दोन पध्दती होत्या. हेगेलने मांडलेला द्वंदात्मक पध्दतीचा आपण विचार करु. हेगेलच्या मते, "संस्कृतीचा विकास नागमोडी वळणाने होत असतो. तो एक सरळ रेषेत कधीच होत नाही." एखाद्या प्रचंड वादळात सापडलेले जहाज जसे वाकडे-तिकडे हेलकावे खात असते त्याचप्रमाणे वाकड्या-तिकड्या मार्गाने मानवी संस्कृतीचा विकास होतो.

हेगेलने आपल्या पूर्ण तत्वज्ञानाला विवेक व ज्ञान यांच्या आधारावर प्रतिपादीत केले आहे. त्याच्या मते, "विश्व ही एक स्थायी वस्तू नसून ती एक प्रगतीशील प्रक्रिया आहे." म्हणूनच हेगेलने विकासवादी दृष्टीकोनातून विश्वाचे अध्ययन करण्याचा प्रयत्न केला आहे. सर्वप्रथम हा सिध्दांत विकासाची प्रक्रिया सरळ न सांगता वाकडी-तिकडी सांगतो. वाद-प्रतिवाद आणि संवाद या तीन अवस्थातून वस्तुचा विकास होत असतो. या तिन्हीचे मिळून एक त्रिपूट तयार होते. अशा अनेक त्रिपुटातुन परमतत्वाची प्राप्ती होत असते. परमतत्वाचे रुप समजले की, विकासवादाच्या या प्रक्रियेत कनिष्ठ दर्जाची वस्तु उच्चकोटीच्या वस्तूत विकसित होते. याचा अर्थ परिवर्तन होत असतांना कोणतीही वस्तू जशीच्या तशी राहू शकत नाही. प्रत्येक वस्तूत गतीशिलता असते. या गतीशिलतेमुळे वस्तूतः परिवर्तन होते व परिवर्तनामुळे ती वस्तू प्रगत होते. मात्र वस्तूची प्रगती होत असतांना त्या वस्तूतील निषेधात्मक गुण त्या वस्तूला गतीशील बनवितात. हेगेलच्या मते वाद आणि प्रतिवाद यांच्या संघर्षातून संवाद जन्माला येतो. समन्वयातून निर्माण झालेली वस्तू पुन्हा वाद बनते. पुन्हा त्या वादाला प्रतिरोध होतो व पुन्हा संवाद जन्माला येतो. म्हणजेच ही प्रगतीची क्रिया सतत चालू असते. विकासाची ही क्रिया अंड्याच्या उदाहरणावरुन अधिक स्पष्ट होवु शकते. उदा. अंड्यामध्ये एक जीव असतो हा जीव म्हणजे मुलरुप आहे. याला हेगेल वाद (Thesis) मानतो त्यानंतर गर्भदानाच्या प्रक्रियेत त्यातील निषेधात्मक गुण नष्ट होतात. हे त्याचे विपरित रुप आहे. म्हणजेच तो प्रतिवाद (Anti-thesis) आहे. हे गुण नष्ट झाले तरी अंड्यातील जीव नष्ट होत नाहीत तर त्यातून एक नवीन प्रकारचा जीव जन्माला येतो. त्याला तो संवाद (Scintesis) मानतो. हा जीव पहिल्या दोन्हीपेक्षा भिन्न असतो.

एल.डी.व्हाईट - हा लेखक हेगेलच्या द्वंदात्मक पध्दतीबद्दल असे म्हणतो की, "हेगेलने शुध्द तर्काच्या आधारावर द्वंदात्मक पध्दती मांडण्याचा प्रयत्न केला आहे." Being म्हणजे अस्तित्व ही त्याची संकल्पना पूर्णपणे तार्किक आहे. याचाच शेवट तो शुध्द विचारांमध्ये करतो. मानवी मनाचे तत्वज्ञान पूर्णपणे आणि स्पष्ट स्वरुपात मांडण्याचा त्याने प्रयत्न केला आहे.

विचारांच्या जगतात सत्याचा शोध अशाप्रकारे घ्यावा लागतो. समाज आरंभीच्या जीवनात जीवन व्यतित करित असतांना काहीच नियम नव्हते. कालांतराने मानवाला आपले जीवन संचलित करण्यासाठी नियमांची आवश्यकता भासू लागली. परिणामतः काही नियम बनविण्यात आले. त्याला वाद असे म्हणता येईल. कालांतराने हे नियम अपूर्ण वाटू लागले. त्यामुळे त्या नियमांच्या जागी दुसरे नियम बनविण्याचा विचार निर्माण झाला याला प्रतिवाद असे म्हणता येईल. एका नियमाचे पालन म्हणजे दुसऱ्याचे उल्लंघन असे होऊ लागले. अशा स्थितीत प्रत्येक जण स्वतःच्या मनाप्रमाणे वागु लागले. त्यामुळे गोंधळ आणि अराजकता निर्माण झाली. लोकांना नियमांचे पालन व्हावे म्हणून परत नविन नियम केले गेलेत. त्या नियमांच्या मागील भावनेमुळे लोक त्या नियमांचे पालन करु लागले याला संवाद असे म्हणतात. उदा. ग्रीक राज्यवाद, रोमण राज्य प्रतिवाद आणि आधुनिक राज्य संवाद होय.

डायलच्या मते, द्वदांत्मक पध्दती हेगेलने अशाप्रकारे प्रतिपादन केले आहे की, त्यामुळे मनुष्याच्या विचारांच्या प्रक्रियेचा अभ्यास मनुष्य करु शकतो. हेगेलच्या मते कोणत्याही वस्तूतील वास्तविकता त्या वस्तूच्या प्रतिकुल वस्तुशी तुलना करुन समजू शकते. उदा. वाईटाचे अस्तित्व आहे म्हणून चांगल्याला किंमत आहे. सावलीचे महत्व उन्हामुळे कळते. प्रथम गोष्टीला हेगेलवाद मानतो तर दुसरीला प्रतिवाद मानतो. विरोध हा प्रगतीचा नियम आहे आणि संघर्षातूनच खरे ज्ञान प्राप्त होत असते.

हेगेलने द्वदात्मक पध्दती इतिहासाच्या आधारे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रीक राज्याला तो वाद मानतो, त्यानंतर रोमण साम्राज्य म्हणजे धर्म राज्य याला तो प्रतिवाद मानतो. या दोन्हींच्या संघर्षातून निर्माण होईल ते राष्ट्र राज्य म्हणजे संवाद होय. हेगेलच्या मते राष्ट्रराज्य हा समन्वय आहे. हेगेलने द्वदात्मक पध्दतीचा आधार घेवून जर्मन राष्ट्राला अंतिम सत्य मानले. एवढेच नव्हे तर भविष्यातील जर्मन राष्ट्र राज्याचे स्वरुप सर्वश्रेष्ठ मानले. राज्याच्या विकासासाठी जर्मन राष्ट्र राज्य बनावे अशी त्याची इच्छा होती. हेगेलने द्वदात्मक पध्दती राज्याप्रमाणेच समाजालाही लागू केली. उदा. कुटूंब या संस्थेला त्याने सामाजीक विकासाचे प्रारंभिक रुप मानले. समाजाच्या अंतर्गत निर्माण झालेल्या इतर सर्व संस्थांना तो प्रतिवाद मानतो व समाजविकासाचे

सर्वोच्च रुप म्हणजे राज्यसंस्था होय असे तो म्हणतो. हेगेलच्या मते, निरंकुशवाद हा वाद आहे तर लोकशाही हा प्रतिवाद आहे व त्यांच्या समन्वयातून घटनात्मक राजतंत्र निर्माण झाले आहे.

**आक्षेप -**

मॅक्जगव्हर्न - या लेखकाने हेगेलच्या द्वदांत्मक सिध्दांतातील काही दोष दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्यामते

१) वाद-प्रतिवाद-संवाद यांचा एक दुसऱ्याशी संबंध कसा दाखवायचा कारण ते एकमेकांपासून भिन्न ओळखता येत नाहीत.

२) धर्म, इतिहास, कायदा आणि तत्वज्ञान यावर द्वंदात्मक प्रक्रियेबरोबरच वातावरणाचाही परिणाम होत असतो. याकडे हेगेलने पूर्णपणे दुर्लक्ष केले.

३) नैसर्गिक व सामाजीक शास्त्रांना द्वंदात्मक पध्दती लागू करित असतांना अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण होतात. कारण त्यात अनेक प्रश्न गुंतागुंतीचे असतात. या तीन अडचणींमुळे हेगेलची द्वंदात्मक पध्दती व्यवहारात फारशी उपयोगी पडेल असे म्हणता येणार नाही. सबाईन या लेखकाने यासंबंधी असे म्हटले आहे की, "द्वदात्मक पध्दती ऐतिहासिक घटना आणि नैतिक निर्णय यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केल्यास अनेक गोष्टी स्पष्ट होण्याऐवजी नविन समस्या निर्माण होतील."

सिध्दांत या दृष्टीकोनातून हेगेलचा द्वंदवाद योग्य जरी वाटत असला तरी प्रत्यक्षात तो अंमलात आणणे कठीण आहे.

**हेगेलचे राज्यासंबंधीचे विचार**

हेगेल हा जर्मन विचारवंत होता. त्याने राजकिय विचार मांडत असतांना एक ध्येय आपल्या डोळ्यासमोर ठेवले होते व ते ध्येय म्हणजे उदात्त, भव्यदिव्य अशा जर्मन राज्याची निर्मिती करणे, कारण त्याच्यावेळी जर्मन राज्य हे विभक्त होते. जर्मनीचे अनेक तुकडे पडलेले होते. या सर्व तुकड्यांना एकत्र करुन बलशाली असे जर्मन राष्ट्र उभे करण्याचा त्याचा हेतू होता. आणि त्याने त्या दृष्टीकोनातूनच आपले सर्व राजकीय तत्वज्ञान मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्यामते राज्याची उत्पत्ती म्हणजे विवेकाचा परिणाम होय. जगातील

सर्व वस्तू म्हणजे आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करित असलेली आत्माची अनेक रुपे होत. या वस्तू अभौतिक जगातून वनस्पती व जीवप्राणी यांच्या जगात प्रगती करित असतात. जोपर्यंत आत्मा मानवी जीवनाच्या अपूर्ण चेतनेच्या स्थितीमध्ये राहतो तोपर्यंत ही प्रगती सतत चालू राहते. मानवी जीवन म्हणजे आत्म्याच्या शारिरीक तसेच पाशवी व्यक्तीची परमसिमा आहे. बाह्य जगातील अनेक विकासाच्या स्थरातून जावून आत्मा सामाजिक आणि नैतिक संस्थामध्ये प्रगट होतो या संस्थेत कुटुंब हे सर्वप्रथम असते. कुटुंबाचा आधार पारस्पारिक प्रेम आहे. दुसऱ्याच्या सुखासाठी आत्माहुती देण्याची भावना त्यात असते. हेगेल या कुटुंबाला वाद मानतो. समाज म्हणजे कुटुंबाचा प्रतिवाद आहे. कारण कुटुंबात प्रेम, सहकार्य आणि त्याग असतो तर समाजात स्पर्धा आणि संघर्ष असतो. समाजात प्रत्येक व्यक्ती आपला स्वार्थ पाहते. त्यामुळे त्यातून संघर्ष निर्माण होतो. समाजातील या संघर्षात व्यक्तिला स्वतःवरच अवलंबून रहावे लागते आणि त्यातूनच त्याची प्रगती होते.

व्यक्ति व्यक्तिमध्ये चालणाऱ्या या अमर्यादित संघर्षात व्यक्तिच्या विकासाला अडथळा निर्माण होतो. विकासाचा मार्ग रोखणाऱ्या या परिस्थितीला बदलण्याच्या दृष्टीने मनुष्य विचार करु लागतो आणि त्यातूनच राज्याची निर्मिती होते याचा अर्थ कुटुंब व समाज यांच्या समन्वयात राज्याची निर्मिती आलेली आहे. त्यामुळे राज्यामध्ये कुटुंब आणि समाज यांचे गुण असतात.

राज्य आणि व्यक्ती यांच्या हितामध्ये विरोध नाही. त्यामुळे हेगेल राज्याला "सर्वोच्च जीव" (Super Organism) मानतो. राज्य ही संस्था व्यक्तिवर लादलेली नसून व्यक्तिच्याच विवेक शक्तीचा तो परिणाम आहे. राज्य म्हणजे पृथ्वीवरील परमेश्वर आहे. राज्य कुटुंबाच्या आणि समाजाच्या रक्षणासाठी आणि विकासासाठी अनिवार्य अशी संस्था आहे. राज्य स्वातंत्र्याचे प्रतिक आहे. मनुष्याच्या विवेकशिलतेचे मुर्तरुप म्हणजे राज्य. हेगेलचे राज्यासंबंधीचे विचार मांडत असतांना स्टॉक हा लेखक असे म्हणतो की, राज्य म्हणजे व्यक्तिच्या परिपूर्ण ज्ञानाचे साकार रुप होय. राज्य म्हणजे व्यक्तिवर लादली जाणारी किंवा व्यक्तिचे व्यक्तित्व नष्ट करणारी बाह्यशक्ती नव्हे तर याउलट राज्य स्वतःच एक व्यक्ति आहे. नागरिकांचे व्यक्तिगत स्वातंत्र्य राज्य

संस्थेमध्ये सुरक्षित राहते. व्यक्तिचे हित राज्यसंस्थेमध्ये साध्य होवू शकते. व्यक्तिचा विकास राज्यातच शक्य आहे आणि व्यक्तिच्या विकासाची अभिव्यक्ती राज्यसंस्थेद्वारे होवू शकते. राज्य साध्य आहे कारण राज्याचे स्वरुप नित्य, शाश्वत आणि शुध्द असते.

राज्यासाठी व्यक्ति आहे, व्यक्तिकरीता राज्य नव्हे कारण राज्याचे हित आपोआपच साध्य होते. राज्यसंस्था ही परिपूर्ण संस्था असल्याकारणाने तिच्याबद्दल व्यक्तिला कोणताही अधिकार असू शकत नाही. राज्याच्या आज्ञांचे पालन करण्यामध्येच व्यक्तिचे हित सामावलेले आहे. क्रांतीचा अधिकार नागरिकांना असूच शकत नाही. नागरिकांनी राज्याला कोणत्याही प्रकारे विरोध करु नये कारण राज्याद्वारेच व्यक्ति आपल्या आत्म्याचे पूर्णत्व करु शकते. राज्यामध्ये व्यक्ति जितकी विलीन होईल तितकी ती अधिक स्वतंत्र होईल.

राज्य ही संस्था चिरंतन असल्याने या संस्थेचा अनुभव आणि शहाणपण व्यक्तिच्या अनुभव आणि शहाणपणापेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे. त्यामुळे व्यक्तिने अशा या राज्यसंस्थेच्या आदेशांचे पालन करणेच हितावह ठरेल. राज्याच्या इच्छा देखील व्यक्तिच्या इच्छेपेक्षा जास्त आहे. व्यक्तिला चांगल्या स्वातंत्र्याचा उपभोग घ्यावयाचा असेल तर त्याने राज्यसंस्थाशी एकनिष्ठ राहणे आवश्यक आहे.  हेगेल म्हणतो, व्यक्तिचे हक्क राज्याने निर्माण केलेले आहेत.

राज्यसंस्था व्यक्तिचे हक्क निर्माण करित असल्यामुळे राज्याला विरोध करण्याचा व्यक्तिला कोणत्याही स्थितीत हक्क असू शकत नाही. राज्यसंस्था ही केवळ सर्वश्रेष्ठ संस्था नाही तर तो सर्वोच्च असा नैतिक समुदाय आहे. त्यामुळे हेगेल त्या संस्थेला व्यक्तिपेक्षा महत्वपूर्ण मानतो. नैतिकतेचे संरक्षण नैतिकतेची सर्वोच्च स्वरुपात अभिव्यक्ती राज्याद्वारेच होऊ शकते. राज्य स्वत:च एक नैतिक संस्था असल्याकारणाने त्या संस्थेवर राज्याचे किंवा कायद्याचे बंधन असूच शकत नाही. ॲरिस्टॉटल प्रमाणे हेगेलने देखील व्यक्तिचा अध्यात्मिक आणि भौतिक विकास राज्यातच शक्य आहे असे सांगितले. राज्य ही सर्वोच्च संस्था असल्याकारणाने व्यक्तिचे सर्वोच्च कर्तव्य म्हणजे राज्याचा घटक बनते.  राज्य हे साधन नाही साध्य आहे.  तर व्यक्ती ते साध्य साधण्यासाठीच असलेले साधन आहे. प्रतिबंधापासून मुक्त आणि स्वतंत्र

अशी संस्था म्हणजे राज्य. हेगेलने राज्याची व्याख्या करतांना असे म्हटले आहे की, "राज्य अध्यात्मिक आणि भौतिक अशा दोन्ही जगाचा केंद्रबिंदू आहे." याचा अर्थ राज्याद्वारा व्यक्ती आपला भौतिक आणि अभौतिक असे दोनही उद्देश प्राप्त करते.

हेगेलच्या मते "राज्यसंस्था ही सामाजिक नैतिकतेचे मुर्त रुप आहे." मानवाचा विकास राज्यसंस्थेतच शक्य असल्याने मानवाने राज्याच्या आज्ञांचे पालन करणे आवश्यक आहे. मनुष्याने राज्याला कधीच विरोध करु नये. व्यक्ती आणि राज्यसंस्था यांच्या परस्पर संबंधाबाबत हेगेलने जे विचार मांडलेत ते विचार जोड (Joad) या लेखकाने पुढील शब्दात व्यक्त केले आहेत.

१) राज्य कधीच अप्रातिनिधीक स्वरुपात काम करीत नाही. उदा. एखाद्या व्यक्तिला पोलीस अटक करत असतील आणि न्यायाधीश त्या व्यक्तिला शिक्षा करीत असेल तर त्याचे कारण हेच की, त्या व्यक्तिची वास्तविक इच्छा तिला शिक्षा मिळावी अशीच असते.

२) मनुष्य समाजाव्यतिरीक्त एकटा राहू शकत नाही.

मनुष्य एकटा कधीच असू शकत नाही. व्यक्ती ही एकटीच एक घटक नाही. तर ज्या समाजात ती राहते त्या समाजाचे ती व्यक्ति अविभाज्य आणि अभिन्न अंग आहे. राज्यामध्ये नागरिकांची सामाजीक नैतिकता एकवटलेली आहे म्हणजेच राज्य नैतिकतेच्या वर आहे याचे कारण मनुष्याच्या वास्तविक ईच्छांचा तो परिणाम आहे.

**हेगेलच्या राज्यासंबंधी विचारावरील आक्षेप -**

हेगेलने राज्यासंबंधी जे विचार मांडले त्यावर अनेक आक्षेप घेण्यात आले.

१) हेगेलने व्यक्तिवर राज्याचे नियंत्रण लादून व्यक्तिला राज्याच्या परिपूर्ण अधिन केलेले आहे.

२) हेगेलने द्वंदात्मक पध्दतीचा वापर करुन राज्याची निरंकुशता समर्थनिय ठरविली आहे.

३) हेगेलने सर्वाधिकारी राज्याची निर्मिती करुन राज्याची निरंकुशता समर्थनिय ठरविली आहे.

४) हेगेलने शक्ती आणि नैतिकता यांना अभिन्न बनवले आहे.

५) प्रो. मॅक्सगव्हर्न यांच्या मते, "प्राचीन विचारवंत या गोष्टीवर भर देत होते की, राज्य स्वतःच साध्य नसून साध्य प्राप्तीचे ते एक साधन आहे." त्याच्या मते, जनतेचे कल्याण हे साध्य आहे व जनतेच्या कल्याणासाठी वापरण्यात येणारे ते साधन आहे. परंतू याउलट हेगेलने राज्य हे एक स्वतःच साध्य असून व्यक्ती त्या साध्य प्राप्तीसाठी केवळ साधन आहे.

**युध्द आणि आंतरराष्ट्रवाद यासंबंधी हेगेलचे विचार -**

हेगेल राष्ट्र-राज्याला मानव संघटनेचे सर्वोच्च रुप मानतो. राष्ट्रराज्याच्यावर कोणतीच विश्वव्यापी संघटना तो मान्य करित नाही. संघर्ष किंवा युध्द राष्ट्र राज्याचे तो आवश्यक तत्व मानतो. आपल्या अस्तित्वासाठी आणि रक्षणासाठी राज्याला युध्द करणे भाग पडते. स्वतःच्या राज्याचा विस्तार करणे हे प्रत्येक राज्याचे कर्तव्य आहे. हेगेलच्या मते, "सदैव शांतीच्या स्थितीने उन्नती होत नाही. तसेच विश्वबंधुत्वाच्या भावनेला तो एक कोरी भावना मानतो." त्याच्या मते जगाच्या इतिहासात युध्दाला महत्वपूर्ण स्थान आहे, हेगेलच्या मते युध्दाचे परिणाम चांगले होतात, कारण युध्दाचे स्वार्थ, अहंकार नष्ट होतो. मानव जातीला अधःपतनापासून तो वाचवितो त्यात चैतन्य निर्माण करतो. शांततेमुळे भ्रष्टाचार माजतो असे हेगेल म्हणतो. युध्द हे एक गुणसंपन्न कार्य आहे. युध्द ही एक अशी संस्था आहे की, जी मानवी नैतिकतेचे संरक्षण करते. वियजी राष्ट्र ईश्वराचे कृपापात्र म्हणून सिध्द होते. युध्द राज्याच्या शक्तीचे द्योतक आहे. हेगेलच्या मते, "युध्द राज्याचे नैतिक कार्य आहे. मानवाच्या विश्वप्रेमाची भावना म्हणजे एक निर्जीव आविष्कार आहे. शांतता भ्रष्टाचाराचा प्रसार करते. सफल युध्दाने राज्यामध्ये आंतरिक शांती निर्माण होते."

हेगेल अतिराष्ट्रवादी होता. त्यामुळे तो आंतरराष्ट्रीय कायद्याला महत्व देत नाही. आंतरराष्ट्रीय कायदा म्हणजे एक परंपरा आहे. कोणतेही प्रभुत्व संपन्न राष्ट्र आपल्या इच्छेप्रमाणे त्याचा स्विकार किंवा अस्विकार करु शकते. दुसऱ्या राज्याबरोबर नितीपूर्ण पूर्ण व्यवहार करण्याची चिंता राज्याने करु नये. नैतिकतेच्या नावावर आंतरराष्ट्रीय क्षेत्रात राज्यावर कोणतेच बंधन लादता येत नाही. कोणत्याही अन्य शक्तीचा राज्यावर अधिकार राहत नाही.

पारस्पारिक संबंधासाठी राज्य पूर्ण स्वतंत्र आहे. युध्द ही परमेश्वराची इच्छा आहे.

**युध्द आणि आंतरराष्ट्रीय वादासंबंधीचे परिक्षण -** हेगेल युध्दाचा समर्थक आहे. युध्दामुळे अनेक फायदे होतात असे हेगेल म्हणतो. पण प्रत्यक्षात पहिल्या व दुसऱ्या महायुध्दाने जगाचे अपिरिमित नुकसान झाले आहे. म्हणजेच हेगेलचे युध्दाविषयीचे विचार प्रत्यक्षात खरे ठरत नाहीत. तसेच अण्वस्त्रांच्या या युगात आंतरराष्ट्रीय कायदा धाब्यावर बसविणे म्हणजे सर्वनाश ओढवून घेणे आहे. आज सहअस्तित्व किंवा सहविनाश यापैकी कोणताही एक पर्याय स्विकारावा लागतो. हेगेलचे युध्द आणि आंतरराष्ट्रीय कायद्यासंबंधीचे विचार स्विकारणे म्हणजे अशांती सर्वनाशाला आमंत्रण देणेच आहे.

जोडच्या मते, "हेगेलचा राज्य सिध्दांत सैध्दांतीकदृष्ट्या चुकीचा आहे. तसेच वास्तवतेपासून दूर आहे." परराष्ट्र नितीच्या अनैतिक कार्याला त्यामुळे मान्यता मिळते. म्हणून हेगेलचा युध्द किंवा आंतरराष्ट्रीय कायद्यासंबंधीचा सिध्दांत म्हणजे सर्वनाशाकडे घेवून जाणारा मार्ग आहे.

***

### प्रकरण ८

# जॉन स्टुअर्ट मिल (John Stuart Mill)

### (इ.स. १८०६ ते १८७३)

**जीवन परिचय -**

व्यक्तीवाद व विचारस्वातंत्र्याचा विचार जेव्हा केव्हा होईल तेव्हा एक नाव प्रामुख्याने घेतले जाते ते म्हणजे जे.एस. मिल याचे. मिल म्हणजे व्यक्तीस्वातंत्र्य विचार असे समीकरण जवळपास तयार झालेले आहे. उपयुक्ततावादातील उणिवा दूर करुन त्याला व्यापक सामाजिक अधिष्ठान प्राप्त करुन देण्याचे काम बेंथमचा अनुयायी पण स्वतंत्र विचारवंत जॉन स्टुअर्ट मिल याने केले. व्यक्तीस्वातंत्र्य आणि समाजहित यात सुसंवादित्व कसे निर्माण करता येईल याचा त्याने विचार केला असून त्यासाठी राजकीय व आर्थिक संघटनांत बदल करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. राजकीय व्यवहारात उदारता, सत्पवृत्ती आणि सहिष्णुता याची आवश्यकताही मिलच्या विचारात व्यक्त झालेली आहे. जॉन स्टुअर्ट मिलचा जन्म २० मे १८०६ रोजी लंडन येथे झाला. ग्लॅडस्टन यांनी त्याचे वर्णन "The Saint of Rationalism" बुध्दीप्रामाण्यवादाचा संत असे केले आहे. वडीलांच्या मार्गदर्शनाखाली शिकणाऱ्या जॉनने वयाच्या तिसऱ्या वर्षी ग्रीक भाषेचे अध्ययन सुरु केले. आठव्या वर्षी लॅटीन भाषेची परीक्षा उत्तीर्ण केली आणि वयाच्या बाराव्या वर्षी राजकीय अर्थशास्त्र, तर्कशास्त्र आणि अध्यात्मशास्त्र या विषयांच्या अभ्यासास प्रारंभ केला. इ.स. १८२३ मध्ये वयाच्या सतराव्या वर्षी लंडनच्या इंडिया हाऊसच्या ऑफिसमध्ये कनिष्ठ लिपीक पदावर रुजू झाला. तत्कालीन थॉमस लव्ह पीकॉक जे एक कवी आणि कादंबरीकार होते. त्यांनी जॉनला एक सांगोपांग विवेचन करणारा युवक म्हणून त्याची प्रशंसा केली. कारण तेव्हापावेतो त्याने ग्रीक, इंग्लिश, लॅटीन आणि फ्रेंच भाषांमधील भरपूर वाचन केले होते आणि तो तर्कशास्त्री, अध्यात्मशास्त्री, राजकीय व सामाजिक सुधारक म्हणून प्रसिध्द झाला होता. इ.स. १८६५ मध्ये जॉन स्टुअर्ट मिल ब्रिटीश पार्लमेंटमध्ये निवडून आला. स्त्रीयांना मतदानाचा अधिकार,

अल्पसंख्याकांना प्रतिनधीत्व, सुधारणा बिल, राष्ट्रीय कर्जात घट इत्यादी सुधारणांना त्याने पाठींबा दिला. प्रत्येक प्रश्नावर तो आपल्या सद्सद्विवेक बुध्दीला स्मरुन वागला. मात्र इ.स. १८६८ च्या निवडणुकीत तो पराभुत झाला. सेंट अॅड्रयुजन विद्यापीठाचा रेक्टर म्हणूनही त्याने काही काळ काम केले. ८ मे १८७३ रोजी एव्हिनन येथे वयाच्या ६७ व्या वर्षी क्षयरोगाने त्याचा मृत्यु झाला.

**जॉन स्टुअर्ट मिलचे प्रातिनिधिक लोकशाही संबंधी विचार -**

जॉन स्टुअर्ट मिल हा व्यक्तिस्वातंत्र्याचा खरा पुरस्कर्ता होता. व्यक्तिस्वातंत्र्याला लोकशाहीमध्ये महत्व असते आणि म्हणूनच मिलने लोकशाही शासन हे उत्तम प्रकारचे शासन आहे असे मानले. अर्थात लोकशाहीतील धोक्यांची त्याला कल्पना होती आणि म्हणूनच लोकशाहीला उत्तम शासन पध्दती बनविण्याच्या दृष्टीने त्याने काही गोष्टी सांगितल्या आहेत-

१) प्रमाणशिर प्रतिनिधीत्वाची पध्दत
२) सुशिक्षित आणि बुध्दीमान मतदार
३) स्त्री-पुरुष यांना समान अधिकार
४) संसदेच्या म्हणजेच कायदे मंडळाच्या सभासदांना मानधन किंवा पगार नसावा.
५) गुप्त मतदान पध्दतीला विरोध
६) चांगल्या व्यक्तिंना अधिक मतांचा अधिकार
७) कनिष्ठ सभागृहाचे म्हणजे विधीगृह म्हणूनच कार्य करावे.
८) प्रशासकिय कार्यात हस्तक्षेप करु नये.
९) तत्वज्ञ समितीची स्थापना

वरील गोष्टींच्या आधारावर मीलने आपली प्रातिनिधीक लोकशाहीची (थॉमस हेअर) कल्पना प्रतिपादन केली आहे. मिलच्या काळात पार्लमेंटचे महत्व सारखे वाढत होते. जनजागृती आणि सत्ता स्पर्धा यामुळे इंग्लंडमध्ये प्रभावी राजकिय पक्ष निर्माण झाले होते. परंतू त्याचबरोबर लोकशाही शासन प्रणालीमध्ये काही दोष निर्माण झाले होते. तसेच त्या शासनात काही उणीवाही होत्या. मिलने या उणिवांचा आणि दोषांचा प्रामुख्याने विचार केला आहे. मिलच्या मते लोकशाही केवळ योग्य आणि सुशिक्षित व्यक्तिंकरताच योग्य अशी शासनप्रणाली आहे. जेथे जनता अशिक्षित असेल तेथे लोकशाही शासन

योग्य यशस्वी ठरु शकत नाही. शासन कोणत्याही प्रकारचे असो त्या शासनाचा उद्देश समाजातील लोकांच्या बौध्दिक विकासाकरिता प्रयत्न करणे हा असतो. शासनाने जनतेच्या गुणांना आणि बुध्दीला प्राधान्य द्यावे की, ज्यामुळे जनता आपला जास्तीत जास्त विकास साध्य करु शकेल. मिलच्या मते "ज्या राज्यामध्ये सर्वोच्च सार्वभौम सत्ता संपूर्ण समाजात केंद्रीत झालेली असते ते शासन सर्वोत्कृष्ट शासन होय." प्रत्येक नागरिकाला शासनाच्या कार्यामध्ये प्रत्यक्षरित्या सहभाग घेता आला पाहिजे परंतु आधुनिक काळात अशा प्रकारचे शासन अशक्य आहे. प्राचीन ग्रीक राज्यातील नगर राज्ये पध्दतीमध्ये जनता प्रत्यक्षपणे शासनाच्या कार्यामध्ये भाग घेत होती. परंतू त्या नगर राज्याच्या तुलनेने आजची राज्ये, भूप्रदेश आणि लोकसंख्येच्या बाबतीत फार मोठी आहेत. त्यामुळे आधुनिक राज्यामध्ये प्रत्यक्ष लोकशाही असंभव आहे. त्या प्रत्यक्ष लोकशाहीची जागा अप्रत्यक्ष प्रातिनिधीक लोकशाहीने घेतली आहे. परंतू मीलच्या काळात प्रातिनिधीक लोकशाहीमध्ये काळाच्या ओघात अनेक दोष निर्माण झाले होते. हे दोष दूर करण्यासारखे आहेत असे मिलला वाटते. आणि म्हणूनच त्याने आपल्या 'Representive Government' या आपल्या ग्रंथात ब्रिटनमधील प्रातिनिधीक लोकशाहीतील दोषांवर प्रखर टिका केली आहे व त्यातील दोष दूर करण्यासाठी काही उपायही सुचविले आहेत.

प्रातिनिधीक लोकशाही संबंधी मिल दोन धोक्यांकडे लक्ष केंद्रीत करतो १) अशिक्षित जनता, २) संख्येला महत्व

मिलच्या मते, जर लोकशाहीला सर्वात मोठा धोका असेल तर तो अशिक्षित आणि मुर्ख व्यक्तिंपासून ज्या राज्यामध्ये जनता अशिक्षित आहे तेथे लोकशाही कधिच यशस्वी होवू शकत नाही. लोकशाही यशस्वी करावयाची असेल तर जनता सुशिक्षित, बुध्दीमान आणि राजकियदृष्ट्या जागृत असली पाहिजे. केवळ सज्ञान किंवा वयाने मोठी अशा कोणत्याही व्यक्ति मतदानाला योग्य ठरत नाहीत. किंवा तिला जीवीतासंबंधी प्राथमिक स्वरुपाचे ज्ञान नाही अशा व्यक्तिला मतदानाचा अधिकार देणे अयोग्य आहे.

**मीलने सुचविलेले उपाय -**

**१) मतदारांची पात्रता :**

**(अ) शिक्षण -** मिल म्हणतो मतदाराला केवळ लिहीता वाचता यावयास पाहिजे, एवढेच पुरेसे नाही तर त्याला इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र यासंबंधीचे थोडेफार ज्ञान असले पाहिजे. शिक्षणामुळे व्यक्ति सर्व गोष्टींचा सारासार विचार करु शकते. नागरिक सुशिक्षित असेल तर तो स्वार्थ, सत्ता धन इ. मोहांना बळी पडणार नाही.

**(ब) संपत्ती -** मिलच्या मते शैक्षणिक पात्रतेशिवाय व्यक्तिजवळ मतदानाचा अधिकार प्राप्त होण्यासाठी संपत्ती असल्यास ती व्यक्ती आपल्या संपत्तीच्या संरक्षणार्थ का होईना जागरुक असते. तसेच धनसंपन्न व्यक्ति ही नेहमीच धनहीन व्यक्तिपेक्षा अधिक जबाबदार पध्दतीने वागत असते. म्हणून विशिष्ट संपत्तीची अट मतदानासाठी आवश्यक आहे.

**(क) स्त्रीयांना मताधिकार -** लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी केवळ पुरुष वर्गाला मताधिकार असून चालत नाही तर मतदानाचा अधिकार आणि इतर राजकिय अधिकार पुरुषांप्रमाणे स्त्रीयांनाही दिले पाहिजे. स्त्रीयांना मतदानाचा अधिकार नाकारणे म्हणजे जवळजवळ समाजातील निम्म्या लोकसंख्येस राजकिय कार्यापासून वगळणे होय. जेथे स्त्रियांना मतदानाचा अधिकार नाही तेथे खऱ्या अर्थाने लोकशाही अस्तित्वात नाही. स्त्रियांना राजकिय पदापासून दूर ठेवणे अन्यायकारक आहे. ज्या-ज्या ठिकाणी स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने दर्जा दिला गेला त्या त्या ठिकाणी स्त्रियांनी पुरुषांप्रमाणेच कार्य करुन दाखविले. रुढी आणि परंपरा यामुळे स्त्रियांचे कार्यक्षेत्र घरांपुरते मर्यादित ठेवले गेले. याशिवाय कोणतेही तर्कशुध्द किंवा बुध्दीनिष्ठ असे कारण यामागे नाही. स्त्रीयांना केवळ मतदानाचा अधिकार असावा एवढेच मील म्हणत नाही तर स्त्रीयांना पुरुषांपेक्षा अधिक मते देण्याचा अधिकार असावा कारण शारिरीकदृष्ट्या स्त्रीया पुरुषांपेक्षा दुबळ्या असल्यामुळे तिला स्वतःच्या रक्षणासाठी कायदा आणि समाज यावर अवलंबून रहावे लागते.

**(ड) बुध्दीमान व्यक्तिंना अधिक मते देण्याचा अधिकार असावा -** लोकशाहीचा दुसरा दोष असा आहे की, या पध्दतीत प्रत्येक व्यक्ति ही इतर व्यक्तिसारखी मानली जाते. बुध्दी, योग्यता आणि शिक्षण यांना लोकशाहीत

काहीच किंमत नाही. केवळ संख्येला महत्व दिल्यामुळे बहुमताला महत्व येते. या बहुमतामुळे अल्पसंख्यांक किंवा बुध्दीवादी लोकांना काहीच किंमत राहत नाही. संपूर्ण समाजाच्या स्त्रियांच्या दृष्टीने ही गोष्ट घातक आहे असे मिल म्हणतो. वस्तूतः लोकशाहीमध्ये जनमतास सर्वात अधिक महत्व असल्यामुळे ते मत व्यक्त करणाऱ्या व्यक्ति योग्य आणि आदर्श असल्या पाहिजेत. केवळ प्रौढ मताधिकाराचे तत्व स्विकारुन लोकशाही यशस्वी होवू शकत नाही. या प्रचंड मताधिकाराबरोबर शिक्षण, योग्यता या गुणांना मतदानाचा अधिकार देतांना महत्व असले पाहिजे. जे लोक सुशिक्षित, बुध्दीमान आणि योग्यता प्राप्त आहेत अशा लोकांना एकापेखा अधिक मते देण्याचा अधिकार असावा. सुशिक्षित व्यक्तिला पाच मते देण्याचा अधिकार असावा. साधारणपणे प्रत्येक प्रौढ व्यक्तिला एकमत देण्याचा अधिकार असतो. एकापेक्षा अधिक मते देण्याचा अधिकार पध्दतीमुळे अयोग्य तत्वांना दूर ठेवता येईल आणि बुध्दीमान व्यक्तिचे मत अधिक प्रभावी ठरेल.

**२) जनप्रतिनिधीं ची योग्यता -**

ज्याप्रमाणे मतदारांसाठी जे.एस. मीलने सूचना दिल्या आहेत त्याचप्रमाणे प्रतिनिधिंच्या बाबतीत देखील त्याने विचार केला आहे. तो म्हणतो, जनतेचे प्रतिनिधी बुध्दीमान, विवेकी, सुशिक्षित, परोपकारी आणि व्यापक दृष्टीकोन असलेले असावे, कारण प्रातिनिधीक लोकशाहीमध्ये प्रतिनिधित्व जनतेच्या सामूहिक बुध्दीचे प्रतिक असतात. जो जनतेला मार्गदर्शन करु शकतो अशा व्यक्तिलाच जनतेने प्रतिनिधी म्हणून निवडावे. खऱ्या अर्थाने प्रतिनिधी हा जनतेसाठी कार्य करणारा असावा. त्यासाठी राजकिय पक्षाच्या हुकूमशाहीपासून तो प्रतिनिधी मुक्त असावा. कारण निवडणूक म्हटली की, प्रचारावर भरपूर पैसा खर्च करावा लागतो. राज्याने जर हा पैसा खर्च केला नाही तर तो प्रतिनिधी भांडवलदारांची मदत घेईल व निवडून आल्यावर भांडवलदारांच्या हितसंबंधांचे रक्षण करिल. परिणामतः लोकशाहीचे भांडवलशाहीत रुपांतर होईल.

**३) प्रतिनिधीत्वाची पध्दत -**

मीलने प्रातिनिधीक लोकशाहीचा विचार करित असतांना केवळ मतदारांच्या योग्यतेचा किंवा प्रतिनिधीच्या योग्यतेचा विचार केला नाही तर

प्रतिनिधीत्वाच्या पध्दतीत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीनेही विचार केला आहे. प्रतिनिधित्वाच्या पध्दतीत बदल केल्याशिवाय लोकशाही खऱ्या अर्थाने लोकाभिमुख होणार नाही असे त्याचे स्पष्ट मत होते. आधुनिक लोकशाहीमध्ये बहुमतला महत्व असते. परंतु बहुमतात असलेले सरकार अल्पमतांकडे दुर्लक्ष करते. त्यामुळे लोकशाही शासन अपूर्ण वाटते. लोकशाहीत निर्माण होणारी काही लोकांची हुकूमशाही ही एकतंत्रत्मक निरंकुशतेपेक्षा अधिक धोकेदायक असते. हा धोका टाळायचा असेल तर प्रतिनिधित्वाच्या पध्दतीमध्ये बदल होणे आवश्यक आहे. हे अल्पमतामध्ये असतात त्यांना देखील कायदेमंडळात प्रतिनिधत्व मिळाले पाहिजे. असे न झाल्यास ते शासन पूर्ण लोकशाहीवादी आहे असे म्हणता येणार नाही. मील म्हणतो, "अल्पसंख्यांकाना योग्य प्रतिनिधीत्व कायदेमंडळात द्यावयाचे असेल तर प्रमाणशिर प्रतिनिधीत्व मतदान पध्दतीचा स्विकार करावा." मीलने विविध हितसंबंधीयांना प्रतिनिधीत्व देण्याच्या दृष्टीने देखील या पध्दतीचा पुरस्कार केला आहे. प्रमाण प्रतिनिधीत्वाची पध्दत ही सर्वप्रथम थॉमस हेअर या विचारवंताने मांडली. म्हणूनच या पध्दतीला "हेअर" पध्दत देखील म्हणतात. मीलच्या मते प्रत्यक्षात संसदेतील सत्तारुढ पक्षाचे सदस्य त्या पक्षाला प्राप्त झालेल्या एकूण मतांच्या तुलनेने जास्त असतात. तर याउलट इतर पक्षाच्या सदस्यांची संख्या यांनी प्राप्त केलेल्या मतापेक्षा कमी असते. हा दोष दूर करण्यासाठी प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या पध्दतीचा स्विकार केला पाहिजे असे मत मीलने मांडले आहे.

**४) गुप्तमतदानाला विरोध -**

जॉन स्टुअर्ट मीलने गुप्त मतदानाला विरोध केला. मतदानाचा अधिकार हे प्रत्येक व्यक्तिचे नैतिक उत्तरदायित्व असल्यामुळे मतदानाचा अधिकार मतदानाच्या बाबतीत गुप्तता असणे आवश्यक आहे असे मील समजत असे. मतदानाचा अधिकार हे प्रत्येक व्यक्तिचे पवित्र कर्तव्य आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तिने बुध्दीनुसार ते कर्तव्य पार पाडले पाहिजे. मील म्हणतो "गुप्तपणे जे कार्य केले जाते ते अनुचित असते म्हणून मतदान उघडपणे केले पाहिजे, तरच त्या अधिकाराची पवित्रता कायम राहू शकते."

### ५) द्विगृही कायदेमंडळ -

मतदान पध्दती, प्रतिनिधी इ. बाबतीत सुधारणा सुचविल्यानंतर संसदेच्या रचनेकडे मीलने लक्ष वळविले. मीलच्या मते, संसद सार्वभौम असल्यामुळे संसदेने विधेयकानुसार सत्तेचा वापर करावयास हवा. कायदेमंडळामध्ये दोन सभागृह असली पाहिजेत. एकच सभागृह असेल तर बेजबाबदार कार्य करु शकते. "एका सभागृहाच्या हुकूमशाहीला आळा घालण्यासाठी संसदेची रचना द्विगृही असणे आवश्यक आहे" असे मिल म्हणतो. त्याचप्रमाणे द्वितीय सभागृहाच्या अस्तित्वामुळे कार्य विभाजन होवून कनिष्ठ सभागृह अधिक कार्यक्षमतेने आणि तत्परतेने काम करु शकते.

### ६) संसदेचे कार्य -

मीलने प्रातिनिधीक लोकशाहीचा विचार करित असतांना संसदेच्या कार्याचाही विचार केला आहे. मील म्हणतो, "लोकशाही शासनामध्ये सार्वभौम सत्ता ही मतदारांनी निवडलेल्या प्रतिनिधी सभेमध्ये म्हणजे संसदेमध्ये वास्तव्य करते." संसदेचे कार्य मुख्यतः कायद्याची निर्मिती करणे हे आहे. परंतु लोकशाहीतील मुख्य दोष असा की, लोकप्रतिनिधींनाच कायद्याचे ज्ञान नसते.

### प्रातिनिधीक लोकशाहीवरील आक्षेप -

मीलची प्रातिनिधीक लोकशाहीची कल्पना तांत्रीकदृष्ट्या पटणारी असली तरी त्याच्या विचारांवर अनेक आक्षेप घेण्यात आले आहेत. त्यातील प्रमुख आक्षेप पुढीलप्रमाणे-

१) जे.एस. मीलने मतदारांसाठी जी योग्यता सांगितली आहे त्या योग्यतेचा विचार केला तर बहुसंख्य व्यक्ति मतदानाच्या अधिकारापासून वंचीत राहतील कारण बहुसंख्य लोकांना इतिहास, भूगोल तसेच राज्यशास्त्र इ. विषयांचे ज्ञान नसते. समाजातील बहुसंख्य लोक मीलने सांगितलेली योग्यता प्राप्त करणारे नसतील तर त्या सर्वांना निवडणूकीमध्ये सहभागी होता येणार नाही. परिणामतः लोकशाही शासनाची खऱ्या अर्थाने प्रस्थापना होवु शकत नाही. उलट अल्पसंख्यांक अशा विद्वान लोकांची महाजनशाही प्रस्तापित होण्याचा धोका निर्माण होतो.

२) मीलने शिक्षणावर अवास्तव भर दिलेला आहे व अनुभवाकडे दुर्लक्ष केलेले आहे. वस्तूतः हा कोणताही निर्णय घेतांना केवळ शिक्षण उपयुक्त

ठरु शकत नाही तर शिक्षणापेक्षाही अनुभवाला जास्त महत्व असते. राजकारणासाठी शिक्षणापेक्षाही राजकिय ज्ञानाची आणि राजकिय अनुभवांची आवश्यकता असते.

३) अल्पसंख्यांकांना प्रतिनिधत्व देण्यासाठी मीलने प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाची पध्दत सुचविली आहे व प्रमाणशिर प्रतिनिधीत्वासाठी क्रमदेय मतदान पध्दतीचा पुरस्कार केला आहे. अल्पसंख्यांकांना उचीत प्रतिनिधीत्व देण्याच्या दृष्टीकोनातून क्रमदेय मतदान पध्दती चांगली असली तरी ती पध्दत अत्यंत किचकट आणि गुंतागुंतीची आहे. या पध्दतीचा वापर म्हणूनच सार्वत्रीक निवडणूकांसाठी कुठेही केला जात नाही. उदा. भारतामध्ये लोकसभेच्या आणि विधानसभेच्या निवडणूका सामान्य पध्दतीने होतात. कारण सामान्य पध्दत सर्वसामान्य लोकांना सहज समजू शकते. विधान परिषद आणि राज्यसभा यासाठी मात्र घटनाकारांनी क्रमदेय पध्दतीचा पुरस्कार केला आहे. पण असे आढळून आले आहे की, पदवी प्राप्त झालेले लोक देखील क्रमदेय पध्दतीचा योग्य प्रकारे वापर करु शकत नाहीत. मतदानात त्यांच्या हातून चुका होतात. त्यामुळे सर्वसामान्य मनुष्याला समजु शकेल अशीच मतदान पध्दती उपयुक्त ठरते व क्रमदेय मतदान पध्दती उपयुक्त ठरु शकत नाही.

४) प्रत्येक सुशिक्षित व्यक्तिला एकापेक्षा अधिक मते देता यावीत असे मील सुचवितो. परंतू प्रत्यक्षामध्ये अशी ठरविणे कठीण आहे. त्यामुळे मतमोजणी आणि निवडणूक पध्दती अधिक कठीण, क्लिष्ट, गुंतागुंतीची होईल तसेच हि गोष्ट लोकशाही पध्दतीच्या विरुध्द राहिल.

५) मीलने गुप्त मतदानाला विरोध केला आहे. उघड मतदान पध्दती ही आदर्श मतदान पध्दती असू शकेल. पण वास्तविकतेमध्ये व्यक्ति उघड-उघड एकाला विरोध आणि दुसऱ्याला मत देवू शकत नाही. त्यामुळे समाजामध्ये व्यक्तिव्यक्तिंमध्ये सतत संघर्ष सुरु होईल. व्यक्तिने आपल्या विरुध्द मत दिले यात केवळ संशयावरुन सुध्दा सत्तारुढ पक्ष इतर व्यक्तिला त्रास देतो असे प्रत्यक्षात दिसून येते. यामुळे सर्व संघर्ष आणि वैमनस्य टाळण्यासाठी गुप्त मतदान पध्दतीच योग्य ठरेल.

६) मीलने "कायदेमंडळाच्या सभासदांना वेतन देवू नये" असे मत प्रतिपादन केले आहे. परंतू त्यांचे वेतन अव्यवहार्य आहे असे म्हणता येणार नाही. संसद सभासदांना आपले कार्य योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी वेतन देणे आवश्यक आहे. इतकेच नव्हे तर त्यांना स्वतंत्रपणे कार्य करण्यासाठी अधिक वेतन देणेही आवश्यक आहे. कायदे मंडळाच्या सभासदांना वेतन जर दिले नाही तर ते इतर व्यवसाय करतील आणि व्यवसायात गर्क झ ााल्यास संसदेच्या कार्यात फारसे लक्ष घालणार नाहीत. आजदेखील मतदानाच्या अगोदर सभासदांनी मतदानाला यावे म्हणून लोकसभेच्या अध्यक्षांना वॉर्निंग बेल वाजवावी लागते. त्यामुळे लोकशाहीच्या हिताच्या दृष्टीने संसद सभासदांना वेतन देणे आवश्यक आहे.

मीलने लोकशाही शासन पध्दतीतील दोष दाखवून ते दूर करण्यासाठी जे उपाय सुचविले आहेत त्यामुळे नविन दोष निर्माण होण्याची अधिक शक्यता आहे. मीलने दाखविलेले दोष आज जवळ-जवळ सर्वच लोकशाही राज्यात दिसून येतात. लोकशाही शासनात सुधारणा करणे आवश्यक आहे हे नाकारता येत नाही. मीलने सुचविलेले उपाय अनेकांनी आज मान्य केले आहेत. उदा. भारतामध्ये प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाची पध्दत असावी असा विचार भारतातील रिपब्लिकन पक्षाने केला आहे. जनसंघ आणि स्वतंत्र पक्ष या पक्षांनी देखील या पध्दतीचा पुरस्कार केला होता. शिक्षणाशिवाय प्रौढ मताधिकाराला अर्थ नाही. हे आजदेखील मान्य केले जाते. थोडक्यात मीलच्या प्रातिनिधीक लोकशाही पध्दतीमध्ये सुधारणा घडवून आणावी असे त्याला मनापासून वाटत होते व त्याने यादृष्टीने उपाय सुचविले आहेत हे अमान्य करुन चालणार नाही.

**मीलने प्रतिपादन केलेल्या उपयोगीतावादाच्या सिध्दांताचे स्वरुप :**

मीलच्या राजकिय तत्वज्ञानामध्ये त्याच्या उपयोगीतावादी सिध्दांतालाही महत्व आहे. मील हा जेरमी बे`न्थमचा शिष्य होता. त्यामुळे बेन्थमच्या उपयोगीतावादाचा त्याने सविस्तर अभ्यास केला. आपले वडील आणि बेन्थम यांच्याविषयी असलेल्या श्रध्देमुळे मील सुरुवातीपासूनच उपयोगीतावादाचे समर्थन करित असे. परंतू त्याने बेन्थमच्या उपयोगीतावादामध्ये काही बदल घडवून आणलेत. वर्ल्डवॉर्थ, कॉन्ट, कॉलरिज

या विचारवंतांच्या विचारांचा जे. एस. मीलवर प्रभाव होता. त्यामुळे उपयोगीतावादाबद्दल मीलचे विचार बेन्थमच्या विचारापेक्षा अलग होते. बेन्थमप्रमाणेच मील देखील सुख-दु:ख, उपयोगीता या गोष्टींवर विश्वास ठेवीत असे. परंतू या गोष्टीच्या विवेचनामध्ये मील अधिक स्पष्ट आणि वास्तववादी वाटतो. मीलने बेन्थमच्या उपयोगीता वादामध्ये कोणते बदल केले हे नीट समजवून घ्यावयाचे असेल तर बेन्थमचा उपयोगीतावादाचा सिध्दांत थोडक्यात समजून घेणे आवश्यक आहे.

बेन्थमच्या मते, मनुष्य निसर्गत:च सुख आणि दु:ख या दोन प्रभूत्व शक्तीच्या अधिपत्याखाली जीवन जगत असे. तो म्हणतो, मनुष्याच्या प्रत्येक कार्यामध्ये दोन शक्ती सुख आणि दु:ख कार्य करित असतात. मनुष्याने काय करावे आणि काय करु नये याचा निर्णय सुध्दा मनुष्य याच शक्तीच्या आदेशानुसार घेत असतो. प्रत्येक व्यक्ती सुखप्राप्तीसाठी धडपडत असतो. आणि जास्तीतजास्त सुख प्राप्त करण्याचा प्रयत्न करित असते. बेन्थमच्या मते, सुखदु:खामध्ये गुणात्मक फरक नसतो. तर तो केवळ मात्रात्मक फरक असतो. बेन्थमच्या मते, सुख आणि दु:ख गुणात्मकदृष्ट्या सारखे असल्यामुळे केवळ मात्रेमध्ये फरक पडु शकतो. तीव्रता, कालावधी, निश्चितता, निकटता, उत्पादकता आणि व्यापकता इ. आधारांवर सुखदु:खाचे मोजमाप करता येते आणि याच आधारावर जास्तीत जास्त लोकांचे कल्याण साध्य करण्याकडे लक्ष दिले जाते.

**जे.एस. मीलने उपयोगीतावादात घडवून आणलेला बदल -**

जे.एस. मीलने बेन्थमच्या उपयुक्ततावादामध्ये ज्या सुधारणा घडवून आणल्यात त्या पुढीलप्रमाणे-

**१) सुखात मात्रात्मक तसेच गुणात्मक फरक असतो -**

बेन्थमने उपयोगीतावादाचा सिध्दांतात केवळ मात्रात्मक सुखाचीच कल्पना केली आहे. त्याच्यामते, काव्यवाचनापासून मिळणारे सुख हे कबड्डी खेळण्यापासून मिळणाऱ्या सुखासारखेच असते. परंतू मिलला हे मत मान्य नव्हते. माया आणि गुण यांच्या सहाय्यानेच खरे सुख मिळत असते. मील म्हणतो, "सुखामध्ये उच्चप्रतीचे सुख, मध्यम प्रतीचे सुख आणि कनिष्ठ प्रतीचे सुख असा फरक आढळतो" सुसंस्कृत व्यक्तिचे सुख हे मुर्ख व्यक्तिच्या

सुखापेक्षा भिन्न असते. म्हणूनच मील असे म्हणतो की, "डुक्कर होवुन संतुष्ट वाटण्यापेक्षा मानव होवून असंतुष्ट राहणे अधिक चांगले, तसेच मुर्ख होवुन सुखी होण्यापेक्षा सॉक्रेटीस होवून असंतुष्ट राहणे अधिक चांगले."

अशा प्रकारे मीलने सुखाची गुणात्मकदृष्ट्या चर्चा करुन बेन्थमच्या विचारांना पूर्णत्व प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न केला आहे.

**२) सुखदुःखाचे मोजमाप करता येत नाही -**

बेन्थमने उपयोगीता वादाचा सिध्दांत सांगत असतांना सुख-दुःखाचे मोजमाप करता येते असे सांगितले. कारण प्रत्येक व्यक्तिच्या सुख-दुःखात मायात्मक फरक असतो. मीलने या विचारांचे खंडन केले आहे. "एखाद्या व्यक्तिला जर खूप दारु पिऊन सुख मिळत असेल तर ते योग्य होय" असे बेन्थम म्हणतो. परंतू मील मात्र अशा प्रकारच्या सुखाला निकृष्ट प्रतीचे सुख मानतो. मिलच्या मते, कोणते सुख अधिक आहे आणि किती अधिक आहे हे सांगणे कठीण आहे.

प्रत्येक व्यक्तिला मिळणारे सुख हे अलग-अलग प्रकारचे असते. तसेच सुखदुःखाची कल्पना ही व्यक्तिनिष्ठ स्वरुपाची असते. त्यामुळे ती व्यक्ति बदलते. एका व्यक्तिला ज्या गोष्टीपासून सुख मिळते, त्या गोष्टीपासून दुसऱ्याला सुख मिळेलच असे नाही. कदाचित त्या गोष्टीपासून त्याला दुःख होण्याचीही शक्यता अधिक असते.

**३) कायद्याचा आधार केवळ उपयोगीता नाही -**

बेन्थमच्या मते, राज्याचा प्रत्येक कायदा अधिकत्तम व्यक्तीने अधिकत्तम सुख प्राप्त करण्याच्या उद्देशाने निर्माण केलेला असावा. परंतू मीलच्या मते, जेव्हा मोजमापच करता येत नाही तेव्हा कायद्याचा आधार उपयोगीता असु शकत नाही. तसेच शासनामध्ये या सिध्दांताचा उपयोग करणे मुर्खपणाचे होय.

**४) सुखाची प्रत्यक्ष प्राप्ती आवश्यक नाही -**

जे.ए. मीलने असे सांगितले आहे की, सुखासाठी मनुष्य प्रयत्न करीत असतो आणि या प्रयत्नातच त्याला सुख मिळत असते. बेन्थमच्या मते प्रत्येक व्यक्ति सुखाकरिता प्रयत्न करित असते आणि सुख प्राप्त होणे आवश्यक समजते. मील म्हणतो "प्रत्येक व्यक्तीला तिच्या कार्यापासून ताबडतोब सुख

मिळाले पाहिजे असे नाही. कदाचित दुसऱ्याच्या सुखात तिचे सुख असू शकते." उदा. उदारता, परोपकारीपणा यात इतरांच्या सुखात व्यक्तिचे सुख आढळून येते. मिल म्हणतो, "प्रथम व्यक्ति स्वतःच्या हिताच्या दृष्टीने प्रयत्न करते. परंतू नंतर त्या कार्यालाच ध्येय मानते आणि त्या सुखकारी आत्मप्रवृत्तीतून सामाजिक कल्याणाची भावना उत्पन्न होते." सुख आणि दुःख या दोन गोष्टी व्यक्तिमध्ये भिन्न तर असतातच पण त्याशिवाय सुखाची कल्पना ही प्रत्यक्ष सुख प्राप्त करण्यापेक्षा जास्त महत्वाची असते. हा महत्वाचा विचार मिलने मांडला आहे. मील म्हणतो, "प्रथमतः व्यक्ति स्वतःच्या हिताच्या दृष्टीने प्रयत्न करते, परंतू नंतर त्या कार्यातच आपले ध्येय मानते. साध्य आणि साधन या संयोगामुळेच मनुष्याच्या सुखवादी आत्मप्रवृत्तीतून सामाजिकत्वाची भावना उत्पन्न होते आणि अशारितीने सार्वजनिक सुखातच व्यक्तिचे सुख सुरक्षित असते."

**५) सुखाची मान्यता आंतरिक असते -**

बेन्थमच्या मते "व्यक्ती चार कारणामुळे सुखप्राप्तीकरीता प्रयत्न करित असते." ही सर्व कारणे बाह्य स्वरुपाची आहेत व ती म्हणजे सामाजिक, राजकीय, धार्मिक, शारीरिक ही होत. सामाजिक दडपणामुळे स्वर्ग प्राप्त करण्याची कल्पना त्याला सुखी करते. तर शारिरीक दडपणामुळे मनुष्य सुख प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो असे बेन्थम म्हणतो. परंतू मीलला हा विचार मान्य नाही. मीलच्या मते, "सुखाची प्राप्ती केवळ बाह्य गोष्टींमुळे होत नसते, तर ती एक आंतरिक शक्ती आहे." मीलच्या मते, सुख सामाजीक, राजकिय, धार्मिक आणि शारिरीक या प्रकारचे तर असतेच पण त्याचबरोबर आत्मिक सुख, मानसिक सुख आणि अध्यात्मिक सुख असे सुखाचे आणखी महत्वाचे प्रकार आहेत." स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात ज्या व्यक्तिंनी हसत हसत दुःख सहन केले किंवा ज्या व्यक्ति फाशी गेल्या त्यांचे सुख हे आंतरिक स्वरुपाचे होते. उदा. सॉक्रेटीसने जे हसत-हसत विष प्राशन केले ते सुध्दा आंतरिक सुख होते. त्यामुळे "सुखाची मान्यता केवळ बाह्य नसून आंतरिक असते" असे मील म्हणतो.

**६) राज्याचा हस्तक्षेप आवश्यक असतो -**

बेन्थमच्या मते "राज्याने व्यक्तिच्या कार्यात केलेला हस्तक्षेप म्हणजे स्वातंत्र्याचा ऱ्हास होय." त्यामुळे व्यक्तिचे सुख नष्ट होते. परंतू मीलने मात्र बेन्थमचा व्यक्तिवाद मान्य करुन देखील असे स्पष्ट केले आहे की, कधीकधी व्यक्तीच्या जीवनात होणारा राज्याचा हस्तक्षेप मनुष्याला सुख प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने आवश्यक असतो.

अशाप्रकारे मीलने बेन्थमच्या उपयोगीता वादात अनेक नविन विचारांची भर घालून त्या उपयोगीतावादाला अधिक उपयुक्त बनविले. बेन्थमचा उपयोगीतावाद अपूर्ण, निरस तसेच उत्साहहीन होता. त्या उपयोगीतावादाचे स्वरुप एकांगी होते. मीलने मात्र त्या उपयोगीतावादात आवश्यक त्या सुधारणा करुन बेन्थमच्या उपयेगीतावादाला अधिक उपयोगी आणि उत्साहपूर्ण बनविले. मीलचे विचार बेन्थमच्या विचारापेक्षा जास्त संयुक्तिक आहेत. वेस्टर मॅक्सी असे म्हणतो की, "बेन्थमचा उपयोगीतावाद लंगड्या समाजात हिंसेला प्रोत्साहन देतो आणि सज्जनांमध्ये विरगतीची भावना निर्माण करतो. याउलट मीलचा उपयोगीतावाद मनुष्यामध्ये मानवतेची भावना निर्माण करतो."

***

## प्रकरण ९

# कार्ल मार्क्स (Karlmarks)

## (१८१८ ते १८८३)

**मार्क्सचा जीवन परिचय -**

कार्ल मार्क्स या विचारवंताचा जन्म १८१८ मध्ये जर्मनीत झाला. त्याचे वडील कायदेपंडित होते. त्याचे शिक्षण बॉन आणि बर्लिन विद्यापीठात झ ाले. तेथे त्याने राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र या विषयाचा अभ्यास केला. त्याच्या भडक विचारसरणीमुळे त्याला जर्मनीतून हद्दपार करण्यात आले. त्यामुळे तो पॅरिसला गेला. तेथे लुई ब्लॅक या विचारवंतांशी त्याचा परिचय झाला. जर्मन सरकारच्या विनंतीवरुन मार्क्सची फ्रान्समधुनही हकालपट्टी झाली. त्यामुळे तो इंग्लंडला गेला. रिकार्डो, अॅडमस्मिथ, विल्यम थामसन या विचारवंताचा मार्क्सवर मोठा प्रभाव निर्माण झाला. स्वप्नाळु समाजवादापेक्षा व्यावहारीक समाजवादाचा त्याने अधिक विचार केला. तसेच अत्यंत गरिबीत त्याने दिवस काढले असल्यामुळे श्रमिकांच्या आर्थिक समस्यांची त्याला पूर्ण जाणिव होती. फ्रान्स, इंग्लंडमध्ये सर्वदूर औद्योगिक क्रांती झाली होती व इंग्लंड ही जगाची बाजारपेठ बनली होती. परंतु याचवेळी उद्योगधंद्यात काम करणारे श्रमिक मात्र पिळले जात होते. म्हणून कार्लमार्क्स भांडवलशाहीतून जन्माला येणाऱ्या भडक स्वरुपाच्या क्रांतीची चित्र रेखाटत होता. तसेच इंग्लंडमध्ये त्याची एंगेल्स या विचारवंतांशी मैत्री झाली. १८४८ मध्ये मार्क्सने "कम्युनिस्ट मेनिफेस्टो" हा ग्रंथ प्रकाशित केला. त्यातून मार्क्सच्या शास्त्रीय समाजवादाचे चित्र स्पष्ट होते, व या ग्रंथामुळे मार्क्सला समाजवादी चळवळीत महत्वपूर्ण स्थान मिळाले, तो क्रांतीकारक ठरला नाही पण क्रांतीला चेतना देण्याचे काम त्याने केले. साम्यवादी विचारांद्वारे त्याने क्रांतीकारकांना बौध्दिक खाद्य पुरविले. म्हणून त्याला आधुनिक समाजवादाचा जनक म्हणतात. त्याने केवळ समाजवादी तत्वज्ञान रचले नाही तर ते कृतीत उतरविण्याचा मार्ग स्पष्ट केला. वास्तविक तो राज्यशास्त्राचा विचारवंत आहे. पण त्याने इतिहास,

समाजशास्त्र आणि अर्थशास्त्र इ. सामाजिक शास्त्रांना शास्त्र म्हणून स्थान प्राप्त करुन दिले. त्याने १८७३ मध्ये "दास कॅपिटल" नावाचा दुसरा ग्रंथ प्रकाशित केला आणि १८८३ मध्ये तो मरण पावला.

**मार्क्सची इतिहासाची भौतिक मिमांसा व परिक्षण :**

जगात इतिहास विषयक विविध दृष्टीकोन आहेत. कारण मानवी इतिहास हा एक गतिमान प्रवाह आहे. तो काही वेळेस संथपणे वाहणारा आहे, तर काही वेळेस धबधब्याप्रमाणे कोसळणारा आहे. तसेच अत्यंत प्राचीन काळात निर्माण होवून तो आधुनिक काळापर्यंत आला आहे आणि भविष्यात प्रवेश करीत आहे. मानवी इतिहासाकडे पाहण्याचा विचारवंताचा दृष्टीकोन वेगवेगळा आहे. काही विचारवंतांच्या मते इतिहास म्हणजे "घडलेल्या व घडणाऱ्या घटना होत." काही विचारवंतांच्या मते, "थोरांची चरित्रे/ पराक्रमाच्या गाथा म्हणजे इतिहास होय." काही विचारवंतांच्या मते इतिहास म्हणजे इतिहास हा युध्द आणि शांतता यांच्याशी संबंधीत सर्व प्रकारच्या घटना होय. परंतु मार्क्सचा इतिहास विषयक दृष्टीकोन अगदी निराळा आहे. त्याच्या मते "इतिहास म्हणजे घडलेल्या आणि घडणाऱ्या खऱ्याखुऱ्या गोष्टीचा अर्थ आणि अन्वयार्थ सांगणे होय." उदा. भारतातील १८५७ च्या झाशीच्या राणीच्या नेतृत्वाखालील उठावाला चळवळ म्हणायची की, बंड म्हणायचे की आंदोलन म्हणायचे, की क्रांती म्हणायची, की युध्द म्हणायचे हे इतिहासकारांनी स्पष्ट केले पाहिजे. म्हणजे इतिहासाचा अर्थ लावला पाहिजे. मार्क्सचा इतिहास विषयक दृष्टीकोन भौतिक स्वरुपाचा आहे. तो पुढीलप्रमाणे -

**इतिहासातील स्थित्यंतरे -**

मार्क्सच्या मते मानवी इतिहासात पाच प्रमुख स्थित्यंतरे झाली आहेत.

**१) अत्यंत प्राचीन काळ -**

या काळात साम्यवाद होता असे मार्क्स म्हणतो. कारण सर्व नैसर्गिक साधनसंपत्ती सर्व माणसांच्या मालकीची होती व त्या संपत्तीवर सर्व माणसे आपली उपजिविका करित असत. त्यामुळे हे माझे ते तुझे हा स्वार्थी विचार नव्हता. खाजगी मालमत्ता नसल्यामुळे व्यक्ति-व्यक्तित संघर्ष नव्हता. परंतु ही परिस्थितीत जास्त काळ टिकली नाही.

**२) प्राचीन काळ -**

या काळात खाजगी मालमत्ता उदयाला आली. हे माझे आणि ते तुझे हा स्वार्थी विचार निर्माण झाला. ज्याच्या जवळ मालमत्ता होती ते मालक झालेत. व ज्यांच्याजवळ मालमत्ता नव्हती ते गुलाम झालेत आणि मालक गुलामांची पिळवणूक करु लागलेत. त्यामुळे त्यांच्यात संघर्ष होता. परंतु ही व्यवस्थाही नष्ट झाली.

**३) मध्ययुगीन काळ -**

या काळात सरंजामशाहीचा उदय झाला. त्यामुळे जामीनदार आणि जमीनीवर राहणारे भू-दास असे दोन वर्ग निर्माण झालेत. जमीनदार भू-दासांची पिळवणूक करित असत, त्यामुळे या दोन वर्गात संघर्ष होता. पण ही व्यवस्थाही जास्त दिवस टिकली नाही.

**४) आधुनिक काळ -**

या काळात भांडवलशाहीचा उदय झाला. त्यामुळे कारखानदारी आणि वस्तुंचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले. या व्यवस्थेतही भांडवलदार आणि कामगार हे दोन वर्ग निर्माण झालेत आणि भांडवलदारांकडुन कामगारांची पिवळवणूक होत असल्यामुळे त्यांच्यासाठी संघर्ष आहे. परंतु हा संघर्ष विकोपाला जाईल आणि त्यातून क्रांती होईल, व त्या क्रांतीत विजय श्रमीकांचाच होईल.

**५) भविष्यकालीन आधुनिक काळ -**

या काळात श्रमिक उत्पादनाची सर्व साधने समाजाच्या मालकीची करतील त्यामुळे प्रत्येक व्यक्तिला कुवतीनुसार काम व गरजेनुसार पैसा दिला जाईल. समाजात यामुळे कोणताही वर्ग राहणार नाही वर्ग नसल्यामुळे वर्ग संघर्ष असणार नाही. व दंड शक्ती नसल्यामुळे राज्य आपोआप लोप पावेल. त्यामुळे जगातील सर्व राज्याच्या सिमा पुसुन टाकल्या जातील व संपूर्ण जग हे एक साम्यवादी राज्य बनेल आणि या व्यवस्थेत विरोध नसल्यामुळे ही व्यवस्था स्थिरावेल असे मार्क्स म्हणतो.

**इतिहासाचा निर्णायक घटक आर्थिकच -**

मार्क्सने इतिहासाची मिमांसा वस्तूच्या उत्पादनाच्या आधाराने केली आहे. त्याच्या मते वस्तूच्या उत्पादनात दोनच घटक असतात. ते म्हणजे नैसर्गिक साधन संपत्ती आणि मानवी श्रम होय. या दोहोंच्या सहकार्यातून वस्तू निर्माण होते. मानवी इतिहास असे दर्शवितो की, काही मुठभर लोकांनी नैसर्गिक साधन संपत्तीवर मालकी मिळविली आहे. त्यामुळे या संपत्तीवर मालकी असणाऱ्यांचा एक वर्ग निर्माण झाला आहे व श्रमिकांचा दुसरा वर्ग निर्माण झाला म्हणून इतिहास असे दर्शवितो की, सर्व मानवी संबंध आर्थिक स्वरुपाचे आहेत. म्हणजे समाजाचा पायाच आर्थिक आहे, व त्या पायावर रचलेल्या व्यवस्थेत राजकारण, कायदा नितिमत्ता, धर्म, न्याय-अन्याय इ. गोष्टींचा समावेश होतो. मनुष्य जेव्हा भटक्या स्थितीत होता तेव्हा त्याच्या संपत्तीचे मोजमाप त्याच्या मालकीच्या घोड्यांच्या संख्येवरुन केले जात असे. ज्याच्या जवळ घोडे जास्त तो सर्वात श्रीमंत मानला जाई आणि अशा साधन व्यक्तिच्या हाती सत्ता होती त्या व्यक्तिने समाजासाठी कायदे करावेत, धर्माची कल्पना मांडावी या अशा व्यक्तिंना समाजात मानाचे स्थान होते. त्यामुळे ते स्वतःच्या इच्छेनुसार वागत होते आणि आपल्या संपत्तीचा उपयोग श्रमिकांच्या पिळवणूकीसाठी करीत होते.

**परीक्षण -**

मार्क्सने वस्तूच्या उत्पादनाच्या आधारे मानवी इतिहासाचे स्वरुप स्पष्ट केले आहे. "माणसाला जगायचे असेल तर त्याने खाल्ले पहिजे व खायचे असेल तर वस्तूचे उत्पादन केले पाहिजे. म्हणजे वस्तूचे उत्पादनही जगण्यासाठी आवश्यक असलेली गोष्ट आहे आणि त्यातूनच इतिहास घडतो" असे मार्क्स म्हणतो. परंतू मार्क्सच्या विचारांवर पुढील आक्षेप घेतले जातात.

**१) इतर घटकांची दखल नाही -**

मानवी इतिहास असे दर्शवितो की, आर्थिक घटकांखेरीज इतर अनेक घटक इतिहास घडवितात. उदा. पाकिस्तानचा जन्म इस्लाम धर्माच्या वेगळेपणातून झाला व तोच इस्लाम धर्म पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान यांना एकत्र ठेवू शकला नाही. तसेच द्रौपदी, सिता व पद्मिनी या स्त्रीयांमुळेही इतिहास घडला आहे.

**२) थोर व्यक्तिचा वाटा -**

काही थोर व्यक्तिचे व्यक्तिमत्वही इतिहास घडविण्याला कारणीभूत होते. उदा. टेरेन्स मॅझवीनी, मार्टीन ल्युथर किंग, लोकमान्य टिळक, ॲडाल्फ हिटलर, महात्मा गांधी इ. व्यक्तिनी जगाच्या इतिहासाला गती दिली आहे.

**३) भिती हा घटक -**

भितीतून देखील इतिहास घडलेला दिसतो. उदा. रशिया व अमेरिका यांना परस्परांची भिती वाटते तर जगातील सर्वच देशांना रशिया आणि अमेरिकेची भिती वाटते.

**४) आर्थिक घटक -**

इतिहासात आर्थिक घटक केवळ एकमेव असता तर इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका सारख्या भांडवलशाही देशात साम्यवाद अंमलात आला असता. म्हणून इतिहास घडण्याला आर्थिक घटक हा एकमेव घटक नसून तो एक घटक आहे.

**५) विचारांचे महत्व -**

काही विचारांना इतिहासात विशेष महत्व असते. उदा. मुसोलिनीच्या फॅसिस्ट विचाराने व हिटलरच्या नाझी विचाराने जगाच्या इतिहासाला मोठी कलाटणी दिली आहे.

**६) किरकोळ गोष्टी देखील महत्वाच्या -**

'वंदे मातरम', 'जयहिंद', 'हर हर महादेव' व 'चले जाव' इ. घोषणांना भारताच्या इतिहासात महत्वाचे स्थान आहे.

**७) शास्त्रीय संशोधन -**

वस्तूच्या उत्पादनातून इतिहास घडतो असे मार्क्स म्हणतो. व उत्पादन पध्दती नेहमीच बदललेली दिसते व तिच्यातील बदल हा शास्त्रीय संशोधनावर आधारलेला असतो. शास्त्रीय संशोधन हे माणसाच्या बुध्दीच्या विकासाचे व विलासाचे फळ आहे. म्हणजेच इतिहास घडण्याला मनुष्याची विशेष बुध्दी ही कारणीभूत ठरते.

अशाप्रकारे मार्क्सची इतिहासाची भौतिक मिमांसा स्पष्ट करुन परिक्षण करता येईल.

**मार्क्सप्रणित वर्ग संघर्षाच्या सिध्दांताचे मुल्यमापन -**

मार्क्सने आपला वर्ग संघर्षाचा सिध्दात पुढील दोन मुद्यांच्या आधारे स्पष्ट केला आहे.

**१) समाजात दोनच वर्ग -**

समाजातील लोकांचे शास्त्रीय पध्दतीने वर्गीकरण केले तर आधुनिक समाजात दोन वर्ग आहेत. १) भांडवलदारांचा वर्ग, २) कामगारांचा वर्ग. असे मार्क्स म्हणतो. भांडवलदारांच्या हाती उत्पादन साधने आहेत व कामगार हे श्रमावर उपजिवीका करतात. या दोन वर्गात संघर्ष आहे. कारण एक वर्ग पिळवणूक करणाऱ्यांचा आहे व दुसरा वर्ग ज्यांची पिळवणूक होते त्यांचा आहे. मार्क्सच्या मते संपूर्ण इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे. उदा. प्राचीन काळात मालक आणि गुलाम असे दोन वर्ग होते. मालक गुलामांकडून श्रम करुन घेत असत व त्यांची पिळवणूक करित असत. मध्ययुगीन काळात संरजामदार (जमिनदार) व शेतावर राबणारे भू-दास असे दोन वर्ग होते व जमिनदार भू-दासांकडून श्रम करुन घेत आणि त्यांची पिळवणूक करीत असत. तसेच आधुनिक भांडवलशाही व्यवस्थेत भांडवलदार आणि कामगार असे दोन वर्ग उदयाला आलेले आहेत. भांडवलदारांकडून कामगारांची पिळवणूक होते. त्यामुळे त्यांच्यात संघर्ष आहे.

**२) श्रमिकांचे संख्याबळ वाढले -**

मार्क्सने आपला वर्ग संघर्षाचा सिध्दांत 'कम्युनिस्ट मॅनीफेस्टो' या ग्रंथात व्यक्त केला आहे. आधुनिक काळात कारखानदारीचा उदय झाला. मध्ययुगीन काळातील छोटे उद्योगधंदे नष्ट होवून त्यांची जागा मोठ्या कारखान्यांनी घेतली, त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा व प्रचंड यंत्राचा वापर सुरु झाला. उत्पादन प्रचंड प्रमाणात वाढले व एकाच कारखान्यात हजारो मजूर काम करु लागलेत. त्यामुळे त्यांचे संख्याबळ वाढले. याउलट भांडवलशाही अर्थव्यवस्था पूर्ण स्पर्धेवर आधारलेली असल्याने त्या स्पर्धेत केवळ मोठे भांडवलदार टिकून राहतात. कारण भांडवलशाहीत मोठ्या माश्याने लहान माश्याला गिळंकृत करावे हा न्याय असतो. त्यामुळे लहान भांडवलदार नष्ट होतात व भांडवलदाराचे संख्याबळ कमी होते. आधुनिक काळात भांडवलदार मुठभर राहिलेले आहेत व श्रमिकांची संख्याश्रम फार वाढलेले आहे. श्रमिकांना

आपल्या कामाचा रास्त वाटा मिळत नाही. त्यामुळे ते भांडवलदारांच्या विरोधात आहेत व अशा स्थितीत श्रमिक अन्यायाच्या जाणीवेने संघटीत झालेत व क्रांतीला उद्युक्त झालेत तर भांडवलदारांना मुठमाती मिळणार आहे. कारण श्रमिकांची संख्या जास्त असल्यामुळे विजय त्यांचाच होईल असे मार्क्स म्हणतो. त्यानंतर उत्पादनाची साधने श्रमिक समाजाच्या मालकीची करतील व ज्या समाजात शोषण राहणार नाही असा वर्ग विरहित समाज निर्माण हे ईल.

मार्क्सने वर्ग संघर्षाचा इतिहास स्पष्ट करुन, त्याचे भवितव्यही स्पष्ट केले आहे. "मानवी जीवनाचा पाया हा आर्थिक स्वरुपाचा असून त्यात दोन प्रकारचे परस्पर संबंध असतात" असे मार्क्स म्हणतो. त्यापैकी एक संबंध हा नैसर्गिक साधन संपत्ती व मानवी श्रम यांचा आहे, तर दुसरा संबंध हा व्यक्ति-व्यक्तितील आहे. काही लोकांनी उत्पादन साधनांवर मालकी प्रस्थापित केल्यावर व्यक्ति-व्यक्तिमधील संबंध हा मालक आणि श्रमिक या प्रकारचा आला. त्यामुळे समाजात वर्ग निर्माण झालेत. जोपर्यंत उद्योगधंद्यांचे स्वरुप घरगुती होते तोपर्यंत श्रमिक वर्ग संघटीत नव्हता. परंतु आधुनिक काळात श्रमिकांचे संख्याबळ वाढले व त्यांचे सामर्थ्य वाढले असल्यामुळे त्यांनी क्रांती केली तर त्यात विजय श्रमिकांचाच होईल असे मार्क्स म्हणतो. त्यामुळे भांडवलदार नष्ट होतील व श्रमिक उत्पादनाची साधने समाजाच्या मालकीची करतील आणि असे झाले तर प्रत्येक व्यक्तिला कुवतीनुसार काम मिळेल व गरजेनुसार पैसा मिळेल. त्यामुळे समाजात कोणताच वर्ग राहणार नाही व एक वर्ग विरहित आणि शोषण विरहीत समाज निर्माण होईल असे मार्क्स म्हणतो.

**मुल्यमापन -**

मार्क्सच्या तर्कशुध्द विचारातील एक पायरी म्हणजे वर्गसंघर्ष सिध्दांत होय. परंतु या सिध्दांतावर पुढील आक्षेप घेतले जातात.

**१) फ्रान्स इंग्लंडमध्ये वर्ग संघर्ष नाही :**

मार्क्सने आपल्या इंग्लंड व फ्रान्सच्या पाश्र्वभूमीवर वर्गसंघर्ष मांडला परंतु इंग्लंडमध्ये वर्गसंघर्ष झाला नाही. तसेच क्रांती झाली नाही. श्रमिकांची हुकूमशाही निर्माण झाली नाही. कारण तेथे भांडवलदारांनी श्रमिकांबरोबर तडजोड केली. त्यांनी श्रमिकांचे वेतन वाढविले, शिवाय इतर सुविधा उपलब्ध करुन दिल्या. त्यामुळे श्रमिकांचे राहणीमान सुधारले.

**२. समाजात अनेक वर्ग :**

समाजात मार्क्सनुसार केवळ दोनच वर्ग आढळत नाहीत, तर भांडवलदार व कामगार यांच्याखेरीज व्यापारी, कारकुन, प्रशासक, डॉक्टर, वकिल, तंत्रज्ञ इ. अनेक वर्ग आहेत त्यांना समाजात महत्वाचे स्थान आहे. मार्क्सने क्रांतीच्या दृष्टीने त्या समाजातील विविध वर्गांना महत्वाचे न मानता फक्त दोनच वर्ग महत्वाचे मानले व ही त्याच्या विचारातील उणिव आहे.

**३. समाजव्यवस्था गुंतागुंतीची आहे :**

आजच्या काळातील समाजव्यवस्था ही अत्यंत गुंतागुंतीची आहे ती दोनच वर्गात विभागली जाण्याइतकी सोपी नाही. ती समाजरचना ही स्थिर स्वरुपाची नसते ती समाज बदलणारी असते. त्यामुळे अशा स्थिर भांडवलदार व कामगार वर्गात दोनच समाजाचे विभाजन करणे शक्य नाही.

**४. कोण श्रमिक आणि कोण भांडवलदार :**

श्रमिक व भांडवलदार यांच्या व्याख्या करणे सोपे नाही. कारण आजच्या प्रगत युगात आपल्याला असे दिसते की, श्रमिकांनीही कारखान्यांचे शेअर्स (भाग) विकत घेतले आहेत. त्यामुळे एका बाजूस ते मजूर आहेत व दुसऱ्या बाजूस ते भांडवलदार आहेत. त्यामुळे या स्थितीत समाजात स्पष्ट स्वरुपाचे दोन वर्ग निर्माण करणे सोपे नाही. म्हणून सबाईन यांनी म्हटले आहे की, "मार्क्सची वर्ग ही कल्पना संदिग्ध (संभ्रमात टाकणारी) असल्यामुळे त्यांचा भविष्य काळाच्या अंदाजात गंभीर चुका झाल्या आहेत."

**५. एकजूट हे स्वप्न :**

मार्क्सला असे वाटते की, जगातील सर्व श्रमीकांची एकजुट होईल. पण वास्तविक श्रमिकांची एकजूट होणे शक्य नाही. कारण श्रमिकात अनेक प्रकारची भांडणे व मतभेद असतात. उदा. स्त्री-पुरुष, तंत्रज्ञ-बिगर तंत्रज्ञ, शिक्षित-अशिक्षित इ. तसेच एकाच कारखान्यातील सर्व श्रमिकांची एकजूट होईल अशी खात्रीही देता येत नाही. त्यामुळे जगातील सर्व श्रमिक संघटीत होतील व क्रांती करतील हा मार्क्सचा फोल स्वप्नाळुपणा आहे. कारण मजूर सुध्दा राष्ट्रवादाने भारावलेले असतात. उदा. फ्रेन्च सैनिक जेव्हा जर्मन सैनिकांशी लढतात तेव्हा फ्रेन्च सैनिकांच्या पाठीशी फ्रेंच मजूर असतात. हे मजूर युध्द साहित्य निर्माण करुन सैनिकांना पुरवितात. उपलटपक्षी जर्मन मजूर

जर्मन सैनिकांना युध्दसाहित्य पुरवितात. त्यामुळे मार्क्सने श्रमिकातील राष्ट्रवाद हा महत्वाचा घटक लक्षात घेतला जात नाही. तसेच जर एखाद्या देशातील भांडवलदारांनी आपल्या देशातील मजूरांना काम न देता दुसऱ्या देशातील मजूरांना कामावर घेतले तर त्या दोन देशातील मजूर एकमेकाशी संघर्ष करतील ते दोघे भांडवलदारांशी न लढता आपआपसातच लढतील.

**६. इतिहास केवळ वर्ग संघर्षाचा नाही -**

मानवी इतिहास हा वर्ग संघर्षाचा इतिहास आहे. मार्क्स म्हणतो, परंतु इतिहासात केवळ वर्गसंघर्ष नाही. कारण इतिहासात पुष्कळ प्रकारची युध्दे आढळतात व ती वर्गयुध्देच होती म्हणणे चुकीचे ठरेल. उदा. रामायण, महाभारतातील युध्द, पहिल्या व दुसऱ्या महायुध्दाला वर्गसंघर्ष म्हणता येत नाही.

**७) इतिहासाकडून पराभव -**

भांडवलदार आणि कामगार यांच्यातील संघर्षात भांडवलदार नष्ट होतील व वर्गहिन समाज निर्माण होईल. त्या समाजात संघर्ष राहणार नाही हा मार्क्सचा विचार खरा ठरला नाही. कारण इतिहासात भांडवलदार व कामगार यांच्यात संघर्ष झाला नाही / वर्णहिन समाजही निर्माण झाला नाही. रशियाच्या उदाहरणातून असे स्पष्ट होते की, तेथे क्रांतीनंतरही पक्ष सभासदांचा व प्रशासकांचा नवा वर्ग उदयाला आला.

**८) नैतिकदृष्ट्या योग्य नाही -**

मार्क्सची वर्गसंघर्षाची कल्पना नैतिकदृष्टया योग्य नाही. कारण त्यामुळे समाजातील एकात्मता नष्ट होते. हिंसाचाराला प्रोत्साहन मिळते व शांतता भंग होते. त्यामुळे वर्गसंघर्षाची कल्पना नैतिकदृष्ट्या राष्ट्रहिताच्या विरोधी आहे. अशाप्रकारे मार्क्सचा वर्गसंघर्ष सिध्दांत स्पष्ट करुन परिक्षण करता येईल.

**मार्क्सचा राज्यविषयक व क्रांतीविषयक दृष्टीकोन -**

मार्क्सने आपला राज्यविषयक दृष्टीकोन दोन मुद्यांच्या आधारे विषद केला आहे.

**१) राज्यविषयक विविध दृष्टीकोन -**

राज्यशास्त्र हे मुख्यतः राज्यविषयक शास्त्र असल्याने त्यात राज्याचा उदय, विकास, कार्य इ. विषय समाविष्ट असतात. त्या विषयाबद्दल निरनिराळ्या विचारवंतांचे विविध दृष्टीकोन दिसून येतात. काही विचारवंतांच्या मते राज्यसंस्थेमुळे मानवी प्रगतीला धोका निर्माण होतो. म्हणून राज्यसंस्था नसावी. काहींच्या मते राज्याने मानवी जीवनात मर्यादित स्वरुपाचे कार्य करावे व व्यक्ती जास्तीत जास्त स्वतंत्र असावी. तर राज्य हे समाज सेवेचे साधन आहे असे काही जण म्हणतात. तर काहींच्या मते राज्याने समाजातील मागासवर्गीय व दुबळ्या घटकांच्या हितसंबंधांचे रक्षण करावे. मार्क्सचा राज्यविषयक दृष्टीकोन मात्र अगदी निराळा आहे. त्याच्या मते "राज्य हे श्रमिकांची पिळवणूक करण्यासाठी निर्माण केलेले साधन होय."

**२) राज्य हे पिळवणूकीचे साधन -**

प्राचीन मानवी समाज हा निरनिराळ्या टोळ्यात विभागलेला होता. त्यानंतर कुटुंब संस्था निर्माण झाली. कुटूंबात प्राणी पाळले जावू लागलेत. शेती सुरु झाली व काही प्रमाणात वस्तूंची देवाण-घेवाण सुरु झाली. त्यामुळे खाजगी मालमत्तेचा उदय झाला व काही लोकांच्या हाती मालमत्ता आली. माणसांनी वस्तूंवर जशी मालकी मिळविली तशी काही माणसांवर मालकी मिळविली. त्यातून गुलामगिरीचा उदय झाला व पूर्वीची समाजव्यवस्था नष्ट होवून नवीन समाजव्यवस्था निर्माण झाली. या नव्या समाजात एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गाची पिळवणूक सुरु झाली. या एका वर्गाची पिळवणूक करण्यासाठी जी राजकिय संघटीत शक्ती निर्माण झाली ती शक्ती म्हणजे राज्य होय. ही अशी राजकीय शक्ती मालमत्ताधारकांनी आपल्या हितसंबंधांची जपणूक करण्यासाठीच निर्माण केली. म्हणून मार्क्स असे म्हणतो की, "राज्य म्हणजे आपली मालमत्ता आणि आपले हितसंबंध जपण्यासाठी श्रीमंत वर्गाने स्विकारलेली संघटना होय." मालमत्तेची निर्मिती नफ्यातून होते. नफा हा श्रमिकांच्या पिळवपणूकीतून निर्माण होतो. म्हणून राज्य हे नफा मिळविण्याचे आणि श्रमिकांची पिळवणूक करण्याचे साधन होय.

कॅरो हेन्ट यांनी मार्क्सची राज्यविषयक कल्पना वेगळ्या पध्दतीने स्पष्ट केली आहे. त्याच्या मते "प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत सर्व

मानवीसंबंध आर्थिक स्वरुपाचे आहेत असेच दिसून येते." समाजाला आधारभूत घटक आर्थिकच असतात. त्यात मानवी श्रम व नैसर्गिक साधन-संपत्ती यांचा समावेश होतो. त्याच्या एकमेकांवर प्रक्रिया होवून वस्तूचे उत्पादन होते. काही व्यक्तिच्या हाती उत्पादन साधनांची मालकी प्रस्थापित होताच मालक आणि गुलाम असे दोन वर्ग निर्माण झालेत. मालकांचा हितसंबंध नफा मिळविण्यात होता व नफा वाढविण्यासाठी श्रमिकांची पिळवणूक आवश्यक होती. श्रमिकांच्या पिळवणूकीसाठी काही साधने निर्माण झालीत. राज्य हे असेच एक साधन आहे. राज्याच्या हाती सैन्य, पोलीस दल, तुरुंग, शस्त्रास्त्रे, कायदा इ. विविध साधने आहेत, त्यांच्याद्वारे राज्य हे श्रमिकांच्या हितसंबंधांची जपणूक करते.

श्रमीकांना आपली पिळवणूक होत असल्याची जाणीव आहे. घरगुती स्वरुपाचे छोटे उद्योगधंदे होते तोपर्यंत या जाणीवेचा काहीच उपयोग नव्हता, कारण श्रमिक असंघटीत व विखुरलेले होते. परंतु आधुनिक काळात कारखानदारीला सुरुवात झाल्यामुळे श्रमीकांचे संख्याबळ वाढले आहे, व अशा स्थितीत श्रमिकांना अनुकूल असे बदल हवे आहेत. पण बदल होवू शकत नाहीत. कारण भांडवलदारांनी राज्य काबीज केल्यामुळे व राज्याकडुन कायद्याची निर्मिती होत असल्यामुळे भांडवलदार श्रमिकांच्या विरोधी कायद्याचे शस्त्र वापरु शकतात. म्हणून श्रमीकांसाठी कायदेशीर मार्ग बंद झाला आहे व त्यांच्यासमोर क्रांतीशिवाय दुसरा पर्याय नाही व क्रांतीही संघटनेशिवाय शक्य नाही. म्हणून कम्युनिस्ट मॅनीफेस्टोच्या शेवटी मार्क्स असे आवाहन करतो की, "जगातील श्रमीकांनी संघटीत व्हा, तुम्हाला जखडून टाकणाऱ्या शृंखला तुटण्याची वेळ जवळ आली आहे."

वर्ग संघर्षाची परिनिती क्रांतीत होईल. ह्या क्रांतीत श्रमिक लोक उत्पादन साधनांचा ताबा मिळवतील व भांडवलदारांना नष्ट करतील आणि भांडवलशाहीबरोबरच पिळवणूकीची साधने नष्ट केली जातील. मार्क्सने क्रांतीची व्यावहारीक बाजूही लक्षात घेतली आहे. त्यांच्या मते क्रांतीकारकांनी बुध्दी कौशल्य वापरुन योग्य ती पवित्रे टाकली पाहिजेत. दोन टप्प्यात क्रांती झ ाली पाहिजे. पहिल्या टप्प्यात सरंजामशाही नष्ट केली पाहिजे व दुसऱ्या टप्प्यात भांडवलदारांवर जोराचा आघात केला पाहिजे. त्यांच्यातील जे फुटतील

त्यांना श्रमीकांनी युक्तीने पण सावधपणे हाताशी धरुन क्रांती करावी. मात्र अशा फितूर व्यक्तिंना नंतर दूर करावे. कारण अशा व्यक्ती पेटाऱ्यातील सर्प असतात. भांडवलशाही नष्ट झाली तर काही काळ राज्य आवश्यक ठरणार आहे. कारण क्रांतीच्या विरोधकांचा वर्ग नष्ट करण्यासाठी राज्याचा उपयोग होणार आहे व जेव्हा वर्ग विरहीत व शोषण विरहीत समाज निर्माण होईल तेव्हा राज्यसंस्थेची गरज उरणार नाही. म्हणजे पिळवणूकीचे साधन असलेली राज्यसंस्था आपोआप लोप पावेल.

**परिक्षण -**

मार्क्सचा राज्यविषयक व क्रांतीविषयक विचार मांडतांना मार्क्सने राज्याचा उदय व राज्याचे स्वरुप सांगितले. राज्यविषयक इतर दृष्टीकोन फेटाळून नवा दृष्टीकोन प्रस्तापित केला. परंतु तरीही मार्क्सच्या राज्यविषयक विचारांवर टिका केली जाते.

१. कॅरोहॅन्ट यांनी आपल्या ग्रंथात असे म्हटले आहे की, "मार्क्सने राज्याच्या कार्याच्या बाबतीत दंडशक्तीच्या आधाराने चालणाऱ्या कार्याचाच विचार केला आहे, इतर कार्याचा विचार केलाच नाही." उदा. आधुनिक काळात राज्य कल्याणकारी कार्य करते, तसेच राज्याचे पोलिसी कार्य हेच महत्वाचे असे कसे म्हणता येईल शिवाय राज्य हे श्रमिकांच्या पिळवणूकीचे साधन आहे असे म्हणणे वस्तूस्थितीला सोडून आहे.

२. वर्गविहीन समाज निर्माण झाल्यावर राज्याची आवश्यकताच राहणार नाही व राज्य कोमेजून (नष्ट होणे, लोप पावणे) जाईल असे मार्क्सला वाटते. पण क्रांतीनंतर वर्गविरहीत समाज निर्माण होईल का? हा महत्वाचा प्रश्न आहे. कारण क्रांतीनंतर भांडवलदार वर्ग जावून त्याजागी नवा वर्ग येणारच आहे. हा रशिया व चीनमधील झ ालेल्या साम्यवादी क्रांतीचा अनुभव आहे. म्हणजे वर्गविहीन समाजाची कल्पना शक्य नाही व राज्य कोमेजून जाईल असे म्हणणे चुकीचे आहे.

३. क्रांतीनंतर काही काळ राज्य आवश्यक आहे असे मार्क्स म्हणतो, कारण त्यातून भांडवलशाहीचे अवशेष व क्रांतीचे विरोधक नष्ट

करता येतील. म्हणजे या काळात राज्याचे कार्य दंडशक्तीच्या आधारानेच चालणार आहे. व भांडवलदार जितक्या निघृणपणे सत्ता वापरतात तितक्याच किंवा त्याहीपेक्षा जास्त निघृणपणे क्रांतीकारक सत्ता वापरतील व राज्य हे पिळवणूकीचे साधनच राहणार. फरक एवढाच की, पूर्वी थोडे भांडवलदार बहुसंख्य श्रमिक त्याच्याविरुध्द असणाऱ्यांना रगडणार आहेत.

४. क्रांतीनंतरचा काळ हा संक्रमण काळ असून त्या काळात श्रमिकांची हुकूमशाही असेल असे मार्क्स म्हणतो. पण हा संक्रमण काळ किती दिवसांचा राहील हे त्याने सांगितले नाही. म्हणजे संक्रमण काळातील श्रमिकांची हुकूमशाही कितीही दिवस चालू राहील व श्रमिक आपल्या हातून सहजासहजी सत्ता जावू देणार नाहीत. कारण एकदा मानगुटीवर बसलेले हुकूमशाहीचे भूत लवकर खाली उतरत नाही.

५. मार्क्स हा वस्तूवादी विचारवंत (वस्तूस्थितीला स्पष्ट करणारा) होता. तो स्वप्नाळू विचारांच्या विरोधी आहे. परंतू क्रांती नंतरची वर्ग विहीन, शोषणरहित व राज्यविहीन समाज ही कल्पना स्वप्नासारखीच आहे. म्हणून 'ग्रे' या विचारवंताने म्हटले आहे की, 'स्वप्नवादाच्या स्विकाराने आपणास स्वप्नवादाकडे नेले आहे.'

अशाप्रकारे मार्क्सचा क्रांतीविषयक व राज्यविषयक दृष्टीकोन स्पष्ट करता येईल.

- **मार्क्सचा जादा (अतिरिक्त) मुल्याचा सिध्दांत आणि त्याचे स्पष्टीकरण-**

मार्क्सने आपला अतिरिक्त मुल्याचा सिध्दांत पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे.

**१. उत्पादनात दोनच घटक -**

प्रत्येक अर्थशास्त्राचा प्राथमिक अभ्यास करणाऱ्या व्यक्तिला माहित आहे की, उत्पादनात चार घटक असतात. १) भूमी, २) भांडवल, ३) मानवीश्रम, ४) संयोजन. आधुनिक भांडवलशाहीत या चार घटकांना मोबदला मिळतो. भूमी म्हणजे निसर्गाच्या देणग्या. भांडवलाच्या उपयोगाबद्दल व्याज दिले जाते. मानवी श्रमाचा मोबदला म्हणून मजूरी दिली जाते व संयोजनाबद्दल

नफा मिळतो. मार्क्सच्या मते वस्तूच्या उत्पादनात दोनच प्रमुख घटक असतात. ते म्हणजे नैसर्गिक साधनसंपत्ती व मानवी श्रम होय. या दोहोंच्या परस्पर सहकार्यातून वस्तूचे उत्पादन होते. भांडवलशाहीत मात्र वर उल्लेखलेले चार घटक स्पष्ट केले आहेत. भूमी ही निसर्गदत्त भांडवल होय. भांडवल म्हणजे भूतकाळातील श्रम होय. उदा. शिंप्याचे यंत्र हे त्याचे भांडवल होय. त्यात मुख्यतः लोखंड व लाकूड वापरले आहे. खाणीतून लोखंड काढून त्याला शुध्द करुन व जंगलातून लाकूड आणून लोखंड व लाकूड यांना विशिष्ट आकार देण्याचे काम मजूरांनी केले. त्यामुळे त्याला यंत्राचा आकार प्राप्त झाला. यंत्रात मानवी श्रम लपले आहे. म्हणून ते भूतकाळातील श्रम होय. संयोजनात विशेष स्वरुपाचे श्रमच आहेत. कारण कारखानदार श्रम करतातच फरक एवढाच की, त्यांचे श्रम मजूरांच्या श्रमापेक्षा वेगळे असतात. थोडक्यात असे म्हणता येईल की, भूमी म्हणजे नैसर्गिक देणगी, भांडवल म्हणजे भूतकाळातील श्रम, संयोजन म्हणजे विशेष स्वरुपाचे श्रम व मजुरांचे शारीरिक श्रम यांच्या परस्पर सहकार्यातून वस्तूंचे उत्पादन होते.

**२. श्रमिकांना रास्त वाटा मिळत नाही -**

उत्पादनातील वरील चार घटकांना मोबदला दिला जातो. पण श्रमिकांच्या उत्पादनात जो वाटा असतो त्या प्रमाणात त्याला मोबदला दिला जात नाही. कारण श्रमिकांचा मोबदला हा मजूरीच्या लोखंडी नियमानुसार ठरविला जातो. या नियमानुसार मजूराला केवळ जगण्यास आवश्यक तेवढाच मोबदला दिला जातो. त्यामुळे मजुराला त्याचा रास्त वाटा मिळत नाही. त्याचा रास्त वाटा व त्याला प्रत्यक्ष दिला जाणारा मोबदला यांच्यातील फरक भांडवलदारांना मिळतो. उदा. मजुराचा रास्त वाटा १० रु. असेल व त्याची प्रत्यक्ष मजूरी ६ रु. असेल तर ४ रु. नफा वाढतो. हा वाढीव नफा म्हणजे अतिरिक्त किंवा जादा मुल्य होय. मार्क्सने अतिरिक्त मुल्याचा विचार पैशात केला नाही. त्याने अतिरिक्त मुल्य ठरवितांना मुल्याचा श्रमसिध्दांत आधारभूत मानला. उदा. एखादी वस्तू निर्माण करण्यास मजुराला ६ तास लागतात असे मानल्यास त्या वस्तूचे मुल्य म्हणजे ६ तासाचे मानवी श्रम होय. परंतु उत्पादनावर संयोजकाचे नियंत्रण असते. त्यामुळे तो मजुरांकडून १२ तास श्रम करुन घेतो व ६ तासाच्या श्रमाचा मोबदला देतो. उरलेल्या ६ तासाचा मोबदला

नफ्याच्या स्वरुपात संयोजक (भांडवलदार) खिशात घालतो. श्रमिकांना निमुटपणे जास्त श्रम करुन कमी मोबदला स्विकारावा लागतो. कारण त्याला नोकरीची गरज असते. शिवाय त्याला कामावर ठेवायचे की नाही हे ठरविण्याचा अधिकार संयोजकाला असतो. शिवाय काम मिळण्याच्या बाबतीत श्रमिक एकमेकांशी स्पर्धा करतात. त्यामुळे एका श्रमिकाने काम नाकारले तर इतर अनेक श्रमिक ते काम करण्यास तयार असतात.

**३. उत्पादन एकाचवेळी तर विक्री नंतर -**

जादा मुल्य निर्माण होण्यास आणखी एक कारण आहे, ते म्हणजे वस्तूचे उत्पादन ज्यावेळी होते त्याचवेळी वस्तू विकली जात नाही. श्रमिकांचे वेतन मात्र त्याचवेळी दिले जाते. वस्तूची विक्री मात्र भांडवलदारांच्या इच्छेनुसार केली जाते. वस्तूची किंमत पैशात ठरते. ती किंमत बाजारपेठेतील मागणीनुसार कमी जास्त होते. वस्तू जास्तीत जास्त किंमतीला विकली जावी असा भांडवलदाराचा प्रयत्न असतो. त्यामुळे त्याचा नफा वाढतो. परंतु वस्तूची किंमत वाढली म्हणून मजुराची मजुरी वाढत नाही. कारण ती पूर्वीच मजुराला दिलेली असते व हा किंमतीतील वाढीव नफा जादा मुल्य दर्शवितो.

**४. पैसा पिळवणूकिला मदत करतो -**

जादा मुल्य निर्मितीच्या बाबतीत पैसा भांडवलदारांना सहकार्य करतो. पैशाची दोन महत्वाची कार्ये असतात. पहिले कार्य म्हणजे विनिमय माध्यम होय. पूर्वीच्या काळी वस्तूविनिमयात निरनिराळ्या अडचणी निर्माण झाल्या म्हणून पैसा हे माध्यम निर्माण झाले. माणसाने स्वतःजवळची 'अ' ही वस्तू विकून पैसा मिळवावा व पैसा देवून 'ब' ही वस्तू मिळवावी. म्हणजे 'अ' आणि 'ब' या वस्तूत माध्यमाचे काम पैसा करतो. तसेच संपत्ती संचय हे पैशाचे दुसरे कार्य आहे. आधुनिक भांडवलशाही युगात या दुसऱ्या कार्याला जास्त महत्व प्राप्त झाले आहे. भांडवलशहा पैसा साठवितात. जेव्हा बाजारात वस्तू स्वस्त असतात, तेव्हा साठविलेल्या पैश्यातून भांडवलदार त्या वस्तू खरेदी करतात. जेव्हा बाजारात वस्तू महाग होतात तेव्हा ते आपल्या जवळील वस्तू विकतात. त्यामुळे भांडवलदारांना अधिक नफा मिळतो. वस्तूची किंमत वाढलेली असली तरी भांडवलदार मजूरांना अधिक मोबदला देत नाही. कारण तो मोबदला भांडवलदारांनी पूर्वीच दिलेला असतो. मजूरांच्या प्रत्यक्ष वाट्यापेक्षा त्यांचा

रास्त वाटा जितका जास्त तितके जादा मुल्य जास्त व जितके जादा मुल्य जास्त तितकी मजूरांची पिळवणूक जास्त म्हणजेच पैसा पिळवणूकीला मदत करतो असे मार्क्स म्हणतो.

मार्क्सने जादा मुल्याचे काही परिणाम स्पष्ट केले आहेत.

**१) संपत्तीचे केंद्रीकरण -**

जादा मुल्य म्हणजे वाढीव नफा होय. या वाढीव नफ्यामुळे भांडवलदारांची संपत्ती वाढते व त्या संपत्तीचे केंद्रीकरण मुठभर भांडवलदारांच्यात हाती होते. त्यामुळे श्रीमंत अधिक श्रीमत होतात व गरीब अधिक गरीब होतात.

**२) भांडवलदारांच्या संख्येत घट -**

भांडवलशाहीत मोठ्या प्रमाणात उत्पादन करण्याची क्षमता (प्रवृत्ती) बळावते. त्यामुळे छोटे उत्पादक या स्पर्धेत टिकत नाहीत. ते कालांतराने नष्ट होतात. म्हणून भांडवलदारांची संख्या वाढते.

**परिक्षण -** मार्क्सचा जादा मुल्याचा सिध्दांत त्याच्या विचारातील एक महत्वाची पायरी आहे. त्याच्यामते वर्गावर आधारलेल्या कोणत्याही व्यवस्थेत जादा मुल्य आढळते. हे जादा मुल्य भांडवलशाहीत जास्त प्रमाणात दिसते. श्रमिकांना रास्त वेतन न मिळाल्याने उरलेला पैसा नफ्याच्या स्वरुपात भांडवलदारांना मिळतो. त्यामुळे श्रमिकांची पिळवणूक होते. या अशा पिळवणूकीमुळे श्रमिक संघटीत होईल व भांडवलदारांविरुध्द क्रांती करेल. या क्रांतीत भांडवलदार टिकणार नाहीत व उत्पादनाची सर्व साधने समाजाच्या मालकिची होवून प्रत्येकाला कुवतीनुसार काम व गरजेनुसार पैसा मिळेल. परंतू मार्क्सच्या या विचारांवर काही आक्षेप घेतले जातात.

**१) केवळ अर्धसत्य -** जादा मुल्य सिध्दांत केवळ अर्धसत्य आहे. वास्तविक वस्तूच्या उत्पादनात भूमी, श्रम, भांडवल आणि संयोजन हे चार घटक असतात. परंतू मार्क्सने भूमी आणि मानवी श्रम हे दोनच घटक महत्वाचे मानले आहेत. त्यामुळे त्याचा विचार परिपूर्ण वाटत नाही. तसेच संयोजकाला जो नफा मिळतो तो सहजासहजी मिळत नाही. कारण त्यांना औद्योगिक क्षेत्रात जोखीम पत्करावी लागते. त्यामुळे नफ्याबरोबर तोट्याचीही शक्यता असते. त्यामुळे संयोजकाला नफा मिळणे एका दृष्टीने योग्यच आहे.

भांडवलदारांकडून कारखाना काढून सरकारने चालवायचे ठरविले तरी त्यासाठी व्यवस्थापक नेमावे लागतील व त्यांच्या बौध्दिक कौशल्याचा मोबदला म्हणून त्यांना मोठा पगार द्यावा लागेल. मार्क्सने उत्पादन क्षेत्रातील संयोजकाचे महत्व मान्य न करणे हा त्याचा दोष आहे.

**२) संयोजन महत्वाचे -** भांडवलदारांपैकी काही आळशी असतात. उदा. कारखान्याचे शेअर्स (भाग) विकत घेणारे बहुसंख्य लोक शेअर्सवरील नफ्यात लक्ष घालतात. त्यांचे कारखान्यातील कामात लक्ष नसते. कारखान्याचे काम हे मॅनेजर्सकडून चालते. अशा मॅनेजर्सना मजूर वर्गात फारसा रस नसतो. त्यांच्याकडुन मजूर वर्गाच्या हितरसंबंधांची जपणूक होत नाही. हे जरी खरे असले तरी उत्पादनातील संयोजकाचे महत्व नाकारणे चुकीचे आहे.

**३) भांडवलशाही देशात क्रांती नाही -** मार्क्सने आपला जादा मुल्याचा सिध्दांत भांडवलशाही देशांच्या बाबतीत मांडला. त्या देशात क्रांती होवून साम्यवादी व्यवस्था निर्माण होईल असे भविष्य वर्तविले. परंतु प्रत्यक्षात इंग्लंड, अमेरिकासारख्या भांडवलशाही देशात क्रांती झाली नाही. उलटपक्षी रशिया, चीन सारख्या गरीब व शेतीप्रधान देशात क्रांती झाली.

**४) श्रमिकांची स्थिती सुधारली -** जादा मुल्य सिध्दांतातून मार्क्सने असे स्पष्ट केले आहे की, श्रीमंत अधिक श्रीमंत होतील व गरीब अधिक गरीब होतील. परंतु प्रत्यक्षात इंग्लंड, अमेरिकासारख्या भांडवलशाही देशात श्रमिकांची स्थिती सुधारलेली आहे. त्यांना जीवनावश्यक वस्तूखेरीज स्वास्थ्यांच्या व चैनीच्या वस्तू विकत घेता येतील इतके वेतन मिळू लागले आहे. त्यामुळे श्रमिकांची क्रांती प्रवणता (इच्छा, उत्सुकता) कमी झाली आहे.

**५) क्रांतीनंतरचे प्रश्न -** भांडवलदार श्रमिकांकडून जास्त काम करुन घेवून कमी वेतन देतात हे म्हणणे योग्य आहे असे मानून मार्क्सने त्यावर सांगितलेले उपाय म्हणजे श्रमिकांनी क्रांती करावी. ही क्रांती केल्यानंतर उत्पादन साधने श्रमिकांच्या मालकीची होतील. परंतू प्रश्न असा निर्माण होतो की, कारखाने चालविण्याची योग्यता, बुध्दीमत्ता व कौशल्य श्रमिकांजवळ आहे का? मार्क्सने या प्रश्नाचे उत्तर दिले नाही. अशाप्रकारे मार्क्सचा जादा मुल्यांचा सिध्दांत स्पष्ट करता येईल.

**मार्क्सवादाचे मुल्यमापन -**

राजकिय विचारवंतात मार्क्सला विशेष स्वरुपाचे स्थान आहे. लेनीन, स्टॅलीन, माओ-त्से-तुंग इ. विचारवंतांवर मार्क्सच्या विचारांचा प्रभाव निर्माण झाला. त्याने तत्व आणि व्यवहार या दोनही गोष्टी विषद करुन जगातील समाजवादी चळवळ गतीमान केली. जगाच्या राजकारणावर त्याचा प्रचंड प्रभाव निर्माण झाला. मार्क्सच्या विचारांचे एक शो-रुम रशियाने निर्माण करुन जगाचे लक्ष आपल्याकडे खेचून घेतले. त्यामुळे रशियाच्या नेतृत्वाखालील देशांचा एक साम्यवादी गट निर्माण झाला. मार्क्सने श्रमिकांबद्दल सहानुभूती दाखविल्यामुळे त्या वर्गात तो आदराचे दैवत बनला. त्याच्या विचारात धर्माला काडीचेही स्थान नाही. धर्म म्हणजे अफुची गोळी आहे असे तो म्हणतो. जे प्रत्यक्ष असते तेच खरे असते असे त्याचे मत होते. धर्माच्या आधाराने काही कल्पना प्रस्थापित झाल्या आहेत. योग्य आणि अयोग्य, न्याय-अन्याय, सत्य-असत्य इ. मुल्ये धर्माधिष्ठीत (धर्माला आधारुन) होती. मार्क्सने आपल्या सिध्दांतात धर्माला काडीचेही स्थान दिले नाही. त्याने श्रमिक वर्गावर होणारा अन्याय थांबविला. तसेच सर्व इतिहासकारांनी मानवी इतिहासातील आर्थिक घटक दुर्लक्षीलेला होता. मार्क्सने आर्थिक घटकाला प्राधान्य देवून तो प्रकाशात आणला. मॅक्सी आणि ग्रे या विचारवंतांनी मार्क्सबद्दल असे म्हटले आहे की, "मार्क्सच्या तत्वज्ञानात कितीही दोष असले तरी तो १९ व्या शतकातील अत्यंत प्रभावी विचारवंत होता. त्याचे तत्वज्ञान जगाचा एक नवा धर्म बनला आहे."

मार्क्सच्या विचारसरणीवर चांगली स्तुतीसुमने उधळली असली तरी जगातील उदारमतवादी विचारवंतांनी त्याच्यावर टिका केली आहे.

**१. विकासाच्या पध्दतीवर आक्षेप -** मार्क्सच्या मते भांडवलशाहीचे उच्चाटन करण्यासाठी व वर्गविरहीत समाज निर्माण करण्ययासठी हिंसक मार्गाचा वापर करावा लागतो. परंतु क्रांतीनंतर मात्र वर्गविरहीत समाज निर्माण करण्यासाठी हिंसक मार्गाची गरज नाही. हे देखील तो मान्य करतो. म्हणून ज्या जाणीवेमुळे क्रांतीनंतरच्या काळात हिंसक मार्ग त्याज्य केला जाईल. त्याच जाणिवेमुळे क्रांतीपूर्वक काळात हिंसा त्याज्य ठरविली जाणार नाही काय? असा विचार उदारमतवादी विचारवंत व्यक्त करतात.

**२. वर्ग संघर्ष आवश्यक नाही -** मार्क्सच्या मते समाजातील संबंध हे नेहमीच संघर्षाचेच असतात. त्यामुळे हिंसात्मक मार्गाचा अवलंब केल्याशिवाय ही वर्ग पध्दती नष्ट होणार नाही. परंतु मार्क्सची ही विचारसरणी बरोबर नाही. कारण समाजातील वर्गामध्ये संघर्ष जितके नैसर्गिक असतात तितकेच सहकार्यही नैसर्गिक असते. समाजातील विविध वर्गाची उभारणी ही श्रमविभागणीच्या तत्वावर झालेली असल्याने सामाजिक सहकार्य ही एक नैसर्गिक गरज आहे. तसेच लोकशाही समाजवादात वर्गसंघर्षापेक्षा वर्गसमन्वयावर जास्त भर दिला जातो.

**३. वर्गविरहीत समाज शक्य नाही -** उदारमतवादी विचारवंतांच्या मते समाजाच्या सर्व अवस्थांमध्ये म्हणजे अत्यंत प्राचीन रानटी अवस्थेपासून तर आधुनिक काळातील अत्यंत प्रगत अशा औद्योगिक अवस्थेमध्येही सामाजिक वर्ग आढळतात. त्यामुळे समाजातून वर्गाची संपूर्ण हकालपट्टी करणे शक्य नाही. तसेच शोषण आणि संघर्ष या दोन गोष्टींवरच समाजातील वर्गाचे संबंध जडलेले असतात असे म्हणता येणार नाही. उलटपक्षी सामाजिक सहकार्यावर आधारलेल्या समाजात वर्गा-वर्गात सहकार्य दिसून येते.

**४) राज्यसंस्थेचा लोप होणे अशक्य -** श्रमिकांची हुकूमशाही संक्रमण काळापुरतीच मर्यादित राहील असे मार्क्स म्हणतो व त्यानंतर वर्गविरहीत समाज निर्माण होईल आणि वर्गविरहीत समाजात राज्याचा कार्यभार संपल्यामुळे राज्य लोप पावेल, असे मार्क्स म्हणतो. परंतु राज्याचा लोप होण्यासाठी सत्ता त्यागाची आवश्यकता असते. सत्तेचे आकर्षण प्रत्येक माणसाला असल्यामुळे सत्तात्याग कठीण असते. म्हणून मार्क्सवादी म्हणतात त्याप्रमाणे राज्यसंस्थेचा लोप होणे शक्य नाही. उलट राज्याचे प्राबल्य वाढण्याचीच अधिक शक्यता आहे. उदा. रशियातील साम्यवादी क्रांतीस ७० वर्षे लोटूनही तेथे राज्याचे प्राबल्य कमी होण्याची कोणतीच लक्षणे दिसत नाहीत.

**५) मार्क्स चुकलेला भविष्यकर्ता -** भांडवलशाहीचा विनाश हा मार्क्सच्या सिध्दांताचा गाभा होय. मार्क्सच्या सिध्दांतानुसार भांडवलशाही जसजशी वाढते तसतसा वर्गसंघर्ष वाढेल व कामगार एकजूट करुन क्रांती करतील आणि भांडवलशाही उलथून पाडतील. तसेच सर्वात जास्त विकसीत देशांमध्ये क्रांती

प्रथम होईल, असे मार्क्सचे भाकित होते. परंतु २० व्या शतकाचा इतिहास पाहता मार्क्सचे भाकित चुकलेले दिसते. मार्क्सच्या भाकितानुसार इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका इ. प्रगत देशात सर्वप्रथम साम्यवादी क्रांती व्हावयास हवी होती. पण तसे आढळून येत नाही.

***

## प्रकरण १०

# मॅक्सवेबर (Maxweber)

## (इ.स. १८६४ ते १९२०)

**जीवन परिचय -**

मॅक्सवेबर हा समाजशास्त्रीय विचारवंत होता. वेबरचा जन्म २१ एप्रिल १८६४ मध्ये जर्मनीत झाला. त्याच्या आई-वडीलांची घराणी प्रॉटेस्टंट मताची होती व त्यामुळे सालझ वर्गमध्ये कॅथालिक (पक्षीयांनी) पंथीयांनी केलेल्या छळास कंटाळून वेबरचे पूर्वज बिएलफिल्ड येथे जावून राहिले. या शहरी त्याच्या आजोबांनी व्यापार सुरु केला. व अल्पावधीतच वेबर घराणे सुखवस्तू, श्रीमंत झाले. वेबरचे वडील नोकरीक्षेत्रात शिरले. एरफर्ट येथे ते मॅजीस्ट्रेट असतांनाच वेबरचा जन्म झाला. राजकारणातील रुचीमुळे वेबरच्या वडीलांनी नोकरी सोडली व ते राजकारणात शिरले.

लहानपणी वेबर अशक्त, लाजाळू व एकलकोंड्या वृत्तीचा होता. परंतू बुध्दीने तल्लख होता. त्याचे वाचन दांडग्या स्वरुपाचे होते. लहानपणापासूनच होमर, सिसिरो यासारख्या विचारवंतांच्या ग्रंथाचे त्याने वाचन केले. गटे, स्पिनोझा, कान्ट, व शोपेनहर यांच्या तत्वज्ञानाशीही त्याचा चांगला परिचय होता.

वेबरची आई स्वभावाने अतिशय कडक होती. तरीही घरात खरी सत्ता वडीलांचीच होती. वेबरला तारुण्यात बीअर पिण्याचे व द्वंद्व युध्दाचे मनस्वी आकर्षण होते. त्याच्या या आकर्षणामुळे वेबरचे वाचन, मनन व चिंतन यात जरादेखील खंड पडला नाही. कायदेशास्त्राचे त्याचे अध्ययन चांगलेच सखोल होते. कायद्याप्रमाणे इतिहास, तत्वज्ञान, अर्थशास्त्र इ. चा त्याने अभ्यास केला. त्याच्या चुलत भावाबरोबर त्याने धर्मशास्त्राचाही अभ्यास केला. वयाच्या १८ व्या वर्षी हायडेलबर्न विद्यापीठात दाखल झालेला वेबर तीन वर्षांनी बाहेर पडला. द्रासवर्गला येवून सैन्यात दाखल झाला व काही कळ आपल्या मावशीकडे राहिला. मावशीच्या व तिच्या यजमानांच्या प्रभावाखाली

त्याच्या बौध्दिक विकासावर परिणाम झाला. तिच्याच प्रभावामुळे वेबरच्या मनात धर्म व धर्मग्रंथाविषयी ओढ जागृत झाली. वाचन व मनन याबरोबरच जर्मन राजकारणाविषयी त्याला आकर्षण होते. परंतू काही कारणास्तव त्याला राजकारणात पडता आले नाही.

१९५८ मध्ये त्याने प्रथम व्हिएन्ना विद्यापीठात प्राध्यापकाचे कार्य केले. नंतर म्युनिच विद्यापीठात जाऊन व राजकारण यावर त्याची गाजलेली भाषणे १९१९ मध्ये झाली. युध्दकाळात वेबरने त्याच्या धर्माच्या तौलनिक अध्ययनाचे काम संपविले व याच काळात "भारतीय धर्म" व " चिनी धर्म" हे ग्रंथ प्रसिध्द केलेत. "अर्थव्यवस्था व समाज" हा ग्रंथ तो पूर्ण करु शकला नाही. १९२० मध्ये निमोनियाने त्याचा बळी घेतला.

**मॅक्सवेबरच्या अधिकार संबंधीचा विचार :**

अधिकार किंवा सत्ता यासंबंधी मॅक्सवेबरच्या विचारांचे मुल्यमापन करण्यापूर्वी अधिकार म्हणजे काय? तसेच त्यांचे स्वरुप लक्षात घेणे आवश्यक आहे. अधिकाराचा संबंध शक्ती किंवा सामर्थ्याशी असतो आणि सामर्थ्याचा संबंध प्रभाव आणि नेतृत्वाशी असतो. अधिकार किंवा सत्ता ही संकल्पना निरनिराळ्या अर्थाने वापरण्यात आलेली आहे.

१. व्यक्तिची मालमत्ता किंवा व्यक्तीचे पद या अर्थाने सत्ता या शब्दाचा वापर केला जातो. या आधारावर आदेश देण्याचा अधिकार समर्थनीय मानला जातो.

२. दोन पदातील परस्पर संबंध या अर्थाने अधिकार हा शब्द वापरण्यात येतो. अशी दोन पदे म्हणजे श्रेष्ठ कनिष्ठ या स्वरुपाची होत. या आधारावर कनिष्ठांकडून श्रेष्ठांचे हुकूम आणि आदेश पाळले जातात. वरिष्ठ अधिकाऱ्याला अशी जाणीव असते की, त्यांना आदेश देण्याचा अधिकार आहे व कनिष्ठांना असे वाटत असते की, त्यांना हे आदेश पाळावयाचे असतात.

३. पुढारी आणि अनुयायी यांच्यातील सं-सूचन या अर्थाने देखील अधिकार किंवा सत्ता हा शब्द प्रचलित आहे. या सं-सूचनाचे स्वरुप पुढारी आणि अनुयायी यांच्यातील सत्ता संबंधांवर अवलंबून आहे. या आधारावरच अनुयायी पुढारी लोकांची सत्ता मानीत असतात.

**अधिकाराच्या व्याख्या -**

"निर्णय किंवा कृती व्यवहार यासंबंधी मान्यता किंवा कार्यकृती प्राप्त करण्याची क्षमता याला सत्ता किंवा अधिकार असे म्हणतात." "विशिष्ट समुदायामध्ये श्रेष्ठत्व प्राप्त करण्याच्या दृष्टीने उपजत असलेली किंवा प्राप्त केलेली क्षमता म्हणजे सत्ता किंवा अधिकार होय." असे मिचेल म्हणतो.

"सत्ता किंवा अधिकार सरतेशवेटी तुमच्या क्षमतेवर अवलंबून असणार." क्षमतेच्या ऐवजी दोन पदांमधील संबंध म्हणजेच अधिकार अशी व्याख्या बिर्स्टेडने केलेली आहे. शक्तीचे बाह्य व प्रगट स्वरुप म्हणजे सत्ता होय. संस्थात्मक शक्ती म्हणजे अधिकार असाही अधिकाराचा अर्थ केला जातो. सत्तेचा संबंध ज्यावेळी शक्तीशी असतो त्यावेळी मान्यता आणि कार्यपूर्ती व्यक्तीच्या आधारावर प्राप्त केली जाते. प्रभावाच्या संबंधात त्याचे स्वरुप अनुयायासारखे असते. नेतृत्वाच्या बाबतीत ते श्रेष्ठत्व किंवा संमोहक या स्वरुपाचे असते. अधिकार किंवा सत्तेची ही संकल्पना राज्यशास्त्रात नवीन नाही. प्लेटो ते ॲरिस्टॉटल यांच्या काळापासून ते आजच्या राजकिय विचारांपर्यत अधिकारांचा विचार होत आलेला आहे. ग्रीन आणि रुसो यांनी राजकिय बंधनांच्या संबंधात या कल्पनेचा परामर्श घेतला होता हे आपल्याला माहितच आहे. आधुनिक राजकिय विचारांमध्ये या कल्पनेचा अभ्यास अनुभव पध्दतीने करण्यात येतो. अधिकार किंवा सत्ता हा शब्द नवीन जरी असला तरी त्याच्या स्वरुपामध्ये सतत बदल होत आहेत. राजकिय क्षेत्र सोडून इतर क्षेत्रामध्ये देखील आपल्याला सत्तेचा प्रादुर्भाव आढळून येतो. उदा. कुटूंब, गट किंवा समुह, धार्मिक पंथ, व्यावसायीक संघ यातही सत्तेचा संबंध येतो आणि म्हणूनच सत्तेचे निरनिराळे प्रकार आहेत. उदा. पितृसत्ता, मातृसत्ता, समूहसत्ता किंवा गटसत्ता इ.

**मॅक्सवेबरने प्रतिपादन केलेले अधिकाराचे आधार -**

मॅक्सवेबर या समाजशास्त्रज्ञाने अधिमान्यतेच्या आधारावर सत्तेचे तीन प्रकार सांगितले आहेत-

**१) वैधानिक व विवेक संपन्न सत्ता -**

समाज आणि राज्य यांचे विधीनियम आणि लोकांची विवेक शक्ती यात अधिकाराचे अधिष्ठान असते. कायद्यानुसार ही सत्ता अंमलात येत

असल्यामुळे लोक त्या सत्तेला मान देतात. सत्तेचा वापर होत असतांना तिला कायद्याच्या आधारे लोकांचीही मान्यता मिळते. जे विधिनियम तयार केले जातात ते लोकांच्या विचारांचा परिपाक आहे आणि म्हणून विधिनियमानुसार जी सत्ता अंमलात येते तिची अधिमान्यता ही लोकसंमती असते. असे जे विधि ीनियम असतात आणि आदेश दिले जातात त्यांचे स्वरुप व्यक्तिरहीत असे असते. केवळ कायद्याच्या आधारावर अधिकार प्राप्त होत असतात, असे नव्हे तर त्यामागे लोकसंमतीची देखील आवश्यकता असते. जनता सर्वसामान्यपणे कायद्याचे पालन करते. याचे कारण कोणत्याही व्यक्तिने आपल्या लहरीनुसार आणि मर्जिनुसार कायदे तयार केलेले नसतात. तर कायद्यामध्ये लोकइच्छा सामावलेल्या असतात. व कायद्याला घटनेचे पाठबळ असते. सामाजिक जीवनाच्या दृष्टीने जी मुल्ये श्रेष्ठ मानली जातात त्यांच्या कसोटीत हे विधिनियम उतरत असतात. शक्ती धारण करणारा अधिकारी आदेश देतो पण तो आदेश स्वतःच्या लहरीनुसार तो देत नसतो. ज्या नियमांच्या आधारे तो हे शक्तीचे पद धारण करतो त्या नियमांचे बंधन त्याच्यावर हे आदेश देत असतांना असते. अनेक लोकांच्या सहजीवनातून अधिकृत होणारी जिवनावृत्ती तिला आपण संस्था मानतो तिचे देखील काही नियम असतात. नियमांच्या द्वारा संस्थेची कार्यकक्षा मर्यादित केलेली असते व त्या आधारे अधिकाऱ्याच्या सत्तेचे न्यायक्षेत्र निश्चित केले जात असते.

अन्य कोणत्याही अधिसत्ता प्रकारापेक्षा कायदेशीर अधिसत्ता अधिक सुस्थिर स्वरुपाची असते. एखाद्या प्रधानमंत्र्याला लोकविरोधामुळे राजीनामा द्यावा लागला तरी संसदिय लोकशाहीची मुळ चौकट कधीच धोक्यात येवू शकत नाही. म्हणून मॅक्सवेबरने सांगितलेल्या अधिकाराचा आणि अधिमान्यतेचा वैधानिक आधार महत्वाचा मानला जातो.

### २) पारंपारिक सत्ता -

सामाजिक जीवनामध्ये परंपरांना विशेष महत्व असते. राज्यकर्त्यांच्या सत्तेला लोकांकडून मान्यता जेव्हा पिढ्यान-पिढ्यांवर आधारलेली असते तेव्हा त्यातून निर्माण होणाऱ्या अधिसत्तेला वेबरच्या वर्गीकरणात पारंपारिक अधिसत्ता असे म्हटले जाते. अधिजन जातीच्या टोळीप्रमुखाची अधिसत्ता ही अशाच प्रकारची असते. कुटूंबामध्ये वडील

पुरुषांची हुकूमत सर्व लोकांवर प्रस्थापित होते व त्या वडील पुरुषाची सत्ता कुटूंबातील सर्व लोक मानतात. कारण अशी सत्ता सामाजीक परंपरेतून निर्माण झालेली असते. पिलाची मुलांवर, पतीची पत्नीवर आणि मालकाची नोकरावर सत्ता असते आणि असलेली अधिसत्ता ही पारंपारिक अधिसत्ता असते. पवित्र आणि अभंग अशा नियमांची जी पध्दती निर्माण झालेली असते त्यामध्ये त्या सत्तेचे निर्धारण होत असते. अशा सत्तेच्या वापरामध्ये सत्ताधीश स्वतःच्या इच्छेनुसार सत्ता गाजवित असतो. त्यामुळे परंपरांवर आधारित असलेली अधिसत्ता ही व्यक्तिगत स्वरुपाची असते. ती विवेक संपन्न असते. अर्थातच समाजाच्या बदलणाऱ्या स्वरुपानुसार या पारंपारिक सत्तेची अधिमान्यता ही ढळमळीत स्वरुपाची झाली आहे. उदा. पतीची पत्नीवरील सत्ता सुधारणे त्या समाजात अधिमान्य म्हणून समजली जात नाही. ब्रिटनमध्ये संपूर्ण देशाचा कारभार हा पारंपारिक अधिसत्तेच्या आधारावर चालतो. रुढी नियम नसल्यामुळे वैधानिक अधिसत्तेच्या तुलनेत पारंपारिक अधिसत्तेचे स्वातंत्र्य निश्चित जास्त असते हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

**३. दिव्यवलयी अधिसत्ता, संमोहक अधिसत्ता -**

जेव्हा सत्ताधारकापाशी काही दिव्यशक्ती व अलौकिक गुण आहेत अशी लोकांची खात्री असते आणि त्यामुळे ते त्याच्यावर, त्याच्या अलौकीत्वावर संपुर्ण विश्वास ठेवून त्याच्या आज्ञांचे, नियमांचे, निमुटपणे पालन करतात. जेव्हा दिव्यवलयी अधिसत्ता अस्तित्वात आलेली असते. ही अधिसत्ता अलौकीक मानल्या गेलेल्या सत्ताधाऱ्यांची व्यक्तिगत सत्ता असते. त्यामुळे निर्णय घेण्याचे अमर्याद स्वातंत्र्य अशा सत्ताधारकास असते. त्याच्या अधिसत्तेचे मुळ त्याच्या व्यक्तिगत गुणवैशिष्ट्यांमध्ये असल्यामुळे तो सत्ताधीश स्वतःवरील तेवढ्याच मर्यादा त्याच्या अधिसत्तेवर पडतात. परंतु जोपर्यंत सत्ताधारण करणारा आपल्या कार्यात यशस्वी होतो तोपर्यंत त्याच्या अलौकीक सत्तेवरचा विश् वास लोकांचा टिकून राहातो. पण जर तो सत्ताधारी आपल्या कार्यात अपयशी झाला तर त्याच्या अधिसत्तेचा डोलारा कोसळल्याशिवाय रहात नाही. कारण त्याची अधिमान्यता फक्त व्यक्तीगत यशावर अवलंबून असते. त्यामुळे मॅक्सवेलरचे असे मत आहे की, "अधिसत्तेच्या इतर दोन प्रकारापेक्षा दिव्यवलयी अधिसत्ता ही अधिक अस्थिर असते." ही अस्थिरता दूर

करावयाची असेल तर प्रथम दिव्यवलयी सत्ताधारक आपल्या दिव्यवलयाने संस्थात्मक अधिष्ठान प्राप्त करतो. म्हणजे त्याचे दिव्यवलय नाहीसे होत नाही.

अशाप्रकारे मॅक्सवेबरने अधिकाराच्या अधिमान्यतेचे तीन आधार सांगून अधिसत्तेचे त्या आधारे तीन प्रकार केले आहेत. या तिन्ही सत्तेचा परस्पर संबंध कसा असतो हे पाहणे देखील तितकेच महत्वाचे आहे.

दिव्यवलयी व्यक्तिमत्वामुळे अधिसत्तेला जनतेची अधिमान्यता प्राप्त होत असते.  दिव्यवलयी सत्ता ही नैसर्गिक स्वरुपाची असते. अशा सत्तेचा आधार लोकांचा विश्वास असतो. व्यक्तिच्या ठिकाणी अलौकिक गुण आहेत अशा लोकांचा विश्वास असेल तर ते लोक त्या व्यक्तिच्या आज्ञेचे पालन करतात. उदा. हिटलर, कार्ल मार्क्स, पं. नेहरु यांच्या ठिकाणी असे संमोहक व्यक्तिमत्व होते आणि म्हणूनच ते लोकांच्या आधाराला प्राप्त ठरले. निसर्गतःच काहींच्या अंगी अलौकिक गुण असतात अशी लोकांची भावना असते. हे गुण अधिभौतिक स्वरुपाचे मानले जातात, आणि ते संमोहक व्यक्तिमत्वाच्या ठिकाणीच आढळुन येतात असा लोकांचा समज असतो. संमाहेक व्यक्तिमत्वाचे व्यक्तित्व इतरांवर प्रभाव टाकू शकते. पण संमोहक व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाची विकृती निर्माण झाली तर त्या व्यक्तिची सत्ता नाहीशी होते.

अशाप्रकारे मॅक्सवेबरने अधिकाराच्या मान्यतेचे तीन आधार आणि तीन प्रकार स्पष्ट केले. परंतू याठिकाणी एक महत्वाची गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे ती म्हणजे मॅक्सवेबरने केलेले अधिसत्तेचे हे तीन प्रकार म्हणजे अधिसत्ता संबंधीत तीन आदर्श रुपे आहेत. कोणत्याही अधिसत्तेशी कोणताही प्रकार तंतोतंत जुळणार नाही याची जाणीव मॅक्सवेबरला तसेच प्रत्यक्ष अधिसत्तेत या तीनही आदर्श स्वरुपाची लक्षणे विश्वस्वरुपात आढळतील हे त्याने मान्य केले आहे. पण प्रत्यक्षात तीन अधिसत्तांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने व विश्लेषण करण्याच्या दृष्टीने या आदर्श प्रवृत्तीचा साधन म्हणून मात्र उपयोग केला जावु शकतो. प्रत्यक्षामध्ये व्यक्तिच्या अधिसत्तेला मॅक्सवेबरने सांगितलेले तीनही आधार मान्य असतात. आदर्श स्वरुपाच्या मांडणीमधून अधिसत्तेची दैवी, पारंपारिक विधीजन्य ही क्रांती मॅक्सवेबरला मान्य होती असे काही अभ्यासक मानतात. आधुनिक काळात राजकिय व्यवस्थेची उभारणी

विवेकी विधीजन्य अधिसत्तेच्या संकल्पनेवर झालेली असली तरी अधिक शिस्त समाजामध्ये दिव्यवलयी व पारंपारिक या दोन्ही प्रकारच्या अधिसत्ता पहाययला सापडतात. उदा. श्रीमती इंदिरा गांधी प्रधानमंत्र्याच्या पदाने त्यांना दिलेल्या अधिसत्तेच्या कितीतरी मोठी होती आणि ही भर त्यांच्या दिव्यवलयी अधिसत्तेशी घातली होती, एवढे मात्र खरे. प्रगतीशिल व औद्योगिक प्रधान समाजात दिव्यवलयी अगर पारंपारिक आधारीत सत्तेला तेवढे महत्व नसते.

**मॅक्सवेबरचे नोकरशाही विषयक विचार -**

मॅक्सवेबरच्या नोकरशाही विषयक विचारांचा अभ्यास करण्यापूर्वी नोकरशाही म्हणजे काय? तिचे स्वरुप कसे असते? याचा विचार करणे आवश्यक आहे. आधुनिक काळात ग्रिकशाहीचे महत्व फार वाढले आहे. समाज हा दिवसेंदिवस गतीमान होत आहे. या गतीमानतेतून सार्वजनिक स्वरुपाचे लहानमोठे प्रश्न निर्माण होत आहेत. या प्रश्नाची सोडवणूक करुन व्यवस्थेचे स्थैर्य वाढविण्याची प्रमुख जबाबदारी शासनाची आहे. 'Bureracueracy' या शब्दापासून नोकरशाही तयार झाला आहे. Bureau-cracy-Bureau - मेज, टेबल cracy- सत्ता/शक्ती) त्यामुळे प्रथम काळाशी संबंधीत असलेल्या रचनांची फार मोठ्या प्रमाणात निर्मिती करणे आवश्यक आहे. लोकांच्या वाढत्या महत्वाकांक्षा, अपेक्षा, गरजा यांची पुर्तता करणे शासन संस्थेचे महत्वाचे कार्य आहे. समाजात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे एवढीच शासनाची जबाबदारी आजच्या काळात राहिलेली नाही. या पारंपारिक कार्याबरोबरच विविध प्रकारची आर्थिक आणि सामाजीक कार्ये देखील शासन संस्थेला पार पाडावी लागतात. कल्याणकारी राज्याच्या कल्पनेत राज्याच्या कार्यात प्रचंढ वाढ झाली आहे. शासनसंस्था हे राज्याचे मुख्य स्वरुप असल्याने राज्याचे वाढते कार्य सरतेशेवटी शासन संस्थेला करावे लागणार. परंतु प्रत्यक्षात ही सर्व कामे कार्यकारी क्षमतेने आणि जबाबदारीने पार पाडण्याच्या दृष्टीने शासनाला सरतेशेवटी सेवक नोकर वर्गावरच अवलंबून रहावे लागणार. त्यामुळे नोकरशाहीचे महत्व राजकिय व्यवस्थेत वाढत आहे. शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी करणाऱ्या नोकरांच्या संख्येत सतत वाढ होत आहे. प्रशासकिय अधिकारांच्या यासंबंधी सेवकांच्या संघटनाही निर्माण झालेल्या आहेत.

गुणवत्ता तत्वाचा स्विकार कार्यकालाच्या बाबतीत त्यांना लाभलेली सुरक्षितता, धोरण निर्मितीत आवश्यक असलेल्या माहितीवरील नियंत्रण, त्यांच्या वाढत असणाऱ्या संघटना आणि संघटनावाद त्यामुळे नोकरवर्ग एक महत्वाची शक्ती आहे. कोणत्याही शासनाची कार्यक्षमता शेवटी सनदी सेवकांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून राहू लागली आहे. आधुनिक काळात हितसंबंधाचे कार्य करण्याचे ज्या रचनांकडे असते त्या राजकीय पक्षासारख्या रचना स्पष्ट स्वरुपात विकसित झाल्या नसतील तर आदान प्रक्रियेमध्ये देखील सनदी सेवकांना कार्य करावे लागते. याचा अर्थ राजकिय व्यवस्थेची आदान-प्रदानाची कार्ये विकसनशिल देशात सनदी सेवकांना करावी लागतात. त्यामुळे सनदी सेवकांचे स्वरुप, त्यांची वैशिष्ट्ये, त्यांची कार्यपध्दतीतसेच राजकिय व्यवस्थेचे स्थान या सर्व विषयांचा अभ्यास मोठ्या प्रमाणावर होवु लागला. आधुनिक काळात समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून नोकरशाही यंत्रणेच्या अभ्यासाला महत्व प्राप्त झाले आहे. मॅक्सवेबर या जर्मन विचारवंताने मांडलेल्या नोकरशाही विषयक विचारांचे परिक्षण जर्मनीत रॉबर्ट प्रिस्ट, ग्लाऊकन इ. अभ्यासकांनी केल्यानंतर नोकरशाही संबंधीच्या नवीन जाणीवा अस्तित्वात आल्या. नोकरवर्ग हा समाजापासून अलिप्त राहू शकत नाही. तसेच या वर्गाला दुसऱ्याशी सहकार्य करण्यासाठी रहावे लागते. यंत्रणा व नियंत्रण यामुळे नोकरवर्ग संघटीत झालेला असतो. यामुळे नोकरवर्गाचा मानवी संबंध अस्तित्वात येतो. व्यवस्थेची कार्यक्षमता ही मानवी संबंधावर अवलंबून असल्यामुळे नोकरशाहीला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. नोकरवर्गाची कौटुंबिक, आर्थिक पाश्र्वभूमी, श्रेष्ठ-कनिष्ठ, योग्य-अयोग्य याविषयी त्यांनी मांडलेले मुख्य उद्दिष्ट, विशिष्ट रितीने त्यांचे झालेले सामाजीकरण या सामाजीक शक्तींचा प्रभाव नोकरवर्गावर म्हणजेच शासनाच्या प्रदान रचनेवर असतो. डिर्माक ॲन्ड डिमॉक यांनी म्हटल्याप्रमाणे प्रशासकिय वर्गाचे दुहेरी संबंध असतात. सामाजीक संदर्भात प्रशासकिय यंत्रणा कार्य करते. या संदर्भात ती नियंत्रीत होते. पण प्रशासकिय वक्तृत्व हे समाजास नेतृत्व देवु शकते. समाजाच्या गरजा भागविण्यासाठी सहाय्यभूत केलेल्या अशा प्रकारच्या जाणीवा झाल्याने समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून नोकरशाहीच्या अभ्यासाला महत्व प्राप्त झाले आहे. नोकरशाहीची व्याख्या करतांना डिमॉक ॲन्ड डिमॉक

यांनी असे सांगितले, "पदसोपानातून औपचारिक रचना स्विकारणे, विशिष्ट बाबींचे ज्ञान असलेल्या विभिन्न व्यक्तिमध्ये कार्याचे वाटप करणारी संयुक्त प्रकारच्या परस्पर संबंधांपेक्षा दिर्घ लांबीची रचना, रेषा महत्वाची मानणारी, नियम आणि नियंत्रण या बाबतीत अधिक भर देणारी एकूण कामकाजाच्या प्रक्रियेत व्यक्तिनिरपेक्ष महत्वाची मानणारी अशी कोणतीही संघटना नोकरशाही या संज्ञेस प्राप्त ठरते."

नोकरशाहीची ही संकल्पना मॅक्सवेबरने विशिष्ट अर्थाने प्रथम वापरली. अर्थशास्त्रातील विचारप्रणालींचा पुरस्कर्ता गुस्ताव स्मॉलेर याने असे म्हटले आहे की, "राजेशाही आणि राजाचा नोकरवर्ग, नैतिकता आणि कार्यक्षमता याचे प्रतिनिधीत्व करतो." या विचारांचा प्रभाव मॅक्सवेबरच्या नोकरशाही विषयक विचारांवर पडला असावा असे बोण्डीक्स आणि लिपसेट यांनी म्हटले आहे. 'The theory of social and economic orgnization' या ग्रंथात मॅक्सवेबरने नोकरशाही या संकल्पनेतील आशय स्पष्ट केला आहे. त्याने नोकरशाहीची पुढीलप्रमाणे लक्षणे सांगितली आहेत.

१) विकसित व स्पष्टपणे नियम स्वरुपात अस्तित्वात असलेल्या प्रशासकिय भूमिका.
२) परिक्षण पध्दतीतून मांडलेल्या गुणवत्तेच्या आधारे सनदी सेवकांच्या नेमणूका होत असतात.
३) नेमणूकीनंतर बदली आणि बढती यासाठी सर्वच समान तत्वांचा स्विकार केला जातो.
४) सरकारी नोकरी म्हणजे स्वतःचा आयुष्यक्रम मानणारा व नियमित वेतन मिळविणारा असा नोकर वर्ग.
५) विचारपूर्वक निर्माण केलेली पदसोपान यंत्रणा
६) जबाबदारीचे तत्व आणि शिस्त या गोष्टींनी निर्धारित केलेल्या चौकटीत राहून प्रशासकिय निर्णय घेण्याची पध्दती.

अशाप्रकारे मॅक्सवेबरने अभिप्रेत असलेली नोकरशाहीची संकल्पना प्रुधा या लेखकाने अधिक चांगल्याप्रकारे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. तो म्हणतो, "अनेक पदाधिकाऱ्यांची उत्तर आणि पूर्व रचना आणि पदसोपान दृष्टीरचना अस्तित्वात असते. प्रत्येक पदाधिकाऱ्यांची भूमिका त्याला स्पष्टपणे

प्राप्त करुन दिलेल्या अधिकाराद्वारे मर्यादित असते. प्रत्येक संभाव्य मार्गदर्शनासाठी नियम आणि कार्यपध्दती विषयक तरतूद केलेली असते. सर्व विशिष्ट नोंदी व कागदपत्रे यांची जपणूक करण्यासाठी एक कार्यालय आणि कचेरी असते. सर्व माहिती लिखित स्वरुपात नोंद केलेली असते. हा प्रशासकिय व्यवस्थेच्या वैचारिकतेचा महत्वाचा भाग मानला जातो. व्यक्तिगत कार्य व संघटनात्मक कार्य यामध्ये भेद केलेला असतो व विशिष्ट पदासाठी त्या पदाशी संबंधीत कार्यात प्रविण असलेल्या व्यक्तिची करार पध्दतीने नेमणूक करुन तो फरक दृढ करण्यात येतो. प्रुधा या शास्त्रज्ञाने मॅक्सवेबरने प्रतिपादन केलेल्या नोकरशाही सबंधीचा आशय स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतू मॅक्सवेबरच्या नोकरशाही विषयक संज्ञेमध्ये एक आणखी महत्वाची गोष्ट आहे ती म्हणजे अधिक मुक्त आणि स्वतंत्र होण्याची मानवी प्रेरणा, नोकरशाहीच्या उदयाच्या मागे आहे असे त्याला वाटे." "मनुष्याच्या कार्यक्षमतेची सर्व अभिव्यक्ती म्हणजे नोकरशाही" असे वेबरचे मत अत्यंत वास्तववादी स्वरुपाचे आहे. सनदी सेवक यांचा गुलाम म्हणून वेबरने कधीच विचार केला नाही किंवा मोठ्या आकाराच्या गुलामांच्या संघटनेला त्याने नोकरशाही म्हटलेली नाही. राजकिय व्यवस्थेत नोकरशाहीला विशेष महत्व असते. ते संघटनात्मक दृष्टीकोनातून वेबरच्या मते, "व्यक्ति आणि समाज यांच्यातील संबंध गुंतागुंतीचे झाल्याने व मोठ्या संघटनांमध्ये आर्थिक कार्यक्षमता आणि वैचारिकता यांना महत्व प्राप्त झाल्याने नोकरशाहीचा प्रकार अस्तित्वात आला." तंत्रविषयक प्राविण्यावर आधारित व्यवस्थापण हे वेबरला अभिप्रेत होते. अंदाज वर्तविता येईल अशी निर्णय प्रक्रिया हे नोकरशाहीचे महत्वाचे अंग वेबरने मांडले व त्यासाठी विशिष्ट बाबतीत प्राविण्य संपादित केलेल्या व्यक्तिंची नेमणूक महत्वाची असते असे त्याने सांगितले. परसोपानयुक्त रचनेमध्ये प्राविण्य संपादन केलेल्या लोकांचे समावेशन असते व त्यामुळे नोकरशाही कार्यक्षम सिध्द होते. वेबरने सरतेशेवटी नोकरशाहीबाबत असे म्हटले की, "आधुनिक नोकरशाहीयुक्त शासन हे अलौकिक किंवा पारंपारिक अधिकाराखाली प्रशासनापेक्षा तांत्रिकदृष्ट्या अधिक श्रेष्ठ असते." मॅक्सवेबरने आपल्या समाजशास्त्रीय विचारांमध्ये अधिकारांच्या संदर्भात लोकशाहीचा विचार केलेला आहे. तो विचार करित असतांना त्याने रुढी-प्रथा-

परंपरा यावर अधिष्ठीत असलेले, सत्ता अलौकीक व्यक्तिमत्वावर आधारलेली अधिसत्ता आणि कायद्यावर आधारलेली सत्ता या तीन प्रकारच्या सत्तांपैकी केवळ कायद्यावर आधारित असण्यापेक्षा सत्तेच्या संदर्भातच नोकरशाहीचा विचार केलेला आहे. किंबहूना त्याचे कायदाधिष्ठीत प्रभुत्वाबाबतचे विवेचन म्हणजे नोकरशाही विषयक विवेचन होय. संघटनेतील सभासदांच्या वर्तनावर बंधनकारक असणारा कोणताही नियम सर्वांच्याच संमतीने स्विकृत आणि प्रस्तापित झालेला असतो. हे नियम संघटनेच्या उद्देशपुर्तीसाठी असल्याने संघटनेतील सभासदांचे वर्तन या नियमांना अनुसरुनच असावे अशी अपेक्षा त्याने केली आहे. परंतु नोकरशाही संबंधीचा त्याचा हा विचार वास्तवतेला धरुन आहे असे म्हणता येणार नाही. केवळ औपचारिक दृष्टीकोनातून प्रशासकिय संघटनेचा विचार करणे योग्य ठरत नाही. समाजातील विविध प्रक्रियांच्या संदर्भात नोकरशाहीच्या भूमिकेचे मात्र त्याने विवेचन केले. एवढेच नव्हे तर त्या संबंधात मुल्यनिरपेक्ष विचार मांडला. मॅक्सवेबरच्या नोकरशाहीमधील विचारांमध्ये त्याने राजकिय तटस्थतेचाही विचार केला आहे. व राजकिय तटस्थता हे नोकरशाहीचे आणखी एक वैशिष्ट्य सांगितले आहे.

**परिक्षण -** मॅक्सवेबरचे नोकरशाही विषयक विचार अत्यंत महत्वपूर्ण असले तरी त्याच्या विचारांमध्ये कोणत्या उणिवा होत्या हे पाहणे महत्वाचे आहे. त्याच्या विचारातील दोष दर्शविण्याचा काही विचारवंतांनी प्रयत्न केला आहे. संघटनेमध्ये काम करणाऱ्या व्यक्तिव्यक्तिमध्ये अनौपचारिक संबंध प्रस्थापित होवू शकतात व या अनौपचारिक संबंधाचा परिणाम कार्यक्षमतेवर होवू शकतो. याकडे वेबरने दुर्लक्ष केल्याचे दिसते. वेस्टर बर्नाड या लेखकाने अनौपचारिक संघटनेचा मुद्दा प्रामुख्याने उपस्थित केला आहे. तो म्हणतो, "औपचारिक संघटनेची सू-संचरनाची कार्ये सुसंगती व एकजीनसीपणा व्यक्तिचे व्यक्तिगत स्वरुप यांचे रक्षण करण्याचे कार्य अनौपचारीक संघटनाच करु शकतात." अलौकीक व्यक्तिमत्व, वैचारिकता, अनौपचारिक संबंध इ. घटकांचा नोकर यंत्रणेवर प्रभाव पडत असतो याचा विचार वेबरने केलेला दिसून येत नाही. नोकरशाही संबंधी विचार करतांना त्यांच्या प्राविण्याचा, कौशल्याचा आणि ज्या नियमांवर विशेषकरुन वेबरने विचार केला. परंतु औपचारिक संघटनेतील सनदी नोकर हे त्यामुळे संकूचित मनोवृत्तीचे बनतात. कायदे व नियमांना

विशेष महत्व देतात. परिणामस्वरुप दप्तर दिरंगाई, भ्रष्टाचार, लालफित इ. दोष निर्माण होण्याचा धोका संभवतो. हा धोका टाळावयाचा असेल तर अनौपचारिक बाबींना आणि राजकिय नियंत्रणाला महत्व दिलेच पाहिजे.

**मॅक्सवेबरचे नेतृत्वासंबंधी विचार -**

मॅक्सवेबर हा खऱ्या अर्थाने समाजशास्त्रज्ञ होता. त्यामुळे त्याचे राजकिय विचार त्याने समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून प्रतिपादन केलेले असल्यामुळे त्याच्या विचारांमध्ये नेतृत्वाच्या प्रश्नांचा सखोल विचार केला आहे. सदैव गुणांवर अधिष्ठीत असलेल्या प्रभुत्वाच्या संदर्भात त्याने दैवीगुणाधिष्ठित नेतृत्वाचे विवेचन केले आहे. नेतृत्वासंबंधी त्याच्या विचारांचा अभ्यास करण्यापूर्वी आपल्याला सर्वप्रथम दैवी गुणाधिष्ठीत सत्ता आणि दैवीगुणाधिष्ठीत नेतृत्व यातील फरक समजून घेणे आवश्यक आहे. दैवीगुणाधिष्ठीत सत्ता आणि दैवीगुणाधिष्ठीत नेतृत्व यांच्यामध्ये फरक दर्शवायचा असेल तर असे म्हणता येईल की, दैवीगुणाधिष्ठीत नेतृत्वही खऱ्या अर्थाने वैयक्तिक स्वरुपाची सत्ता असून नेत्याच्या अलौकिक सामर्थ्यावर अनुयायांचा विश्वास हा तिचा मुख्य आधार आहे आणि अशा सर्व वैयक्तिक आणि आत्मनिष्ठ स्वरुपाच्या प्रभुत्वाचेच व्यक्तिमध्ये रुपांतर होवून दैवी गुणाधिष्ठीत सत्ता अस्तित्वात येते. हे रुपांतर कसे होते हे समजून घेण्यासाठी दैवीगुणाधिष्ठीत सत्ता अन्य दोन प्रकारांपासून कोणत्या अर्थाने भिन्न आहेत हे विशद करुन सांगणे आवश्यक आहे. दैवी गुणाधिष्ठीत सत्ता ही गुणांच्या अद्वितीयतेवर व त्यांच्या आकस्मिक अभिव्यक्तिवर आधारित आहे. परंपराधिष्ठीत आणि फायदाधिष्ठीत सत्ता याचा आधार अद्वितीय नाही आणि गुणांची आकस्मित अभिव्यक्ती देखील नाही. म्हणजेच या दोन सत्ता मानवाच्या दैनंदिन स्वरुपाच्या व्यवस्थेशी संबंधीत आहेत. दैवीगुणाधिष्ठीत समाज मात्र चाकोरीबाहेर आहे. परंपराधिष्ठीत व कायदाधिष्ठीत सत्ता व्यवस्थेचा संबंध समाजाच्या दैनंदिन गरजांच्या पुर्तीशी व्यवहार्य करण्याचा असल्याने त्यांनाच प्रभूत्व प्राप्त होणे स्वाभाविक नव्हे तर अपरिहार्य आहे. पण जी सत्ता चाकोरीबाहेरची आहे तिला दैनंदिन गरजेच्या पुर्तीशी संबंध असणे शक्य नाही. एखाद्या व्यक्तीत हे प्रभुत्व उदयाला येते. ज्या प्रसंगांमध्ये दैनंदिनतेशी संबंधीत सत्ता व्यवस्था असमर्थ ठरतात, अशाच प्रसंगी दैवीगुणाधिष्ठीत नेतृत्व उदयाला

येते. असे असामान्य प्रसंगांवरुन समाजाचे आणि गटाचे नेतृत्व करणारी व्यक्ती साधारण असू शकत नाही. ती व्यक्ति असाधारण असते. सहाजीकच त्या व्यक्तिच्या अलौकिक सामर्थ्यावरील विश्वास जनतेच्या मनात निर्माण होणे क्रमप्राप्त आहे. या विश्वासावरच नेत्याचे इतरांवर असलेले प्रभुत्व अवलंबून असते. अशा प्रकारच्या नेतृत्वाचा व नैतिकतेचा काहीही संबंध नाही व हे नेतृत्व कोणत्याही विशिष्ट क्षेत्रामध्ये आढळेल असेही नाही. त्याचप्रमाणे गौतमबुध्द, महावीर, छत्रपती शिवाजी महाराज, म. गांधी यांचा दैवीगुणाधिष्ठीत नेतृत्व म्हणून उल्लेख करता येईल. तसेच रॉबीन हुड यांचाही दैवीगुणाधिष्ठीत म्हणून उल्लेख करता येईल. मॅक्सवेबरने दैवीगुणाधिष्ठीत नेतृत्वाचा विचार करित असतांना संघटनात्मक दृष्टीकोनातून विचार केला आहे व समाजाची सहमती आणि मान्यता नेतृत्वासाठी कशी आवश्यक असते हे दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. दैवीगुणाधिष्ठीत नेतृत्व हे प्रसंगांच्या आकस्मिततेमुळे निर्माण होते व नेतृत्व करणाऱ्या व्यक्तिच्या अलौकीक सामर्थ्यावरील विश्वासावर आधारित असणारे हे प्रमुख स्वभावतःच अस्थिर स्वरुपाचे असते. ही अस्थिरता निर्माण होण्यासाठी वेबरने मुख्यतः तीन गोष्टींचा उल्लेख केलेला आहे -

१. नेत्याच्या अलौकीक सामर्थ्यावरील आणि अद्वितीय गुणांवरील असणारा विश्वास स्पष्ट होवू शकेल.
२. नेत्याचे अद्वितीय गुण लुप्त होवु शकतात.
३. नेतृत्व करणाऱ्या व्यक्तिच्या मृत्युनंतर नेता आणि अनुयायी यांच्यातील संबंधाचे विसर्जन होवु शकते. मॅक्सवेबरने दैवी गुणाधिष्ठीत नेतृत्व हे स्वभावतःच अस्थिर असते असे जरी म्हटले असले तरी समाजहिताच्या दृष्टीने या प्रकारच्या प्रभुत्वास स्थायी स्वरुप देण्याचा प्रयत्न नेत्याच्या अनुयायांद्वारे केला जातो. या प्रयत्नांची परिणती दैवी गुणांच्या संस्थाकरणात होवू शकते आणि दैवी गुणांना अनुवांशिक ठरवून कौटुंबिक सत्तेत या नेतृत्वाचे रुपांतर होवू शकते. मॅक्सवेबर असे म्हणतो की, नेतृत्वाचे कश्याहीप्रकारे रुपांतर झाले तरी, त्यातून निर्माण होणारा प्रकार विशुध्द स्वरुपाचा राहू शकत नाही. दैवीगुणाधिष्ठीत नेतृत्वाचे कौटुंबिक सत्तेत रुपांतर

झाले तर या रुपांतराला दैवीगुण व परंपरा तसेच दैवीगुण व कायदा यांचे मिश्रण झालेले आढळते. याचा अर्थ कौटुंबीक सत्ता अगर संस्थात्मक सत्ता हे दैवीगुणाधिष्ठीत नेतृत्वाचे विशुध्द प्रकार करित नाहीत. रुपांतराची ही प्रक्रिया पुढे दिल्याप्रमाणे स्पष्ट करता येईल.

१) एक तर नेताच स्वतः हस्तांतरासाठी स्वतःचा वारस नेमु शकेल. किंवा

२) हस्तांतरासाठी नवीन नेत्याची होणारी निवड दैवी निर्णयावर सोपविता येऊ शकते. किंवा

३) नेत्याचा शिष्यगण वारसाची निवड करु शकतो.

४) नेत्याचे लौकीक गुण अनुवंशिक स्वरुपाचे ठरविले जावून नेतृत्व परंपरागत केले जाते.

५) विशिष्ट धार्मिक निधीद्वारा नेत्याच्या प्रभुत्वाची न्यायता प्रदान करता येते.

वरीलपैकी कोणतीही पध्दत रुपांतरासाठी आणि हस्तांतरासाठी उपयोगात आणली तरी त्या पध्दतीत दैवीगुणाधिष्ठीत नेतृत्वाचे शुध्द स्वरुप बदलले जाते. दैवी न्याय आणि अनुयायांच्या द्वारा निवड या पध्दतीत उपयोगात आणावयाचे ठरविले तर नियम पध्दत नियमांनी बध्द होते. आणि नियमांनी बध्द असलेली सत्ता संख्याकृती संस्था असते. अनुवंशतेची कसोटी वापरुन निवड करावयाची झाल्यास दैवीधिष्ठीत सत्तेचे रुपांतर विशिष्ट घराण्याच्या सत्तेत होते. याला देखील सत्ता हस्तांतर करण्याच्या प्रक्रियेत अनेक समस्या निर्माण होतात. जसा ज्येष्ठ पुत्रास आणि लहानास सत्ता द्यावी हा निर्णय घ्यावाच लागतो पण या परिस्थितीत सत्ता प्राप्तीसाठी संघर्ष होणे आवश्यक होवून बसते.

**राज्यशासन व सत्ता या संबंधीचे मॅक्सवेबरचे विचार -**

मॅक्सवेबर हा खऱ्या अर्थाने समाजशास्त्रज्ञ होता आणि त्यामुळे समाजशास्त्रीय विचार परंपरेमुळे वेबरच्या विचारांना अनन्य साधारण महत्व दिले आहे. आधुनिक समाजशास्त्राचा पाया घालण्याच्या दृष्टीने मॅक्सवेबरच्या चिंतनाला निर्णायक महत्व आहे. सामाजीक तत्वज्ञानाच्या शृंखलातून समाजशास्त्राला मुक्त करुन समाजशास्त्राला स्वतंत्र व वैशिष्टपूर्ण आणि

स्वायत्त असा दर्जा प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने वेबरच्या विचारांचे महत्व वादात आहे. म्हणून समाजशास्त्रात वेबरचे स्थान कार्यात्मक आहे. याचे विवेचन करतांना ॲरान ने काढलेले उद्‌गार फार बोलके आहेत. त्याच्यामते, "वेबर हा सर्वश्रेष्ठ शास्त्रज्ञ आणि हाच एक समाजशास्त्रज्ञ आहे." मॅक्सवेबरने राज्यसंस्थेचा आणि सत्तेचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केलेला आहे. सामाजीक नियंत्रणाची एक यंत्रणा म्हणजे राज्यसंस्था" अशी त्याने राज्यासंबंधीची व्याख्या केली आहे. सामाजीक नियंत्रण प्रस्थापित करण्यामध्ये एक महत्वपूर्ण यंत्रणा या दृष्टीकोनातून वेबरने राज्यसंस्थेचा विचार करित असतांना समाजात मुख्य स्थान स्थापन करण्याच्या दृष्टीने राज्यसंस्थेला अनन्य साधारण महत्व आहे हे मान्य केले. पाशवी बळ वापरण्याचा एकमेव अधिकार हा राज्यसंस्थेला असल्यामुळे ही संस्था मनुष्य विकास निर्मितीचे कार्य प्रभावीपणे करु शकते असे त्याने सांगितले. वेबरने अधिकाराचा विचार करत असतांना समाजाच्या संदर्भातच विचार केला असल्यामुळे त्याने अधिमान्यतेची संकल्पना मांडली आणि सामर्थ्य व सत्ता या दोन संकल्पनांचे महत्व अधिमान्यतेच्या आधारावरच प्रतिपादन करण्याचा प्रयत्न केला. वेबरने तत्कालीन जर्मन राष्ट्राच्या परिस्थितीच्या संदर्भात आपले विचार मांडलेले असल्यामुळे त्याच्या विचारात आपल्याला राष्ट्रीयतेचे पडसाद पडलेले दिसतात. अनेक पाश्चिमात्य विचारवंत आणि लेखक वेबरचे लोकसत्तावादी म्हणून चित्रण करित असले तरी प्रत्यक्षात लोकशाहीचे वेबरद्वारा झालेले समर्थन गरजेपोटीच होते हे लक्षात ठेवणे अत्यावश्यक आहे. वेबर वृत्तीने पक्का राष्ट्रवादी होता. पण त्याचा राष्ट्रवाद देशावरील प्रेमापुरताच मर्यादित नव्हता. त्याने राष्ट्रा-राष्ट्रांमधील संबंधाचा मानवतावादी मुल्यांच्या आधारे विचार केला. संघर्ष-स्पर्धा-चुरस राष्ट्राराष्ट्रामध्ये असतेच व निरनिराळ्या मार्गानी ती अभिव्यक्त होत असते. त्यामुळे संघर्ष हा मानवी जीवनातील एक दुसऱ्यास आवश्यक आहे असे वेबर मानतो. तो पक्का राष्ट्रवादी असल्याने जर्मन राष्ट्रवादाला सामर्थ्यशाली बनविणे या मताच्या वेबरने आग्रही पुरस्कार केला असल्यास नवल नाही. पण या राष्ट्रीय सामर्थ्याचा एक साधन या अर्थी ज्याप्रमाणे विचार केला आहे त्याप्रमाणे राष्ट्रीय सामर्थ्य हे वेबरसाठी एक साध्य देखील होते. संस्कृतीच्या प्रसाराला शक्तीचे पाठबळ असेल तर राष्ट्राच्या

संस्कृतीचा झपाट्याने प्रसार होतो व म्हणून राष्ट्राचे सामर्थ्य हे संस्कृती प्रसाराचे एक साधन ठरते. पण कोणत्याही राष्ट्राचे श्रेष्ठत्व हे त्या राष्ट्राच्या सामर्थ्यावरच अवलंबून असते. त्यादृष्टीने राष्ट्रीय सामर्थ्याचा विचार केल्यास ते साध्य स्वरुप ठरते. वेबरने राष्ट्रीय सामर्थ्याचा विचार केला आहे, असे नव्हे तर समाजातील प्रभुत्वाचाही विचार केला. प्रभुत्व हा राजकिय वर्तनाचा स्थायी भाग आहे, असे त्याने सांगितले. प्रभुत्वाशिवाय राजकिय वर्तनाची कल्पनाच करता येणार नाही. मानवाचे मानवावरील वर्चस्व आणि प्रभुत्व ज्या-ज्या वर्तनामध्ये प्रतिबिंबित होते, त्या सर्व वर्तन प्रकारांना आपण राजकिय विश्लेषण लावू शकतो. या प्रभुत्वामध्ये किंवा वर्चस्वामध्ये दडपशाहीचा अंत असू शकतो, आणि राजकिय वर्तन हे आर्थिक वर्तनांपेक्षा निराळे असते. राजकारणाचा विचार वेबरने प्रभुत्वाच्या दृष्टीकोनातूनच केला आहे. एकाने अनेकांवर आणि एका गटाने दुसऱ्या गटावर आपले वर्चस्व आणि प्रभुत्व प्रस्थापित करुन ते कायम टिकविण्याचा प्रयत्न म्हणजे राजकारण. ही राजकारणाची व्याख्या वेबरला अभिप्रेत होती. तसेच ही राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारणाची व्याख्या मॅक्सवेबरच्या विचारातील प्रभावात होती असे म्हणावे लागेल. वेबरने सामाजीक कार्याच्या संदर्भात अभ्यास केलेला आहे. सत्तेचा अभ्यास करीत असतांना सत्तेच्या न्यायतेचीही दखल वेबरने घेतली आहे. किंबहुना अधिमान्यतेच्या आधाराचाच प्रामुख्याने विचार करुन सत्तेचे प्रकार मांडण्याचा त्याने प्रयत्न केलेला आहे. प्रभुत्वाच्या न्यायतेवर विश्वास निर्माण होण्याची जी कारणे आहेत त्याच आधारावर वेबरने तीन प्रमुख प्रकार सांगितले -

१) दैवीगुणाष्ठीत प्रभुत्व आणि दिव्यवलयी सत्ता -

२) परंपराधिष्ठित प्रमुख -

**३) कायदाधिष्ठीत सत्ता / प्रभुत्व -**

प्रभुत्वाच्या प्रभावासंबंधीच्या विवेचनात वेबरचा उद्देश प्रभुत्व प्रकाराची वैशिष्ट्ये विषद करण्याचाच नव्हता तर त्या वैशिष्ट्यांच्या विवेचनाबरोबर त्यास आर्थिक, धार्मिक आणि राजकिय संस्थांमधील परस्पर संबंधाचे विश्लेषण करावयाचे होते. विशिष्ट अर्थव्यवस्था व विशिष्ट विधी यांचा कशा प्रकारचा संबंध असतो, दैवीगुणाधिष्ठीत प्रभुत्वाचा अर्थव्यवस्थेवर कसा प्रभाव पडतो हे प्रश्न वेबरच्या राजकारणाच्या समाजशास्त्रावरील

विवेचनात जास्त महत्वाचे आहेत. आधुनिक काळात नोकरशाहीला सत्ता प्राप्त झाली असली तरी वेबरच्या मते, राज्याचे नेतृत्व करण्याची पात्रता त्यांच्या अंगी असत नाही. त्या नोकरशाहीला मिळणाऱ्या प्रशिक्षणामुळे त्यांच्या अंगी शिस्त बनते. नियमांची अंमलबजावणी करण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण होते. पण राज्याचे नेतृत्व ते कधीच करु शकत नाहीत. कारण राज्याचे नेतृत्व करण्यासाठी वेगवेगळ्या गुणांची आवश्यकता भासते. लोकशाहीमध्ये निवडणुक स्पर्धा असते. त्यामुळे व्यक्तिला आपल्या अंगचे गुण प्रकट करण्याची संधी त्यांना मिळते आणि म्हणूनच राज्यासाठी समाजाचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तिच योग्य असतात असे वेबरने लोकशाहीचे समर्थन केले आहे.

वेबरची राजकिय मते टिकेचा विषय होण्याची अनेक कारणे आहेत. मॅक्सवेबरला अभिप्रेत असलेली लोकशाही आणि अब्राहम लिंकनच्या व्याख्येतून व्यक्त होणारी लोकशाही यात अंतर आहे. वेबरला कोणती लोकशाही अभिप्रेत होती याचे स्पष्टीकरण करतांना ॲरॉनने असे म्हटले आहे की, "डिगॉलच्या नेतृत्वाखालील असलेल्या फेंचच्या प्रशासनाचे जे स्वरुप होते त्याच स्वरुपाच्या लोकशाहीचा पुरस्कार वेबरने केला आहे." लोकनेत्यासंबंधीचा वेबरच्या कल्पनेत दोन गोष्टींचा संबंध आलेला दिसून येतो. एक तर नेता हा अलौकिक गुण असलेला असावा व दुसरे त्याची निवड लोकांनी केलेली असावी तरच खऱ्या अर्थाने तो लोकनेता ठरु शकतो.

***

# संदर्भ ग्रंथसुची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | भोळे भा.ल. | - | पाश्चिमात्य राजकीय विचारवंत<br>पिंपळापुरे बुक डिस्ट्रिब्युटर्स, नागपूर २००२ |
| २. | कुलकर्णी अ.ना. | - | आधुनिक राजकीय विचारप्रणाली<br>पाश्चिमात्य राजकीय विचारप्रवाह |
| ३. | गर्दे दि.का. | - | पाश्चिमात्य राजकीय विचारप्रवाह<br>गो.य. राणे प्रकाशन, पुणे १९९७ |
| ४. | डॉ. डोळे ना.य. | - | प्रमुख पाश्चिमात्य राजकीय विचारवंत<br>विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद |
| ५. | दाते सुनिल आणि<br>आडगावकर सुनिल | - | पाश्चिमात्य राजकीय विचारवंत<br>पिंपळापुरे ॲण्ड पब्लिशर्स कंपनी, नागपूर<br>१९८४ |
| ६. | शृंगारपुरे अरविंद<br>विचारवंत | - | समग्र भारतीय आणि पाश्चिमात्य<br><br>विद्या प्रकाशन नागपूर, २००१ |
| ७. | डोळे ना.य. आणि<br>माकणीकर गंगाधर | - | पाश्चिमात्य राजकीय विचारवंत<br>जयभारत बुक सेंटर, वजिराबाद, नांदेड |
| ८. | घांगरेकर चिंतामण | - | राज्यशास्त्र सैध्दांतिक राजकीय विचार<br>के. सागर पब्लीकेशन्स, पुणे |
| ९. | डोळे ना.य. | - | राजकीय विचारांचा इतिहास<br>कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९६९ |
| १०. | कुलकर्णी सुधाकर | - | पाश्चात्य राजकीय विचारवंत<br>विद्या प्रकाशन, नागपूर |
| ११. | डॉ. देवरे पी.डी.<br>डॉ. निकुंभ दिलीपसिंह | - | पाश्चिमात्य राजकीय विचारवंत<br>प्रशांत पब्लीकेशन्स, जळगाव |
| १२. | डॉ. राठी शुभांगी | - | पाश्चिमात्य राजकीय विचारवंत<br>कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबादकर |
| १३. | डॉ. राठी शुभांगी | - | आधुनिक राजकीय विचारप्रणाली<br>अथर्व पब्लिकेशन्स, जळगाव २०१३ |
| १४. | डॉ. डोळे ना.य. | - | अभिजात विचारप्रवाह<br>य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक ऑगस्ट -<br>२००४ |
| १५. | डॉ. मेटकर रामकृष्ण<br>विचारप्रवाह, भाग-१<br>२००४ | - | आधुनिक काळातील पाश्चीमात्य राजकीय<br>य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक ऑगस्ट - |
| १६. | प्रा. बोरगावकर मनोज<br>विचारप्रवाह भाग-२<br>डॉ. देवळाणकर शैलेंद्र<br><br>प्रा. मुसळे सोपान | - | आधुनिक काळातील पाश्चिमात्य राजकीय<br><br>य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक ऑगस्ट -<br>२००४ |
| १७. | साखळकर एकनाथ | - | पाश्चात्य राजकीय विचारवंत |

| | | | |
|---|---|---|---|
| | जैन अशोक | | संत पब्लीशर्स, मुंबई १९९० |
| १८. | डॉ. अमृतकर प्रशांत | - | पाश्चिमात्य राजकीय विचार<br>चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद |
| १९. | कुमार अशोक | - | राजनीती विज्ञान<br>उपकार पब्लीकेशन्स, आगरा २०१२ |
| २०. | फाडिया बी.एच.<br>(प्लेटो से मार्क्स) | - | पाश्चात्य राजनीतिक चिन्तन का इतिहास<br>साहित्य भवन पब्लिकेशन, आगरा २००६ |
| २१. | गौतम पी.बी. | - | प्रमुख राजनीतिक विचारक<br>नॅशनल पब्लिशिंग हाऊस, दिल्ली - १९७३ |
| २२. | फाडिया बी.एल.<br>(बेंथम से वर्तमान तक) | - | आधुनिक राजनीतीक चिन्तनका इतिहास<br>साहित्य भवन पब्लिकेशन, आगरा |
| २३. | कार्ल मार्क्स | - | भांडवल भाग - १ |
| | भाषांतर | - | वसंत तळपुळे भाग - १<br>प्रागतिक पुस्तक प्रकाशन, पुणे |
| २४. | रुसो जे.जे. | - | सामाजिक करार |
| २५. | भाषांतर व.भ. कर्णिक | - | साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई |

***

-



# पाश्चिमात्य राजकीय विचारवंत

## लेखक परिचय

### प्रा. डॉ. संभाजी संतोष पाटील

(एम.ए., बी.एड., एम.फील., पीएच.डी.)

| | |
|---|---|
| सहयोगी प्राध्यापक | - श्री. शि. वि. प्र. संस्थेचे भाऊसाहेब ना. स. पाठील साहित्य आणि मु. फि. मु. अ. वाणिज्य महाविद्यालय, देवपूर धुळे. |
| अध्यक्ष | - खान्देश राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद |
| सहा. संपादक | - विचारमंथन संशोधन पत्रिका |
| मा. केंद्रसंयोजक | - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. |
| अध्यक्ष | - रिअल इंडो ग्लोबल व्हिजन सोशल डेव्हलपमेंट गुरूकुल फाउंडेशन, धुळे. |
| मा. जिल्हाध्यक्ष | - ओ. बी. सी. सेवा संघ, धुळे. |
| मा. व्यवस्थापक | - शिवगंगा बायोटेक |
| | - स्पर्धा परिक्षा व व्यवसाय मार्गदर्शन केंद्र, श्री. शि. वि. प्र. संस्थेचे महाविद्यालय, धुळे. |
| समन्वयक | - करिअर कट्टा, श्री. शि. वि. प्र. संस्थेचे महाविद्यालय, धुळे. |
| पुरस्कार | - गुरुगौरव पुरस्कार २०१७ |
| | - भारत शिक्षा रत्न अवार्ड 2021 |
| आदर्श गुरुजन पुरस्कार | - २०२१ |
| | - राज्यस्तरीय गुरुगौरव पुरस्कार २०२२ |
| | - महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत उत्कृष्ट विभागीय महाविद्यालयीन समन्वयक पुरस्कार २०२२ |
| | - राज्यस्तरीय लोकराजा राजर्षी शाहू गौरव |

पुरस्कार २०२३

- राज्यस्तरीय समाजभुषण पुरस्कार २०२३
- राष्ट्रीय शिक्षारत्न पुरस्कार २०२३
- नेशन बिल्डर अवार्ड २०२४

• आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य विभागीय परिषदा व चर्चासत्रात विविध विषयांवर शोधनिबंध सादर व १४ पुस्तके प्रकाशित.

• वर्तमानपत्र व नियतकालीकातून लेख प्रसिध्द, विविध विषयांवर भाषणे दिलेली आहेत. तसेच ७५ लेख प्रकाशित.

• विविध विषयांवर मार्गदर्शन व प्रभावी व्याख्याने

• सामाजिक कार्य तसेच विविध जनप्रबोधनात्मक जनजागृती रॅलीचे आयोजक.

***